विषय काव्य
सं. नं. ७३२०
१०५३

॥ श्रीदत्त ॥

साठे-ग्रंथ-प्रकाशक-मंडळी

# श्रीदत्त-भजन-पद्यसंग्रह

श्रीयुत

विनायक वासुदेव साठे

विरचित

卐

REFBK-0008085

किंमत साडेतीन रुपये

॥ श्रीदत्त ॥

साठे-ग्रंथ-प्रकाशक-मंडळी

# श्रीदत्त-भजन-पद्यसंग्रह

मराठी [illegible]
अनुक्रम ९३२० वि. [illegible]
क्रमांक नों. दि. [illegible]

श्रीयुत

विनायक वासुदेव साठे

विरचित

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
REFBK-0008085
REFBK-0008085

किंमत साडेतीन रुपये

सर्व हक्क स्वाधीन

पहिली आवृत्ति
शक १८७५

प्रकाशक :
श्री. कृष्णाजी भार्गव मुळ्ये, एल्एल्. बी., वकील, टिळक आळी, रत्नागिरी.
श्री. साबाजी रामचंद्र भिसे, बी. ए. ( मुंबई ), बी. ए. ( लंडन ),
इन्स्पेक्टर, बँक ऑफ् इंडिया, मुंबई.

मुद्रक :
बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २.

साहाय्यक

**दि. ब. रामचंद्र महादेव भिसे,** बी.ए., एल्एल्. बी.,
रिटायर्ड डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज्ज; रिटायर्ड चीफ जस्टिस, कोल्हापूर हायकोर्ट; प्रेसिडेंट, सेल्स टॅक्स ट्रायब्यूनल; प्रेसिडेंट, को-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनल, मुंबई.

**श्री. दत्तात्रेय भिकाजी वरेरकर,**
रिटायर्ड मॅजिस्ट्रेट, फर्स्टक्लास, रिटायर्ड रेव्हिन्यू सेक्रेटरी, कोल्हापूर, खासगी कारभारी, जत (दक्षिण सातारा).

**श्री. भार्गव विनायक मुळ्ये,**
रिटायर्ड गव्हर्नमेंट प्लीडर अँड पब्लिक प्रॉसिक्युटर; वकील, रत्नागिरी.

---

अनुमोदक

**प्रो. विनायक हरि दाते,** एम्. ए., पीएच्. डी.
प्रोफेसर ऑफ फिलॉसफी, महाराजा कॉलेज, जयपूर (राजस्थान).

---

साठे-ग्रंथ-प्रकाशक मंडळी – व्यवस्थापक कमिटी – कांहीं नांवें

श्री. दत्तात्रेय भिकाजी वरेरकर

श्री. कृष्णाजी भार्गव मुळ्ये
श्री. नरहरि भिकाजी वरेरकर
श्री. लक्ष्मण विनायक मुळ्ये
श्री. भिकाजी बाळकृष्ण नाटेकर
श्री. यशवंत जगन्नाथ जोशी
श्री. बाळकृष्ण जनार्दन आठवले

---

# शुद्धिपत्र

| पद्यांक | पृष्ठांक | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १०५ | ५९ | ७ | सिद्धिदे | सिद्धि दे |
| १५१ | ८७ | ११ | अघात | आघात |
| १८० | १०० | १७ | हस्त | हस्तीं |
| २२० | ११६ | ३ | विरति बळ | विरतिबळ |
| ,, | ,, | ८ | पुष्ट | तुष्ट |
| २२८ | ११९ | ९ | ताप सहावा हृदयीं | ताप सहावा हृदयीं सार |
| २७९ | १३७ | १२ | परमार्थिकी | पारमार्थिकी |
| ३०४ | १५० | ६ | हारकती | हारक ती |
| ४३९ | २०७ | १० | स्मित- | सित- |
| ४६१ | २२० | १४ | वण्ड-मूर्ख | गण्ड-मूर्ख |
| ६६९ | ३१४ | ३ | स्वादमधुर | स्वाद मधुर |
| ६७१ | ३१४ | २२ | जणुनि | जाणुनि |

# प्रकाशकांचें निवेदन

श्रीयुत विनायक वासुदेव साठे यांचें कोंकणप्रांतांत रत्नागिरी येथें खासगी देवस्थान आहे. त्या देवस्थानाकडे उपासनेचीं कार्यें चालू असतात. त्यांमध्यें श्री. साठे यांनीं पद्यरूपानें केलेली रचना आज जी उपलब्ध आहे त्यापैकीं निवड करून प्रकाशनाचें काम करण्यासाठीं साठे-ग्रंथ-प्रकाशक मंडळीनें आम्हांला नेमलें आहे.

सदर मंडळीच्या आदेशानुसार व हें ईश्वरोपासनेचें काम आहे आणि आम्ही त्या ठिकाणीं बहुतेक वेळां हजर असतों व हें देवस्थानचें काम म्हणून कर्तव्यबुद्धीनें आम्हीं आपल्या अंगावर घेतलें आहे.

या पुस्तकाला बराच खर्च आलेला आहे हें ध्यानांत आणून पुस्तकाची किंमत ठरविलेली आहे. यांत फायद्याचा प्रश्न नसल्यामुळें तो जमेस धरलेला नाहीं. जेवढा वास्तविक खर्च आला तेवढाच प्रती घेणाऱ्यांवरतीं बसावा अशी यांत योजना केलेली आहे; आणि यामुळें या पुस्तकाची किंमत अल्प ठेवितां आलेली आहे. तेव्हां या स्थानापैकीं ज्या भाविक मंडळींनीं यांत द्रव्यरूपानें मदत करण्याचें आपण होऊन कबूल केलें आहे व ज्यांच्यापासून द्रव्यनिधि घेण्याला कोणतीही हरकत नाहीं अशी मंडळीची समजूत अनुभवानें बनलेली आहे अशाच लोकांकडून मंडळीनें मदत घेण्याचें ठरविलें आहे.

यामध्यें मंडळीनें दोन भाग पाडले आहेत. या पुस्तकाच्या प्रती विकून झाल्यानंतर ज्यांना आपली रक्कम परत पाहिजे असेल त्यांना ती बिनव्याजीं परत देण्याचें योजिलें आहे. ज्यांना परत घ्यावयाची नसेल त्यांची रक्कम मंडळीकडे जमा राहील व मंडळी ठरवील त्याप्रमाणें ती बँकेंतून ठेवण्याची मंडळीची मनीषा आहे.

हीं पद्यें छापून प्रकाशित करावीं असा पुष्कळांचा आग्रह असल्याकारणानें आम्ही तीं छापून काढीत आहोंत. ज्या भाविक मंडळींना या कार्याला द्रव्यरूपानें किंवा कोणत्याही तऱ्हेनें मदत करावयाची असेल त्यांनीं ती मंडळीचे परवानगीनें करावी.

# शुद्धिपत्र

| पद्यांक | पृष्ठांक | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १०५ | ५९ | ७ | सिद्धिदे | सिद्धि दे |
| १५१ | ८७ | ११ | अघात | आघात |
| १८० | १०० | १७ | हस्त | हस्तीं |
| २२० | ११६ | ३ | विरति बळ | विरतिबळ |
| ,, | ,, | ८ | पुष्ट | तुष्ट |
| २२८ | ११९ | ९ | ताप सहावा हृदयीं | ताप सहावा हृदयीं सारा |
| २७९ | १३७ | १२ | परमार्थिकी | पारमार्थिकी |
| ३०४ | १५० | ६ | हारकती | हारक ती |
| ४३९ | २०७ | १० | स्मित- | सित- |
| ४६१ | २२० | १४ | वण्ड-मूर्ख | गण्ड-मूर्ख |
| ६६९ | ३१४ | ३ | स्वादमधुर | स्वाद मधुर |
| ६७१ | ३१४ | २२ | जणुनि | जाणुनि |

क्रमांक 9320

# प्रकाशकांचें निवेदन

श्रीयुत विनायक वासुदेव साठे यांचें कोंकणप्रांतांत रत्नागिरी येथें खासगी देवस्थान आहे. त्या देवस्थानाकडे उपासनेचीं कार्यें चालू असतात. त्यांमध्यें श्री. साठे यांनीं पद्यरूपानें केलेली रचना आज जी उपलब्ध आहे त्यापैकीं निवड करून प्रकाशनाचें काम करण्यासाठीं साठे-ग्रंथ-प्रकाशक मंडळीनें आम्हांला नेमलें आहे.

सदर मंडळीच्या आदेशानुसार व हें ईश्वरोपासनेचें काम आहे आणि आम्ही त्या ठिकाणीं बहुतेक वेळां हजर असतों व हें देवस्थानचें काम म्हणून कर्तव्यबुद्धीनें आम्हीं आपल्या अंगावर घेतलें आहे.

या पुस्तकाला बराच खर्च आलेला आहे हें ध्यानांत आणून पुस्तकाची किंमत ठरविलेली आहे. यांत फायद्याचा प्रश्न नसल्यामुळें तो जमेस धरलेला नाहीं. जेवढा वास्तविक खर्च आला तेवढाच प्रती घेणाऱ्यांवरतीं बसावा अशी यांत योजना केलेली आहे; आणि यामुळें या पुस्तकाची किंमत अल्प ठेवितां आलेली आहे. तेव्हां या स्थानापैकीं ज्या भाविक मंडळींनीं यांत द्रव्यरूपानें मदत करण्याचें आपण होऊन कबूल केलें आहे व ज्यांच्यापासून द्रव्यनिधि घेण्याला कोणतीही हरकत नाहीं अशी मंडळीची समजूत अनुभवानें बनलेली आहे अशाच लोकांकडून मंडळीनें मदत घेण्याचें ठरविलें आहे.

यामध्यें मंडळीनें दोन भाग पाडले आहेत. या पुस्तकाच्या प्रती विकून झाल्यानंतर ज्यांना आपली रक्कम परत पाहिजे असेल त्यांना ती बिनव्याजीं परत देण्याचें योजिलें आहे. ज्यांना परत घ्यावयाची नसेल त्यांची रक्कम मंडळीकडे जमा राहील व मंडळी ठरवील त्याप्रमाणें ती बँकेंतून ठेवण्याची मंडळीची मनीषा आहे.

हीं पद्यें छापून प्रकाशित करावीं असा पुष्कळांचा आग्रह असल्याकारणानें आम्ही तीं छापून काढीत आहोंत. ज्या भाविक मंडळींना या कार्याला द्रव्यरूपानें किंवा कोणत्याही तऱ्हेनें मदत करावयाची असेल त्यांनीं ती मंडळीचे परवानगीनें करावी.

स्थानकार्यासाठीं या प्रकाशित झालेल्या प्रतींपैकीं २०० प्रती श्रीस्थानाकडे विनामोबदला देण्याचें मंडळीनें ठरविलें आहे. श्री. साठे यांनीं परवानगी दिल्यास तशी व्यवस्था करावयाची आहे. पुस्तकांची विक्री करण्यासाठीं खर्च येईल त्यासाठीं मंडळी ठरवील त्याप्रमाणें कमिशन देण्यांत येईल. असा एकंदर या पुस्तकप्रकाशनाचा अहवाल आहे.

श्री. साठे यांजकडील देवस्थानचें छायाचित्र यांत आम्हीं घातलें आहे.

या कामांत ज्यांनीं लेखन, खटपट वगैरे बाबतींत मदत केली त्यांची सेवा श्रीस्थानाकडे रुजू आहे.

सदरहू पुस्तकासंबंधीं सर्व हक्क श्री. साठे यांचे आहेत.

शेवटीं ज्या देवस्थानचें हें कार्य आहे त्या देवस्थानानें आम्हांला मदत करावी व आमचेकडून हें कार्य करवून घ्यावें अशी प्रार्थना करून हा प्रस्तावनेदाखलचा निबंध आम्ही पुरा करीत आहोंत.

॥ इति शम् ॥

रत्नागिरी
ज्येष्ठ शु. ५, शके १८७५
तारीख १८ मे, १९५३

कृष्णाजी भार्गव मुळ्ये
सावाजी रामचंद्र भिसे

# उपोद्घात

श्रीवासुदेवानंदसरस्वती ऊर्फ टेंब्येस्वामी म्हणून एक महान् सत्पुरुष अगदीं अलीकडच्या काळांत होऊन गेले हें महाराष्ट्रीयांस सांगणें नकोच. वैदिक परंपरेप्रमाणें वर्णाश्रमधर्माचें पालन करून सगुणभक्तीच्या आधारें परमार्थांतील आत्मानुभवाचें अत्युच्च शिखर कसें गांठतां येतें हें त्यांनीं आपल्या आचरणानें दाखवून दिलें आहे. आपल्या अलौकिक सामर्थ्यानें व कृपाप्रसादानें त्यांनीं शेंकडों लोकांना अनेक संकटांतून व दुःखांतून मुक्त करून दत्तोपासनेस लावलें हें विश्रुत आहे. त्यांचे अनेक शिष्य व अनुयायी कर्नाटक, गोमंतक, महाराष्ट्र व गुजराथ येथें अद्याप आहेत. तथापि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून गुरूपदिष्ट मार्गाचें अक्षरशः अवलम्बन करून निरलसपणें गेलीं चाळीस वर्षें अखंड उपासना करीत राहणारे एकच गृहस्थ माझे पाहण्यांत आले आहेत. ते म्हणजे रत्नागिरीस वास्तव्य करून राहणारे श्रीयुत विनायक वासुदेव साठे हे होत. सत्पुरुषास ओळखण्यास दोन साधनें आहेत. एक म्हणजे स्वतः सत्पुरुष असणें; व दुसरें म्हणजे त्या सत्पुरुषाच्या वाङ्मयांत परमार्थाच्या खाणाखुणा सांपडणें हें होय. नुसत्या बुद्धीनें या खुणा समजतील असें नाहीं; कांहीं तरी अनुभवाची जोड असावीच लागते. तथापि जेवढें म्हणून बुद्धीनें अगर उपलब्ध अशा साधुसंतांच्या व औपनिषदीय अनुभवांच्या आधारें जाणणें शक्य आहे, तेवढेंच प्रस्तुतच्या श्रीयुत साठे यांच्या वाणींतून सहज निघालेल्या श्रीदत्त-भजन-पद्यांबद्दल निवेदन करणें शक्य आहे व तें मी श्रीकृपेनेंच करीत आहें. एक गोष्ट सांगून ठेवणें मात्र फार जरुरीचें आहे; ती म्हणजे प्रत्येक पद अगदीं चिकित्सक बुद्धीनें व सत्यान्वेषणाच्या दृष्टीनें तपासून पाहिलें आहे.

श्रीयुत साठे यांच्या पदांचें महत्त्व अनेकविध आहे. ( १ ) हीं सर्व पदें स्वानुभवाधिष्ठित असल्यामुळें साहजिकच उपनिषदांमधील कित्येक स्थळांशीं यांचें विलक्षण साम्य आहे असें दिसून येतें. मधून मधून काव्य असलें तरी कल्पनामय असत्य सृष्टि कोठेंही निर्माण झालेली नाहीं. ( २ ) या सर्व पदांचा अथपासून इतिपर्यंत अभ्यास केल्यास परमार्थमार्ग काय आहे हें कळून येतें. परमार्थाचें विवरण करणारा हा एक पद्यात्मक ग्रंथच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ( ३ ) हीं पदें त्या त्या चालीवर गाणें अगर मननपूर्वक वाचणें म्हणजे

ईश्वराचें भजन करणेंच होय. ईशगुण गाणें व गाण्यांत रंगून लोकलाज सोडून नाचणें हें भगवंतास अत्यन्त प्रिय आहे. गायन-कला हें एक दुधारी शस्त्र आहे. मनोभावना उच्छृंखल होऊन मनुष्याला अधःपातास नेणें अगर उदात्त व शुद्ध बनून त्यास देवकृपेस पात्र करणें या दोन्ही गोष्टी गायन-कला घडवूं शकते. हें जाणूनच कीं काय पदकर्त्यांनीं हीं पदें परमेश्वरप्राप्तीचें एक अचूक साधन म्हणून आमचे हातीं दिलीं आहेत. तेव्हां हा पदरूपी दुःखदोषांतक मेवाच आहे यांत संशय नाहीं.

आतां वर म्हटल्याप्रमाणें या पदांत स्वानुभव व परमार्थशिकवण कशी गोवलीं गेलीं आहेत हें आपण पदांच्याच अनुरोधानें पाहूं. तत्पूर्वी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं स्वानुभव कथन करतांना स्वतःच्या मोठेपणाचें प्रदर्शन करणें हा हेतु नसून मोक्षदायक गुरु व तत्कथित मार्ग किती सत्य आहेत हें सांगण्याचा आहे.

अगदीं प्रथमच पद दोनमध्यें पदकर्त्यानें स्वतःबद्दल दत्तांनीं वरद होऊन निजगुह्य सांगितलें आहे असें म्हटलें आहे. कामदुघा अशा गुरुचरितकथा ऐकल्यानें दुःखांचा व कामनांचा उपशम होऊन चित्त शांत होतें व सहज विरक्तता बाणते व मी ईशयशगायनानें भान विसरून प्रेमानें डुलूं लागतों असें ते सांगतात ( १४ ). श्रीटेंब्येकुळींच्या वासुदेवाचें चरित्र वाचेला आलें तर त्याहून दुसरी पावनगंगा जगांत नाहीं, त्यामुळें कामाचा पिंगा थांबून प्रेमोद्गम हृदयांत फुलून येतो व भय व चिंता विसरून जाऊन जीवन्मुक्तता लाभते असें अनुभवावरून ते सांगतात ( २२ ). विकारांना वश न होणारा, सह्यगिरीवर आतपवर्षादिक सहन करणारा, स्वानंदीं एकला रमणारा, पण रूपानें गोजिरा दिसणारा माझ्या हृदयींचा प्यारा देव झोटिंग असूनही सर्वांवर करुणा करणारा, कोमल हृदयाचा व स्मरतांक्षणींच प्रगट होणारा विनायकाचा जीवनरसच आहे ( १७४ ). ह्यास विसरण्यास प्रयत्न केला तरी विसरत नाहीं; माझ्या इंद्रियांस भुलवून, चित्त चोरून यानें माझ्या देहींचा थारा घेतला आहे; माझ्यासंगेंच हा निजतो व बसतो, यामुळें मलाही जागृतीं, स्वप्नीं व सुषुप्तिकाळीं याचाच ध्यास लागून राहिला आहे; याविना मला गमत नाहीं; इतकेंच काय पण जेथें विनायक तेथें तो प्रभु आहे याबद्दल मुळींच संशय धरूं नका

अशी अत्यन्त मोठ्या अनुभवाची गोष्ट ते सांगतात ( १७७ ). अहो, छाया जशी पुरुषाला सोडीत नाहीं तशी माझी हा संगत सोडीत नाहीं, हा माझें मन मोडीत नाहीं, व माझ्या सुखदुःखाबरोबर हा सुखी दुःखी होतो, मजला पाठीं घालून आपण संकटीं पुढें उभा राहतो व माझ्या विपत्ति भोगतो. काय ह्याच्या अंतरंगाच्या कळवळा व अनुराग कीं मजसाठीं हा सदैव जागा आहे ! मजवर अनुपम प्रेमाचें छत्र धरून त्याचा मी जो दास त्या विनायकाचाही हा जणूं दास बनून राहिला आहे ( १७८, १८६, २१८, २२६, २४३, २४७ ). पदकर्ते स्वानुभव म्हणून पुढें सांगतात कीं अशा या सर्वेश्वर दत्ताची सेवा केल्यास तुला कांहीं उणें न पडून त्रिभुवनाची सत्ता तुझ्या हातीं येईल, तूं विश्वाची खबर काढशील व सर्व वैभव झगटून येईल. म्हणून ते देवाला म्हणतात कीं मला निजहातीं घट्ट धरून, निजसंगीं नाचीव व मला नाच्या बनव, कारण त्यामुळें माझें द्वैत जाऊन मी अविनाशी दत्तरूपानें स्वानंदांत राहीन ( २२४, २४१, २५२, २५८ ). तसेंच मी स्मितमुख देव पाहिला, यानें माझी सर्व काया झांकून सर्वतोपरी मला वेष्टून टाकिलें असा अनुपम अनुभव आल्याचें ते सांगतात ( ४८६, ५११, ५५७ ). शेवटीं, आत्मसाक्षात्काराची परमोच्च कसोटी म्हणून ते लिहितात कीं बाह्य व अभ्यंतरीं कृष्णसंगती अत्रुटित जडली पाहिजे जेणेंकरून निस्सीम आनंदाच्या वृत्तीखेरीज मनाच्या इतर सर्व वृत्ति विरून जाऊन, कुब्जेप्रमाणें मी स्त्री व हा कृष्ण असें देहभिन्नतेचें भानही गळून जाऊन सद्गुरु व देव यांचें एकदम दर्शन होईल ( ६३६, ६३३, ७२७ ).

वर निर्दिष्ट केलेले अनुभव ज्याच्या प्रत्यहीं अंगवळणीं पडले अशा महानुभावी पुरुषानें केलेला उपदेश साहजिकच प्रभावशाली असला पाहिजे यांत मुळींच संशय नाहीं. हा उपदेश काय आहे हेंच खरोखर आपणांस मुख्यतः पाहाणें आहे. कारण दुसऱ्याचा अनुभव कितीही श्रेष्ठ असला तरी जोंपर्यंत स्वतःला तसा अनुभव येत नाहीं तोंपर्यंत त्याचा कांहीं उपयोग नाहीं. पण जर कोणाला तसा अनुभव यावा अशी मनापासून इच्छा असेल, त्यानें सत्पुरुषांनीं सांगितलेलाच मार्ग चोखाळण्यास शिकलें पाहिजे. म्हणूनच सिद्धान्तरूपानें योग व वेदान्त यांत वर्णन केलेले अनुभव सगुणोपासनेच्या आधारें साधकांस कसे मिळूं शकतात हें श्रीयुत साठे यांच्याच शब्दांत सांगितल्यानंतर त्यांनीं पदांत सांगितलेल्या साधनमार्गाकडे आतां वळूं.

प्रथमतः हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं एकच देव उपासकांना त्यांच्या आवडी-प्रमाणें नानारूपें घेऊन प्रगट होतो ; तेव्हां भेद न मानतां कोणत्याही एका रूपानें परमात्म्यास भजा ( १९० ) हेंच दृढ व्हावें म्हणून पदकर्त्यांनीं श्रीराम, कृष्ण, विष्णु वगैरे कांहीं देवांसंबंधीं पदें करून येथें संकलित केलीं आहेत. तथापि हा भजनमार्ग सर्वांनाच लाभतो असें नाहीं. पूर्वपुण्य उदयाला येईल तरच गुरुपदीं रति उत्पन्न होईल. सद्गुरूंनीं पूर्ण कृपा करून आत्मरति शिकविली, अर्थात उपासना दाखवून नाम घेत भजनीं मग्न व्हावें असें शिकविलें तरच भजनमार्ग खुला झाला असें समजावें ( २८१, ३११, ३१५ ). हा गुरुदास्यमार्ग प्रथम अवघड वाटेल, पण धैर्य धरून सेवा कर म्हणजे गुरुकृपाच सर्व सिद्धीला नेईल. हा मार्ग आचरण्यास मी समर्थ आहें कीं दुर्बल आहें असा शक्याशक्यतेचा विचार न करतां, निंदास्तुतीला समान लेखून, देहममता व सुखदुःख बाजूला सारून एखाद्या रणयोद्ध्याप्रमाणें सेवाच करावयाची असा निश्चय कर, म्हणजे तुला कालांतरानें इहपर सौख्य पावेल व तूंच परमात्मा व गुरु बनशील. सद्गुरूचें देणें अतुल असून त्याच्या कृपेस अचिंत्य, अगम्य, अलभ्य, अतर्क्य असें कांहीं नाहीं ( ३२३, ३२८, ३३०, ५६२ ). प्रेमासनीं बसून, विषयरुचि आंवरून, सगुण मूर्तीचें ध्यान कर ; आजवर ज्यानें तुझा योगक्षेम चालविला तोच पाठीराखा हरि तुझा आसरा आहे असें जाणून व्यर्थ तळमळूं नको ( २२० – २२४ ). परमार्थांत लागल्यावरही साधकास मार्गांत विघ्नें येतात. मनींचा अभिलाप मरत नाहीं, तर उलट हृदयास वरचेवर दंश करतो ; श्रीहरिमूर्ति ध्यानांत न येतां भलतेंच कांहींतरी येतें, दुष्टसंगति सोडवत नाहीं व एकान्त धरवत नाहीं. अशा वेळीं देवालाच शरण जा व क्षमा माग ( ३९३, ४०३ ). चिंतेची तलवार शिरीं लटकत ठेवलीस तर साहजिकच भजनावरून लक्ष निघून जाईल ; परनार मृत्यूची मूर्ति असल्यानें तिजविषयीं अभिलाष धरूं नको ; नर-जन्म दिल्याबद्दल मातृभाव जागृत ठेव. अहंकार हा भजनसुखाला ग्रासणारा अजगर असल्यानें, तो ज्ञात्यालाही बाधा करितो, म्हणून त्याच्या उर्मी शोधून काढून त्या शमवून टाक ( ४६३, ४६७, ५२१, ५३०, ५६४ ). गुरुभजन न कळत जरी घडलें तरी अनंत जन्मींच्या पातकांचा क्षय होईल ; म्हणून मुंगी जशी मरण आलें तरी साखरेला सोडीत नाहीं तसें उपासनेचें दृढव्रत आजीवित पालन कर ; व प्रारब्धाला व द्वंद्वांना न डगमगतां उपासनेच्या आधारानें सर्व

सहन कर; म्हणजे कृतज्ञतेनें व प्रेमानें केलेल्या भजनानें श्रीगुरु कृपा करतील व तुला विषयवासनेवर जय मिळेल ( ४५२, ४५६, ४६०, ४७१ ). अशा प्रकारें दहा इंद्रियें व मन यांना त्यांचा आहार दिला नाहींस म्हणजे सहजच तुला एकादशीचें उपोषण घडेल व त्याबरोबर अहोरात्र जागा राहून, साधुसंत मिळवून श्रीपतीचें अर्चन व कीर्तन केलेंस तर तुझा अटळ भाललेखही भंग पावेल ( ५०४, ५०५, ५०६ ).

अशा प्रकारें पारमार्थिक एकादशी साधून पुण्य जोडल्यावर व साधक कांहीं स्थिर झाल्यावर साहजिकच त्यास देवाच्या दर्शनाची, स्पर्शनाची व संभाषणाची इच्छा उत्पन्न होते. परम लीन होऊन मी तुला हांका मारीत आहें, तुझें स्वरूप मला डोळे भरून पाहूं दे, तुझ्या चरणीं माझा माथा अर्पण करून तुझ्या तनूला केव्हां मी आलिंगन देईन, व तुझी अमृतमय वाणी माझे कानीं केव्हां पडेल असें त्यास होऊं लागतें ( ४०८ ). उपासनेचा जोर व गुरुकृपा यांमुळें भक्ताची ही कामनाही तृप्त होते. कधीं देवाच्या पायींचा नुपूरशब्द तो ऐकतो तर कधीं मंदस्मित चारुगात्र देवाचें दर्शन त्यास घडतें. कधीं अंगींच्या सुवासानें वेधून जातो तर कधीं जोत्स्नामय अगर सूर्यसम कांतिच पाहतो ( ६२५, ६५१ ). असें सुख अनुभवीत असतांनाच एक नवल घडतें. भक्ताचें धैर्य पाहण्यासाठीं व त्यास निष्काम भक्तियोग शिकविण्यासाठीं प्रभु प्रथम त्याची सकाम भक्ति फलवती करून त्यास मोहांत पाडतो, विपत्ति व दुःखें देऊन अखंडैकरसता भंगते कीं काय हें पाहतो व ज्ञान देऊन वृत्ति विरून जातात कीं अहंकारानें मारवला जातो याची परीक्षा घेतो. स्वजनांस कठोर भाव व त्यांच्या शत्रूचें रक्षण असें विरुद्ध देवाचें चरित्र कसें अशीही शंका साधकांचे मनांत उत्पन्न होते ( १७, ५४४, ७३४ ). याच सुमारास देव रुसून गुप्त झाला असाही चमत्कार साधकांच्या वांट्यास येतो. आतांच मला दिसला, ह्यानें कां बरें आपणांस लपविलें, ह्याच्या वनमालेचा सुवास मला कां येत नाहीं, आलिंगनसुख कां मिळत नाहीं, माझा करुणाघन प्रभु निष्ठुर बनून कसा हो गुप्त झाला, आतां याला मी कोठें शोधूं असा आर्तस्वरानें विलाप करतो ( ३९८, ४१२, ५१० ). माझ्या मतें ही साधकांची द्वितीय काळोखी रात्र होय. इंग्रजी वाङ्मयांत अशी एकच रात्र असते असें मानलें आहे. पण हें बरोबर नाहीं; कारण ही रात्र परमेश्वराचा साक्षात्कार होणेंची पूर्वींची असते. पण भारतांतील

विशेषतः महाराष्ट्रांतील साधूसंतांना माहीत असलेली साक्षात्कारानंतरची ही दुसरी रात्र फारच भीषण असते. देवाच्या स्वरूपाचा अनुभव घेतल्यामुळें संसारांत पुन्हा जाववत नाहीं व देव अधिक कृपा व्हावी म्हणून रुसल्यामुळें पुढचा मार्गही दिसत नाहीं. स्थलसंकोचास्तव ह्याचें अधिक स्पष्टीकरण करणें येथें शक्य नाहीं. असो.

श्रीयुत साठे यांनीं यानंतरच्या साधकांच्या स्थितीचें केलेलें वर्णन फारच बहारीचें आहे. साधक दृढनिश्चयी असल्यावर काळोखी रात्र संपून पुन्हा सुप्रभात होईल. अंतीं मंगल प्रथम अमंगल हाच साचा नियम आहे. वासुदेवगुरूच्या चेल्यास काय उणें आहे? हा उपासनामार्ग एका अर्थी सोपा असला तरी असिधारोपम दुर्गम आहे. लोकमान्यतेच्या मार्गे न लागतां श्रीदत्त॰ सेवारूपी कर्मसिद्धीचा अवलंब कर, मोहाला वारून निजचित्तवृत्तीला धैर्यानें सांभाळ व जें जें घडतें तें सर्व ईशइच्छा असें समजून उदासीनतेनें रहा म्हणजे तुला ईश्वराची जोडी लाभून जीवन्मुक्तता येईल ( ७३७, २८८ ). अहोरात्र भजन करणें हें एकच व्यसन अंतरीं मुरल्यावर देवाच्या कृपेस काय उशीर? देव भक्ताधीन आहे. अनन्यशरण येऊन भजनसुखांत दंग होणें हें एकच भक्ताचें काम आहे. वैकुण्ठ सोडून देव त्याच्याशीं निगडित होईल ( २०, ३३, ९१, ९६ ). पण खरोखर ईश्वरसाक्षात्कार होऊन, त्यांतच भक्त विरून गेला आहे हें जाणण्याच्या कांहीं खुणा आहेत. पैकीं कांहीं खुणा इतरांना दिसण्यासारख्या असोत, पण वास्तविक सर्व स्वतःच अनुभवण्याच्या आहेत. वस्तुजात तोच नटला आहे, अनेकीं एकच पहाणें, द्वैत हारपणें, बहुरूप, बहुनाद, सुवास वगैरेंचा अनुभव येणें, क्रीडनांत गुह्यज्ञान साक्षात् देवापासून मिळणें, भक्तिरसरूपी मद्यपानानें आनन्दातिशय अनुभवणें, डुलणें व नाचणें, कंठ दाटून येणें, नेत्रांतून प्रेमाश्रु स्रवणें, देवाच्या स्पर्शसुखानें तनु पुलकांकित होणें वगैरे अष्टसात्त्विक भाव, देहाचें भान हरपणें, अहंताग्रंथी तुटणें, विस्मित होऊन स्तब्ध बनणें व तोंडांतून शब्द न फुटणें व शेवटीं स्वतःबरोबर आपले पितरही कृतार्थ झाले अशी मनास साक्ष पटणें व देव व गुरु यांचें एकदम दर्शन होणें ह्या सर्व गोष्टी स्वानुभवावांचून कशा समजणार? ( १९१, २१२, २१५, २६२, ३०५, ३१३, ३६७, ३८१, ४८४, ५८१, ५८३, ७२७ ).

ईश्वराचा खरा भक्त ईशकार्य म्हणून केवळ परोपकाराकरतांच सदैव कसा प्रवृत्त होतो हें श्रीयुत साठे यांनीं रत्नागिरी येथील त्यांच्या श्रीस्थानाबद्दल काढलेल्या उद्‌गारांवरून सहज लक्षांत येईल. या स्थानाची विजयपताका त्रिभुवनशिखरीं फडको, वैरी तेजानें भस्म होऊन कलीला धाक पडो व भक्तांची सर्व संकटें, रोग, निवारण होऊन त्यांचा सतत विजय होवो असें पसायदान त्यांनीं मागून घेतलें आहे ( ३४०, ३४२, ३४३ ). ही प्रस्तावना लिहिण्याचें भाग्य माझ्या वांट्यास आल्यानें मला व माझ्या स्वकीयांनाही हें पसायदान मिळो अशी श्रीचरणीं प्रार्थना करतों.

महाराजा कॉलेज,
जयपूर
अक्षय्य तृतीया, गुरुवार
१६–४–१९५३

**विनायक हरि दाते,**
एम्. ए., पीएच्. डी.,
तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व प्रमुख.

( २ )

रत्नागिरी येथें श्री. वि. वा. साठे यांच्या घरीं श्रीदत्ताचें स्थान आहे. केवळ ईश्वरी कृपेनें गेल्या वीस वर्षांपासून या स्थानाशीं माझा संबंध आहे.

श्री. वि. वा. साठे हे भक्ति, ज्ञान व वैराग्य यांची साक्षात् मूर्तिच आहेत व त्यांच्या भक्तिपूर्ण हृदयाची छाप त्यांनीं रचिलेल्या श्रीदत्त-भजन-पद्यसंग्रहांतील पदांत स्पष्ट उमटलेली दिसते. निरनिराळ्या प्रसंगीं रचण्यांत आलेलीं हीं पदें वाचतांना यांत ईश्वरीप्रेरणा, विषय-विविधता, प्रसाद, माधुर्य व अनुभूति या सर्व गुणांचा संगम झालेला दिसून येतो. सर्वच पदें भक्तिरसानें ओथंबलेलीं आहेत. मुमुक्षु-मार्गावरील पथिकांना त्यांनीं मधून मधून दिलेला उपदेश अत्यंत उपकारक आहे हें अनुभवानें दिसून येईल. त्या उपदेशांतील जिव्हाळा व कळकळ यांचा परिणाम मनावर झाल्याशिवाय रहात नाहीं.

चालींचें वैचित्र्य हेंही या पद्यसंग्रहाचें एक वैशिष्ट्य आहे. अनेक पदांच्या चाली नव्या असल्यामुळें तीं पदें जास्तच आकर्षक वाटतात. श्रीस्थानावर हीं पदें

भजनांत नित्य म्हटलीं जात असतांना भजनाला जो बहर चढतो त्याचें वर्णन शब्दांनीं करतां येत नाहीं.

तीनशेंचाळीस पानांचा हा सुंदर ग्रंथ ही श्रीस्थानाची एक देणगीच असून तिच्याबद्दल वाटणारी कृतज्ञता शब्दांत व्यक्त करणें कठीण आहे परंतु ती हृदयांत सदैव रहावी अशी श्रीचरणीं प्रार्थना करतों.

ग्रंथाच्या छपाईच्या बाबतींत महार्घतेच्या व दुर्मिळ वस्तूंच्या काळांतही उत्कृष्ट कागद व टाइप वापरून या ग्रंथाचें बहिरंग आकर्षक करण्याचा कसोशीचा प्रयत्न केलेला आहे यांत शंका नाहीं.

अंजनी,
नागपूर
१६।४।१९५३

व. सी. कानविंदे,
ऑफि. हेडमास्तर, भिडे गर्ल्स् हायस्कूल,
नागपूर.

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठांक |
| --- | --- |
| १. देवप्रबोध व पहांटेचीं पदें | १ |
| २. श्रीगणपति | १८ |
| ३. श्रीशंकर | २६ |
| ४. श्रीविष्णु | ५१ |
| ५. देवी — १. श्रीमहाकाली | ५५ |
| २. श्रीमहालक्ष्मी | ५७ |
| ३. श्रीलक्ष्मी | ५८ |
| ४. श्रीमहासरस्वती | ५८ |
| ६. श्रीसूर्य | ६० |
| ७. अवतार — १. श्रीनृसिंह | ६१ |
| २. श्रीवामन | ६४ |
| ३. श्रीभार्गवराम | ६५ |
| ४. श्रीराम | ६६ |
| ५. श्रीहनुमान् | ६९ |
| ६. श्रीकृष्ण | ७१ |
| ८. श्रीदत्त — १. श्रीदत्त | ८१ |
| २. बालदत्त | १२१ |
| ९. श्रीवासुदेवानंदसरस्वती | १३१ |
| १०. श्रीगुरु | १४६ |
| ११. श्रीस्थान | १६२ |
| १२. भक्ति | १७० |
| १३. भजन — १. भजन | १८० |
| २. करुणापर | १८६ |

| विषय | पृष्ठांक |
|---|---|
| ३. औत्कण्ठ्य | १९६ |
| ४. वात्सल्यपर | २०० |
| १४. कार्यसिद्धि | २०१ |
| १५. उपदेश | २०८ |
| १६. वैराग्य | २२३ |
| १७. ध्यान | २३० |
| १८. वेदान्त | २३४ |
| १९. मन | २३७ |
| २०. एकादशी | २४० |
| २१. संमिश्र | २४३ |
| २२. निरूपणाचीं मूळपदें | २५४ |
| २३. कथाभाग – आख्यानें | २६६ |
| ” ” – संत | ३०९ |
| २४. साभिनय – कीर्तन | ३१३ |
| ” ” – मद्य | ३१९ |
| २५. मांगलिक | ३२१ |
| २६. उत्सव | ३२२ |
| २७. पूजा | ३२७ |
| २८. श्रीस्थानाचा आदेश | ३२९ |
| २९. आरती | ३४० |
| आद्यचरणांची सूचि | ३४१ |



( श्री. साठे यांजकडील देवस्थानचें छायाचित्र )

प्रभव उदित व्हावा वासुदेवा स्वदीय । दिवसमणि जसा कीं पूर्ण उद्दीप्त होय ॥
दहन करित पापी दुष्ट आचारहीन । प्रगट सतत स्थानीं या असो प्रज्वळोन ॥ १ ॥

|| श्रीदत्त ||

श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजकी जय

श्रीपूर्णानंदसरस्वतीस्वामीमहाराजकी जय

## || श्रीगुरुदेवदत्त ||



# श्रीदत्त-भजन-पद्यसंग्रह

## ( १ ) देवप्रबोध व पहांटेचीं पदें

१. भूपाळी ( चाल – उठा उठा सकळिक । वाचे स्मरावा गजमुख )

उठा उठा हो भाविक । बोला अत्रीचा नंदन ।
भक्ति-विरक्तिचा दायक । भवहारक सकळांसीं ।। १ ।।
भस्मलेप सर्वांगाला । जटाभार माथां शोभला ।
व्याघ्रचर्म असे नेसला । तेणें शोभे तापस ।। २ ।।
पायीं खडावा गोजिऱ्या । चालतां वाजती साजिऱ्या ।
येणें घडतां त्या कैवाऱ्या । आगमना सुचविती ।। ३ ।।

संगें चाले कामधेनू। वेद चारी घेतले श्वानू।
विनायक करितो वर्णनू। हृदयीं रूप रेखावें ॥ ४ ॥

---

२. भूपाळी ( चाल – उठा उठा सकळिक। वाचे स्मरावा गजमुख )

जन हो उठा अरुणोदयीं। दत्तचरणां स्मरा हृदयीं।
पातक दग्ध होय निश्चयीं। अनंतकोटी जन्मींचें ॥ १ ॥
दत्त हा अविद्यानाशक। आत्मतत्त्वाचा प्रकाशक।
ज्ञान-विज्ञान-मति-दायक। मोक्षद गुरु सकळांसीं ॥ २ ॥
दत्त योगमार्ग-प्रवर्तक। अखिल बुद्धि-भेदां हारक।
नानाकुतर्क-उच्छेदक। सत्यबोध-प्रापक तो ॥ ३ ॥
दत्त केवळ ज्ञानमूर्ती। आत्माराम परंज्योती।
चैतन्यमात्र अवस्थिती। निखिल ब्रह्मांडीं जया ॥ ४ ॥
दत्त जाणा परमानंद। त्याचा जडतां हृदयीं छंद।
विनायकाला झाला वरद। बोलवी निज गुह्यातें ॥ ५ ॥

---

३. भूपाळी ( चाल – उठा उठा सकळिक। वाचे स्मरावा गजमुख )

उठिं उठीं अनसूयात्मजा। सह्यगिरीच्या राजा।
भक्त उभे दर्शनकाजा। उघडीं कपाट आपुलें ॥ १ ॥
आला प्रल्हाद दैत्यसुत। अतुल जो श्रद्धावंत।
नरहरी प्रगटला त्वरित। ज्याच्यासाठीं स्तंभांत ॥ २ ॥
कार्तवीर्य हात जोडी। प्रेमें स्तवनाला मांडी।
उठा म्हणे हो तांतडीं। सूर्योदय झालासे ॥ ३ ॥

आयुराजा सेवेसाठीं । तत्पर झाला जगजेठी ।
त्याची पुत्राशा मोठी । तुम्हीं पुरविली दत्तात्रेया ॥ ४ ॥
अलर्काचा राज्ययोग । तुमच्या कृपेनें अभंग ।
तुम्हीं तयाचे जिवलग । म्हणुनि भेटी मागतसे ॥ ५ ॥
विष्णुदत्त वेदधर्म । प्रियदास तुमचे परम ।
प्रार्थिताती मंगलधाम । श्रीमुख दावा आम्हांसीं ॥ ६ ॥
बोले विनायक वचन । सकल आले संतजन ।
म्हणति नाथा प्रगटोन । विजय करा भक्तीचा ॥ ७ ॥

---

४. भूपाळी ( चाल—उठा उठा सकळिक । वाचे स्मरावा गजमुख )

जागृत व्हावें श्रीपादा । भक्तवृंदाभयवरदा ।
योगिजनांच्या परमानंदा । आतां उठावें सत्वरीं ॥ १ ॥
भर्गें विश्व अवघें सृजिलें । सूर्यादि प्रकाशित केले ।
तेज तें तुझेंच प्रसरलें । या ब्रह्मांडगोलांत ॥ २ ॥
सर्वभूतहृदयवासी । जगत्सूत्रें हालवीसी ।
इच्छामात्रें तूंच करिसी । सृष्टि-स्थिति-प्रलयादिक ॥ ३ ॥
इंद्र चंद्र वरुण कुबेर । अखिल स्वर्गींचे सुरवर ।
तुझेच ते अंश साकार । त्रैलोक्यधारणासाठीं ॥ ४ ॥
भास्कर त्वदंश उदयोन्मुख । जीवमात्रां देत हरिख ।
द्विजवर होउनी सन्मुख । अर्घ्यें देती त्याप्रती ॥ ५ ॥
वृक्षीं प्रबुद्ध शकुनिगण । करिती मधुर-रव-कूजन ।
अंधःकार जातसे पळुन । येतां अर्क उदयाला ॥ ६ ॥

चंद्रें झांकिली निजकान्ती । तत्पर झाला स्वागतीं ।
सज्जनांची हेच रीती । अन्यमहिमा विस्तारिती ॥ ७ ॥
दिवाभीतें बसलीं लपोन । अमर्षें मुखें झालीं म्लान ।
नीचांचा हाचि स्वभावगुण । परोत्कर्ष न साहती ॥ ८ ॥
तमारि येतां उदयाचळा । भयें निशा कांपे चळचळां ।
पांडुरवर्ण विकळ बाळा । विरोनि गेली लज्जेनें ॥ ९ ॥
प्रिय तुजला काषायवसन । तेंच सविता परिधानून ।
सागरांत करुनी स्नान । तुज वंदाया पातला ॥ १० ।
उठावें तरि अत्रिकुमरा । अनुग्रह मित्राला करा ।
दर्शन देउनी उदारा । आम्हां पुनीत करावें ॥ ११ ॥

---

५. भूपाळी ( चाल — उठा उठा सकळिक । वाचे स्मरावा गजमुख )

उठावें दत्त योगेश्वर । पहावा उषेचा स्वयंवर ।
द्युलोकें नेमस्त केला वर । आदित्य प्रकाशक विश्वाचा ॥१॥
दिव्यरथीं आरुढोनी । सारथ्य अरुणा देउनी ।
निघतसे पाताळांतुनी । बालार्क निज विवाहार्थ ॥ २ ॥
लग्नघटिका प्रभातींची । मंगल वेळा आनंदाची ।
ब्रह्मदेवें योजिली साची । पंचांगीं पाहोनी ॥ ३ ॥
प्रेमें क्षीराब्धि उचंबळला । स्नान घाली मार्तंडाला ।
फेन-धवल-पद्म-माला । देत हातीं तयाच्या ॥ ४ ॥
आकाश-मंडपाचें द्वार । रोधी दैत्य अंधःकार ।
गरुडाग्रजें स्यंदनवर । लोटिला सत्त्वर त्यावरी ॥ ५ ॥

आलोकमात्रें तमोनाश । साधुनि विजयी होय दिनेश ।
मग उत्साहें करी प्रवेश । लग्नमंडपामाझारीं ॥ ६ ॥
तंव तेथें नवरी देखिली । जे स्वर्गंगेमाजि न्हाली ।
लाल साडी असे नेसली । परिणयोत्सुका द्युकन्या ॥ ७ ॥
जागे झाले विहंगम । मांडिती गायन अनुपम ।
तोषली पूर्वदिशा परम । डौल तिचा वर्णवेना ॥ ८ ॥
आलें चक्रवाकमिथुन । त्यांचा संयोग आला घडुन ।
ब्राह्मण उभे अर्घ्य घेऊन । वधूवरांतें अर्पाया ॥ ९ ॥
गांधर्वविधिनें पाणिग्रहण । करी वासरमणी नारायण ।
आल्हादलें विश्व पूर्ण । मीलन होतां दोघांचें ॥ १० ॥
दांपत्य पातलें नमावया । उठा श्रीगुरुदत्तात्रेया ।
आशिर्वाद देवोनियां । त्रैलोक्यातें सुखवावें ॥ ११ ॥

---

### ६. भूपाळी ( चाल – घनश्यामसुंदरा० )

अधर्मध्वंसका दिगंबरा जागा होई आतां ।
असुरभय हरुनि तारीं आम्हां त्वरें शरणागतां ॥ ध्रु० ॥
धरा दीन होउनी आली, सांगे निजदुःखाला ।
ऊठ लवकरि दयाळा, भार न साहवतो तिजला ॥
त्रस्त झाल्या गाई, कृपाळा, हंबरडा फोडिती ।
ब्राह्मण असहाय, अवधूता, हांका तुज मारिती ॥
वाली संतां कोणि न उरला यास्तव ते पळती ।
हीन अवस्था किती तयांची हाल न वर्णवती ॥

हाहाःकार झाला । न कळे धर्म जिवंत कीं मेला ।
न्यायनीति हारपली । विश्वीं अंधःकार भरला ।।
स्वर्गठाव गेले अमुचे आम्हीं स्थानभ्रष्ट झालों ।
या कारणें तव उभे द्वारीं रक्षीं भगवंता ।। १ ।।
जंभदैत्य उन्मत्त होउनी तेणें जग व्यापिलें ।
अधिकार आमुचे सर्वही दैत्यांनीं घेतले ।।
आम्हां गति न कांहीं उरली तुजला शरण आलों ।
पुण्यबल मावळलें सारें हीनसत्त्व बनलों ।।
माया दुर्धर त्यांची देवा गुरफटुनी गेलों ।
जारणमारणादि प्रयोगीं बद्धता पावलों ।।
ऊठ सत्वरीं नाथा । आम्हांसाठीं समर्था ।
घे आयुधें निजकरीं । अमुच्या पुरवाया अर्था ।।
अकारण वैरी हे अमुचे समग्र निवटोनी ।
प्रगट करावी अपुली सदया निजजनवत्सलता ।। २ ।।
गुरूपदेशें पातलों येथ तुझे आश्रमासीं ।
योगनिद्रा सांडुनी देईं आम्हां दर्शनासीं ।।
अनन्य-गतिक सुरगण तुझिये लीन पायांतळीं ।
सांभाळीं वनमाळी जगतीं तूंच आतुर्बळी ।।
प्रार्थना अशि परिसुनि त्यांची द्रवलासी देवा ।
मारवुनी जंभा तयांकरवीं सोडविलें देवां ।।
उठा झडकरी स्वामी । प्रवेशा हृदयधामीं ।
सामर्थ्यवंत करुनी । आम्हां बुद्धि द्यावी नामी ।।

देवां असुर तैसे अमुचे वैरी आम्हां गांजिती ।
धर्मरक्षणासाठीं यास्तव प्रगटो तव सत्ता ॥ ३ ॥

---

७. भूपाळी ( चाल – घनश्यामसुंदरा० )

उठा ज्ञानसागरा योगिन् उषःकाल झाला ।
अज्ञान-तिमिर नासुनि उजळा बोध-प्रभाताला ॥ ध्रु० ॥
जीवशिवांची भेटि घडवुनी साधा मंगलाला ।
गाढतमावरणासीं नासा दावुनि मुखरविला ॥
काम-क्रोध हे षड्रिपु अमुचे जन्माचे वैरी ।
मोहनिशेचे निशाचर आम्हां झपाटिती भारी ॥
भूत प्रेत समंध डाकिनी वासना लौकिकादि ।
ग्रस्त करोनि पीडिती किती त्यां नाहीं अंत आदि ॥
यास्तव उठा त्रिपुरांतका । आम्हां कृपेनें विलोका ।
शत्रुभयें भयभीत । आम्हीं मारितसों हांका ॥
प्रसाद-कवचा लेववुनि करा समर्थ या दासां ।
आपण पुढें होउनी आम्हां पाठीसीं घाला ॥ १ ॥
दुष्टनिबर्हणास्तव शस्त्रें धरितां निज करीं ।
चढवुनि कोपें भृकुटी प्रेरा उग्रास्त्रें त्यांवरी ॥
मद-मत्सर हे महापातकी दुष्मन् जगताचे ।
थैमान घालिती परि रुचति चार जनां त्यांचे ॥
कृष्णवेष परिधानुनि हा कृष्ण मत्सर संचरतो ।
दावुनि कृष्णमय सारें पाशीं आम्हां अडकवितो ॥

दुर्धर झपाटा त्याचा । न चले यत्न मानवाचा ।
गुरफटतां जन होतो । असहाय हीन दीन काचा ॥
करूण अवस्था अशी आमुची करितो हा कपटी ।
उठा सत्त्वरीं दयाळा यासीं लावा शिक्षेला ॥ २ ॥
विचित्र गंधें दर्पित मद हा आम्हां माजवितो ।
प्रमत्त बनवुनि विचारशक्ति आमुची भ्रष्टवितो ॥
भलताच उत्साह उपजवी आग्रह उभारवी ।
जडत्व मतिला आणुनि भारी शुद्धि तिची गळवी ॥
अहितसंगती जडवी करवी संग्रह अपथ्यकर ।
घात योजितो दारूण ऐसा हा दुष्ट अहंकार ॥
याचे हननकाजास्तव । उठावें लवकरि सदाशिव ।
हा महा अजगर मारुनि । जवळीं आम्हां द्या ठाव ॥
आम्हां घट्ट जखडिलें याणें स्वतंत्रता गेली ।
विलम्ब नको अतां कृपाळा उठा तारायाला ॥ ३ ॥
रुचिर-वेष-धर गारुडी नटसा रचुनी शृंगार ।
स्त्रीपानादिक विषय प्रसवतो काम दुर्निवार ॥
दावानलसा क्रोध भाजितो दुष्ट प्राणियांसीं ।
अतृप्त सदा हा लोभ महोदर भक्षी जीवांसीं ॥
मायामोह हा रजस्तमोमय रागात्मक सारें ।
दावुनि करी सुरक्त विश्वा भूल जनीं वितरे ॥
हे प्रवेशुनि सर्वभूतीं । हृदयें परम क्षोभविती ।
द्वैत उपजवुनि चित्तीं । जीवां परस्पर झुंजविती ॥

म्हणोनि प्रार्थना अत्रिकुमरा उठा अरिवध करा ।
पावन दर्शन म्हणे विनायक द्या निजभक्तांला ॥ ४ ॥

---

### ८. भूपाळी ( चाल – घनश्यामसुंदरा० )

उठा अनसूयात्मजा तुमचा जन्मदिन पातला ।
याकारणें उठुनि सत्त्वरीं द्यावें दर्शनाला ॥ ध्रु० ॥
उत्सव करणें आहे आम्हां समारंभ थोर ।
यास्तव आम्हीं असे जमविला पूजासंभार ॥
गीतवाद्यनृत्यांनीं मांडूं भजनाचा गजर ।
कथाकीर्तनीं गाऊं त्वद्यश सुधेहुनी मधुर ॥
नाम-घोष आणि जयजयकारीं भरुं दिगंतर ।
वैकुंठ उतरलें कीं गमवूं क्षण या अवनीवर ॥
यावा आनंदासीं भर । पडावा द्वैताचा विसर ।
समरस होउनि आम्हीं । व्हावें समाधिसुखनिर्भर ॥
अविद्येचे क्लेश गळुनि यावें जीवन्मुक्तपण ।
यास्तव स्तवितों आम्हीं होउनि शरण चरणांला ॥ १ ।
सुरेंद्रासह सुरवर घेउनि आले अप्सरांचा मेळा ।
गंधर्व किन्नर गायक उभे गात यश स्नेहाळा ॥
स्कंधीं टाकुनि वीणा नारद करितो कीर्तनाला ।
तुंबुरु सुस्वर मधुरालापें वर्णी कीर्तीला ॥
प्रज्वाळुनी दीप ओंवाळिती देवी तुज आरती ।
सिद्धी रुळती धरुनी तुझिया महाद्वाराप्रती ॥

उठा अत्रिचे नंदन। करुं चरणांला वंदन।
द्यावें शुभाशिर्वचन। जेणें घडे कार्यसंपादन॥
अपूर्व योग जुळवुनि आणा करा साक्षात्कार।
दावुनि चमत्कार प्रगटवा स्थान-महिम्याला॥ २॥
सगुणवैभव आम्हांलागीं अपुलें दाखवावें।
कृतकृत्यता आमुची करुनी आम्हां गौरवावें॥
नारायण आम्हां नरां बनवुनी किमया हे साधुनी।
निज चरित्र प्रकाशित ठेवा संतत या स्थानीं॥
दुष्ट-शासनीं नित्य असावें जागृत हें स्थान।
कल्पवृक्षासम अभीष्टद भक्तां गाजो महिमान॥
करावें धर्मसंरक्षण। अधर्माचें उच्छेदन।
तैसें कलिला बंधन। निगडित द्यावा ठेवून॥
उपासना जी आजवरि झाली ती फलोन्मुख व्हावी।
संचरुनी भक्तांचे हृदयीं रंगवा उत्सवाला॥ ३॥
अदृश्यरूपें शुकसनकादिक ब्रह्मनिष्ठ आले।
वसिष्ठवामदेवादि मुनीश्वर तेही अनुसरले॥
अलर्क तैसा कार्तवीर्यार्जुन रामही ठाकला।
आयु यदु प्रल्हाद नहुष सेवकगण उभा राहिला॥
विष्णुदत्त वेदशर्मा ससुत करिती आगमन।
नव चैतन्य भरो येथ त्यांचा होईल सन्मान॥
ऋद्धिसिद्धी दासी। याव्या तव कार्यासीं।
पद्मा सहाय होउनी। विनटो सकल वैभवेंसीं॥

शोक मोह नाथ आज सारे विसराया व्हावे ।
विनायकाला स्वरूपीं मिळवुनी साधा विजयाला ॥ ४ ॥

---

९. भूपाळी ( चाल – उठा उठा सकळिक । वाचे स्मरावा गजमुख )

उठा स्वामी वासुदेवा । आम्हां आपुलें मुख दावा ।
पापक्षय सकल व्हावा । तुमच्या पुण्यदर्शनें ॥ १ ॥
गरुडेश्वरीं तुमचे जन । द्वारीं उभे कर जोडून ।
आसक्त सदा त्यांचें मन । तुमच्या पायीं गुरुराया ॥ २ ॥
तरी आतां जागे होउन । बसावें मंचकीं उठोन ।
करावें वदन-प्रक्षाळण । आरती भक्त करिताती ॥ ३ ॥
प्रथम कांकडे आरती । कांकडा भला प्रज्वाळिती ।
नीरांजनें ओंवाळिती । कनकपात्रीं ठेवोनी ॥ ४ ॥
गीत-वाद्य-घोष करिती । तुमचें यश वर्णिताती ।
भूपरागें आळविती । सद्गदित संत भाविक ॥ ५ ॥
फलाहार नैवेद्यासीं । शर्करेसहित नवनीतासीं ।
अर्पिती तुम्हां यतीश्वरांसीं । प्रेमभावना धरोनी ॥ ६ ॥
नर्मदा कृष्णा आणि भीमा । वाट पहाती पुरुषोत्तमा ।
कधीं येसी परंधामा । स्नानार्थ निजपात्रांत ॥ ७ ॥
क्षेत्रें त्वदागमन इच्छिती । स्पर्शें पुनीत होऊं म्हणती ।
याकारणें कामनापूर्ती । करा नाथा सकलांची ॥ ८ ॥
नृसिंहवाटिका औदुंबर । पुण्यपावन गंधर्वनगर ।
कृष्णातटिंचें कुरवपूर । स्थानें अनुग्रहा आपुलीं ॥ ९ ॥

तैसें तुमचें माणगांव । जेथें केला प्रादुर्भाव ।
जागृत होउनी दत्तदेव । तेथें प्रकाश करावा ॥ १० ॥
मागे विनायक साक्षात्कार । येथें तुमचा दयासागर ।
प्रत्यक्ष येउनी पतितोद्धार । करा उषःकाळीं या ॥ ११ ॥

---

### १०. पद ( चाल—उठीं गोपालजी० )

उठा दत्तजी त्यागुनी योगमाया । सत्स्वरूपें अम्हां भेट द्याया ॥ ध्रु० ॥ ज्ञानरवि उगवला । कामविधु लोपला । कर्मभोग सरला ॥ स्वापरूपी ॥ गोपगण ऊठिला । गाई चारी भला । सोऽहं-गीतिला ॥ गाउनीयां ॥ १ ॥ हृदब्जें विकसलीं । भक्तिनें दाटलीं । विवेकें सेविलीं ॥ मधुप बनुनी ॥ चक्रमिथुनापरी । जीवशिवैक्या तरी । प्रगट व्हा नरहरी ॥ साधवाया ॥ २ ॥ अबोधतम नासुनी । चित्तनभीं येउनी । तेज प्रज्वाळुनी ॥ आदरावी ॥ शांतिदेवी उषा । सुगुणतेची मुषा । रामणीयक-कषा ॥ त्रिभुवनीं या ॥ ३ ॥ भावामृत अर्पितों । चरणिं शिर ठेवितों । प्रसाद मी मागतों ॥ परम पुरुषा ॥ उभारुनी निजकरां । अनुग्रहा गुरुवरा । धन्य दासां करा ॥ अत्रितनया ॥ ४ ॥

---

### ११. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

रुद्र पहा शमला । नमनें हा ॥ ध्रु० ॥
मंगल तनु जे त्याची ख्याता । प्रगट करी तिजला ॥ १ ॥
शैल-सुते-सह स्मेरानन हा । शशिभूषण दिसला ॥ २ ॥
शरच्चंद्र-धवल-शीतलमूर्ति । पशुपति हा नटला ॥ ३ ॥

शस्त्रें त्याचीं शांतचि झालीं । सुखवाया सकलां ॥ ४ ॥
अनंत-मुनिगण-सेवित शोभे । सुर स्तविती त्याला ॥ ५ ॥
संरक्षक तो होउनी अमुचा । नाशी पापाला ॥ ६ ॥

---

## १२. पद ( झंपा )

शांत हो शांत हो शमविं कोपास या । शरण आम्हीं तुझ्या वंद्य पायां ॥ ध्रु० ॥ आंवरीं योधतनू । शांतवीं निजधनू । उपसंहरीं कृशानु-॥ दिव्यबाणा ॥ विश्व हें थरथरां । कांपतें शंकरा । सांडिं रे उदारा ॥ मन्यु सदया ॥ १ ॥ दोन तनू वर्णिती । सत्कवी तुजप्रती । मोक्षदा मागती ॥ ज्ञानरूपा ॥ शंतमा प्रगटवीं । अविद्या मालवीं । लेंकरा उपजवीं ॥ ज्ञान सखया ॥ २ ॥ अज्ञ जे दुर्मति । सत्पथा त्यागिती । मारण्यां त्यांप्रति ॥ शस्त्र धरिसी ॥ मधुरशब्दें तरी । विनवितों अंतरीं । सौम्य आम्हां करीं ॥ वांचवाया ॥ ३ ॥ रोग बाधा न हो । सौख्य चित्तास हो । मृति न हो ॥ आमुच्या पुत्रपौत्रां ॥ भक्तजन-रक्षणा । करिं कृपावीक्षणा । वारुनी प्रहरणा । आपुल्या या ॥ ४ ॥

---

## १३. पद ( चाल—माई सरसचि शारदा० )

त्या सेव तूं मोक्षदा
वासुदेव श्रीदत्तावतार जा शरण तरि तया वरदा ॥ ध्रु० ॥
यतिवेषधारी जो मुनीश्वर
दंडकमंडलु शोभविती कर
पायीं खडावा परमहंसवर
त्या भजें ज्ञानदा ॥ १ ॥

भगवी छाटी अंगीं विभूति
त्रिपुण्ड्र टिळा भाळावरतीं
संतुष्टमुद्रा ऐसा मुनिवर
ध्याइं त्या सौख्यदा ॥ २ ॥

मंदमधुर ठेवी वदनीं स्मित
कृपादृष्टिं सर्वां विलोकित
वैराग्याचें रूपक सुंदर
पूजिं त्या कामदा ॥ ३ ॥

विनायकाचा तारक गुरुवर
जो नित्य तयाला करुणाकर
आठवितां ये भरुनी अंतर
गाउं त्या इष्टदा ॥ ४ ॥

---

१४. पद ( चाल—मी समजुं तरि काय० )

गा गुरुचरितसुधा-रसोपम । भरुनि येत सुखें तव हृदय-धाम ।
उठुनि प्रेमलहरी तुज अनुपम ॥ ध्रु० ॥
कामदुघा त्या कथा परिसतां । शांति येते परमचि चित्ता ॥
सहज तरी बाणे विरक्तता । दुःखाचा कीं मूर्तचि उपशम ॥ १ ॥
विनायकाला अनुभव येतो । जेव्हां जेव्हां तद्यश गातो ॥
डुलतो प्रेमें भान विसरतो । कामनांचा होतसे उपरम ॥ २ ॥

---

१५. पद ( चाल—जन सारे मजला० )

गुरुसेवा गमते सुरतरु कीं ॥ ध्रु० ॥
इच्छावें जें शतगुण मिळतें । न्यून न कांहीं कोठें पडतें ॥
शिवचि जितुकें तितुकें घडतें । विशेष होय हा तिचा कीं ॥ १ ॥
भोगैश्वर्या देत जरी ती । भोगदाच तरि केवळ नच ती ॥
शतजन्मींचीं दुरितें जळती । अपूर्वता हेच तिची कीं ॥ २ ॥
अज्ञान हरी जीवांचें ती । ज्ञान-दृष्टि निज भक्तां दे ती ॥
मोक्ष-जनित्री भजकांची ती । कीर्ति तिची अत्यद्भुत कीं ॥ ३ ॥
विनायकाला सद्गति देवो । इहपर त्याचा गौरव होवो ॥
वासुदेव-गुरु प्रीती पावो । ऐशी लाभा येवो कीं ॥ ४ ॥

---

१६. पद ( चाल—जय कृष्णा तटनिवासा० )

हे गरुडेश्वरवासी
दर्शन कधिं मज देसी तळमळ हृदया ऐसी ॥ ध्रु० ॥
धरिसिल प्रगटपणाला
हरिसिल मम तापाला
करिसिल स्थिर स्थानाला
स्थापिसि निजसत्तेला
विश्वास हाच मनाला
सत्य कधीं तो करिसी ॥ १ ॥

---

### १७. पद ( चाल – मी समजुं तरि काय० )

हें चरित तरि काय प्रभो तव । करिसि रक्षणां निज-जन-रिपुंच्या ।
दावुनि स्वजनांस कठोरभाव ॥ ध्रु० ॥
मानुं काय मी प्रियपण अपुलें । कीं म्हणुं हें भजन न तुज रुचलें
दैव काय कीं विरुद्ध आलें । न समजे तरि मनास या लव ॥ १ ॥
पांडवांस बहु कष्ट वनवास । सुयोधना राज्यसुखनिवास ।
स्वविक्रय त्या हरिश्चंद्रास । न कळे कसा काय हा अनुभव ॥ २ ॥

---

### १८. पद ( चाल – सार्थचि ते वदती लोकीं० )

धन्यचि त्यां गणती जगतीं । सद्गुरुची जे कृपा मिळविती ॥ ध्रु० ।
जीविताविधि ज्यां व्रत पद-सेवन । अखंड ज्यांचें न ढळे स्मरण ।
कर्मीं तिष्ठे श्रीश-समर्पण । चित्त आपुलें भजनीं रमविती ॥ १ ॥
व्यवसाय ज्यांचा श्रीगुरुभक्ति । ध्यानीं घडते परमचि मुक्ति ।
स्वभावभूत ज्यां विषय-विरक्ति । त्यांवरि राहे प्रभूची प्रीति ॥ २ ॥

---

### १९. पद ( चाल – तनु ईची सुंदरा० )

मजवनवा गुरुवरा । सेवक निज खरा ।
तिरस्कृत-विषय-रुचि या करा । निज-कृपा-प्रभव दावा जरा ॥
प्रेमा भजनीं मना । द्या दयाघना ।
बोलवा स्वीय यश-वर्णना । साधा याच्या भव-मोचना ॥
ध्यानीं प्रगटुनि । चित्त वेधुनी ।
समाधि-योगीं दृढ जडवुनी । विनायक घ्या जवळि ठेवुनी ॥

---

२०. पद (चाल—तुम्हीं गरिब म्हणुनी०)

जरि मनिं न दया मज करणें। तरि कां भजनीं लावियलें ॥ ध्रु० ॥
कां विफल करितसां आशा। हें काय युक्तसें गमलें ॥
रुचि मला उपजली भजनीं। व्यसन तें अंतरीं मुरलें ॥
तुम्हीं आतां कृपा न जरी केली। होणें काय असे उरलें ॥

---

२१. पद (चाल—मी समजुं तरि काय०)

दे तरि मज अतां प्रभो शिकवण। काय करूं मी कशा उपायें।
साधावें हें भव-जलधि-तरण ॥ ध्रु० ॥
विरक्त कीं मी विषयीं लालस। भजन-सक्त वा ढोंगीच खास।
पाखंड किंवा धरिं श्रद्धेस। न कळे तुजसिं मम प्रियाऽप्रियपण ॥१॥
शिणलों देवा कष्ट साहिले। स्वप्नींही मी सुख न देखिलें।
आजवरि बहु छंद आचरले। अनन्य विनायक आला शरण ॥ २ ॥

---

२२. पद (चाल—स्वार्थचि ते वदती०)

श्रीगुरुमहिमा गा। मनुजा। जीवन्मुक्तता बाणेल अंगा ॥ ध्रु० ॥
प्रेमोद्गम ये फुलुनी हृदयीं। चित्तवृत्ति तव विकसुनि येई।
भयचिंता मन विसरुनि जाई। जडसिल जरि त्या भजनसुरंगा ॥१॥
वासुदेव श्रीटेंबेकुळिंचा। अवतार म्हणती जो दत्ताचा।
चरित्र त्याचें वदे जरि वाचा। त्याहुनि काय ती पावन गंगा ॥ २ ॥
विनायक बोले अनुभव अपुला। नित्य सेवितां यशामृताला।
धाया येते निजजीवाला। कामाचा मग थांबेल पिंगा ॥ ३ ॥

---

## ( २ ) श्रीगणपति



### २३. पद ( चाल – अंध पंगु० )

स्वपद-नतांनां मुक्त करी जी विद्या ती दासी ।
रुळते ज्याच्या चरणिं सदा त्या नमितों गणपतीसीं ॥ ध्रु० ॥
अष्टहि सिद्धि सेविति ज्यासीं त्या गजवदनाला ।
चित्तीं स्मरुनी ध्यानीं धरुनी करितों स्तवनाला ॥ १ ॥
प्रणवाकारी तत्त्वात्मक जो धर्ता जगताचा ।
हर्ता भर्ता ब्रह्मचि जेथें न चले मम वाचा ॥ २ ॥
ब्रह्मांडाचा रक्षण-कर्ता तन्निर्माता ही ।
उपसंहर्ता अपुलेठायीं एकचि जो पाहीं ॥ ३ ॥
सकलदेवतामय परमात्मा अखंड बोधरस ।
सच्चिन्मूर्ती विश्वात्मा जो आनंदचि खास ॥ ४ ॥
एकदंत जो मूषकवाहन पाशांकुशधारी ।
इभ-मुख रक्तोत्पल-पूजित जो भक्तांसीं तारी ॥ ५ ॥
प्रिय अनुलेपन रक्तचंदनें रक्तवसन सेवी ।
भक्तोद्धारीं रक्त जयाची कृपामूर्ति बरवी ॥ ६ ॥

परम वरद जो लंबोदर हा प्रेमें वंदोनी ।
भावितसों गा चित्तीं ऐसें यावा प्रगटोनी ॥ ७ ॥

---

२४. पद ( चाल — स्वार्थी जी प्रीति० )

होईं वा, प्रगट आतां तूं शिवसुता ॥ ध्रु० ॥
निजश्रीदातें संरक्षाया, होईं उद्धरिता ॥ १ ॥
चरणीं आम्हीं लीनचि झालों, होईं सोडविता ॥ २ ॥
आलों दर्शन मागायासीं, धरुनी त्वत्परता ॥ ३ ॥

---

२५. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

नमितों मी गणपतिला । विद्या-सुरतरुला शिवतनयाला ॥ ध्रु० ॥
त्या विघ्नांतक-विभुला । बाहतसें मी भक्तवरदाला ॥ १ ॥
गिरिजा-प्रिय-पुत्राला । सुर-वर-याचित-सिंदुरारीला ॥ २ ॥
त्या परम-मंगलाला । विधि-हरि-हर-नुत-गुण-गण-निकराला ॥ ३ ॥
सुर-वर-गुरुमान्याला । नमितों भावें मुनि-जन-सेव्याला ॥ ४ ॥

---

२६. पद ( झंपा )

जगीं बोलती धन्य तूं विघ्नहर्ता । कृपेनें महत्कल्याणकर्ता ॥ ध्रु० ॥ धातृ-जृंभेंतुनी । दैत्य जो उपजुनि । घेत वर मागुनि ॥ ब्रह्मयासीं ॥ वर-सत्ताबळें। शत्रु त्याचा जळे । इंद्र तोहि पळे ॥ त्यास पाहतां ॥ १ ॥ जिंकुनी त्रिभुवना । भोगि देवांगना । तुहिनगिरि-नंदना ॥ नेत हरुनी ॥ युद्ध होतां भवा । देत त्या परिभवा । स्मरत

तधिं माधवा ॥ रुद्रकांता ॥ २ ॥ फरश मारी हरी । पाडि त्या भूवरी । चरण तेव्हां धरी ॥ शैलतनया ॥ लाज या अवसरीं, । राखिली श्रीहरी । उदरिं बोले तरी ॥ येई आतां ॥ ३ ॥ गर्भ तो वाढला । नारदें कळविला । असुरेंद्र खवळला ॥ चण्डकोपें ॥ शिरुनि गर्भांतरीं । पिशुनता आदरी । शीर्ष शस्त्रें हरी ॥ बालहन्ता ॥ ४ ॥ जन्मतां श्रीपति । करि-शिरा लाविति । गजवदन ठेविती ॥ नाम कुमरा ॥ हर्ष देवांदिकां । सकळ मुनि-नायकां । दुष्टसंहारका ॥ जन्म होतां ॥ ५ ॥ प्रार्थितां सुरवरीं । लोटला सत्वरीं । दानवांसीं करी ॥ संगराला ॥ चिरडुनी निजकरीं । प्राण त्याचे हरी । होय विश्वांतरीं ॥ कीर्ति ख्याता ॥ ६ ॥ माहात्म्य हें जाणुनी । चरण तव वंदुनी । भाव निज अर्पुनी ॥ मागतों मी ॥ करुनि निर्विघ्नता । देई तेजस्विता । धरुनि तूं प्रगटता ॥ होई त्राता ॥ ७ ॥

---

## २७. पद ( चाल – रुचती कां तीर्थ० )

प्रसन्नवदन कोमलांग चारु-गात्र शोभतो ।
गिरिजेच्या रम्य अंकीं शिव-चित्ता मोहितो ।
स्वोत्संगीं शर्व देवीसह स्नेहें घेत तो ।
ध्यानें या गजास्याला हृदयीं मी ध्याइतों ॥ १ ॥

---

## २८. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

बाळ मना रुचला । गिरिजेचा ॥ ध्रु० ॥
घेउनि अंकीं हिमनगबाळा । करि कौतूकाला ॥ १ ॥
चुकवुनि निजमुख चुंबन घडवी । शिवशर्वाणीला ॥ २ ॥

गंगाप्रश्नें करि सामर्षा । जो निज मातेला ॥ ३ ॥
परस्पर-प्रणय-कुपितां पितरां । साधन तोषाला ॥ ४ ॥
वह्निश्वरात्मा उमा-हरांचा । पावो तो मजला ॥ ५ ॥

---

२९. पद ( चाल – पार्था तुज देउनि० )

हैमवती-प्रिय-तनयाला । नमितों तुज गण-राजाला ॥ ध्रु० ॥
विघ्नांचा तूं अंतक असती । कार्यारंभीं तुजला नमिती ।
तेणें सिद्धी भजक पावती । गाती कीर्तीला ॥ १ ॥
त्रिपुरांतक शिव त्रिपुरनाशनीं । आधीं तुजला स्मरला स्वमनीं ।
यश आलें तधिं शरसंधानीं । साधी दहनाला ॥ २ ॥
सृष्टी रचितां ब्रह्मा स्मरतो । विष्णु पालनीं तुजला ध्यातो ।
लय-काळीं शिव सहाय घेतो । तुज गज-वदनाला ॥ ३ ॥
आठहि सिद्धी चरण सेविती । ऋद्धि तुझीये द्वारीं असती ।
शिवगण आज्ञापालन करिती । विद्या वश तुजला ॥ ४ ॥
इंद्रादिक-सुर पद-सेवा-पर । सूर्य-चंद्रमा त्वत्संस्थाधर ।
तव निर्देशीं सकळहि तत्पर । प्रिय तूं विश्वाला ॥ ५ ॥
उपासनाव्रत सफल करोनी । विजय भक्तिचा 'संपादोनी ।
अंतराय मम विध्वंसोनी । दे मज सिद्धीला ॥ ६ ॥

---

३०. पद ( चाल – कधिं करिती लग्न० )

मजलागीं प्रमथनाथा कधिं देसी दर्शना ॥ ध्रु० ॥
आपदा मजसि बाधती । बहुत पीडिती ।
ताप तो अती । मुळीं सहावेना ॥ १ ॥

निःशंक वैरि मजप्रती । लाथ हाणिती ।
कटुक बोलती । करिती अपमाना ॥ २ ॥
विक्षेप कार्य नाशिती । भ्रमांत पाडिती ।
बुद्धि भेदिती । उमज गवसेना ॥ ३ ॥
सत्कर्म तडिस जाइना । विघ्न सोडिना ।
फलास येइना । हेतु समजेना ॥ ४ ॥
आरोग्य तनुस राहिना । रोग सांडिना ।
भोग त्यागिना । अगद चालेना ॥ ५ ॥
प्रापंच तरि न नेटका । नित्य तोटका ।
बनत मोडका । पूर्ति होईना ॥ ६ ॥
परमार्थ दूर लोटिला । स्वार्थ जोडिला ।
फसत दोहींला । मार्ग लाभेना ॥ ७ ॥
विनायक शरण तूजला । लीन जाहला ।
मारि हांकेला । तार या दीना ॥ ८ ॥

---

२१. पद ( चाल — नमिति गजवदन० )

शरण गजवदन तव पद-कमला ।
गणवरा, विघ्नहरा, नत-जन-सुख-बहुला ॥ ध्रु० ॥
अहित-द्रावका गुरुकार्यास्तव ।
दे अभिनव निज-वर-बल-निखिला ॥ १ ॥
विनायकाला विजय द्यावया ।
प्रगट करीं निज मंगल-तनुला ॥ २ ॥

---

३२. पद ( चाल — या नव नवल नयनोत्सवा० )

या तव शरण चरणांबुजा । नमुनी प्रार्थितसें
प्रगटपण धरुनि तूं, साधविं उत्सवकाजा ॥ ध्रु० ॥
विघ्न हराया विघ्नेशा तुज, प्रथम स्मरती सुर-राज ।
स्तवितों म्हणुनी येउनि येथें । कार्य करा गणराजा ॥ १ ॥

---

३३. पद ( चाल — युवति मना दारुण रण० )

सकल-मंत्राधिप गणपति जो
देवगणांचाही
अवन कराया प्रगटो, येथ
सायुध लवलाहीं ॥ ध्रु० ॥
त्रिभुवन-पति राज-राजेश्वर
ज्ञान मूर्त जो का
उपमानात्मक-कीर्ति गणप
भक्ताधीन पाहीं ॥ १ ॥

---

३४. पद ( चाल — मी अधना न शिवे० )

मी नमना करितों, गणाधिपा ।
विघ्नां नासुनि शमविं तापां ॥ ध्रु० ॥
अभिनंदन-नृप-रिपु-विघ्नासुर
झटत सत्कर्म-लोपा
करिं वश
महाप्रतापा ॥ १ ॥

---

३५. पद ( चाल – हा टकमक सूर्य० )

ब्रह्मानुभव प्रथम आविर्भवतां शिवहृदयीं
समाहित-चित्त तो पाही
गणेश, त्या समयीं ॥ ध्रु० ॥
म्हणे पुत्रत्व प्रतिपाळीं
ख्यात होय शिवसुत म्हणुनी
तो, भजावा उपायीं ॥ १ ॥

---

३६. पद ( झंपा )

जगीं देव तो एक हें तत्व माना। नित्य दावी जरी स्वतनु नाना ॥ ध्रु० ॥ तोच ब्रह्म-हरि-हर। तोच तरि विघ्नहर। तोच धरि अवतार ॥ भिन्नरूपें ॥ जेंवि सजावट करि। एक नट परोपरि। तेंवि हा आदरी ॥ वेष-रचना ॥ १ ॥ माया-वरण-पर। तो छद्मरूपधर। त्रैगुण्य-व्यवहार ॥ अंगिकारी ॥ विश्वहित-साधनीं। स्वलीला प्रगटवुनि। तो भवजलधिंतुनी ॥ तारि स्वजनां ॥ २ ॥ विघ्न–हा विघ्नपति। विशेष हा योजिति। भक्तजन ज्याप्रती ॥ गुणारोपें ॥ गणेश महागणपति। सगुण जो श्रीपती। तो विनायकाप्रति ॥ स्फुरे ध्याना ॥ ३ ॥

---

३७. पद ( चाल – कष्ट देति फार दुष्ट० )

जय जय जय शब्द महा जाहला तदा
बालरूप पाहुनि त्या भक्तवरदा ॥ ध्रु० ॥
प्रणमन त्या करिति देव मुनिवरांसह
परस्परां वदति चकित देखुनी मह

कवण कुठिल काय रूप प्राप्त कां इह
प्रार्थिति ते जोडुनि कर लीन अभयदा ॥ १ ॥
परब्रह्म रक्षणार्थ नटुनि थाटलें
अनला-सुर-हनन मनीं आणुनी भलें
देव तुम्हीं गणेश शिशुवेष जाणिले
दूर करा भय अमुचें आश्रितार्थदा ॥ २ ॥

---

३८. पद ( चाल – रुचती कां० )

रत्न-मुक्ताहार गळां तशिं कर्णीं कुंडलें
मृगमद-तिलक भाळीं शेषें कण्ठा भूषिलें ।
दश-बाहू भूषणांनीं परिवेष्टित शोभले
ओळखोनी विनायका गिरिजेनें वंदिलें ॥ १ ॥

---

३९. पद ( चाल – करिन यदुमनीं सद्ना० )

नमन शिव-सुता करितों ।
गणपति-पद सविनय वरीतों ॥ ध्रु० ॥
नत-जन-पातक, सकरुण हरी, तो ।
स्वयें सन्मुख होतो ॥ १ ॥

---

३५. पद ( चाल – हा टकमक सूर्य० )

ब्रह्मानुभव प्रथम आविर्भवतां शिवहृदयीं
समाहित-चित्त तो पाही
गणेश, त्या समयीं ॥ ध्रु० ॥
म्हणे पुत्रत्व प्रतिपाळीं
ख्यात होय शिवसुत म्हणुनी
तो, भजावा उपायीं ॥ १ ॥

---

३६. पद ( झंपा )

जगीं देव तो एक हें तत्व माना। नित्य दावी जरी स्वतनु नाना ॥ ध्रु० ॥ तोच ब्रह्म-हरि-हर। तोच तरि विघ्नहर। तोच धरि अवतार ॥ भिन्नरूपें ॥ जेंवि सजावट करि। एक नट परोपरि। तेंवि हा आदरी ॥ वेष-रचना ॥ १ ॥ माया-वरण-पर। तो छद्मरूपधर। त्रैगुण्य-व्यवहार ॥ अंगिकारी ॥ विश्वहित-साधनीं। स्वलीला प्रगटवुनि। तो भवजलधिंतुनी ॥ तारि स्वजनां ॥ २ ॥ विघ्न–हा विघ्नपति। विशेष हा योजिति। भक्तजन ज्याप्रती ॥ गुणारोपें ॥ गणेश महागणपति। सगुण जो श्रीपती। तो विनायकाप्रति ॥ स्फुरे ध्याना ॥ ३ ॥

---

३७. पद ( चाल – कष्ट देति फार दुष्ट० )

जय जय जय शब्द महा जाहला तदा
बालरूप पाहुनि त्या भक्तवरदा ॥ ध्रु० ॥
प्रणमन त्या करिति देव मुनिवरांसह
परस्परां वदति चकित देखुनी मह

कवण कुठिल काय रूप प्राप्त कां इह
प्रार्थिति ते जोडुनि कर लीन अभयदा ॥ १ ॥
परब्रह्म रक्षणार्थ नटुनि थाटलें
अनला-सुर-हनन मनीं आणुनी भलें
देव तुम्हीं गणेश शिशुवेष जाणिले
दूर करा भय अमुचें आश्रितार्थदा ॥ २ ॥

---

३८. पद ( चाल – रुचती कां० )

रत्न-मुक्ताहार गळां तशिं कर्णीं कुंडलें
मृगमद-तिलक भाळीं शेषें कण्ठा भूषिलें ।
दश-बाहू भूषणांनीं परिवेष्टित शोभले
ओळखोनी विनायका गिरिजेनें वंदिलें ॥ १ ॥

---

३९. पद ( चाल – करिन यदुमनीं सदना० )

नमन शिव-सुता करितों ।
गणपति-पद सविनय वरीतों ॥ ध्रु० ॥
नत-जन-पातक, सकरुण हरी, तो ।
स्वयें सन्मुख होतो ॥ १ ॥

---

# ( ३ ) श्रीशंकर



### ४०. पद ( चाल – भोळानाथ दिगंबर० )

कां तुज चिंता भारी । निशिदिनीं रक्षी तुज त्रिपुरारि ।। ध्रु० ।। मार्कंडेयें स्तवितां प्रगटुनि । यमभय त्याचें वारी । कोपें काळा लत्ता मारी ।। १ ।। सीमंतिनीच्या व्रताचारें । सौभाग्यवर्धन करी । यमुनेंतुनि ये पति बाहेरी ।। २ ।। द्वादशवर्षें परिमित म्हणुनी । रुद्रजप नृप आचरी । दीर्घायु तत्सुत शिव करी ।। ३ ।। सकळां दुर्जय मन्मथ खळ जो । बाण शिवावरी प्रेरी । क्षणें करि त्या दग्ध मदनारी ।। ४ ।। निरसिल सकळहि चिंता जाणीं । सदाशिव तो आदरीं । तेणें मुक्त होइं संसारीं ।। ५ ।।

---

### ४१. पद ( चाल – पार्थी तुज देउनि० )

मृत्युंजय सदाशिवाला । नमितों त्या श्रीसांबाला ।। ध्रु० ।।
उग्र-शरासन करिं घेवोनी
प्राण-हर-निशित-शर लावोनी
अतितर भीषण वेष नटोनी
संहारा आला ।। १ ।।

प्रळयास्तव दृढ-बद्ध-परिकरा
प्रचंड-कोपाग्नि-शिखा-प्रखरा
वांकवुनि धनु करि टणत्कारा
नत त्या रौद्राला ॥ २ ॥

रडवी सकळां अंतकाळिं जो
चरण-नतांचें दुःख हरी जो
निजाश्रितांचे अर्थ पुरवि जो
रुद्र नाम ज्याला ॥ ३ ॥

शुभाशुभ तनू भिन्न जयाच्या
भिन्न-फलप्रद भिन्न गतींच्या
भक्ताभक्तां प्रगटति साच्या
धरि बहुरूपांला ॥ ४ ॥

शंतम-तनु-धर भक्तां शंकर
गिरिजा-प्रियवर पदनत-हितकर
प्रसन्न व्हावा प्रभु तो सत्त्वर
सुख द्याया मजला ॥ ५ ॥

---

४२. पद ( चाल — साध्य नसे मुनिकन्या० )

भोळा प्रभु श्रीशंकर । ब्रह्माण्डासीं करि उपकार ॥ ध्रु० ॥
भगिरथ आणी गंगा भूवर । विश्व वाटे बुडणार ।
निजशिरीं शंभो घे सत्त्वर ॥ १ ॥
मंथन-प्रापित-विष जें दुर्धर । त्रिभुवन दग्ध करणार ।
निजकंठीं घे शिव साचार ॥ २ ॥

देउनि भूति सकळा जगाला । सेवितसे गिरिकंदर ।
झाला आपण मुनि दिगंबर ॥ ३ ॥
सकलार्थांचा भक्तां दाता । अनुपम हा करुणाकर ।
यास्तव सेवीं चरण निरंतर ॥ ४ ॥

---

४३. पद ( चाल—जो भेद विधिनें० )

थोर मी पापी म्हणुनी जरि उबगसी ।
तारी कवण न दीनासीं ॥ ध्रु० ॥
यास्तव स्तवितसें । चरण नमितसें ।
सदया क्षमा भाकितसें ॥ १ ॥
अजामिळ तरला । पुत्रनाम घेतां ।
मज दोष काय उद्धरीतां ॥ २ ॥
इंद्रें वंचिली । गौतमें शापिली ।
अहिल्या पावन त्वां केली ॥ ३ ॥
वाल्या स्तेन–पति । नारद उपदेशी ।
नाम घेतां होय महर्षी ॥ ४ ॥
तरे चांडाळी । बिल्व शिवा वाही ।
पाप जळालें लवलाहीं ॥ ५ ॥
व्याध बहु पापी । उपहास तो करी ।
परी शंकर त्याला तारी ॥ ६ ॥
शरण मी आलों । धरुनि विश्वासा ।
मज तारा हृदयनिवासा ॥ ७ ॥

---

## ४४. पद ( चाल – पंचतुंड नररुंड० )

सज्ज करोनी भव्य शरासन दिव्य भल्ल त्या योजोनी
दुष्टनिग्रहीं सिद्ध जाहला महेश्वर तो धरा ध्यानीं ॥ ध्रु० ॥
अत्युग्र-कोपें तप्त होउनी जटा शिरींच्या विखरोनी
महनीय वेषें चित्र नटोनी योध-तनू ये प्रगटोनी ॥ १ ॥
गिरिजा देवी घेउनि संगें भीषण-परिकर बांधोनी
भूमि-रथावरी रूढ होउनी विविधास्त्र वरीं झळकोनी ॥ २ ॥
उद्यद्भास्कर-सहस्र-दीधिति-भ्राजमान-वपु शोभोनी
भुजंगभूषण आरक्तनयन चण्डकोपन प्रकाशोनी ॥ ३ ॥
त्रिपुरांतक हा संहाराया विश्व पातला कोपोनी
नमन करोनी स्तोत्र गाउनी तुष्ट करा त्या बहु स्तवुनी ॥ ४ ॥

---

## ४५. पद ( चाल – अंध पंगु० )

सांग्रामिक शिव, वेष नटोनी तत्पर संहारा
भूभार हराया, सोडुनि शर करी, नष्ट जीव सारा ॥ ध्रु० ॥
म्हणुनी चरणीं लीन होउनी मस्तक अर्पोनी
करुणामूर्ती गिरिजावर तो शांत करूं भजनीं ॥ १ ॥
दीनदयाळा करुणासिंधो कैलासाधिपते
कृपापूर्ण तूं होउनि रक्षीं अम्हां दुर्बळांतें ॥ २ ॥
प्रणतांचें तूं समूळ हरिसी दुःख म्हणुनि तुजला
रुद्राभिधानें संबोधिती पापद्रावकाला ॥ ३ ॥

श्रुत्युक्त सेतु उल्लंघिती जे त्यांसी दंडाया
सत्त्व-मूर्ति तूं बळें प्रगटिसी कोपासी सखया ॥ ४ ॥
अघनाशन परि कोप तुझा त्या करितों नमनाला
कोपें प्रहरण प्रेरिसी म्हणुनि नमितों बाणाला ॥ ५ ॥
कार्मुक सोडी बाण म्हणुनी तया शांतवाया
वंदन करितों हात जोडुनी धरुनी बहु विनया ॥ ६ ॥
प्रणती माझी भुजयुग्माला धरिती जे धनुला
शिवतम तेणें सकळहि व्हावें रक्षाया मजला ॥ ७ ॥
प्रभुजी आतां कोपा त्यजुनी प्रसन्न व्हा नाथा
क्षमा करोनी दीन बालका लावा परमार्था ॥ ८ ॥

---

४६. पद (चाल — मी समजुं तरि काय०)

व्हा मजवरि प्रसन्न सदाशिव । वंदित चरणां स्वजन-शिव-तमां ।
धरुनी हृदयीं अनन्यभाव ॥ ध्रु० ॥
पापात्मा मी म्हणुनि उग्रगती । कोणि न मजला जवळी करिती ।
प्रार्थितांही दूर लोटिती । तुम्हांविण उरला न अन्य ठाव ॥ १ ॥
नाममंत्र मी तुमचा जपतों । नाश अघाचा तयें इच्छितों ।
भजन पूजनीं सादर असतों । घडो खास या तव प्रसाद-लव ॥ २ ॥
कलावतीनें दाशार्हासीं । दाखवितां जपमाहात्म्यासीं ।
मंत्र घेत तो गर्गापाशीं । पाप जळालें ये त्या अनुभव ॥ ३ ॥
दुरित-मुक्त या विनायकाला । करुनी घ्यावें पदरीं याला ।
लावुनि यासीं निजसेवेला । प्रगटवा स्वयश जगतीं अभिनव ॥ ४ ॥

---

### ४७. पद ( चाल—अरसिक किती हा शेला० )

प्रणति शिवशंकराला । हिमगिरीवासी पुराण-पुरुषाला ॥ ध्रु० ॥
गिरिजा-हृदयेशाला । तया अर्धनारी-नटेश्वराला ॥ १ ॥
मन्मथ-विनाशकाला । भिल्लिणी-नेत्र-कटाक्ष-बद्धाला ॥ २ ॥
भस्मासुर-वरदाला । दश-वदन-गायन-परम-तुष्टाला ॥ ३ ॥
प्रलय-कृत्कृतांताला । कोपतां त्रिभुवन-दहन-शक्ताला ॥ ४ ॥
भक्तार्थ-कल्पतरुला । दशानना दे जो निज कांतेला ॥ ५ ॥
पाखंड-तारकाला । तारि जो विन्ध्यवासी व्याधाला ॥ ६ ॥
प्रसन्न विनायकाला । आज तो होवो उद्धरायाला ॥ ७ ॥

---

### ४८. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

नाम घेत जा रे । शिवाचें ॥ ध्रु० ॥
इतर बडबड व्यर्थचि करिसी । तें न कामा ये रे ॥ १ ॥
भलत्या मिषेंही जरि तूं घेसी । तारक तें तुज रे ॥ २ ॥
उपहासास्तव व्याध गर्जला । तेणें तरला रे ॥ ३ ॥
विनायकाला छंद शिवाचा । शिवरुप बनवी रे ॥ ४ ॥

---

### ४९. पद ( चाल—टाकिला यानें० )

शरण चरणांसीं । तारीं पतितासीं । अन्य न गति उरली यासीं ॥ध्रु०॥
खरा हितकर्ता । या त्रैलोक्यासीं । शोधितां न दिसे दृष्टिसीं ॥ १ ॥
महती विनष्टि । श्रुति निर्देशी जी । चुकवीं, कृपाळुपण योजीं ॥२॥
अणुहि जरि सेवा । घडे पातक्यासीं । तरी ती थोर गणुनी घेसी ॥३॥
यासी दृष्टांत । त्या चांडाळीचा । महिमा अद्भुत तो साचा ॥ ४ ॥

सद्विप्र-दुहिता । होय बालविधवा । सेवी शूद्र जार बरवा ॥ ५ ॥
ती मेष म्हणोनी । गोवत्सा मारी । कळतां शिवशिव उच्चारी ॥ ६ ॥
पावे यमपुरी । भोगी नरकासीं । लाधे मानवजन्मासीं ॥ ७ ॥
कुष्ठ सर्वांगीं । वैधव्य ये तिसीं । निर्वाह करी भिक्षेसीं ॥ ८ ॥
शिवरात्रदिवशीं । अन्न न मिळे तिसीं । तेणें राहे उपवासी ॥ ९ ॥
बिल्व-दळ कोणी । देतां झिडकारी । लिंगीं पडलें साचारीं ॥ १० ॥
नेली शिवपुरा । तुम्हीं उमावरा । तैसा हा दास उद्धरा ॥ ११ ॥

---

५०. पद ( चाल—साध्य नसे मुनि कन्या० )

गावा शिवमहिम्यासीं । तैसें अनुपम दातृत्वासीं ॥ ध्रु० ॥
रावणमाता धान्यपिष्टाचें । लिंग करी अर्चेसीं
इच्छी विजय नित्य तनयासीं ॥ १ ॥
इंद्रें विघ्न करितां जाई । दशमुख कैलासासीं
तेथें आचरी तपस्येसीं ॥ २ ॥
मांडी गान रागोपरागें । शास्त्र-शुद्ध प्रेमेंसीं
छेदी स्वशिर बनवि, वाद्यासीं ॥ ३ ॥
संतोषे तो अपर्णाकांत । घे म्हणे अभीष्टासीं
आत्मलिंग देई असुरासीं ॥ ४ ॥
मागे त्रिभुवन-सुंदर-ललना । अर्पी त्या गिरिजेसीं
ऐसा ओपी सर्वस्वासीं ॥ ५ ॥
संकट झालें ब्रह्माण्डासीं । प्रार्थी उमा विष्णूसीं
द्विजरूपें तो सोडवि तिजसीं ॥ ६ ॥

स्तविती सुरवर विघ्नेशासीं । प्रगटुनि तो मार्गासीं
विघ्नें रची स्थापि लिंगासीं ॥ ७ ॥
चरित्र ऐसें सदाशिवाचें । कोण वदे वाचेसीं
सीमा नाहीं उदारत्वासीं ॥ ८ ॥

---

५१. पद ( चाल—प्रतिकुल होइल० )

तारिं तारिं तारीं मजला चुकवीं निरयपात ।
दुरितसंचय घडला बहुत तेणें होय घात ॥ ध्रु० ॥
दुर्मद मी अघ आचरिलों आजवरी अनंत ।
विवेक मजपाशीं नाहीं वागलों दुर्वृत्त ।
अनिष्ट भोग प्राप्त झाले म्हणोनि विनवीत ।
कृपादृष्टिं मज पाहोनी करीं दुःखमुक्त ॥ १ ॥
विंध्याचलवासी व्याध निघत पारधीसीं ।
शिवरात्र-पर्वणि दिवशीं भक्ष्यशोधनासीं ।
सव्य घडत दैवें मार्गीं शिवमंदिरासीं ।
न मिळे जीव कोणी त्याला निराहार होत ॥ २ ॥
घोर कांतारांत जाई देखे तडागास ।
बिल्ववृक्ष उन्नत तीरीं गांठीं तदग्रास ।
लोक भजन करिती त्यांचा मांडी उपहास ।
हरहर शब्द तिरस्कारें वदत तो उन्मत्त ॥ ३ ॥
बिल्वदळें खुडुनि टाकी पडति शैवलिंगीं ।
तों येत गर्भिणी हरिणी जल-पानालागीं ।

उद्युक्त हननासी तों ती प्रार्थि तयालागीं ।
गर्भ सांडुनि येतें थांब शपथ उच्चारित ॥ ४ ॥

रंभा पूर्वींची मी हरशापें मृगी झालें ।
हिरण्यदैत्य सखियांसह योनिंत या आलें ।
दिव्य ज्ञान म्हणुनि मजला विश्वास धरीं बोले ।
क्षीण-पाप यास्तव सोडी, सुबुद्धी त्यास होत ॥ ५ ॥

काम-पीडित दुजी आली मृगी तया स्थानीं ।
शपथ कथित काम पुरतां येतें परतोनी ।
जातां ती मागोमाग ये मृगराज रानीं ।
तोहि शपथ घेउनि जात आश्चर्याची मात ॥ ६ ॥

तीन प्रहर रात्र लोटे ये तिजी तृषाक्रांत ।
दुग्ध पाजुनि वत्सालागीं येइन भाक देत ।
शिव शिव शिव घोषें व्याध डुलत आनंदांत ।
अहोरात्र झाला ऐसा तल्लिन भजनांत ॥ ७ ॥

भास्कर उदय घेत तंव तीं येउनी प्रणाम ।
वत्सांसह करिती, म्हणती, पावविं मुक्तिधाम ।
निश्चय हा पाहुनि त्यांचा द्रवे हिंसाकाम ।
पश्चात्तापें शुद्ध म्हणुनि विमान वरुनि येत ॥ ८ ॥

सकल घालुनि दिव्य यानीं शिवदूत नेती ।
माहात्म्य थोर त्वदीय हें साधुसंत गाती ।
श्रद्धा मम चित्तीं उपजे परिसोनि कीर्ति ।
यास्तव आलों शरण नाथ उद्धर कृपावंत ॥ ९ ॥

५२. पद ( चाल – हरिभजनावीण० )

गोकर्ण भू-कैलासचि क्षेत्र धन्य तें ॥ ध्रु० ॥

ब्रह्मादिक अमर-वर
वसताती धरुनि द्वार
जेथ नित्य गिरिजावर
पावे प्रीतितें ॥ १ ॥

जेथ महापातक्यांस
सद्गतिचा लाभ खास
मुक्ति घडे ब्रह्महास
काय वानुं तें ॥ २ ॥

मित्रसह नृप मृगयेस
जातां वधि राक्षसास
बंधु रचुनि कपटवेष
सेवि नृपतितें ॥ ३ ॥

नरमांस वसिष्ठासीं
वाढित तो पापराशि
मुनि चढले कोपासीं
शाप देति ते ॥ ४ ॥

ब्रह्म-राक्षस होइं नृपा
सोडिलीस सकळ त्रपा
जाणसी न मदीय तपा
त्यजसि भीतितें ॥ ५ ॥

असुरकृत्य जाणविलें
उःशापा ऋषि वदले
द्वादशाब्द जा वहिलें
तया योनितें ॥ ६ ॥

घोरदशा पावतांच
क्रूर बने तो तसाच
भक्षी द्विज एक साच
होय नवल तें ॥ ७ ॥

भोग सरुनि परत फिरत
ब्रह्महत्या पाठिं येत
परम मनीं भीतिग्रस्त
झटे निवृत्तितें ॥ ८ ॥

योगयाग तीर्थाटन
करित पुण्य व्रताचरण
दोष न सुटे परि दारुण
भोगि दुःख तें ॥ ९ ॥

भेट गौतमाची होय
गोकर्णा म्हणत जाय
ब्रह्महत्या पावे लय
अपूर्व स्थान तें ॥ १० ॥

जातां तो मुक्त होय
प्रेमळ सदाशिव माय
न्यावयास भूपराय
विमान धाडि तें ॥ ११ ॥

शिवरात्र पर्वणीस
महिमा ये जागृतीस
स्मरण देत विनायकास
पाप-शुद्धितें ॥ १२ ॥

---

५३. पद ( चाल — अंध पंगु० )

वंदन रुद्रा तव कोपा तो वैऱ्यांसीं बाधो
नमितों बाणा तैसें धनुला शत्रुहनन साधो ॥ ध्रु० ॥
धनुर्बाणयुत हस्तांलागीं प्रणमन मी करितों
रिपुवध व्हावा तुझिये हातीं इच्छा ही धरितों ॥ १ ॥
शांत बाण तव शांत धनुष्यही शांत रुद्र भाता
नमनें शमलीं शस्त्रें त्यांहीं होईं सुखदाता ॥ २ ॥
कैलासाचे शिखरीं राहुनि जीवां सुखवीसी
मंगल तनु तूं निजा प्रगटवुनि करिं अनुग्रहासी ॥ ३ ॥
दोन तुझ्या तनु प्रसिद्ध लोकीं त्यांहीं तूं नटसी
घोरा अन्या शिवा म्हणोनी वर्णन वेदांसीं ॥ ४ ॥
अनिष्टदा जी कधीं नसे कीं इष्टचि देणारी
कल्याणाची धात्री केवळ आम्हां तनु वितरीं ॥ ५ ॥
कैलासपाल जो बाण धरिसि करिं अरिवरि प्रेराया
शांतचि व्हावा आम्हांठायीं पशुसुत रक्षाया ॥ ६ ॥
स्तवितों करुणावचनें आम्हां शैलशिखरवासी
पावुनि ठेवीं तुष्ट निरामय पशुसुत-जायेसीं ॥ ७ ॥

सर्प-व्याघ्रादि-राक्षस-हन्ता देवेन्द्र चिकित्सक
सर्वाधिक तो म्हणो श्रेष्ठ मज होइन मी अधिक ॥ ८ ॥
आरक्त उदयीं पुढें अरुणसा पिंगल मग पुढती
तमारि म्हणुनि मंगल रवि हा सूर्य-बिंब-वर्ती ॥ ९ ॥
रश्मिरूप हें रुद्र अमित जें व्यापिति विश्वाला
सर्व-दिक्-स्थित शमवूं नमनीं त्यांच्या कोपाला ॥ १० ॥
नीलकंठ हा आरक्त-भानु-रूपें संचरतो
पाहावें यासीं गोपादिकीं म्हणुनि दृश्य होतो ॥ ११ ॥
उदक-हारिका अज्ञ स्त्रियांनां तेविं सकळ जीवां ।
दर्शन द्यावें म्हणुनी विहरे सुखद अम्हां व्हावा ॥ १२ ॥
नीलकंठ तो इंद्र होउनी पर्जन्याहि बनतो
नमन तयाला तद्दासांनां अर्पण मी करितों ॥ १३ ॥
सर्वैश्वर्ययुत रुद्रा सोडीं धनुची प्रत्यंचा
वसे बाण जो हातीं तुझिया करीं त्याग त्याचा ॥ १४ ॥
आवरिं धनुसीं सहस्राक्षा शीर्ण बाण करुनी ।
अनंतभात्यांमधिं तूं ठेवीं प्रसन्न शांत बनुनी ॥ १५ ॥
जटाधराचें धनुष्य होवो प्रत्यंचारहित ।
विशल्य भाता होउनि बाणही व्यर्थचि होवोत ॥ १६ ॥
खड्गकोशही समर्थ त्याचा खड्ग-धारणाला ।
गुप्त करो तो कृपाण ऐसा न पडे दृष्टीला ॥ १७ ॥
काममेघ तव आयुध तैसें धनुष्य हातींचें ।
निरुपद्रव तूं त्यांहीं अमुचें रक्षण करिं साचें ॥ १८ ॥

नमन असो तव समर्थबाणा चापवियुक्तासी ।
तैसें दोन्हीं बाहूंलागीं तेंविं धनुष्यासीं ॥ १९ ॥
चापनियुक्त न बाधो आम्हां तव शर कोठेंही ।
दूर ठेव तो आम्हांपासुनि भाता निज पाहीं ॥ २० ॥
रुद्राचा जो प्रथमानुवाक त्याचा भावार्थ ।
विनायकानें रचिला तेथें सदाशिवप्रीत्यर्थ ॥ २१ ॥

---

५४. पद ( चाल – मज गमे ऐसा जनक तो० )

शिवशिवां गाती मधुर ते । अही-भ्राते ॥ ध्रु० ॥
ताल-काल-लय-तान-जाणते
उठविती राग-रागिणींतें
घेती मंजुळ आलापांतें
कोमल निघती किति ध्वनि ते ॥ १ ॥
कैलासाचल गानें भरिती
वाद्यमेळ तरि सुंदर रचिती
नादमय सकळ करुनि सोडिती
ब्रह्मसुख जणुं लुटविती ते ॥ २ ॥

५५. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

शिवसेवन करिं रे । मनुजा ॥ ध्रु० ॥
त्यजुनि सकळही धर्माचारां । हें व्रत आचरिं रे ॥ १ ॥
पुत्रकलत्रीं धनधामीं जी । प्रीति ती धरिं रे ॥ २ ॥
म्हणे विनायक भवबंध तुडुनि । पावसि शिवपद रे ॥ ३ ॥

---

### ५६. पद ( चाल – वैशाखमासिं० )

कनक युवति इष्ट अशी लोकभावना
सिद्ध होय तीहि जरी करिति शिवार्चना ॥ ध्रु० ॥
प्रदोष समय साधुनियां करणें पूजला
तें न घडे, स्वचिंत शिवा अर्पा वंदना
श्रवण-पुटें साधा शिवकथामृत-प्राशना
दारिद्र्य-नाश होय तयें पुरति कामना ॥ १ ॥

---

### ५७. पद ( चाल – शैवालें युक्त जैसें० )

व्याघ्रचर्म पांघरोनी पंचानन ठाकला
उमेसह तरुण–मूर्ति चंद्र–मौली पातला ॥
गौर–काय प्रसन्न–शांत–मुद्रेनें शोभला
स्मित–धवलित–वदनकांति उभा पुढें राहिला ॥ १ ॥

---

### ५८. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

शिवसेवन करिं रे । बाळा ॥ ध्रु० ॥
भुक्ति–मुक्तिचा दाता प्रभु तो । त्यासीं तूं भज रे ॥ १ ॥
अन्योपाय न हित साधाया । कृपा संपादिं रे ॥ २ ॥
इहपर सद्गति लाभे तुजला । तो आराधीं रे ॥ ३ ॥
उपदेश मना दृढ ठसवोनी । त्या मार्गा वच रे ॥ ४ ॥
मातेचा हा बोध परिसुनी । उमज त्या पडला रे ॥ ५ ॥
म्हणे विनायक उपमन्यूनें । प्रसादिला भव रे ॥ ६ ॥

---

५९. पद ( चाल – गमते सदा ही मजला० )

भजनीं शिवा आळवुनी,
ध्याउनी मूर्ति हृदयांतरीं मुदें,
लय पावा स्वरुपीं ॥ ध्रु० ॥

तन्मयता साधा, बनुनी
सांद्र, गातां तत्कथामृत,
लाभा समरसतेस, रसिं विरुनी ॥ १ ॥

---

६०. पद ( चाल – करिन यदुमनीं सदना० )

कवन शिवगुणीं रचुनी
उठविन रस सुललित पदांनीं ॥ ध्रु० ॥

डुलविन निर्भर पशुपति सुखानें
तयीं तोषभरानें ॥ १ ॥

---

६१. पद ( चाल – जमल्या पहा वनीं० )

जपतां तुझ्या शिवा शिवनामा ।
करिसी भजकीं शिवमूर्ते निजधामा ॥ ध्रु० ॥

अघ हरुनी द्रुत पुण्यात्मकता । वितरुनी बनसी मोचनकर्ता
पुरवीं मंत्रानुष्ठानीं मम कामा ॥ १ ॥

---

६२. पद ( चाल—उपवनीं गात कोकिला० )

मनु निज शैव देउनी
रमवावा सातत्यें वदनीं मम ॥ ध्रु० ॥
उपजवोनि रतिस मनीं । चित्त तयीं गुंगवुनी
त्वरित सिद्ध होय असा जपवा प्रभो ॥ १ ॥

---

६३. पद ( चाल—असाचि धांवत येई० )

शिवांघ्रिसेवन लावुनी मना
अर्चनतत्पर भक्तिनें बना ॥ ध्रु० ॥
शिव शिव भजना सदैव करुनी
अघदाहें शुचि देहा करुनी
नैज साधवा चित्तशोधना ॥ १ ॥

---

६४. पद ( चाल—ठाकुर तव शरणाई आवो० )

शंकर पदरति घेईं, ध्याईं
स्वरूप मनीं, सक्त बनुनी प्रेमें,
चिरुनीयां समरस होईं ॥ ध्रु० ॥
स्मृतिनाश पवें ऐक्य लाभोनी
शम जोडीं सुखदाई ॥ १ ॥

---

६५. पद ( चाल—ही रात सवत बाई० )

सांबास शरण जाईं
भवसिंधु तीर्ण तव होई ॥
शिवभक्त बनोनी गाईं
कीर्तना, रति तयीं घेईं ॥
गुणवृंद-वर्णनीं प्रीती
थोर धरीं स्वचित्तीं ॥
रेखोनि मनोज्ञ मूर्ती
प्रेमें हृदीं दृढ ध्याईं ॥

---

६६. पद ( चाल—सखे झणि जिंकिला० )

शिवा रत जाहलों। चरणीं।
घे जवळिक, तव भजना वद्वीं।
बनुनि प्रेमयुत दास थाटलों ॥ ध्रु० ॥
रंगवुनि मना यशकीर्तिरसा।
सेववि निर्भर सुरसिक नटलों ॥ १ ॥

---

६७. पद ( चाल—हांसोनि नाचोनियां आनंदें )

चित्तांत पावोनियां लौल्यातें,
गाऊं यशातें, वर्णूं गुणांतें, ॥ ध्रु० ॥
रूपीं लुब्धता धरुनि, वरोनी
ध्यान मानसीं, ऐक्य साधुनी
मग्न शिवीं जाऊं होवोनी।
गाऊं यशातें वर्णूं गुणातें ॥ १ ॥

---

## ६८. पद (चाल–अति गोड गोड ललकारी०)

शिव सेव, बोल स्तवनासीं, ।
प्रेमसांद्रता आणीं हृद्यासी ॥ ध्रु० ॥
लयता धर, अर्चीं चरणांसी,
लभवीं चित्ता रती दृढतेसीं, ॥
छंदा घेई, रच कवनासीं,
होई गाढ लुब्ध भजनासीं ॥ १ ॥

---

## ६९. पद (चाल–विसरला काय हरि प्रेमा या)

शिवयशा गाय, धर प्रेमाला, । व्यसन लावीं चित्ताला ॥ ध्रु० ॥
नामजपाचा उपहासानें । छंद लागला व्याधाला ॥
शिवहर बोल वदवि रसनेला । तेणें शिवचि बनेला ॥ १ ॥

---

## ७०. पद (चाल–माधवा ठावा जिवा०)

ध्याइसी सांबा जरी,
लभसी त्याच्या कृपेस तरी ॥
गाय भजनाला, भवीं तेंच तारी ;
शिवहर बोलें, प्रेमा धरीं ॥ ध्रु० ॥
गोपबालक पूजनीं । दंग जाहला स्वमनीं ।
जननी मारितां सोसुनी न हले
व्यक्त शंभु झाले ॥ १ ॥

---

७१. पद ( चाल – मधुवदना सखिच्या रम्य त्या० )

शिवभजनीं धरुनी रक्तता, अन्यता विसरुनी ऐक्यता भावीं ।
लुब्ध बने विरोन रसीं । माधुरि लभें, वरीं रतिसीं ; ।
गाय गुणांसीं, रिझवीं शंभुला ॥ १ ॥

७२. पद ( चाल – लहरी अतां० )

हृदयीं धरीं, । शिवाची ।
नयनहरा रम्याकृती ; ॥ ध्रु० ॥
रतिसीं घेईं, समरस बनवीं
रमवुनियां चित्ता, पवे निर्वृती ॥ १ ॥

७३. पद ( चाल – मंजूळ रसना० )

शंकररति हृदया लावीं, । घोर संसृतीस ती हारवी ; ॥ ध्रु० ॥
पर्व शिवरात्रिचें । करिं भजन शिवगुणकीर्तीचें ।
आज तुष्ट हर, कांस धरावी ; ॥ १ ॥
रसलौल्य चोजवीं । बन समरस, ऐक्य थाटवीं ; ।
रमें, भवात्मक आपण भावीं ॥ २ ॥

७४. पद ( चाल – सत्य वदे वचनाला० )

ब्रह्मवधासम पापांलागीं । शिवरति जाळी शंभुभक्ति विलगी ॥ ध्रु० ॥
मित्रसहा निज क्षेत्रा पववुनि । मुक्त करी स्वकृपापांगीं ॥ १ ॥

७५. पद ( चाल—नदी किनारीं नदी किनारीं० )

शिवा भजावें, गुणां वदावें,
रूपीं रमावें, ध्याउनीयां
कर्पुरकान्तिस, सदा हृदीं ; ॥ ध्रु० ॥
प्रेम पावसि दृढ सेवेसीं,
सामरस्या चिर लभसि,
प्रिय तूं बनसी त्या वरदीं ॥ १ ॥

---

७६. पद ( चाल—नवरंगि रंगलेला० )

शिवमूर्ति आठवोनी
धर, दंग होउनी, ध्यानीं ;
पूजोनि, सेव गानीं,
कीर्तिस गाय रंगोनी ; ॥
स्तुतिस्तोत्र ऐकवोनी
रमवीं, गुणां वदोनी
कवनांत, प्रेमभावा भरोनी,
डुलवीं, यशास वानी ॥

---

७७. पद ( चाल—जाऊं खेळाया चला० )

चाण्डाळी पावे गती, जाणवी
शांकरी थोरवी ; ॥ ध्रु० ॥
चित्त भारवूं वर्णुनियां तद्वृत्तासीं,
सांद्ररति साधाया ॥ १ ॥

---

७८. पद ( चाल—कैसी बनी बांसरी० )

सांबा भजें सर्वदा, भक्तीनें
योजुनि कवना, तन्महिमाना
मधुर वर्णुनी, गाईं भरोनी
शिवरतियोगें रस लभुनी ॥

---

७९ पद ( चाल—वारिं गरिबा वीराजी० )

शिवरतिनें त्या उपमन्यूला । दुग्धमहासागर लभवीला ॥ ध्रु० ॥
सुरेंद्र बनुनी, शंभु त्याजला । येती सकरुण वंचायाला ॥ १ ॥
ढळे न पाहुनि, भ्राकाश्याला । धरोनि दाविति निजरूपाला ॥ २ ॥
गिरिसम लभशी पकान्नांला । इत्यादि वितरति शुभ वरांला ॥ ३ ॥
गाणपत्य, मम सान्निध्याला, । पवसीं, वदती सांब तयाला ॥ ४ ॥
सिद्ध प्रसादें तेंवि बनविला, । यास्तव मनुजा सेविं हराला ॥ ५ ॥

---

८०. पद ( चाल—रुसलासि हरी कां बरें० )

शिवमूर्ती हृदीं ध्याइणें,
नित्य विमल यश गाइणें ॥ ध्रु० ॥
विरुनि तेथें जाशी जरी । विसर पडेल विषयांतरीं ॥
तन्मयत्व फला लाभणें ॥ १ ॥
बनशील वामदेवासम । योगीन्द्र जो विख्यात परम ॥
जीवन्मुक्तता पावणें ॥ २ ॥

---

८१. पद (चाल—चकोरा मीच तव चंद्रिका०)

शिवाचा छंद मज जोडला, ।
सहजेंच जडवी नाम मुखाला ; ।। ध्रु० ।।
सुयश गाण्याला लोलुप बनवी, ।
तोष कुठें गमूं दे न, भारवी ।।
कीर्तनरसीं, लुब्ध करि मजला ।। १ ।।

---

८२. पद (चाल—फूल मंगाओ हार बनावो)

प्रेम धरावें, रक्त बनावें, ।
वदनीं शिवहर नामा गावें ; ।। ध्रु० ।।
रमोनी भजनीं, रंगभर खुलवुनी, ।
क्रीडत डोलत विहरावें ।। १ ।।
सदाशिव हर शंभो करुणाकर ।
बोलत गावत नाचावें ।। २ ।।

---

८३. पद (चाल—खचित उगीच भय दावी०)

शिवहर सांब गौरीश, मजला ।
वद निज नर, पदीं दे सुरतिला ; ।। ध्रु० ।।
गाववुनि भजनीं स्वकीर्तीला
चरित वर्णवीं, उठविं रसाला ।
बनवुनि समरस, दे ऐक्याला ।। १ ।।
नामजपास लावुनि, अघाला ।
दग्ध करोनी, लभविं शमाला ; ।
साधीं माझ्या उद्धाराला ।। २ ।।

---

८४. पद ( चाल – आईचा छकुला० )

संसारा विटला । विरमला ।
मरगळला थिजलेला बनला ; ॥ ध्रु० ॥
शंकरा अंतरीं ध्याई
प्रेमें त्यास गाई
साधन जरि हें यापरि योजी, तारिल त्याला ॥ १ ॥

---

८५. पद ( चाल – कुंजांत हरि हा क्षणांत दिसला० )

शिवास भजतां रसास पवतां लयास वरितां,
भव हरुनी, भव होइल पाता ॥ ध्रु० ॥
वद नाम मुखें निशिदिनीं, । यशाला गाय रत बनुनी ; ॥
रमवुनी हृदीं ध्याईतां, । परम सुख होय लाभविता ॥ १ ॥

---

८६. पद ( चाल – घेई विहगसम भरारि० )

गाय शिवयश-मधुगान, निर्भर होवोन ; ॥ ध्रु० ॥
प्रेमा भर आणोनी, बन मोहित अभिलाषें ;
वेडा लोलुप रसांत डुल, त्यागीं भान ॥ १ ॥

---

८७. पद ( चाल – जनमानसमंदिरांत० )

शिवपूजन बिल्वयुक्त
घडतां, तुजला स्वभक्त ।
समजुनी, दयाघन तो
मानसांत होय व्यक्त ; ॥ ध्रु० ॥

शिवरात्रिस-सोध योग, भजनीं बन पूर्ण दंग ; ।
प्रिय बिल्वार्चन भवास । तेणें करि खास मुक्त ॥ १ ॥

---

८८. पद ( चाल — भजनानें आळविला० )

शिवपूजा नित्य करा, बिल्वनूतन-मृदुल-दल-निकरा ।
अर्पा, हरपादां वरा ; ॥ ध्रु० ॥
सांब भजावा, चरणीं थारा
घेऊनि, भव हा सहज तरा ॥ १ ॥

---

८९. पद ( चाल — बँडची )

शिव शिव शिव शिव बोलूंया ।
शिव शिव गर्जत नाचूंया ॥
शिव शिव छंद घेऊं या ।
छंद शिव शिव घेऊं या ।
शिव शिवरूपीं मिसळूं या ॥ १ ॥

---

९०. पद ( चाल — बँडची )

शंकर शिव हर बोलूं या ।
शिवहर गर्जत नाचूं या ॥
शिवहर छंद घेऊं या ।
छंद शिवहर घेऊं या ।
शिवहररूपीं मिसळूं या ॥ १ ॥

---

# ( ४ ) श्रीविष्णु

श्री ... ग्रंथालय ठाणे
अ. क्र. 8054



## ९१. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

जिवलग श्रीहरी मजला । संकटीं आला सोडवायाला ।। ध्रु० ।।
प्रियतम अनुपम गमला । स्नेहें मजसाठीं जो कळवळला ।। १ ।।
माझ्या उद्धाराला । प्रगटुनि येथें जो करि लीला ।। २ ।।
हृदयीं स्मरतों त्याला । मज अन्य न कोणी वाली उरला ।। ३ ।।
करुनी मी भजनाला । अहर्निश झटतों आळवायाला ।। ४ ।।
त्यागुनि वैकुंठाला । मज संरक्षाया येथें आला ।। ५ ।।
सांडुनि वैभवाला । रात्रंदिन येथें तिष्ठत बसला ।। ६ ।।
श्रीची भीड न त्याला । जो पापोद्धारीं सिद्धचि झाला ।। ७ ।।
अर्पित मी हृदयाला । जो भवीं तारक श्रीगुरु त्याला ।। ८ ।।

---

## ९२. पद ( चाल — कुसुमगंध सुटला० )

दास हरी बनला । दासांचा ।। ध्रु० ।।
धर्मगृहीं जो उष्टीं काढी । परिजनसा सजला ।। १ ।।
पार्थरथीं करि सारथ्याला । काय वदूं याला ।। २ ।।
पाणी आणी नाथांसाठीं । सेवक कीं गमला ।। ३ ।।

दामाजीचा जासुद झाला । प्रभु काठीवाला ॥ ४ ॥
न्हाव्यासाठीं न्हावी झाला । गावा त्या प्रभुला ॥ ५ ॥

---

९३. पद ( चाल — कष्ट देति फार० )

संकटिं या वांचविता कोण श्रीहरी ।
होउनि मी शरण तुला स्मरत अंतरीं ॥ ध्रु० ॥
नक्रमुखीं सांपडतां मत्त तो करी ।
प्रतिहत तद्वीर्य तदा होत संगरीं ।
परिजन-कृत-यत्न विफल मकर तो करी ।
केला तो स्मरतां तुज मुक्त नरहरी ॥ १ ॥
अनय करुनि त्यजुनि विनय लाज सोडुनी ।
पांचाळी राजसभे आणिति ओढुनी ।
कौरव ते छळिति सती मत्त होउनी ।
पावत बहु वस्त्रलाभ चिंतितां हरी ॥ २ ॥
म्हणुनी मी शरण तुला, धांव लवकरी ।
सहाय नसे मजसिं कुणी, धांव तूं तरी ।
जाणुनि तूं मानस मम, हृदयिं द्रव धरीं ।
दृढ माझा भाव असे एक तुजवरी ॥ ३ ॥

---

९४. पद ( चाल — कुसुमगंध सुटला० )

लाज हरी तुजला । माझी या ॥ ध्रु० ॥
तवोपदेशें वागत असतां । करिती निंदेला ॥ १ ॥
निंदापात्रचि होय कसा हा । हें न कळे याला ॥ २ ॥

दुर्वृत्त कसा मज जन वदती। समजेना मजला ॥ ३ ॥
भजनपूजनीं रत मी म्हणुनी। दोष कसा घडला ॥ ४ ॥
धांवत येईं तारायाला। या तव दासाला ॥ ५ ॥

---

९५. पद (चाल—अरसिक किति हा शेला०)

विनवूं किति हरि तुजला। आजवरि नाथा धीर मी धरिला ॥ ध्रु० ॥
देसि न दर्शनाला। दिवानिश जरि मी आक्रोश केला ॥ १ ॥
हरसी न संकटांला। पहासी माझ्या प्राणांताला ॥ २ ॥
धरिसी निष्ठुरतेला। योजिति जरि वैरी मम हननाला ॥ ३ ॥
सांडिसि निजब्रीदाला। गांजिति रिपु जरि या तव दीनाला ॥ ४ ॥
झांकिसी कां नयनांला। असत्यारोपें दूषिती मजला ॥ ५ ॥
त्यागिसि सामर्थ्याला। धर्मोच्छेदन विदित जरी तुजला ॥ ६ ॥
दाविसि विचित्र लीला। समजे कैशी अज्ञ बालकाला ॥ ७ ॥
प्रसन्न होईं मजला। नको उशिर आतां शुभकार्याला ॥ ८ ॥

---

९६. पद (चाल—खरा तो प्रेमा०)

धरा तो चित्तीं श्रीहरी प्रेमभरीं
मनीं मृदुल चरण ध्याउनि पूजित शुभफल तया वितरीं ॥ ध्रु० ॥
नाशित अघ, पाहातां स्वरुपा, मोही मना,
प्रमुदित-हृदय होय नरु विसरे देह-भाना
नाचत अति उल्हासें देखुनी श्यामल हरी
निगडित होय देववर तेंच खरें ध्यान तरी ॥ १ ॥

---

९७. पद ( चाल — मम आत्मा गमला० )

गुण गाईं श्रीहरीचे । त्यज भय, अविरत बनुनि
भजनपर, घेईं घोंट सुधेचे ॥ ध्रु० ॥ सहन करीं
ताप, लाभ जोडीं, एषणा-पाश तोडीं, लज्जापट
फेडीं, सार्थक्य करीं, धीर-वरा, नर-जन्माचें ॥ १ ॥

---

९८. पद ( चाल — रुचती कां० )

वनमाळी चतुर्बाहु पीतवसनें शोभतो
रत्नखचित किरीटांसीं शिरावरी वाहतो
वक्षस्थळीं लांछनाला आदरें दावितो
मणिकर्णिकेंत स्नाना उषःकाळीं सारि तो ॥ १ ॥

---

९९. पद ( चाल — रुचती कां० )

शंख-चक्र-कमलधारी वनमाला-भूषित,
गदाधर, गरुड आहे जवळि ज्याच्या तिष्ठत ।
कण्ठिं कौस्तुभाची दीप्ती विशेषें फांकत
विद्युद्वसनें प्रगटरूपी अनंत शोभत ॥

---

क्रमांक ९३२०

# (५) देवी

## १. श्रीमहाकाली



### १००. पद ( चाल—प्रीति जी दुजावरी० )

व्रत नवरात्र आचरावें । वैभवा अतुल पावावें । मनुज हो ।। ध्रु० ।।
व्रतें अन्य बहु या जगतीं । परि त्यां न यासम महती । मनुज हो ।।
स्वर्ग-मोक्ष-आयुरारोग्य । प्राप्त होय सर्व सुभाग्य । मनुज हो ।।
( चाल ) शरत्काल । योजुनी व्हाल । सिद्ध पूजाल ।
जगदंबिकेसीं । उणें न किमपि मग तुम्हांसी ।। मनुज हो ।। १ ।।
स्मरण घडे जरि दुर्गेचें । दहन होय अघ-बीजांचें । मनुज हो ।।
जरि साधे अर्चन दैवें । फळ त्याचें कोणा गणवे । मनुज हो ।।
( चाल ) श्रीराम । जानकी-काम । कल्पतरु-धाम ।
व्रत सेवितां हें । लाभला इष्ट लवलाहें ।। मनुज हो ।। २ ।।

---

### १०१. पद ( चाल—प्रीति जी दुजावरी० )

महामाया वदती तुजला । मोहिसी सकल जगताला । अंबिके ।। ध्रु० ।।
जधिं जलमय जग होवोनी । विष्णु निजले शेषशयनीं । अंबिके ।।
हरिकर्णमलापासोनी । मधु कैटभ तधिं उपजोनी । अंबिके ।।

(चाल) जाहले । सिद्ध ते भले । बहुत माजले ।
धातृहननाला । विधि तेव्हां प्रार्थित तुजला ॥ अंबिके ॥ १ ॥
हरिनयनीं आलय केलें । योगनिद्रे तूं आपुलें । अंबिके ॥
पति जगताचे निजविले । साह्य कोणी नाहीं उरलें । अंबिके ॥
(चाल) समजला । शरण जाहला । बाहि तूजला ।
पाव दासाला । जननी गे या समयाला ॥ अंबिके ॥ २ ॥
परिसुनी प्रार्थना विधिची । माये तूं द्रवलिस साची । अंबिके ॥
नेत्रादि षडंगें हरिचीं । स्थानें तव उत्पत्तीचीं । अंबिके ॥
(चाल) तेथुनी । प्रगट होउनी । विधिस दाउनी ।
रूप तूं अपुलें । जागृतीं प्रभुसि आणीलें ॥ अंबिके ॥ ३ ॥
युद्ध दानवांसीं झालें । मुकुंदें दैत्य मारीले । अंबिके ॥
माहात्म्य तव हें प्रगटलें । अंकित तिन्ही देव भले । अंबिके ॥
(चाल) अवतार । हरुनि भूभार । करित उद्धार ।
सकळ विश्वाचा । स्मरतों मी हृदयीं साचा ॥ अंबिके ॥ ४ ॥
जन्ममरण तुजला नाहीं । अनादि तूं अंबे पाहीं । अंबिके ॥
सुरकार्यास्तव लवलाहीं । करिसी परि लीला पाहीं । अंबिके ॥
(चाल) प्रार्थितों । हात जोडितों । चरण वंदितों ।
पाव गे मजला । करीं कृपा या दीनाला ॥ अंबिके ॥ ५ ॥

---

## २. श्रीमहालक्ष्मी



### १०२. पद ( चाल – धांव विभो० )

महिषासुर असुरपति मातला । सुरपति तेणें पराभूत केला ।। ध्रु० ।।
स्वर्गभ्रष्ट त्यां देवां करुनी । त्रासवि तो सकळ विश्वाला ।। १ ।।
सुरगण सारे घेउनि धाता । जाई शरण जगन्नाथाला ।। २ ।।
कोपा चढला मधु-कैटभारी । तेज मुखानें अनुपम स्रवला ।। ३ ।।
गिरिजानाथहि क्रोधें स्रवला । सुरवरांसह महत्तेजाला ।। ४ ।।
त्रिभुवन-व्यापी तेज प्रगटलें । एकवटुनि धरि स्त्रीदेहाला ।। ५ ।।
शक्ति देवतामय प्रगटली । देती अमर दिव्यशस्त्रांला ।। ६ ।।
धांवे दानव झुंजायाला । घेउनी सकळ निजसेनेला ।। ७ ।।
श्वास देविचे अंबिकागण । होउनि करिती संगराला ।। ८ ।।
प्रगटुनि ऐशा अद्भुतरूपा । संहारित सकळ दैत्यांला ।। ९ ।।
धन्य जी झाली वधुनी असुरां । नमितों प्रेमें त्या देवीला ।। १० ।।
रिपुवध करुनी आम्हां देवो । अंबिका ती परमविजयाला ।। ११ ।।
विजयादशमी दिन विजयाचा । म्हणुनि मागतों उत्कर्षाला ।। १२ ।।

## ३. श्रीलक्ष्मी

१०३. पद ( चाल–कुसुमगंध सुटला० )

प्रगट रमा झाली । निजरूपें ॥ ध्रु० ॥
नेसुनि शालू मत्तइभासह । चमकत कीं विजली ॥ १ ॥
सकल भूषणीं नटुनी थटुनी । हरि जवळी आली ॥ २ ॥
सुंदर माळा वनपुष्पांची । प्रभु कंठीं घाली ॥ ३ ॥
योग बघुनि हा मामेशांचा । जनचित्तें खुललीं ॥ ४ ॥

---

## ४. श्रीमहासरस्वती



१०४. पद ( चाल–रुचती कां० )

गणनाथ अंकिं घेई तुजलागीं शारदे
अंसदेशीं पसरि बाहू तव वदनीं दृष्टि दे
घालोनी कंठीं शुंडा निजहृदयीं ठाव दे
त्यागोनी अन्य नारी रति तुजला कांत दे ॥ १ ॥

१०५. पद ( चाल — कष्ट देति फार दुष्ट० )

विश्वाचे जननी गे पाव शारदे ।
पामर मी प्रार्थितसें सर्व-कामदे ।। ध्रु० ।।
सकल जगन्मंगलार्थ प्रणवरूपिणी ।
अविद्यामल-क्षालनार्थ शुद्धि-कारिणी ।
दुस्तरभवसागरांत मूर्त तारिणी ।
विद्ये तूं प्रगटुनियां मजसिं सिद्धिदे ।। १ ।।
कमलोद्भव तात तुझा अखिल-विरचिता ।
जल-शायी पितृपिता सृष्टि-रक्षिता ।
श्वशुर तुझा उग्र रुद्र जीव-भक्षिता ।
विघ्नांतक गणेश तुझा रमण वरदे ।। २ ।।
माते तूं करिसि सदा मधुर गायना ।
आलापीं गुंगवुनी निखिल त्रिभुवना ।
भरुनी तूं प्रेमभरीं मांडिसि नर्तना ।
यास्तव त्रैलोक्य लुब्ध होय सौख्यदे ।। ३ ।।
प्रसन्न मज होउनि तूं नृत्य आदरीं ।
उपासना-कार्य सिद्ध सफल हें करीं ।
दत्तात्रेय-मूर्ति इथें प्रगट हो तरी ।
मागत मी जननि तुला दर्शनासि दे ।। ४ ।।

# ( ६ ) श्रीसूर्य



१०६. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

प्रणमूं आदित्याला । उपजवी विश्वा स्थिर-जंगमाला ॥ ध्रु० ॥
जगताच्या आत्म्याला । प्रकाशवी जो या ब्रह्माण्डाला ॥ १ ॥
केवल-चैतन्याला । संवत्सररूपी कालात्म्याला ॥ २ ॥
प्राणांच्या प्राणाला । त्रैलोक्य-व्यवहार-नियामकाला ॥ ३ ॥
आरोग्य-देवतेला । अत्तृत्त्वें सर्वां वसणाऱ्याला ॥ ४ ॥
ज्योतिर्मय पुरुषाला । वस्तुमात्रा रूप देणाऱ्याला ॥ ५ ॥
गोचर-परमात्म्याला । लोक-जन्य-सर्व-कर्म-साक्षीला ॥ ६ ॥
तेजस्वी आम्हांला । बनवुनी देवो योग्य बुद्धीला ॥ ७ ॥

# ( ७ ) अवतार

## १. श्रीनृसिंह



### १०७. पद ( झंपा )

धरिं धरीं माधवा जागृति केशवा । पाहसी आमुच्या सत्त्वभावा ॥ ध्रु० ॥ गरळ, अग्नि, जळें । कपट-युक्ति-बळें । द्यूत-क्रीडा छळें ॥ गांजुनीयां ॥ मांडुनी स्त्रीछळा । वास वनिं आगळा । देउनी, प्रगटिती ॥ वैरभावा ॥ १ ॥ करुनि वेषांतरा । एक संवत्सरा । राहणें गुप्त ज्यां ॥ प्राप्त झालें ॥ साहुनी कष्ट अति । भाग निज मागती । त्यांस तूं श्रीपति ॥ सहाय व्हावा ॥ २ ॥ तुजविणें श्रीहरी । कोण सहाया करी । भीष्मद्रोणादिकीं ॥ सांडिलें ज्यां ॥ नृपति दुर्योधना । विश्व करि वंदना । हेतु कीं पांडवां ॥ हार द्यावा ॥ ३ ॥ उठुनि आतां तरी । त्वरित तूं श्रीहरी । जिष्णुचा सारथी ॥ होई नाथा ॥ विजयरथ हांकुनी । विजय त्यां देउनी ।

प्रगटवीं आपुल्या ॥ स्नेहभावा ॥ ४ ॥ हिरण्यकशिपू महा । द्वेष मांडी पहा । तुजसवें प्रेमळा ॥ दुष्ट खोटा ॥ पुत्र त्याचा तरी । भक्त तूझा हरी । चरणिं तूझ्या धरी ॥ भक्तिभावा ॥ ५ ॥ शिकवि पोरें सदा । नाम बोले वदा । श्रीहरी केशवा ॥ माधवा या ॥ भजन रंगें नटा । कधिं न मागें हटा । जागृतीं आणण्या ॥ आत्मभावा ॥ ६ ॥ दैत्यपोरें अशीं । लावितां भक्तिशीं । परम कोपासि ॥ ये दैत्यराणा ॥ घेउनी शस्त्र करिं । मारण्या सुत तरी । धांवतां, तो म्हणे ॥ नाथ धांवा ॥ ७ ॥ तिखट शस्त्रें भलीं । हाणितां भंगलीं । प्रखर वैश्वानरहि ॥ शांत झाला ॥ उग्र विष नासलें । अमृतचि जाहलें । विसरलें आपुल्या ॥ दुष्ट भावा ॥ ८ ॥ पर्वतीं लोटिला । तयिंच तो झेलिला । मारितां, येइना ॥ मृत्यु त्याला ॥ परम कोपा चढे । येइ पुत्रापुढें । दाखवीं रे म्हणे ॥ भ्याड देवा ॥ ९ ॥ देव कोठें वसे । प्रगट कां तो नसे । मज पुढें येइना ॥ सांग कां तो ॥ सिद्ध झुंजावया । त्यासिं मारावया । मन्मनीं मृत्यु त्या ॥ आजि द्यावा ॥ १० ॥ बाळ सांगे तया । पाहे विश्वांत या । व्यापुनी सर्व या ॥ जाण उरला ॥ याहि स्तंभीं वसे । बोलतां शिशु असें । परम कोपें धरी ॥ तप्तभावा ॥ ११ ॥ हाणि लत्ता शिरीं । पाडि भूमीवरी । बाळ ते अवसरीं ॥ देव ध्याई ॥ येउं दे या क्षणीं । झुंजण्या या रणीं । आपुल्या सांडुनी ॥ गुप्तभावा ॥ १२ ॥ बोल बोले असे । भरत त्यासी पिसें । लाथ हाणीतसे ॥ दुष्ट स्तंभीं ॥ स्तंभ तो भेदला । नाद कोंदे भला । अंबरीं जाहला ॥ धाक देवां ॥ १३ ॥ अवनि हे कांपली । सकळ आंदोळली । सकळ गा लोपलीं ॥ दिव्य तेजें ॥ नरहरी कोपला ।

परम गर्जिन्नला । घेउनी शोभला ॥ प्रगटभावा ॥ १४ ॥ तीक्ष्ण नख रोंवुनी । आंतडीं फाडुनी । अंकिं त्या घेउनी ॥ मारि दैत्या ॥ धन्य नरकेसरी । विजयश्री जो वरी । आज तो श्रीहरी ॥ प्रगट व्हावा ॥ १५ ॥

---

१०८. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

गाईं निर्भय रे । हरिला ॥ ध्रु० ॥
हन्ता तुझिया संसाराचा । खचित तो होय रे ॥ १ ॥
प्रल्हादाचा रक्षण-कर्ता । शरण त्या जाय रे ॥ २ ॥
ममत्व आणी मीपण सारें । तव पावे लय रे ॥ ३ ॥
भोगोन्माद तो हिरण्यकशिपु । न तुजला खाय रे ॥ ४ ॥
विषय-प्रेमा अर्पुनि प्रभुसीं । हो प्रल्हादमय रे ॥ ५ ॥
स्थाणु भेदुनी अहंकार तव । नृहरि ये माय रे ॥ ६ ॥
दैत्येश्वर-वध सहज करिल ती । धरिं तिचे पाय रे ॥ ७ ॥
विनायक बोले भजतां प्रेमें । तुज गवसे सोय रे ॥ ८ ॥

---

१०९. पद ( चाल – करिन यदुमनीं सदना० )

नृहरि-गुण-सुधा पवुनी । मधुपसम बन रम मधुपानीं ॥ ध्रु० ॥
विसरुनि भान रस-रतिस धरोनी । तया आळविं गानीं ॥ १ ॥

---

११०. पद ( चाल – करिन यदुमनीं सदना० )

नृहरि-जनि-कथा, रसने । वद, मधुरसुललित-पद-गानें ॥ ध्रु० ॥
नतजनरक्षण, प्रियपणभरानें, । जियीं, गाय रसानें ॥ १ ॥

## २. श्रीवामन

### १११. पद ( झंपा )

भज मना, वामना, दितिजवर-मोहना। त्रिलोकी-व्यापना, परम-गहना ॥ ध्रु० ॥ पयोव्रत-तोषणा । अमर-भय-वारणा । बटुवेष-धारणा ॥ विश्वक्रमणा ॥ वैरोचन-वंचना । कृत-तदभ्यर्थना । दैत्य-गुरु-शासना ॥ दुष्टदलना ॥ १ ॥ त्रिपद-भू-याचना। दैत्यपति-लोभना । प्रतिश्रुताधिक-भर्त्सना ॥ सदवना ॥ मद-विस्रंसना। अपरिमित-वर्धना । भुवन-कोष-कलना ॥ त्रिदिवजयना ॥ २ ॥ द्विपद-भू-मापना। उर्वरितशंसना। प्रतिश्रवज्ञापना ॥ विप्रकरणा ॥ प्रणत-प्रति-पालना । दुःख-दव-शातना । सुतल-तल-प्रापणा ॥ विश्वभवना ॥ ३ ॥ त्रिदश-वर-वंदना । तपोधन-सेवना । अदिति-नुतनंदना ॥ शेषशयना ॥ अर्पुनी निजमना । गाऊनी तद्गुणां । करिं नरा पूजना ॥ विनयभवना ॥ ४ ॥

---

### ११२. पद ( चाल – रुचती कां० )

बटुरूपी, वनमाळी, पीतवासा, मा-पती, ।
चारुगात्र, चारुनेत्र, चारुहास, मधु-द्युती, ।
अंगकांती भासवीत मूर्ती जणुं वैद्युती, ।
तधिं राहे, अदितीच्यापुढें उभा, जगत्पती ॥ १ ॥

---

## ३. श्रीभार्गवराम

### ११३. पद ( चाल — पंचतुंड नररुंड० )

क्षत्रियराजे मत्त बनोनी द्वेष मांडिती विप्रांसीं ।
सर्वस्वातें झटति हराया योजुनी घोर छलनासीं ।। ध्रु० ।।
रमाधवासी शरण रिघालें विश्व मागण्या अवनासीं ।
अवतरुनी मी येतों वदला सत्वर आतां अवनीसीं ।। १ ।।
जमदग्नीसी वर सूर्याचा येतों तुझिये वंशासीं ।
रेणुकोदरीं जन्म घेतला म्हणुनी तेणें प्रेमेंसीं ।। २ ।।
मुनिनें इंद्रा सेवुनि केलें तुष्ट देत तो सुरभीसीं ।
सबला-योगें योगक्षेमा आकारी निज सुलभेंसीं ।। ३ ।।
रामनाम हें भृगुनें पौत्रा दिधलें होतें हर्षेसीं ।
भार्गवरामें तप आचरुनि आराधीलें विष्णूसीं ।। ४ ।।
प्रसन्न हरि त्या आत्मशक्तिसह वितरी वैष्णवचापासीं ।
जिंकीं बोले उन्मत्त भूपां स्थापी सत्ता पृथिवीसीं ।। ५ ।।
दत्त-भक्त-वर कार्तवीर्य ये मृगयामिषें आश्रमासीं ।
कामधेनुच्या अनुग्रहानें ऋषी करी आतिथ्यासीं ।। ६ ।।
लुब्ध राजयें श्रोत्रिय हनुनी हरुनी नेलें गाईसीं ।
रेणुका करी शोक वृत्त हें कठोर कळतां रामासीं ।। ७ ।।
बाहु तोडुनी अर्जुन वधिला मारी क्षत्रिय कोपेंसीं ।
एकवीसदां क्षत्रहीन या करिता झाला धरणीसीं ।। ८ ।।
परशुराम-यश अत्यद्भुत हें स्मरुनी गाऊं मोदेंसीं ।
जन्मदिवस कीं आज तयाचा देवो आम्हां विजयासीं ।। ९ ।।

## ४. श्रीराम



### ११४. पद ( झंपा )

मना राम हा पूर्ण आनंददाई । तयाच्या पदीं तूं लीन होई ।।ध्रु०।। हृदय-भवनीं सदा । पूजिं त्या सौख्यदा । खचित तुज आपदा ।। बाधती ना ।। लोक-मनरंजना । संसृती-भंजना । त्रिविध-ताप-शमना ।। शरण जाई ।। १ ।। कमलवर-लोचना । पूर्ण-चंद्रानना । मधुर-रुचि-शोभना ।। मूर्त-मदना ।। वर्षधर-श्यामला । पद्मदल-कोमला । धृत-तुलसीमाला ।। हृदयिं ध्याई ।। २ ।। जानकी-प्रिय-धवा । भानुकुल-वैभवा । दितिवंश-भैरवा ।। मनुज-देवा ।। पवनसुत-सेविता । एकपत्नी-व्रता । सिद्धगण-संस्तुता ।। नित्य गाई ।। ३ ।। पुरवि तव कामना । करिसि जरि वंदना । म्हणुनि रघुनंदना ।। आळवीं या ।। श्रीगुरु-पूजोत्सवीं । पूर्णता उपजवीं । प्रेमरस वाढवीं ।। सिद्धि देई ।। ४ ।।

### ११५. पद ( चाल — अभाग्याचे घरीं० )

रामचरित-सुधारस-सारें मंगल साधावें ।
यास्तव प्रेमें हृदयीं दाटुनी औत्सुक्यें गावें ॥ ध्रु० ॥
तात-वचन-परिपालन-तत्पर वनवासा सेवी ।
वल्कल-धारी तृण-शय्येवर निज देहा रमवी ॥
उपवासी परि दुष्ट-निशाचर-वंशक्षय घडवी ।
मुनिमख-संरक्षक-सद्यश हें अद्भुत वानावें ॥ १ ॥
कष्ट चतुर्दश वर्षं साहुनि रावण निवटोनी ।
सोडवुनी निजकांता पुष्पक-यानीं बैसोनी ॥
सेनेसह ये अयोध्येला कृतार्थ होवोनी ।
सत्यावलंबन-दृढतेचें हें कौतुक लेखावें ॥ २ ॥
सानुरागें अभिषेक करिती वसिष्ठ रामाला ।
अनुपम उत्सव थोर होय तो अपूर्व जगताला ॥
सानुज सिंहासनिं आरूढे घेउनि सीतेला ।
परम रुचिर हें ध्यान सुमंगल अंतरिं रेखावें ॥ ३ ॥
अब्द चतुर्दश व्रती दंपती उत्सुक संगाला ।
सुरतोत्सवोद्यत गळां घालिती सुमनांच्या माळा ॥
पूर्ण-कलेचा चंद्र उगवला स्रवत अमृताला ।
प्रगटुनि अनंग चित्तीं आणी रामा रमवावें ॥ ४ ॥
परस्पर-मुख-दर्शनीं लालस पुलकांकित होती ।
मदन-बाणीं विव्हल होउनी टकमक पाहाती ॥
इन्दु-धवल-सुमशय्येवरती आनंदें रमती ।
क्रीडोत्सव हा गाउनि मागें कृतार्थ मीं व्हावें ॥ ५ ॥

११६. पद ( चाल – वैशाखमासिं० )

राम-चरित-कुसुम-रेणु घेइं वेंचुनी ।
परिमळ तुज गंधयुक्त करिल जाणुनी ।। ध्रु० ।।
नामरूप मधुर तशी आकृती भली ।
नीति-पंथ-गमन-रीति खुलुन शोभली ।।
कर्तव्यीं सन्मुखता नटुनि राहिली ।
पराग-चय हा रचुनि ठेव आपुल्या मनीं ।। १ ।।
पत्नी वच बाण यांत एकत्व थाटलें ।
निश्चय-बळ क्षात्र-तेज मूर्त चमकलें ।।
न्याय-नैष्ठुर्यांत दया-परत्व रंगलें ।
वनविं मन निर्भर या आमोद-सेवनीं ।। २ ।।
सागरें निज तनुवरतीं दगड वाहिले ।
अविवेकी पशुनींही सख्य बांधिलें ।।
अघटित-घटन-कुतुक यशीं रम्य प्रगटलें ।
सिद्धार्थ तूं चित करितां राहसि होउनी ।। ३ ।।

---

११७. पद ( चाल – वैशाखमासिं० )

रामाची जन्मकथा गाउं कीर्तनीं ।
होउनियां समरस रसें पूर्ण दाटुनी ।। ध्रु० ।।
जन्मतिथी आज शुभा नवमि पातली ।
नवविधा भक्ति गमे प्रगट जाहली ।।
अपूर्व हे खचित महापर्वणि लाभली ।
घेउं अनुग्रह तिचा अलभ्य जोडुनी ।। १ ।।

मास मधु ऋतुहि मधु समय हा मधु ।
वासन्तीश्रीहि मधु पक्षही मधु ॥
वायु मधु वृत्ति मधु प्रसंग हा मधु ।
मधुचि राम-यश-गानें जाउं होउनी ॥ २ ॥
सूर्यवंश धन्य पुण्य पुण्य भूपती ।
दशरथ पिता पुण्य माय कौसल्यासती ॥
पुण्य गुरु वसिष्ठ राज-नगरि पुण्य ती ।
पुण्यचि सकल आज बनूं राम चिंतुनी ॥ ३ ॥

---

## ५. श्रीहनुमान्



११८. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

अंजनिचा सुत रे । भज तो ॥ ध्रु० ॥
काया वाचा मन हीं ज्याचीं । श्रीरामार्पित रे ॥ १ ॥
गृहधनदाराक्षुधातृषा जो । रामचि चिंतित रे ॥ २ ॥
हृदयीं ज्याच्या रामचि भरला । रामीं वर्तत रे ॥ ३ ॥
रामास्तव तो अवघड कार्यीं । झाला नियोजित रे ॥ ४ ॥

रामचि करि जो स्वार्थ सर्वही । राम-सेवा-रत रे ।। ५ ।।
म्हणे विनायक राम-कीर्तनीं । तो नित्य प्रगटत रे ।। ६ ।।

---

११९. पद ( चाल — अंध पंगु० )

अद्भुत मारुति-विक्रम त्याची अनुपमता थोर ।
वर्णायासी शक्ती कोणा कोण लभे पार ।। ध्रु० ।।
जांबवंत दे स्मरण बलाचें सीता-शोधनार्थ ।
उड्डाण करुनि लंघी सागर शतयोजन समर्थ ।। १ ।।
समुद्र-प्रार्थित ये बाहेरी मैनाक गिरि-श्रेष्ठ ।
विश्रांति त्या द्याया तेणें होय इंद्र-श्रेष्ठ ।। २ ।।
सुरसा रोधी मार्ग तयाचा शिरे तिचे वदनीं ।
सूक्ष्मरूपें बाहेर निसटे व्याली नवल मानी ।। ३ ।।
सिंहिकाननीं प्रवेश करूनी मर्मातें चिरुनी ।
साधुनि वध त्या राक्षसिणीचा उडे पुन्हां गगनीं ।। ४ ।।
यापरि क्रमुनी तोयानिधीतें ये लंकेजवळी ।
गमलें लोकां सहजचि हा हें द्वीप अतां कवळी ।। ५ ।।
स्वाभाविक निज वानररूपें कामरूपधारी ।
महोदधीच्या तीरीं उतरे पवेल कोण सरी ।। ६ ।।

---

## ६. श्रीकृष्ण



### १२०. पद (झंपा)

तुझ्या दर्शना मागतों कृष्णराया। प्रगट होई मला तोषवाया।।ध्रु०।। कंस बहु माजला। कामरूपी भला। अष्टवी कोमला ।। वृत्ति माझी।। हृदय हें व्यापुनी। राज्य निज स्थापुनी। मातला मन्मनीं ।। दैत्य, सखया ।। १ ।। वसुदेव देवकी। शृंखला घालुनी, ठेवितो कोंडुनी ।। दुष्ट पापी ।। मारिलीं अर्भकें। निष्ठुरें त्या खळें। तप्त, द्वेषानलें ।। होउनियां ।। २ ।। गांजला त्वत्पिता। माय ही तत्त्वतां। येईं त्या लवकरी ।। सोडवाया ।। विवेक शांति तरी। सोडवीं सत्वरीं। शुद्ध माझ्या करीं ।। दुष्ट हृदया ।। ३ ।। गोकुळीं प्रगटली। मोहिनी जे भली। अविद्या पातली ।। मूर्त जगतीं ।। यशोदा झोंपली। आपणां विसरली। मूर्त जे प्रसवली ।। आदिमाया ।। ४ ।। गाढ तम दाटलें। चित्त मम मोहलें। गोकुळीं पसरलें ।। करुनि छाया ।। देवकीचा तरी। गर्भ तूं श्रीहरी। प्रगट होईं, तया ।। लोपवाया ।। ५ ।। ब्रह्म हें प्रगटलें। विवेकें देखिलें,। शांतिनें प्रार्थिलें, ।। मुग्धवचनीं ।। गोकुळीं न्यावया। होय आज्ञा तया। तेथिंची

आणण्या ॥ आदिमाया ॥ ६ ॥ मार्ग देई तदा। स्पर्शुनी हरिपदा, । पावना, अघहरा ॥ शांत यमुना ॥ पसरुनी निज फणा, । शेष करि रक्षणा, । आर्द्र, मेघें न हो ॥ कृष्णकाया ॥ ७ ॥ कन्यका घेउनी, । निघत तो परतुनी । ब्रह्म गा ठेउनी ॥ गोकुळीं त्या ॥ येत कारागृहीं, । कळे न कोणासही, । गाढ निद्रा तधीं, ॥ कंसराया ॥ ८ ॥ मात बोभाटली, । कन्यका जाहली, । सकळही धांवली ॥ दैत्यसेना ॥ कंसही पातला । परम जो खवळला । घेत ती निजकरीं ॥ आपटाया ॥ ९ ॥ गगनिं ते जाउनी । बोलिली गर्जुनी । शत्रु मूर्खा तुझा ॥ जन्मलासे ॥ झोंपलासी कसा, । होउनी मूढसा, । काळ आला, तुझे ॥ प्राण घ्याया ॥ १० ॥ कंस-रिपु जन्मला, । नंदसुत जाहला । यशोदे लाभला ॥ चक्रपाणी ॥ अंबरीं सुरवरां । भूवरी द्विजवरां । पातला निजजनां, ॥ सोडवाया ॥ ११ ॥ आज जन्माष्टमी, । पातली म्हणुनि मी । मागतों, तूझिये ॥ दर्शनाला ॥ कंस हा मर्दुनी, । चित्त मम शोधुनी । सत्वरीं प्रगट हो ॥ नंदतनया ॥ १२ ॥

---

### १२१. पद ( चाल — कुसुमगंध सुटला० )

कृष्ण कसा भुलला । प्रेमासीं ॥ ध्रु० ॥
गोपकुमारां प्रियतम म्हणुनी । त्यांतचि हा रमला ॥ १ ॥
शिकवी चोरी गोपाळांसी । चौर्यपटू गमला ॥ २ ॥
यमुना-तीरीं क्रीडत मोदें । प्राकृतसा बनला ॥ ३ ॥
गोपाळांच्या भोळ्या पोरी । त्यांसीं हा रतला ॥ ४ ॥
रानीं गाई, प्रेमें चारी । गवळी हा सजला ॥ ५ ॥

---

## १२२. पद ( चाल – हरिभजनावीण० )

वनमाळी, सुरत-रसीं रमवि, गोपिनां ॥ ध्रु० ॥

परिसवुनी वेणु, मधुर
हृदय-हारि तारस्वर
पाडितसे देहविसर,
व्रजयुवतिंना ॥ १ ॥

शारदीय उषःकाळ,
योजुनि अशी रम्यवेळ,
वंश-रवें करित विकळ,
कमल-लोचना ॥ २ ॥

कालिंदी-पुलिन पृथुल,
नाद-भरें स्वनित निखिल,
औत्कंठ्यें शकुंत-कुल,
करित कूजना ॥ ३ ॥

यमुनाजल अमल शांत,
पवन मंदमंद सुटत,
सपरिमल तुषार-सहित,
तोष दे मना ॥ ४ ॥

उल्लसित-सौरभ्यभर,
कुंज असे सुमनोहर,
स्फटिक-शिला सुमहत्तर
परम शोभना ॥ ५ ॥

सजल-घन-श्यामलांग,
आर्द्र सदा अंगराग,
म्हणति सांग हा अनंग
बल्लवांगना ॥ ६ ॥

कमल-वदन मृदुल-हसन
तडिदंबर रक्त-नयन
दर्शनेंच करि चेतन
कामिनी-मना ॥ ७ ॥

एकसरें उठवि मदन,
भाव दुजा जाय गळुन,
विसरति मग देहभान
पंकजेक्षणा ॥ ८ ॥

काम-मदें अति विव्हळ
गांठुनियां नंदबाळ,
शमवाया हृदयजाळ,
करिति धर्षणा ॥ ९ ॥

अधरामृत प्राशिति किति,
आलिंगिति चुंबिति किति
लौल्यभरें चाटिति किति,
कुरंग-नयना ॥ १० ॥

अत्युत्कट कामवेग,
माज चढुनि घेत रंग,
रचुनि निशा, करित दंग
व्रीडितानना ॥ ११ ॥

पूर्ण निशारमण उदित
वरुनि सुधा-बिन्दु स्रवत
अनंतकाय प्रभु नटत
रासक्रीडना ॥ १२ ॥

परब्रह्म लुटिति खास,
पार नसे सौख्याब्धिस,
कोण म्हणे अज्ञ त्यांस,
पूज्य त्रिभुवना ॥ १३ ॥

रास-केलि जो क्रीडत
गोपींसह प्रेम-ललित
धरुनि चरण, मी प्रार्थित,
पुरविं कामना ॥ १४ ॥

---

### १२३. पद ( चाल – वैशाखमासिं० ;)

नंदबाळ, कांत, गोप-कुमारि इच्छिती । हेमंतीं कात्यायनी-व्रत योजिती ॥ ध्रु० ॥ अरुणोदयिं यमुना-जळीं स्नान सारिती । देवीची रचिति रम्य प्रतिकृति सैकती । गंधमाल्य-धूपादिकीं मूर्ति पूजिती । मास एक व्रताचार हाच सेविती ॥ १ ॥ परस्परें करावलंब करुनि कुमारिका । जलावगाहनार्थ उषःकाळिं बालिका । कालिंदी-तीर निकट येति व्रजकन्यका । मज्जनोद्यत, निजवसनें तटीं ठेविती ॥२॥ साधुनियां समयासी, ये कपटि श्रीहरी, । व्रत-फलद उचलि सकल अंबरें सत्वरीं, । उन्नतवृक्ष पाहुनियां चढत त्यावरी, । या म्हणे मज निकटीं, वस्त्रें लाधती ॥ ३ ॥ झांकुनि निज योनि करें, सलज्ज

कामिनी, । हात एक उचलुनि वरी, मागति प्रार्थुनी । व्रतघ्न, नग्न स्नान होत, यास्तव भामिनी । म्हणत करा दोन्हीं करीं नमन, श्रीपती ॥ ४ ॥ विलज्ज करुनि व्रजयुवति, वसनें देइ तो, । संकल्प तुमचा मत्कृपें पूर्ण होय तो । आश्वासन देउनि असें, व्रजांत धाडितो । भजतां हा गोप-तनय अर्थ साधती ॥ ५ ॥

---

## १२४. पद ( चाल—खरा तो प्रेमा० )

भजावा राधाकृष्ण-गोविंद-हरी,
वनीं विहरत, मुरली अधरीं धृत, । त्रिभुवनीं निनाद करी ॥ ध्रु० ॥
अभिनव श्रुति ऐकवी श्रवणीं गोपीजनां
भुलवुनि, करित आत्मवश, युवती विद्धमना,
चुंबित अधरीं, आलिंगीत, कामा प्रगटवी,
शमवि कुहक, सुरतज्ञ राधा-भुजंग हरी ॥ १ ॥

---

## १२५. पद (चाल—मला मदन भासे० )

भला किसन शोभे राधे संगतीं । मोहितसे त्रैलोक्याप्रती ॥ ध्रु० ॥
कडेवरी खेळत, स्मित दावी मधुर मुखीं, स्फुरवी तन्मती, ॥ १ ॥
मनिं ती आणी रति-प्रमोदा, थोर बने तेव्हां, श्रीपति ॥ २ ॥

---

## १२६. पद ( चाल—मला मदन भासे० )

सजे गवळि, स्कंधीं वाहे घोंगडी, । गोपार्भकीं क्रीडे आवडी ॥ ध्रु० ॥
गृहीं शिरे, गोरस दधि लोणी पय हरुनी सेवी तांतडीं ॥ १ ॥
गोपिका, काना करी विमूढा, प्रेरुनि त्यां, दृष्टी वांकुडी ॥ २ ॥

---

### १२७. पद ( चाल – खरा तो प्रेमा० )

यशोदे, पुण्याई तुझी थोर खरी,
महापुरुष अवतरे तुझियेस्तव । स्तनरस पिये अधरीं ॥ ध्रु० ॥
गोकुल-जन-भाग्य-सूर्य उदेला वाटतो,
रमवित सकल नारनर, सुधाकरसा गमतो,
काम पुरवि सुरतरूसा, वागतो प्राकृत जसा,
असुर वधी, भया हरी, गोवर्धन-गिरि-धारी ॥ १ ॥

---

### १२८. पद ( चाल – आनबान० )

रास, कृष्ण, कुमारि-संगें । खेळनि बनवि दंग, ।
गळां माळ आपाद रुळे । पुष्प-किरीट स्वशिरीं चढवी ।
नयनिं काम-संकेत दावी । पीतवसन कटिसीं मिरवी ।
नटोनि मोहक, रंगे ॥ १ ॥

---

### १२९. पद ( चाल – आनबान० )

गोप-बाळ, शिधोरी म्हणती । कान्या, त्वरित काढ ।
भुकेलों अती क्षुधा न कंठवे । चरति गाई निर्भर रमती ।
अशन सेवूं तुज सांगाती । मंडळाकार हरी भोंवती ।
अन्योन्य उच्छिष्ट खाती ॥ १ ॥

स्थळप्रत.

१३०. पद ( चाल – आनबान० )

बालकृष्ण, यशोदे, बोले । राधासंग गोड ।
विसंबे कधीं ना ती मातें, । मन न मोडी, स्तन दे हातीं, ।
निजवक्षीं घेत गाढ प्रीति, । ढकलुनि खालीं मज, उपरी ।
पडोनि, आपण हाले ॥ १ ॥

१३१. पद ( चाल – आनबान० )

दीन लीन राधिका विनवी, । काना पदर सोड, ।
चलूं दे मसीं, कोपेल पती, । अनुचिता ही करणी तुझी, ।
भय वाटे, लाज राख माझी, । उचलुनि घेतें, लघु होईं ।
फजीती ना मम व्हावी ॥ १ ॥

१३२. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

रस दे गोकुळिंचा । प्रभुला ॥ ध्रु० ॥
गोपांसह तो घेइल लुटुनी । संवके जरि त्याला ॥ १ ॥
राधा निज त्या, जरि अर्पिसी । सांडि न मग तुजला ॥ २ ॥
गोप बनवितां चारिल प्रेमें । तव गोवृंदाला ॥ ३ ॥
गोकुल-स्वामी करितां, प्रगटिल । नंद-यशोदेला ॥ ४ ॥
अघासुरादिक सर्व मर्दुनी । नाशिल दोषांला ॥ ५ ॥
अधरीं धरुनी वाजविल मुरली, । मोहिल गोपींला ॥ ६ ॥
अंगसंग त्यां घडवुनि सुखविल । देइल निजरतिला ॥ ७ ॥
इंद्रासह ये ब्रह्मदेवही । त्या सेवायाला ॥ ८ ॥
म्हणे विनायक निजसहवासीं । रमविल तो तुजला ॥ ९ ॥

### १३३. पद ( चाल—प्रीति जी दुजावरी० )

वनिं जातां, सोंगड्यांसीं । बोले कृष्ण, हृद्गतासी । बन्धु हो ।।ध्रु०।।

परार्थ-साधक गमती वृक्ष । निजवृत्तिं कैसे पहा दक्ष । बन्धु हो ।।
निज अंगें सर्व साहिती । वातवर्षातपहिम प्रीतीं । बन्धु हो ।।
( चाल ) रक्षिती । आश्रितांप्रती । हे महामती ।
करुनि छायेसी । जणुं धरुनि आतपत्रांसी ।। बन्धु हो ।। १ ।।

फल-पुष्प-पत्र-मूलांनीं । तेंवि अंकुर-वल्कलांनीं । बन्धु हो ।।
रस-गन्ध-काष्ठ-निचयांनीं । जें जें इष्ट, तें पुरवोनी । बन्धु हो ।।
( चाल ) तर्पिती । पाथिक ये रिती । धन्य निश्चितीं ।
न उपमा त्यांसीं । साधिलि जनिसाफल्यासी ।। बन्धु हो ।। २ ।।

---

### १३४. पद ( चाल—अरसिक किति हा शेला० )

नयनीं, हृदयेशाला । पाहुनि पुरवूं, तरि मनोरथाला ।। ध्रु० ।।

केशें पद-युग्माला, । झाडुनि पावूं, तरि अभिलषिताला ।। १ ।।
परिसुनि मधुवाणीला, । कृतकृत्य करूं तरि, निजश्रवणांला ।। २ ।।
गाउनि गुणगुणनाला, । सुधारस तरी चाखवुं, जिव्हेला ।। ३ ।।
हृदयीं तन्मूर्तीला । रेंखुनी, अनुभवूं तरि समाधिला ।। ४ ।।
अर्पुनि प्रियप्राणांला,। तत्स्वरुपीं साधूं तरि, ऐक्याला ।। ५ ।।
दावा यास्तव हरिला, । म्हणती द्विजनारी, त्यां गोपांला ।। ६ ।।

---

### १३५. पद ( चाल—मित्रा मम जन्मकथा० )

यमुनेच्या रम्य तटीं, अशोक-द्रुमवनीं, । विहरत तो साग्रज हरि, गोपसमूहनीं ।। ध्रु० ।। तडिदंबर, श्यामल-तनु, हास्य आननीं, ।

वनमाळी, बर्हभूषण, सक्त-क्रीडनीं, । खांद्यावरि गडियाच्या हस्त टाकुनी, । अन्यकरीं, मृदुल कमल, फिरवि घेउनी ॥ १ ॥ कुरळ केश गालांवरि रुळति येउनी, । उत्पलें निजकर्णीं शोभवि सेवुनी, । मोहनास्त्र चमकवि जणुं, स्वीय लोचनीं । पाहुनि त्या द्विजकांता, अर्चिति वंदनीं ॥ २ ॥

---

१३६. पद ( चाल—घेइं विहगसम भरारि० )

येइ विहरत यदुवीर, । मूर्त जसा मार ॥ ध्रु० ॥
उन्मादवि गोपींचें मन, विव्हल करि त्यांसी, ।
भोगी, प्रेमरस-वेड, । किति त्याला थोर ॥ १ ॥

---

# (८) श्रीदत्त

## १. श्रीदत्त



### १३७. पद (झंपा)

तुझी सत्कथा बोलवीं दत्तराया । होय तारक भवीं दुस्तरीं या ।। ध्रु० ।। निज-नेत्रोद्भवा । अत्रि-मुनि-पुंगवा । अनसूया-धवा ।। सांगे धाता ।। पुत्र व्हावा तरी । उग्र तप आचरीं । सेविं तूं कुलगिरी ।। ऋक्षतनया ।। १ ।। ताक्ष्र्यासन वरी । एक पायावरी । संयतात्मा करी ।। अशन अनिला ।। अब्दशत अंतरीं । त्र्यधीश ध्यानीं धरी । घोर तप आचरी ।। पुत्र व्हाया ।। २ ।। तपोग्नि प्रगटला । दिव्य तेजें भला । ताप तो जाहला ।। सकळ विश्वा ।। त्रिगुणेश तोषले । ध्यात जे मुनि भले । पातले त्याजला ।। पुत्र द्याया ।। ३ ।। ध्यान त्याचें चळे । त्र्यधिप-सत्ताबळें । तच्चित्त नावरे ।। आकळीतां ।। नेत्र तो उघडुनी । सुरवरां लोचनीं । परम हर्षे मनीं ।। पाहुनियां ।। ४ ।। स्तवन भावें करी । अर्पुनी वैखरी ।। चरण त्यांचे धरी ।। प्रेमभावें ।। वर देती तया । दत्त आत्मा मया । ऐक्यरूपा तया ।। बोधुनियां ।। ५ ।। पुत्र तो प्रगटला । दत्त नामें

भला । अवतार जाहला ।। आद्य जो का ।। चतुर्भुज नरहरी । ध्याइतां अघ हरी । स्मरत मी अंतरीं ।। अत्रितनया ।। ६ ।।

---

१३८. पद ( चाल – वैशाखमासिं० )

मार्गशीर्ष-मासोत्तम, अंश तो विष्णुचा । जन्म घेत म्हणुनि त्यांत, तनय अत्रिचा ।। ध्रु० ।। रव्युदय, सुर-कार्य करी, अनसूया सती, । म्हणुनि सकल देव तिला, कृतज्ञ, प्रार्थिती । माते वर माग इष्ट, देउं निश्चितीं । व्हावा, म्हणे, विश्वगुरु पुत्र आमुचा ।। १ ।। अविद्या-कृत-क्लेश-जाल-बंध-मोचना । भर्त्यासह मजसिं करिल योग-शंसना । दाविल जो सकल जगा मार्ग उपासना । संभव मम उदरीं घडो त्रयमूर्तिचा ।। २ ।। ब्रह्म-विष्णु-महेश करिती, दत्त, आपणां । अवतरतां भजति मुनि परमार्थ-प्रापणा । सेविती जड-पतित-पिशुन, दुरित-मोक्षणा । लभत सुत, अत्रि असा, अमित शक्तिचा ।। ३ ।। आश्रमांत जन्मोत्सव ऋषिनीं मांडिला । सुरपति सुरसंघ सवें घेउनि पातला । प्रमुदित जणुं भुवन-कोश मूर्त लोटला । मागत मी, प्रगट भाव, येथ तेथिंचा ।। ४ ।।

---

१३९. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

प्रसन्नता आली । आज मना ।। ध्रु० ।।
जन्मदिवस श्रीदत्तात्रींचा । हृत्कलिका फुलली ।। १ ।।
अंतरीं त्र्यधिप-प्रादुर्भवनें । मम वृत्ति खुलली ।। २ ।।
विनायकाच्या चित्तामाजी । त्र्यात्मकता थटली ।। ३ ।।

---

१४०. पद ( चाल—विसरला काय हरि० )

उगवला जन्मदिन दत्ताचा । परम आम्हां हर्षाचा ॥ ध्रु० ॥
छंद मनाला यश गायाचा । बोल बोलुनी प्रेमाचा ॥
पुरवुनि घेऊं अनुपम सुखाचा । अर्पूं रस हृदयींचा ॥ १ ॥

---

१४१. पद. ( चाल—कुसुमगंध सुटला० )

बाळ मनीं भरला । अत्रीचा ॥ ध्रु० ॥
क्रीडत शिशुसा सुरुचिर कांती । मन-मोहन नटला ॥ १ ॥
मुग्धा मधुरा वदुनी वाणी । रिझवी जो मुनिला ॥ २ ॥
योजी सहचर बाळें योगीं । गुरु त्यांचा बनला ॥ ३ ॥
पर्वत-शिखरीं बैसे ध्यानीं । बाळ मुनी सजला ॥ ४ ॥
स्मरतां प्रगटे, म्हणुनी माता, । दत्त म्हणे ज्याला ॥ ५ ॥

---

१४२. पद ( चाल—उद्धवा शांतवन कर जा० )

दत्तनामें प्रगट झाला । लीलात्मा जो योगी भला ॥ ध्रु० ॥
कामरूपी, बाळलीला । करुनि मोही, अत्रिचित्ताला ; ॥
दुश्चर तपा आचरला । पुत्रकामें मुनि कष्टला, ॥
(चाल) तपाचारें बहु तोषला । म्हणुनी स्वयें दत्त झाला, ॥
तेणें दत्त नाम पावला, । अत्रिगृहीं जन्मा आला ॥ १ ॥
अनसूया जगतीं ख्याता । पतिव्रता मुनिची कांता ॥
अत्रिपासुनी भगवंता । तिचे ठायीं होय पुत्रता ॥
(चाल) म्हणुनी नाम दत्तात्रेय । प्रगट झाला ज्योतिर्मय ॥
सांगे अथर्वण गुह्य । प्रिय शिष्या शांडिल्याला ॥ २ ॥

क्षणें बाळ क्षणें तरुण । जरठ जटाधारी जाण ॥
पैशाचरूपें संचरण । उन्मत्त जड मायावरण ॥
(चाल) त्यागि भोगि संगी योगी । नग्न, दंडी, कधीं, बैरागी ॥
ब्रह्मचारी यति तापसी । करि ऐशा विचित्र लीला ॥ ३ ॥
पीतांबरधारी तुष्ट । सुंदर काया ज्याची पुष्ट ॥
भक्तांचें जो पुरवी इष्ट । हरुनि सकल त्यांचे कष्ट ॥
(चाल) धर्माधर्म ज्यासी, नाहीं । वर्ण-विरुद्धाचार पाहीं ॥
गृही वनी कीं संन्यासी । आश्रम ज्यासी नाहीं उरला ॥ ४ ॥
भक्त-रक्षणीं आनंद । म्हणति ज्यासी योगानंद ॥
स्मरण करितां, जो वरद । पूजा-फल दे कामद ॥
(चाल) भक्तचित्त धरुनी राहे । कृपेनें जो भक्तां पाहे ॥
आनंद, पूर्ण, तो लवलाहें । देवो आम्हां, पददासांला ॥ ५ ॥

---

## १४३. पद ( चाल – चलत चलत मथुरा० )

रमत हृदय-भवनीं, निजरसीं ।
चित्त-चोर तो दत्त येउनी, । खेळत खुलुनी स्वच्छंद मनीं ॥ध्रु०॥
धूर्त निजेच्छीं देह नाचवी । यत्न करि विनायेक-मोहनीं ॥ १ ॥

---

## १४४. पद ( चाल – अरसिक किति हा शेला० )

नमितों मी श्रीगुरुला । जो स्वयें झाला दत्त जगताला ॥ ध्रु० ॥
त्या पतित-पावनाला । स्मरणें पुरवी सकलार्थाला ॥ १ ॥
करुणाघन-वरदाला । यतिवर-मान्य-योगाचार्याला ॥ २ ॥

अनसूयातनयाला । पतिनिष्ठेला द्यामेव वळला ॥ ३ ॥
बाल-जड-पिशाचाला । वर्णाश्रमधर्म-बंध-मुक्ताला ॥ ४ ॥
त्या लोकविरुद्धाला । उन्मत्त-व्रात्य-स्वैराचाराला ॥ ५ ॥
ज्ञान-घन-शोभनाला । मंगल करुनी देवो सिद्धीला ॥ ६ ॥

---

१४५. पद ( चाल — नमिति गजवदन० )

वरित तव चरण, करुनी नमना, ।
भवहरा, वरदवरा, दुरित-निचय-दलना ॥ ध्रु० ॥
अत्रि-नंदना,शरणागत मी ।
निजधामीं न्या, मज, सुख-भवना ॥ १ ॥

---

१४६. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

वंदूं श्रीदत्ताला । निष्कल-सकल-संमिश्र-रूपाला ॥ ध्रु० ॥
शिव-सूक्ष्म-अनंताला । अखंड निरंजन निष्कलाख्याला ॥ १ ॥
माया-महेश्वराला । कृष्णपिंगल जो सकल-निष्कलाला ॥ २ ॥
ज्ञानमय-तपतप्ताला । धरोनी चित्तीं प्रजाकामाला ॥ ३ ॥
जगद्बीजात्मकाला । सर्व-देव-मय-सर्वैश्वर्याला ॥ ४ ॥
दिगंबर-तनु-रम्याला । रतानुकंपी दत्तात्रेयाला ॥ ५ ॥
सकलाभिध-सगुणाला । सीमा नाहीं यत्सौंदर्याला ॥ ६ ॥
चतुर्भुज परमात्म्याला । कथिला अथर्वणें शांडिल्याला ॥ ७ ॥

---

१४७. पद ( चाल – जमल्या पहा वनीं व्रजबाला० )

नमितों तुला, प्रभो, त्र्यधिपाला ।
हृदयीं स्मरुनी, मधुकीर्ते, तव लीला ॥ ध्रु० ॥
झटपट धांवसि, दुःखा हरिसी ।
स्मरण करि तया सौख्यद होसी ।
भरलों औत्कण्ठ्यें, दावी वदनाला ॥ १ ॥

१४८. पद ( चाल – रुचती कां० )

मज सखया, पाव आतां, तुजला मी प्रार्थितों,
चरणीं, या मस्तकाला ठेवोनी, याचितों,
अंत माझा नको पाहूं, हेंच मी सांगतों,
तुजविण बा, अन्या नाहीं गती हें, जाणतों ॥ १ ॥
अत्रितनया, दत्तराया, मजसाठीं धांवणें,
करोनीयां थोर कृपा, मजलागीं पावणें,
तुम्हांवीण वालि नाहीं, यासाठीं तारणें,
अर्पोनी मस्तकाला, निर्भयता मागतों ॥ २ ॥

---

१४९. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

रूप तुझें दावी । अवधूता ॥ ध्रु० ॥
योगी भोगी त्यागी दंडी । दीक्षा नित्य नवी ॥ १ ॥
गृही वनी कीं बटु संन्यासी । समजेना पदवी ॥ २ ॥
अव्यक्तलिंग, पतितोद्धारा, । दर्शन निज घडवीं ॥ ३ ॥
या दीनाचा तूं कैवारी । इच्छा मम पुरवीं ॥ ४ ॥

---

## १५०. पद (धुमाळी)

दत्ता, मम कराल का अंगिकार ॥ ध्रु० ॥
तुमचें सद्यश परिसुनि भुललों । नावडे हा संसार ॥ १ ॥
चटक लागली तुमच्या ध्यानीं । लांचावलों अनिवार ॥ २ ॥
परपुरुषासी व्यभिचार घडतां । चिडला प्रपंच फार ॥ ३ ॥
नावरे प्रेमा, विलज्ज बनलों । सांडियेलें घरदार ॥ ४ ॥
प्रार्थि विनायक, उशिर कशाला । करणें पतितोद्धार ॥ ५ ॥

## १५१. पद (धुमाळी)

प्रभुजी कदा कृपा करणार ॥ ध्रु० ॥
काया वाचा मन हीं माझीं । दुर्बळ झालीं फार ॥ १ ॥
प्रापंचाचे अघात घडतां । झालों मी बेजार ॥ २ ॥
एकांतींचा लाभ देउनी । दुःख कदा हरणार ॥ ३ ॥
चंचल मन हें स्थिर होवोनी । शांत कदा होणार ॥ ४ ॥
विनायका कधिं पदरीं घेउनी । निर्भयता देणार ॥ ५ ॥

## १५२. पद (धुमाळी)

दर्शन कधीं मला देणार ॥ ध्रु० ॥
वाट पाहतों सखया तुमची । कधिं दत्ता येणार ॥ १ ॥
प्रार्थित असतां नाथ मज पुढती । उभे कधीं रहाणार ॥ २ ॥
डोळे मिटुनी हृदयीं ध्यातां । प्रगट कधीं होणार ॥ ३ ॥
सद्गदित होउनि लीला गातां । प्रेमानें डुलणार ॥ ४ ॥
विनायकाच्या बोबड्या बोलां । कधिं स्वामी द्रवणार ॥ ५ ॥

## १५३. पद ( धुमाळी )

सन्निध कधीं मला घेणार ॥ ध्रु० ॥
कृष्णातटिंच्या पावन देशीं । वास कधीं घडणार ॥ १ ॥
भीमा-तीरीं संगमस्थानीं । कधिं सेवा देणार ॥ २ ॥
नर्मदेच्या तटाक-यात्रे । कधिं मजला नेणार ॥ ३ ॥
पायांपाशीं प्रभु मजलागीं । ठाव कधीं मिळणार ॥ ४ ॥
विनायकाचें मनोगत दत्ता । सफल कधीं होणार ॥ ५ ॥

---

## १५४. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

मम आशा पुरवीं । श्रीदत्ता ॥ ध्रु० ॥
गाणगा-भुवनीं नेउनि मजला । निज सेवा घडवीं ॥ १ ॥
स्नान संगमीं घालुनि याला । रूप तिथें दावीं ॥ २ ॥
भजन-सिद्धिला देउनि मातें । सार्थकता करवीं ॥ ३ ॥
चरणांपाशीं विनायकाला । जवळि सदा ठेवीं ॥ ४ ॥

---

## १५५. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

कीर्ति तुझी वदवी । मधुमधुरा ॥ ध्रु० ॥
जिव्हेनें ती प्रेमें गातां । मन विषयीं विटवी ॥ १ ॥
श्रवणीं पडतां चित्तवृत्तिची । समरसता घडवी ॥ २ ॥
गुण-पुष्पांचा परिमल हृदया । तन्मयता जडवी ॥ ३ ॥
विनायका तव सुंदर मूर्ती । यश-कीर्तन स्मरवी ॥ ४ ॥

---

१५६. पद ( चाल — कधिं करिती लग्न० )

मज दत्ता, भेटुनियां, सुखवावें अंतरा ।। ध्रु० ।।
वासना, मजसि गांजिती, । विषयिं लोटिती, । संग घडविती, ।
नको त्यां थारा ।। १ ।।
मात्सरी उठति भावना, । द्वैत ये मना, । देति यातना, ।
दूर त्यां सारा ।। २ ।।
मानसीं नाथ प्रगटुनी । ज्ञान देउनी । मोह नासुनी ।
भवातें वारा ।। ३ ।।

---

१५७. पद ( चाल — रुचती कां० )

वाट तूझी किती पाहूं, अत्रिच्या नंदना,
शिणलों मीं धांव आतां, त्रैलोक्यवंदना,
कलि खोटा त्रास देतो, त्याचीया भंजना
मारीतों थोर हांका, शत्रूंच्या तापना ।। १ ।।
जंभारे, कार्तवीर्यालर्काघ-पावना,
रेणूका-स्तुत-पादा, वेदांच्या गायना
अनसूया-गर्भरत्ना, अत्रि-चित्त-रंजना,
मुनि-वृंद-सेवितांघ्रि, सर्व-लोक-मोहना ।। २ ।।
स्त्री-पाना-सक्त मत्त, सह्याद्रि-शोभना,
उन्मत्त-बाल-वृत्त, पैशाच-क्रीडना,
अतिवर्णाश्रम, सिद्ध, श्रुति-मार्ग-मंडना
सर्वात्मन्, सर्वसाक्षी, विश्वाच्या लोचना ।। ३ ।।

विश्व-गमना, ज्ञानमूर्ते, भक्तार्ति-नाशना,
सर्वेड्या, सर्ववन्द्या, सर्वान्तः-प्रमोदना,
श्रीदत्ता, पाव आतां, परिसोनी प्रार्थना
नको शिणवूं बालकाला, करितों ही याचना ॥ ४ ॥

---

१५८. पद ( चाल — धांव विभो० )

ये रे माझ्या सखया दत्ता । प्रगट करीं रे आपुली सत्ता ॥ ध्रु० ॥
राज्य कलीचें बुडवायासी । करि तूं येथें साक्षात्कारासी ॥ १ ॥
अविद्येच्या कपट-जालातें । प्रगटुनि साधीं पूर्ण भंगातें ॥ २ ॥
तृतीय नेत्र तव उघडुनी जाळीं । काम क्रोध हे वैरी समुळीं ॥ ३ ॥
भस्म करीं या दुष्ट मत्सराचें । कारण नाशीं महत्कलहाचें ॥ ४ ॥
संशय सारा फेडुनि टाकीं । कृपा-दृष्टिनें मज अवलोकीं ॥ ५ ॥
सुखानुभव जो तव स्पर्शाचा । होवो प्राप्त तो मजला साचा ॥ ६ ॥
घडतां भेटी भय जाईल । दिव्य धैर्य तें मज उपजेल ॥ ७ ॥
अग्निमाजी लोह तप्त करितां । येत तयासीं आरक्तता ॥ ८ ॥
तेविं तुजसीं मज योग घडतां । येवो मजला त्वत्स्वरुपता ॥ ९ ॥
विनायकातें अंगिकारोनी । ठाव देईं तूं आपुल्या चरणीं ॥ १० ॥

---

१५९. पद ( झंपा )

करिं करीं प्रेमळा मजसिं थोर सुदया । अंत किति पाहसी प्रेम-निलया ॥ ध्रु० ॥ त्यागुनी वासना । अर्पुनी मन्मना, । करित मी प्रार्थना ॥ सौख्यसदना ॥ मूर्ति तूझी बरी । ध्याउनी अंतरीं । बोल बोलें तरी ॥ धांव सदया ॥ १ ॥ आजवरि पाळिलें । बाळ संरक्षिलें ।

भक्तिसी लाविलें ॥ विश्व-सखया ॥ संकटीं तें पडे । घालि तुज सांकडें, । पाहि तूं त्याकडे ॥ सांद्रहृदया ॥ २ ॥ दोष बहु आचरी । आडमार्गावरी । गमन बा तें करी ॥ मोह पडुनी, ॥ येईं तूं धांवुनी । त्याचिया सद्वनीं, । नेईं बा प्रगटुनी ॥ दुःख विलया ॥ ३ ॥ बहुत मी तापलों । जन्म बहु पावलों, । शेवटीं पातलों ॥ शरण तुजला ॥ घेईं घेईं तरी, । यासिं तूं निजकरीं, । दास हा उद्धरीं ॥ अत्रितनया ॥ ४ ॥

---

१६०. पद ( चाल—नमिति गजवदन० )

गिरिवर-शिखर-सुरतरु-शिखरा, ।
मुनिवरा, अशुभहरा, प्रणत-विजय-निकरा ॥ ध्रु० ॥
शत्रुतापना, अरि-हनना मी ।
स्तवितों, द्या मज जय, बळ-प्रखरा ॥ १ ॥

---

१६१. पद ( चाल—शाम चुनरिया दे दे मोरी० )

येथ, गुरुवरा, होवो फेरी । दत्त दत्त तव नाम वदतसें ।
भव माझी पाठ न सोडी, त्यासी निवारीं ॥ ध्रु० ॥
विपत्ति-हत मी, हांक मारितों, । अहित-क्षय कीं, व्हावा म्हणतों ।
तुजविण मजला कोण न तारी ॥ १ ॥

---

१६२. पद ( चाल—खरा तो प्रेमा ना धरि० )

घडावा साक्षात्कार, श्रीदत्त मुनी, ॥
प्रसन्न-मुख-मधुर-मंदस्मिताकुल, सुखविं, नयन दाउनी ॥ध्रु०॥
हिमकर-कर-निर्मिता जणुं, काया शीतला ।
प्रगटवुनि, करि शांत, स्वजन-मनस्ताप मला ॥
ठेविं कर शिरीं, आशीर्वाद देईं सुमंगल, ।
भजन-गजर दुमदुमवीं, हो जयजयकार जनीं ॥ १ ॥

---

१६३. पद ( चाल—लागे तुझा छंद रामा० )

देईं मला तव प्रेमा, दत्ता ॥ ध्रु० ॥
भजनीं निर्भर होउनि राहिन, । सांडुनि विषयकामा ॥ १ ॥
कीर्तन-छंदा घेउनि गाइन । तुज सदा परंधामा ॥ २ ॥
विनायकाचा होवो धंदा, । घेणें प्रभु, तव नामा ॥ ३ ॥

---

१६४. पद ( चाल—सत्य वदे वचनाला० )

अर्पुनियां नमनाला, दत्ता, । चरण धरोनी, प्रार्थित तुजला ॥ ध्रु० ॥
देईं मला तव प्रेम अनुपम, । होइल तृप्तिद चित्ताला ॥ १ ॥

---

१६५. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

दत्त मनीं ध्यावा । योगी हा ॥ ध्रु० ॥
सह्याद्रीच्या शिखरीं राहे, । मुनिवर हा बरवा ॥ १ ॥
अंकीं बाळा तरुणी नग्ना । पिशिताशी गावा ॥ २ ॥

मदिरापानीं सक्त असें मी । दावी या भावा ॥ ३ ॥
कण्ठीं माळा वन-पुष्पांची । दुर्लभ जी देवां ॥ ४ ॥
चंदनवासित ज्याची काया । तो हृदयीं रमवा ॥ ५ ॥
व्रात्य असा हा योगानंदी । हृदयीं तो ठेवा ॥ ६ ॥

---

### १६६. पद ( चाल – रुचती कां० )

मदविव्हल नग्न बाळा मदिराक्षी शोभना ।
सुरापान-मत्त अंकीं शोभे नव-यौवना ।
वनमाळा गळां घालि करि चंदनलेपना ।
करितों या छद्मवेषी दत्तासी वंदना ॥ १ ॥

---

### १६७. पद ( चाल – टाकिला यानें० )

सर्वैश्वर्ययुत । कृपाघन भगवंत । व्यापुनी विश्व हें वर्तत ॥ ध्रु० ॥
हृदयसंनिविष्ट । योगी अवलोकित । दत्ताख्य तेज परमाद्भुत ॥ १ ॥
आत्मक्रीड म्हणुनी । प्रसिद्ध जें लोकीं । त्यासी अनुकंपा तोकीं ॥ २ ॥ दिगंबर काया । जे पापक्षाशिनी । येथें यावी प्रगटोनी ॥ ३ ॥ जो चतुर्बाहु । चिदानंदैक रस । परब्रह्म सद्गुरु खास ॥ ४ ॥ ब्रह्मा विष्णु शिव । तोची सकलहि देव । मायावी दावी भाव ॥ ५ ॥ हात जोडोनी । सेवा मागत मी । द्यावी मज आतां स्वामी ॥ ६ ॥

---

### १६८. पद ( चाल—साध्य नसे मुनिकन्या० )

एकला वनविहारी, । त्रैलोक्यासी करितो फेरी ।। ध्रु० ।।
माथां शोभे कृष्णजटाभार, । भाळीं हिमकर-धारी, ।
भस्में चर्चित काया सारी ।। १ ।।
पायिं खडावा खांके झोळी । गंगा मस्तकावरी ।
संगें शुनक वेद चत्त्वारी ।। २ ।।
माला-डमरू-दिव्यकमंडलु-चक्र-गदा-शूल करीं ।
शंखें त्रिभुवन नादें भरी ।। ३ ।।
कौपीन नेसे वरि पीतांबर । व्याघ्रचर्म त्या उपरी ।
वल्कलें सेवी निज तनुवरी ।। ४ ।।
कृष्णा-भीमा-तटसंचारी, । रुचे नर्मदा भारी ।
संगमीं अनुष्ठानें करी ।। ५ ।।
वासुदेव नरहरी दत्तात्रेय । तुष्ट विनायकावरी ।
राहे त्याच्या जवळि निरंतरीं ।। ६ ।।

---

### १६९. पद ( चाल—प्रीति जी दुजावरी० )

यश वदतां श्रीदत्ताचें, । रस दाटे अधिकचि वाचे । भावुका ।। ध्रु० ।।
एकदां निजानंदेंसीं । दत्त धरिती शिवरूपासी । भावुका ।।
माहुरीं, व्रात्य वेषेंसीं, । मांडिती वेदपठणासी । भावुका ।।
( चाल ) परिसुनी, । चकित निजमनीं, । नाग होवुनी, ।
पुसत दत्ताला, । कुणि कथिलें या मार्गाला ।। भावुका ।। १ ।।

वर्णाश्रम तुजला नाहीं । अनाचार दिसतो पाहीं । भावुका ॥
गृही, वनी, बटु, संन्यासी । ओळखावें केवीं तुजसीं । भावुका ॥
( चाल ) लंगोट । त्यजुनि तूं धीट । दाविसी स्पष्ट ।
दिगंबर-तनुला । नेणों या आचाराला ॥ भावुका ॥ २ ॥

शिखासूत्र वर्जुनी वससी । ग्राम्य-विषयीं लंपट अससी, । भावुका ॥
नार, अंकीं, नग्न तरुणी । जे सौंदर्याची खाणी । भावुका ॥
( चाल ) मद्यपा । भोग-लोलुपा । सांडुनी त्रपा ।
काय हें करिसी । उपेक्षिसी मर्यादेसी ॥ भावुका ॥ ३ ॥

स्मित करुनी देव बोलती । पंचमाश्रम हा निश्चितीं । भावुका ॥
अवधूत, दिगंबर-दीक्षा । नाहीं या कसली शिक्षा । भावुका ॥
( चाल ) निर्मुक्त । आत्मनि सक्त । पूर्ण सुविरक्त ।
द्वैत ना ज्यासीं । तो न बद्ध श्रुतिबंधांसीं ॥ भावुका ॥ ४ ॥

हेतुगर्भ-वच ऐकोनी । दत्तात्रेय ये कळोनी । भावुका ॥
पश्चात्तापें धरि चरण । सर्व म्हणे केलें अर्पण । भावुका ॥
( चाल ) लोळला । गुरुपदीं भला । चरणधूळिला ।
लावि अंगासी । वदुं काय तद्विनयासी ॥ भावुका ॥ ५ ॥

श्रावण शुक्ल अष्टमीसी । प्रगटले इंदुवारासी । भावुका ॥
शिवरूपें हा अवतार । अर्धनारी-नटेश्वर । भावुका ॥
( चाल ) जाणुनी । विनायक मनीं । गाय कीर्तनीं ।
तच्चरित्रासी । पिंगलाच्या अनुभवासी ॥ भावुका ॥ ६ ॥

### १७०. पद ( चाल – आज शाम मोहलिनो० )

दत्तदेव योगपरो शंख डमरू वाजवी,
माइ घाल बोले भिक्षा, हांक अशी गर्जवी ॥ ध्रु० ॥
क्षण उभा वाट पहात, मग त्वरें तेथुनि जात,
स्वीय जन पावन करी, महिमा निज जागवी ॥ १ ॥

---

### १७१. पद ( चाल – राधाधर मधु० )

दत्तात्रेय योगीश, । गुरुवर, । दिगंबर सह्य-गिरीश ॥ ध्रु० ॥
नर्मदा-कृष्णा-विहरण-प्रिय, भस्म-भूषित, जगदीश, ॥ १ ॥
व्याघ्र-चर्माम्बर-परिवृत-काय, जटाधर, महामुनीश ॥ २ ॥
शंख-चक्र-त्रिशूल-मालाभृत, डमरु-कमंडलु-धृगीश ॥ ३ ॥
कंठ-स्थित-वनमाल, अवधूत, त्रिपुण्ड्र-भूषण, यतीश ॥ ४ ॥
रुद्राक्ष-धरण-समलंकृत-तनु, त्यक्त-संग, संयमीश ॥ ५ ॥
तुष्ट, पुष्ट, धृष्ट, सस्मितानन, भजा सदा विनायकेश ॥ ६ ॥

---

### १७२. पद ( चाल – राधारमण गिरी० )

मायावरण वरि दावी । सह्य-शिखरीं नित्य राही ॥ ध्रु० ॥
वागत लोकीं सुराप-जनसा । प्रगटीत, प्रमत्त भावही ॥ १ ॥
सेवित अंकीं तरुणी नग्ना । असकृत घेत चुंबनही ॥ २ ॥
पिशिताशी, चंदन-चर्चित-वपु, । मदन-रुचि-सुंदर-देही ॥ ३ ॥
छद्मवेष हा विनायकाला । अतिशयत्वानें मोही ॥ ४ ॥

---

१७३. पद ( चाल—हसे दिसे नभिंचा सुधाकर० )

वसे मुखीं स्मित किती मनोहर, । हृदय आकर्षी, मोहवी किती ।।ध्रु०।।
मिसळलों गमे, सरूप बनलों । विसरुनि अपणां, तन्मय, झालों ।
विरली वाटे तयीं मन्मती ।। १ ।।
ऐक्य विनायक पावुनि ध्यानीं । दत्तचि अपणां निश्चित मानी ।
वास करि जणों, त्याच मधु-स्मितीं ।। २ ।।

---

१७४. पद ( चाल—वनवासी राम माझा० )

हृदयींचा देव प्यारा । रूपें दिसे गोजिरा ।। ध्रु० ।।
सह्यगिरीवरतीं राहे । घेत शिखरिं थारा ।। १ ।।
आतपवर्षादिक साहे । लभेच न विकारा ।। २ ।।
रमे एकला स्वानंदीं । परिकर त्यजि सारा ।। ३ ।।
सेवि उदुंबर वृक्षा, तो । करि शिरीं पसारा ।। ४ ।।
झोटिंग परी सर्वांसीं । करुणा करणारा ।। ५ ।।
कोमल-हृदय, धरी भावा । भक्तीं सुकुमारा ।। ६ ।।
स्मरतां प्रगटे जो पुढती । सामर्थ्यें न्यारा ।। ७ ।।
आपणांसि जो दत्त करी । उपमा न उदारा ।। ८ ।।
जीवन-रस विनायकाचा । करि गमे विहारा ।। ९ ।।

---

१७५. पद ( चाल—कन्हैया बन्सिवाला० )

वैरागी, सह्यवासी, जो का मुक्ति-धाम ।। ध्रु० ।।
दृष्टि मधुर, शाटी परिधानी । शंख, गदा, शुन, संगीं ।।
शूलांबुज जो शोभवि हातीं । डमरु वाजवित मंद ।। १ ।।

---

१७६. पद ( चाल – जय जय दत्तराज योगी० )

यज यज योगिराज, ध्यानीं । भजभज, प्रेमकाज, गानीं ।। ध्रु० ।।
त्यागी भोगी शूली चक्री, कमल करीं शोभवितो ।
हास्य दाखवी वदन-संपुटीं रम्य, आपणीं रमतो ।। १ ।।
भस्म अंगिं, कुंकुमतिलका भालदेशिं जो मधु लावी ।
श्वान चार, श्रुतिरूप, जया अनुसरत, अचल जो सेवी ।। २ ।।
सवें असे सुरधेनु, एकला जो संचरतो मौनी ।
खडावा विलसती पदकमलीं, नम गुरु शिर नमवोनी ।। ३ ।।

---

१७७. पद ( धुमाळी )

दत्त माझ्या जीविंचा बहु प्यारा ।। ध्रु० ।।
अशनीं शयनीं विलास-समयीं । त्याविण गमेना जरा ।। १ ।।
जागृति स्वप्नीं सुषुप्ति-काळीं । ध्यास न मज दुसरा ।। २ ।।
विसरूं जातां विसर पडेना । मोहुनि गेलों खरा ।। ३ ।।
भुलवुनि इंद्रियें चित्त चोरिलें । देहीं घे थारा ।। ४ ।।
निजतो बसतो माझ्यासंगें । करि मजवरि पहारा ।। ५ ।।
जेथें विनायक तेथें प्रभु तो । संशय मुळिं न धरा ।। ६ ।।

---

१७८. पद ( चाल – बीज पेरावें० )

प्रेम दत्ताचें । किती अनुपम मजवरि साचें ।। ध्रु० ।।
छाया जेंवि पुरुषा न सोडी
तैशी माझी संगति जोडी
मन न माझें कधिं तो मोडी,
वात्सल्य त्याचें ।। १ ।।

१०२८९ दि ९९/३/०
७३२० दि २८/३/

माझ्या दुःखें दुखी होतो
मज सुख होतां सुख मानी तो
चिंता माझी सर्व वहातो,
ममत्व लोभाचें ॥ २ ॥

विषय-भोगां मी भोगीतों
तेव्हां तेथें कौतुक पहातो
प्रतिबंध सारे दूर करितो,
बंध प्रीतीचे ॥ ३ ॥

मजसाठीं हा सदैव जागा,
माझा कळवळा अंतरंगा,
काय म्हणावें या अनुरागा,
छत्र स्नेहाचें ॥ ४ ॥

दास बने हा निजदासांचा,
अनुभव ऐसा विनायकाचा,
योग तयासी अभेदत्वाचा,
दृश्य तोषाचें ॥ ५ ॥

---

१७९, पद ( चाल – प्रीति जी दुजावरी० )

एके दिवशीं, सह्याद्रीसीं, । दत्त बोले आनंदेंसीं । मम सखा ॥ ध्रु० ॥
मजसंगें खेळायासीं । चाल म्हणे स्वच्छंदेंसीं । मम सखा ॥
उपवनें रम्य गिरिवरिचीं । करुं क्रीडा तेथें साची । मम सखा ॥
( चाल ) जाहला । सोंगडी भला । नटुनि थाटला ।
पुष्पगुच्छेसीं । करि वनिंच्या विहारासीं ॥ मम सखा ॥ १ ॥

परिमल-रुचि जाणुनि मजला। घाली मज निज वनमाळा। मम सखा॥
पीत वसन मीं लक्षीतां। मजसिं होई नेसवीता। मम सखा॥
(चाल) या परी। आयुधें करीं। देइ सत्त्वरीं।
भूषवी मजसी। लेववी निजवेषासी॥ मम सखा॥ २॥
दृष्टि खिळतां चरणासी। ते मिळवी मत्पादांसी। मम सखा॥
मन चिंती प्रत्यंगासी। जडवी तें मंदगासीं। मम सखा॥
(चाल) संचरे। अंतरीं भरे। प्रत्ययीं स्फुरे।
घडवि सौख्यासी। जोडुनि समाधि-योगासी॥ मम सखा॥ ३॥
चित्तीं चित्त, देहीं देह,। मिसळी तो निःसंदेह। मम सखा॥
रति ऐसी त्यासीं घडतां। मज येई सौख्यरूपता। मम सखा॥
(चाल) क्रीडलों। तृप्ति पावलों। द्वैत विसरलों।
ऐक्यरूपासीं। साधवी तो मम जीवासी॥ मम सखा॥ ४॥

---

## १८०. पद (चाल—झिम्मा खेळूं या०)

दत्ता वाहूं या, दत्ता जोडूं या
खेळूं नाचूं त्याचे संगें—दत्ता जोडूं या, ॥ ध्रु०॥
हस्त हस्ताला धरोनी
अंगा अंगीं मेळवोनी
नृत्य-रंग—भाव दाऊं—दत्ता जोडूं या॥ १॥
फेर सभोंवतीं धरूं
नाचतां कौतूका करूं
गाढ होऊं एकाकारू—दत्ता जोडूं या॥ २॥

परिमल-रुचि जाणुनि मजला । घाली मज निज वनमाळा । मम सखा ॥
पीत वसन मीं लक्षीतां । मजसिं होई नेसवीता । मम सखा ॥
( चाल ) या परी । आयुधें करीं । देइ सत्त्वरीं ।
भूषवी मजसी । लेववी निजवेषासी ॥ मम सखा ॥ २ ॥
दृष्टि खिळतां चरणासी । ते मिळवी मत्पादांसी । मम सखा ॥
मन चिंती प्रत्यंगासी । जडवी तें मंदगासीं । मम सखा ॥
( चाल ) संचरे । अंतरीं भरे । प्रत्ययीं स्फुरे ।
घडवि सौख्यासी । जोडुनि समाधि-योगासी ॥ मम सखा ॥ ३ ॥
चित्तीं चित्त, देहीं देह, । मिसळी तो निःसंदेह । मम सखा ॥
रति ऐसी त्यासीं घडतां । मज येई सौख्यरूपता । मम सखा ॥
( चाल ) क्रीडलों । तृप्ति पावलों । द्वैत विसरलों ।
ऐक्यरूपासीं । साधवी तो मम जीवासी ॥ मम सखा ॥ ४ ॥

---

## १८०. पद ( चाल—झिम्मा खेळूं या० )

दत्ता बाहूं या, दत्ता जोडूं या
खेळूं नाचूं त्याचे संगें—दत्ता जोडूं या, ॥ ध्रु० ॥
हस्त हस्ताला धरोनी
अंगा अंगीं मेळवोनी
नृत्य-रंग—भाव दाऊं—दत्ता जोडूं या ॥ १ ॥
फेर सभोंवतीं धरूं
नाचतां कौतूका करूं
गाढ होऊं एकाकारू—दत्ता जोडूं या ॥ २ ॥

दत्त गाऊं दत्त बोलूं
बहु खुलूं उडूं डुलूं
वांकुल्या दावोनी रंगीं – दत्ता जोडूं या ॥ ३ ॥
यशकीर्ती गात गात
रसीं ऐक्या घडवीत
चोजवूं या दत्तालागीं – दत्ता जोडूं या ॥ ४ ॥
रंगें रंगूं त्याचेठायीं
लीन होऊं त्याचे पायीं
सामरस्या लाभूं तेणें – दत्ता जोडूं या ॥ ५ ॥
मूर्त होऊं दत्तात्रेय
प्रेमरसें सुधामय
खेळां खेळूं सोंगें ढोंगें – दत्ता जोडूं या ॥ ६ ॥

---

## १८१. पद ( धुमाळी )

दत्त दत्त अखंड बोलूं या ॥ ध्रु० ॥
भवविष उतरे नाम-मंत्रानें । अनुभव तरि तो घेऊं या ॥ १ ॥
अविद्येनें असे झडपिलें । पिशाच-मोचन साधूं या ॥ २ ॥
भय मृत्यूचें दूर कराया । याच अमृता सेवूं या ॥ ३ ॥
विनायकासी मार्ग गवसला । कृतार्थतेला गांठूं या ॥ ४ ॥

---

## १८२. पद ( चाल – बघतां सुंदर वदना० )

वदनीं वदतां नामा, दत्ता, झगटुनि ये प्रेम, हृदय-धामा ॥ ध्रु० ॥
उल्हसोनि वृत्ती, । विसरुनि अन्य-विषय-प्रीति ।
घे रति तुजसीच पूर्णकामा ॥ १ ॥

विनायक विरोनी । समरस तो तुजसिं बनोनी ।
पावत तो, चरमागति रामा ॥ २ ॥

१८३. पद ( चाल — स्वार्थी जी प्रीति० )

योगी तो, दत्त, दीनांचा सोयरा ॥ ध्रु० ॥
संकटिं त्याचेवीण न कोणी । धांवत गा दुसरा ॥ १ ॥
चिंता तुमची सकळहि जाणा । अत्रिच्या कुमरा ॥ २ ॥
म्हणुनी त्यातें हृदयीं ठेवा । कधिं नच त्या विसरा ॥ ३ ॥

१८४. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

प्रियकर सुखकर मजला । स्मरतां दे जो मज आनंदाला ॥ ध्रु० ॥
गातां प्रेमें ज्याला । निरवधि लाभत समाधि-सौख्याला ॥ १ ॥
नत मी अवधूताला । स्मरणें चुकवी जो संसाराला ॥ २ ॥
त्याविण कांहीं मजला । लाभ नसे कीं हृदयंगम उरला ॥ ३ ॥
त्या नत-जन-सुरतरुला । सांडीन कां मी श्रीदत्त-यतिला ॥ ४ ॥

१८५. पद ( चाल — प्रीति जी दुजावरी० )

विश्व सकल हें ताराया । आलासी दत्तात्रेया । गुरुवरा ॥ ध्रु० ॥
जे त्वच्चरणांला भजती । त्यांसी तूं देसी सुगती । गुरुवरा ॥
इतिहास ऐकुनी कानीं । श्रद्धा मज बहु उपजोनी । गुरुवरा ॥
( चाल ) वंदिलें । स्वरूप ध्याइलें । चित्त वाहिलें ।
तव पदाब्जाला । पावें तूं आतां मजला ॥ गुरुवरा ॥ १ ॥

कार्तवीर्य तुज नत झाला । तिन्हीं लोकीं वंद्य केला । गुरुवरा ॥
भ्रष्ट-राज्य अलर्कराजा । सेवि तुजला महाराजा । गुरुवरा ॥
( चाल ) होउनी । तुष्ट तूं मनीं । योग पढवुनी ।
धन्य तो केला । लाधे तो निजराज्याला । गुरुवरा ॥ २ ॥

यदुराजा ज्ञान लाभला । विष्णु-दत्त सिद्ध झाला । गुरुवरा ॥
जंभदैत्य देव जिंकिती । आयुलागीं पुत्रप्राप्ती । गुरुवरा ॥
( चाल ) रमवुनी । चित्त गुणगणीं । सुयशगायनीं ।
प्रार्थितों तुजला । सिद्ध करीं तव कार्याला ॥ गुरुवरा ॥ ३ ॥

---

१८६. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

दत्ताला अभिमान । माझा ॥ ध्रु० ॥
संकटिं मजला, घालुनि पाठीं, । उभा पुढें, भगवान ॥ १ ॥
विपत्ति माझ्या आपण भोगी । नसे तया उपमान ॥ २ ॥
विनायकाला अनुभव आला । येथ नको अनुमान ॥ ३ ॥

---

१८७. पद ( चाल — पार्था तुज देउनि० )

देउनि एकांताला । वडवा मज निजसेवेला ॥ ध्रु० ॥
छंद लागला तुमचे भजनीं,
आदर जडला चरण—पूजनीं,
आवड मोठी गुणगण—कथनीं,
द्या दृढ प्रेमाला ॥ १ ॥

संगति लाभो साधुजनांची,
अनुमति तैशी बहुमान्यांची,
सहायता मज गुणवंतांची,
लावा मार्गाला ॥ २ ॥

गलबला हा प्रापंचाचा
असह्य वाटे मजला साचा,
तेणें बनलों, श्रीगुरु, काचा
पाठीसी घाला ॥ ३ ॥

विनायकाच्या कैवारीया,
धांवत यावें दत्तात्रेया,
निजवसनांतरीं मज झांकाया
पसरा बाहूंला ॥ ४ ॥

---

१८८. पद (चाल—रुचती कां०)

फसवोनी नयनिं माझ्या प्रवेशना साधिलें
तेथोनी हृदय माझें मग तेणें जिंकिलें
स्थापोनी तेथ सत्ता दृढ ठाणें दीधलें
ऐसें या दत्तनाथें मम स्वत्वा हारिलें ॥ १ ॥

---

१८९. पद (चाल—श्रीमंत पतीची राणी०)

श्रीदत्तकृपेचा थारा, नर तोच परमभाग्याचा ॥ ध्रु० ॥
स्वर्ग-मृत्यु-पाताळाचा, यजमान होय तो साचा; ।
रविचंद्र, तेहि वश त्याला, मानिती धाक मनिं त्याचा; ।

विश्वपाळ होउनी दास, सांभाळिति कल हृदयींचा ; ।
भक्त्यमृत सेवायाला,
विरति, तृप्ति-मद, द्यायाला,
ज्ञान, चित्त रमवायाला,
आप्तकाम, निधि शांतीचा, । पुतळा तो आनंदाचा ॥ १ ॥

---

१९०. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

दत्त गजानन रे । मनुजा ॥ ध्रु० ॥
देव एक, परि नानारूपें, । भक्तांस्तव धरि रे ॥ १ ॥
जैशी काया रुचते भजकां । प्रगट तशी करि रे ॥ २ ॥
उपासकांना, आवड जी जी । तीच तया प्रिय रे ॥ ३ ॥
त्रिगुणात्मक तो नटुनी करितो । सृष्टि-स्थिति-लय रे ॥ ४ ॥
म्हणे विनायक, भेद सांडुनी । भज परमात्म्या रे ॥ ५ ॥

---

१९१. पद ( चाल—बोल तुझे गोड असले० )

मूर्त हृदीं, दत्त भरले, गाढ राहिले, तरीच कार्य साधलें ॥ ध्रु० ॥
बनसी तयाची मूर्ति, तेजाची समाप्ती,
म्हणसील रूप त्याचें, तुला लाभलें ॥ १ ॥
समज जनांची होई, सामक्षा तयां ये, ।
प्रभु-तेज, खास येथें, पहा बोललें ॥ २ ॥
लयता थटोनी ये जी, सांगे समापत्ती ।
लभली विनायकासी, द्वैत लोपलें ॥ ३ ॥

---

### १९२. पद (चाल — प्रेम नच जाई तेथें०)

दत्त, वश होई प्रेमा, प्रियाच्या हृदयिं धरी, कामा, ॥ ध्रु० ॥
त्यजित न लोभें, जडतो त्यासी, ।
करी जो भजक, मुग्ध गानरसीं ॥ १ ॥

---

### १९३. पद (चाल — विसरला काय हरि प्रेमाचा०)

गवसला दत्त वद कोणाला । कवण लाभे साक्षीला ॥ ध्रु० ॥
धन्य तयाला समजायाला, । वंद्य मानुनी विश्वाला, ॥
अडचण काय गमत हृदयाला, । मानूं गुरुच तयाला ॥ १ ॥

---

### १९४. पद (चाल — मंजूळ रसना०)

छंद भजनिं, सुजना, घेईं; । सोड अन्य त्याज्य दुर्वासना ॥ ध्रु० ॥
जडो रति गायनीं । सुललित-धवल-यश-कीर्तनीं ।
दत्त तुष्ट, तुज देति वरांनां ॥ १ ॥
लभसील दर्शना, । पवसिल निज चित्त-शोधना, ।
कथी विनायक, स्वानुभवांनां ॥ २ ॥

---

### १९५. पद (चाल — अति गोड गोड ललकारी०)

डुल, गाय गाय भजनासी । जाळ किल्बिषा, भंगीं नियतीसी ॥ध्रु०॥
बन निर्भर, पावें लयनासी, ।
घडवीं ऐक्या परात्मयासी, ॥
दत्तात्रेयीं परम-रतीसी ॥
घे, सौख्यास सेव सततेंसी ॥ १ ॥

---

१९६. पद ( चाल—जाऊं खेळाया चला० )

गाऊं कीर्तीला यशा हर्षुनी,
आळवूं कीर्तनीं, ॥ ध्रु० ॥
दत्त लोभवूं भक्तिरसीं, प्रेमा अर्पूं
तन्मय बनोनीयां ॥ १ ॥

१९७. पद ( चाल—बजाव बजाव मुरली० )

झपाट झपाट मजसीं, धांवोनी,
मम मति हरवीं, दत्त, डमरुधर, ॥
शंख वाजवुनि, आगम कळविं, ।
यास निज रतिस लाविं धांवोनी ॥ १ ॥

१९८. पद ( चाल—प्रतिकूल होई० )

माझेवरि असो तुझी कृपा अनुपम, ।
दोन्ही चरण धरोनियां, प्रार्थितों पुरुषोत्तम ॥ ध्रु० ॥
देह माझा चुकताहे, मनीं शुद्ध भाव ।
जाणतोसि दत्तराया, सर्वज्ञ तूं देव; ॥
श्रद्धा थोर हृदयिं माझ्या, अविश्वासा न वाव ; ।
वसतोसि चित्तीं माझ्या, तेथें करुनी धाम ॥ १ ॥
क्षमा व्हावी माझे दोषां, मदीय ही प्रार्थना ।
परिसोनि, सिद्ध करा, स्वामि दयाघना ॥
लोळतों मी पायीं नाथा, करुणा येवो मना, ।
प्रगटोनि तरी आतां मज द्यावें क्षेम ॥ २ ॥

अपराध बालकाचे, माय काय मानी, ।
क्रोधि होय अंतर तीचें, ऐसें काय जनीं, ।
कृपाळु ती नित्य पूर्ण, प्रेमाची कीं खनि; ।
विनायका पदरीं घेईं, पुरवीं हा काम ॥ ३ ॥

---

१९९. पद ( चाल—उपवनिं गात कोकिला० )

विधुसम तेज फांकलें; ।
सुखवाया मच्चित्ता, नटलें मधु, ॥
नयन-तुष्टिकर बनलें । अमृतसें कीं गमलें ।
प्रगट दत्त प्रेमभरें । थट्टुनि अले ॥ १ ॥

---

२००. पद ( चाल—पहा गोकुळीं रंगल्या गोपबाला० )

मनीं चिंतुनी रेखुं, या दत्तदेवा ।
थटे कामसा, दावितो तुष्टभावा; ॥ ध्रु० ॥
शम देत चित्तास, पति त्यास भावूं, ।
प्रियता तया अर्पुनी, संगिं सेवूं ।
अनन्यत्व स्वीकारुनी दंग गाऊं ॥ १ ॥

---

२०१. पद ( चाल—माधवा ठावा जिवा० )

मोहिसी, चित्ता किती । स्वरुपीं स्वीयीं, नसेच मिती; ॥
ध्यास मनिं लागे, न लाभेच शान्ति, । हुर हुर वाटे जीवाप्रती ॥ध्रु०॥
देइं दर्शन आपुलें । तोषवीं मला वहिलें ।
रमवीं येउनि मन्मतीस, स्वयें । दत्त होईं मातें ॥ १ ॥

---

२०२. पद (चाल - अरसिक किति हा शेला०)

रस हृदयींचा थटला। दत्तरूपें हा येथें सांचला ॥ ध्रु० ॥
मधुर किती हा नटला। गुंगुनी गेलों पाहतां याला ॥ १ ॥
प्राणचि हा मम सजला। अनुपमेयरूपें गमतो मजला ॥ २ ॥
बहिश्वर आकारला। मनासम करितो येथ क्रीडेला ॥ ३ ॥
प्रियकरसा रमणीला। संतोषकर हा देत निजरतिला ॥ ४ ॥
लभवीतो स्मितमधुला। मनोलय आपणीं साधायाला ॥ ५ ॥
भासे विनायकाला। जीवन आपुलें आलें मूर्तिला ॥ ६ ॥

---

२०३. पद (चाल—ही रात सवत बाई०)

कां दत्त दिसत नाहीं। नयनां, न शांति मज कांहीं ॥
मन रक्त करोनी ठेलों,। बुद्धिला स्थिर जरी केली, ॥
हृदयास भंग कैसा हा,
सह्य बने अगाई,
कां भेट मला न होई,
दुःखी विनायक झाला ॥

---

२०४. पद (धुमाळी)

प्रभु, मी कधीं दत्त बनणार, ॥ ध्रु० ॥
तीर्थें, क्षेत्रें दुर्गम स्थानें,। लीलेनें फिरणार, ॥ १ ॥
स्मरतां कोणी मज कोठेंही। दत्त तया होणार, ॥ २ ॥
ब्रह्माण्डासी मठ कल्पोनी। वास तिथें करणार, ॥ ३ ॥
योगी आणी सिद्ध असा मी। जन-दुःखा हरणार, ॥ ४ ॥

स्वजनां वश मीं भक्तांसाठीं । तनु नाना धरणार, ॥ ५ ॥
स्वेच्छाचारी नानारूपें । दास-गृहीं वसणार, ॥ ६ ॥
छंद लागला विनायकाला । कधिं स्वरुपीं मिळणार ॥ ७ ॥

---

२०५. पद ( चाल—धांव विभो० )

दर्शन मजला कधिं तें घडतें । तळमळ मनिंची विलया जाते ॥ ध्रु० ॥
त्या प्रभुचरणीं, लोळेन कधिं मी । अर्पिन कधिं त्या, सर्वस्वा मी ॥१॥
पाहिन नयनीं मुखसरोरुह तें । परिसिन कधिं मी मधु-वाणीतें ॥ २ ॥
मृदुल पदांना, कधिं कुरवाळिन । प्रेमानें कधिं, संवाहीन ॥ ३ ॥
सेविन कधिं त्या, किंकर बनुनी, । योग घडे कधिं उच्छिष्टसेवनीं ॥४॥
म्हणे विनायक, चिंतन ऐसें । मधुराहुनि मधु, अमृत जैसें ॥ ५ ॥

---

२०६. पद ( चाल—रुचती कां० )

वाट तुमची किती पाहूं, सह्याद्रि-शोभना,
वात्सल्यें धांव घ्यावी, पुरवावी कामना,
मुहूर्त-वेळा भरत आली, मनिं केंवीं येइना
लाज राखा प्रभु माझी, हे आतां प्रार्थना ॥ १ ॥

---

२०७. पद ( चाल—वाजवी वाजवी मुरलीला० )

पाहुनि सस्मित-वदनाला, । स्मृति गळे, होत मी उतावळा ॥ ध्रु० ॥
विद्रुम-सदृश अधराला । बघुनि गमे, चुंबावें याला ।
मधुरामृत प्यावें, । मत्त बनावें, । आलिंगन द्यावें शरिराला ॥ १ ॥

कोमल कपोल, निज गाला । लावुनि, घ्यावें स्पर्शसुखाला ।
नयनां नयनांसीं, । मुख वक्त्रासीं, । भिडवुनि हुंगावें श्वसनाला ॥२॥
मारुनि दृढ मिठि कंठाला । रुचत रमावें विनायकाला ।
ऐक्यता पावुनी । दत्तचि बनुनी । म्हणे लुटावें आनंदाला ॥ ३ ॥

---

२०८. पद ( चाल—कान्हा तव बांसरी० )

दत्ता तव भास्वती । आकृती,
दावीव मातें, मना लागली आर्ति ॥ ध्रु० ॥
चित्ता प्रमोदवीं, । कश्मला हारवीं, ।
मज दर्शना देउनी जीववीं, ।
भरवीं विनायकीं, निज गाढ प्रीति ॥ १ ॥

---

२०९. पद ( चाल—ब्रिज लाला गडे० )

गिरिवासी, कधीं मजसीं, जवळि घे, खास ॥ ध्रु० ॥
बोधिल गुह्य तो, । शोधिल चित्त तो, ।
देइल शांति, विनायकास ॥ १ ॥

---

२१०. पद ( चाल—माझा राज बन्सि राणा० )

माझा दत्त कोठ राहे, मन त्यास शोधिताहे ॥ ध्रु० ॥
प्रेम-बनावट वाटे त्याची, रूप तसें लाहे ; ॥ १ ॥
माझें जीवन, आत्मा माझा, भरुनि गेलों मोहें ॥ २ ॥
हृदयीं माझ्या प्रगटुनि, केव्हां देइल साक्ष पाहें ॥ ३ ॥
तळमळ लागे विनायकाला, येइल कधीं स्नेहें ॥ ४ ॥

---

२११. पद ( चाल — भोलानाथ दिगंबर० )

सेवा दत्त निरंतर । तेणें साधा आत्मोद्धार ।। ध्रु० ।।
स्वैराचारी वेष दिगंबर, । ब्रह्माण्डांत संचार, ।
स्मरतां पावे, परि सत्वर ।। १ ।।
आश्रम-विरहित जो अवधूत, । नाहिं जया संस्कार, ।
आत्मत्वें निजस्वरुपीं स्थिर ।। २ ।।
प्रल्हादासी, यदुरायासी, । कथि ज्ञानामृतसार, ।
पूर्णत्वानें स्वयें निर्विकार ।। ३ ।।
विनायक सांगे, तो दयाघन । करिल भवार्णव पार, ।
यासाठीं व्हा तद्भजन-पर ।। ४ ।।

---

२१२. पद ( चाल — वैशाखमासिं० )

दत्त दत्त दत्त सदा, गात जा मना, । प्राप्त होय सुगति तुला, परमशोभना ।। ध्रु० ।। चित्त शुद्ध होत, उठत प्रेमभावना, । गळुनि जाति कुटिल-मलिन-दुष्टवासना, । भरुनि कंठ, येत बाष्पपूर, लोचनां, । विसरसि तूं, सकळ अन्य भोगकामना ।। १ ।। देइल तुज खचित नाथ, स्वीय दर्शना, । दुरित हरिल, करिल सदय, हृदय-लोभना, । स्वरूपीं निज साधिल तव, गाढमीलना, । यास्तव तूं, सोडुं नको नामकीर्तना ।। २ ।।

---

२१३. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

भज रे त्या दत्ताला, । तुजसाठीं जो, येथें अवतरला ।। ध्रु० ।।
परमचि जो कळवळला । पाहुनि तुझिया दीनावस्थेला ।। १ ।।

कोणि न तुझा उरला । धरिल जो तुजसी, प्रेमबंधाला ॥ २ ॥
धांवत म्हणुनी आला, । रक्षिल तुजसी, धरिं विश्वासाला ॥ ३ ॥
प्रसन्न आहे तुजला । मागुनि घे तूं, शुद्धभक्तिला ॥ ४ ॥

२१४. पद ( चाल – हरिभजनाविण० )

त्रिभुवन हें, श्रीदत्तमय, अनुभवीं मना ॥ ध्रु० ॥
सांडुनियां भेदभाव, । समरसता अपुली ठेव, ।
भक्तिसुधा नित्य सेव, । त्यजुनि कामना ॥ १ ॥
इच्छा जे ईशाची, । आदिशक्ति उमा तेची, ।
जगत्कार्ये, रचित साचि, । अतुल योजना ॥ २ ।
जन्म मृत्यु लाभ हानि, । जें जें तुज येत घडुनि, ।
प्रभुसत्ता ती समजुनि, । न करिं रोदना ॥ ३ ॥
विश्वाचें जें प्रियपण, । तें भगवद्रूप जाण, ।
मिसळुनि तूं त्यांत अपण, । विसर कल्पना ॥ ४ ।
अग्नियोग इन्धनास, । दहनीं दे, स्वात्मतेस ।
होसी तूं, गुरुचि खास । साधिं मीलना ॥ ५ ॥

२१५. पद ( चाल – प्रीति जी दुजावरी० )

विषयराग सांडुनि सारा । भज दत्ता जगदाकारा । मानवा ॥ ध्रु० ॥
वस्तुजात तोची नटला । अनेकीं पाहिं एकाला । मानवा ॥
तव आत्मा प्रिय जो तुजला । ओळख त्या गुरुदेवाला । मानवा ॥
( चाल ) होउनी । शांत तूं मनीं । घेइं समजुनी ।
विश्वविस्तारा । मायेच्या या बाजारा । मानवा ॥ १ ॥

शत्रु मित्र कोणि न मानीं । न हो तूं देहाभिमानी । मानवा ॥
विश्वात्मकता साधावी । चित्तवृत्ति लय पावावी । मानवा ॥
(चाल) आणुनी । स्वरुप तूं मनीं । तत्त्व उमजुनी ।
गा अत्रिकुमरा । अनुभविसी साक्षात्कारा ॥ मानवा ॥ २ ॥

---

२१६. पद (चाल—भोलानाथ दिगंबर०)

तो भज तूं जंभारी, । सह्याद्रीच्या राहे शिखरीं, ॥ ध्रु० ॥
योगस्त्रीतें उचलुनि नेतां,
दैत्यबळा संहारी, । देवांकरवीं, असुरां मारी ॥ १ ॥
क्षत्रिय-हननीं भार्गवरामा,
जो कृपानुग्रह करी, । तेणें विजयी तो संगरीं ॥ २ ॥
हुंडवधास्तव नहुपालागीं,
देउनि तेज सत्त्वरीं । मारवि दैत्य अमरां भारी ॥ ३ ॥
उदुंबर—तरुतल—सुघनच्छाये
असे स्फटिक शिळेवरी, । स्मरतां पावे, परि निरंतरीं ॥ ४ ॥

---

२१७. पद (झंपा)

नाम गा, नाम गा, नाम गा, दत्तगुरुचें, । हेंच कीं सार बा, सांगण्याचें ॥ ध्रु० ॥ ध्याइं तो सह्यगिरी । वास जेथें करी । योगि तो नरहरी, ॥ परम प्रेमें ॥ उदुंबर कल्पतरु, । आपणां गुरुवरू, । स्थान योजी वरू, ॥ आवडीचें ॥ १ ॥ दत्त होईं तुला, । स्मरसि

जरि त्याजला, । निश्चयो हा भला, ।। अंगिकारीं ।। मनोरथ-पूर्तता ।
करुनि, दे निजात्मता, । होय छत-पसरिता, ।। प्रमोदाचें ।। २ ।।

२१८. पद ( चाल—भोलानाथ दिगंबर० )

योगी सह्यनिवासी । भज रे मनुजा, त्या दत्तासी ।। ध्रु० ।।
गर्गोक्तिं, नत कृतवीर्यात्मज
यच्चरण-सरोजांसी, । लाधे दुर्लभ सामर्थ्यासी ।। १ ।।
मदालसा-प्रिय-पुत्रालर्कें,
मातृलिखित-वचनेंसी । नमितां, पावे हृतराज्यासी ।। २ ।।
बृहस्पति, देवां उपदेशितां,
जंभासुर-हननासी । साधिति, होतां शरण तयासी ।। ३ ।।
मुनि-प्रोक्त-महिमा परिसुनि आयु
सेवी दृढभावेंसी । तेणें लाभे सत्पुत्रासी ।। ४ ।।
विनायक कथी अनुभव अपुला
रक्षितसे नित्येंसी । प्रगटुनि, मजला निजकरुणेसी ।। ५ ।।

२१९. पद ( चाल—खरा तो प्रेमा० )

स्मरावा प्रेमें अंतरिं, दत्तमुनी
करी विषय-विरत, साधवि मंगल । उपजवित बोध मनीं ।। ध्रु० ।।
सेवन-रति देउनी चरणीं, लावी पथा,
वदवि निज भजना, सतत रचवि स्तोत्रगाथा
उल्हसवित चित्ता मोदें, मनस्ताप शमवी
मुखरित-भक्ति-भक्तवर, तोच सदा, धन्य जनीं ।। १ ।।

शत्रु मित्र कोणि न मानीं । न हो तूं देहाभिमानी । मानवा ॥
विश्वात्मकता साधावी । चित्तवृत्ति लय पावावी । मानवा ॥
( चाल ) आणुनी । स्वरुप तूं मनीं । तत्त्व उमजुनी ।
गा अत्रिकुमरा । अनुभविसी साक्षात्कारा ॥ मानवा ॥ २ ॥

---

## २१६. पद ( चाल—भोलानाथ दिगंबर० )

तो भज तूं जंभारी, । सह्याद्रीच्या राहे शिखरीं, ॥ ध्रु० ॥
योगस्त्रीतें उचलुनि नेतां,
दैत्यबळा संहारी, । देवांकरवीं, असुरां मारी ॥ १ ॥
क्षत्रिय-हननीं भार्गवरामा,
जो कृपानुग्रह करी, । तेणें विजयी तो संगरीं ॥ २ ॥
हुंडवधास्तव नहुषालागीं,
देउनि तेज सत्त्वरीं । मारवि दैत्य अमरां भारी ॥ ३ ॥
उदुंबर—तरुतल—सुघनच्छाये
वसे स्फटिक शिळेवरी, । स्मरतां पावे, परि निरंतरीं ॥ ४ ॥

---

## २१७. पद ( झंपा )

नाम गा, नाम गा, नाम गा, दत्तगुरुचें, । हेंच कीं सार बा, सांगण्याचें ॥ ध्रु० ॥ ध्याइं तो सह्यगिरी । वास जेथें करी । योगि तो नरहरी, ॥ परम प्रेमें ॥ उदुंबर कल्पतरु, । आपणां गुरुवरू, । स्थान योजी वरू, ॥ आवडीचें ॥ १ ॥ दत्त होई तुला, । स्मरसि

जरि त्याजला, । निश्चयो हा भला, ।। अंगिकारीं ।। मनोरथ-पूर्तता ।
करुनि, दे निजात्मता, । होय छत-पसरिता, ।। प्रमोदाचें ।। २ ।।

२१८. पद ( चाल—भोलानाथ दिगंबर० )

योगी सह्यनिवासी । भज रे मनुजा, त्या दत्तासी ।। ध्रु० ।।
गर्गोक्तें, नत कृतवीर्यात्मज
यच्चरण-सरोजांसी, । लाधे दुर्लभ सामर्थ्यासी ।। १ ।।
मदालसा-प्रिय-पुत्रालर्कें,
मातृलिखित-वचनेंसी । नमितां, पावे हृतराज्यासी ।। २ ।।
बृहस्पति, देवां उपदेशितां,
जंभासुर-हननासी । साधिति, होतां शरण तयासी ।। ३ ।।
मुनि-प्रोक्त-महिमा परिसुनि आयु
सेवी दृढभावेंसी । तेणें लाभे सत्पुत्रासी ।। ४ ।।
विनायक कथी अनुभव अपुला
रक्षितसे नित्येंसी । प्रगटुनि, मजला निजकरुणेंसी ।। ५ ।।

२१९. पद ( चाल—खरा तो प्रेमा० )

स्मरावा प्रेमें अंतरिं, दत्तमुनी
करी विषय-विरत, साधवि मंगल । उपजवित बोध मनीं ।। ध्रु० ।।
सेवन-रति देउनी चरणीं, लावी पथा,
वदवि निज भजना, सतत रचवि स्तोत्रगाथा
उल्हसवित चित्ता मोदें, मनस्ताप शमवी
मुखरित-भक्ति-भक्तवर, तोच सदा, धन्य जनीं ।। १ ।।

## २२०. पद ( झंपा )

मना राख रे आपुली नित्य शांती। सांडुनी सर्वथा स्वैरवृत्ती ॥ ध्रु० ॥ विषयरुचि आंवरीं। निरयच्युति सांवरीं। विरति बळ अंतरीं ॥ उपजवोनी ॥ विवेक जागा करीं। लोटिं मोहा दुरी। होइं तूं सत्त्वरीं ॥ धन्य जगतीं ॥ १ ॥ पाठिराखा हरी। जाणुनी तूं तरी। साधना आचरीं ॥ धैर्य धरुनी ॥ निश्चयें गुरुपदां। सेवुनी मोक्षदां। ध्याइं रे स्थैर्यदा ॥ सगुणमूर्ती ॥ २ ॥ दत्तगुण गाउनी। आत्मरत होउनी। द्वैतमति विसरुनी ॥ पुष्ट राहें ॥ बसुनि प्रेमासनीं। एकलय लावुनी। समाधी साधुनी ॥ पाव सुगती ॥ ३ ॥

---

## २२१. पद ( चाल – दीनदास० )

तळमळसी कां रे वृथा, सुज्ञ मानवा। काय नसे मुळिंच तुझी लाज माधवा ॥ ध्रु० ॥ अनुभव तुज अजुनि नसे काय लाभला। आजवरी योगक्षेम कैसा चालला। पुरविला कोणि तुझा अर्थ इच्छिला। विसरसि तूं केंविं तया सदय केशवा ॥ १ ॥ सांडुनियां विषय-मोह सेविं ईश्वरा। तोच तुझा अढळ असे खचित आसरा। प्रणत-काम-कल्पवृक्ष कोण दुसरा। स्मरत जा म्हणुनि मनीं अत्रिसंभवा ॥ २ ॥ सायंदेव यवनभयें शरण जाहला। अभय-वच देति गुरू रक्षिन तुजला। म्लेच्छाधिप स्वप्न घोर पाहुनि दचकला। सोडितसे विप्रवरा करुनि गौरवा ॥ ३ ॥ पूर्वकर्म जेंविं तुझें तेंविं भोगणें। मुक्तता न कुणासही तत्त्व जाणणें। यास्तव त्वां हृदयीं हरी नित्य ध्याइणें। कर्तव्य उचित तुजसि हेंचि मनुज-पुंगवा ॥ ४ ॥

---

## २२२. पद (चाल — तूं माझा यजमान०)

भवसागर तर रे। जीवा ॥ ध्रु० ॥
जीवदशा तुज अज्ञानानें। हें तूं ओळख रे ॥ १ ॥
सांवरोनि तूं मूर्च्छा अपुली। प्रबुद्धता धर रे ॥ २ ॥
दत्तनाम ही नौका बळकट। सेवीं सत्वर रे ॥ ३ ॥
उपासना हे नाळ रक्षुनी। योग्य दिशा वर रे ॥ ४ ॥
भक्ति-सुकाणूं दृढ अवलंबीं। सोडुं नको मुळिं रे ॥ ५ ॥
पोतवाह तुज विवेक रक्षी। षड्रिपुपासुन रे ॥ ६ ॥
गुण-वृक्ष धैर्य निश्चय रज्जू। तर-पण्य, प्रेम रे ॥ ७ ॥
रंगुनि भजनीं नाच घडति जे। ते नौकादंड रे ॥ ८ ॥
गीत येथिंचें प्रेमळ कीर्तन। सांयात्रिक बन रे ॥ ९ ॥
कर्णधार-श्रीदत्त-कृपेनें। पार गांठेल रे ॥ १० ॥
विनायकाच्या या उपदेशा। निर्भय अनुसर रे ॥ ११ ॥

---

## २२३. पद (चाल — हे मना सोड०)

भज सदा। दत्त-गुरु-पदां। चुकति आपदा। संदेह न धरिं।
अनुभव येईल खास तुजसिं पहा सत्वरीं ॥ ध्रु० ॥
भय नको,। लौकिकहि नको,। अभिमान नको,। दृढता
आदरीं। कर्तव्य समजुनि, लोळण घे चरणांवरी ॥ १ ॥
दुर्धरा। साहसी गिरा। तरिच बुधवरा। संत तूं होसि।
दत्त-कृपेला पावसि मग अविलंबेंसीं ॥ २ ॥

---

२२४. पद ( चाल – रुसलासी हरी कां बरें० )

गिरिवासी दत्त सेवणें । सिद्धि त्वरित तयें लाभणें ।। ध्रु० ।।
त्रिभुवनींची सत्ता तुज । खचित येईल हातिं सहज ।
पडेल कांहीं न तुज उणें ।। १ ।।
खबर विश्वाची काढिसी । गति सर्वत्र तूं पावसी ।
दत्तात्मक बनुनी राहणें ।। २ ।।
विनायक कथी स्वानुभव । झगडुनी येई वैभव ।
आपुल्याच ठायीं डोलणें ।। ३ ।।

---

२२५. पद ( चाल – रुसलासी हरी कां बरें० )

स्मर रे दत्तगुरु अंतरीं । खचित तीच पावसी सरी ।। ध्रु० ।।
विचरसी दत्त होउनी । अनुभवसी स्वातंत्र्या मनीं ।
योगसिद्धी लभसी करीं ।। १ ।।
विनायक यथार्थ बोलतो । निजसंपन्नता सांगतो ।
स्वानंदसाम्राज्या वरीं ।। २ ।।

---

२२६. पद ( चाल – खचित उगिच भय दावी मजला० )

अनुपम शांति लाभेल तुजला ।
भजसिल जरि सदा दत्तगुरुला ।। ध्रु० ।।
प्रेम मनीं धरिसी जिव्हाळ्याचें । विसरसी इतर विषय साचे ।।
करिल अनुगृहीत तो तुजला ।। १ ।।
होशिल प्यार प्राणसम त्याला । तो न विसंबेल कधीं तुजला ।।
कथित विनायक स्वानुभवाला ।। २ ।।

---

२२७. पद ( चाल – फूल मंगावो हार बनावो० )

दत्त वदावा, दत्त भजावा । हृदयीं दृढतर ध्यावा, गावा ॥ ध्रु० ॥
श्रवावा श्रवणीं, प्रेमरस त्रिकरणीं । नाचत नाचत तुज यावा ॥ १ ॥
विनायक रति, घेतां भगवंतीं । मोदत, लाधत तद्भावा ॥ २ ॥

---

२२८. पद ( चाल – भजनानें आळविला० )

अनसूया-पुत्र स्मरा, । तेविं, सह्यनग-गुरुतर-शिखरा ।
जेथें प्रभु घे आसरा ॥ ध्रु० ॥
ताप सहावा हृदयीं । दर्शन लभवी, सहन, नरा ॥ १ ॥

---

२२९. पद ( चाल – सखे मी मुरारी वनीं पाहिला० )

भजें भावनेनें, ज्ञानदातया, ।
लय साधुनियां, कुमति-हारिया ॥ ध्रु० ॥
नको संशयेंसीं, चळूं सेवनीं, ।
दृढता उचित जाणुनी, साहुनी ।
विरोधना, सेव विमलकारिया ॥ १ ॥

---

२३०. पद ( चाल – सदा कलहा विना० )

भजा, गुरुदत्त, हा ॥
भुले, जिथें प्रेम, सुखें बने मुग्ध ॥ ध्रु० ॥
रमे मुदें, प्रगट क्रीडत वसे ।
रसज्ञ, कौतुकभरें, डुलतसे ॥
खरोखर, प्रीतिलुब्ध असे हा ॥ १ ॥

---

## २३१. पद ( चाल – सावलडो म्हाने भायो० )

दत्त वरा, दत्त सेवा । गाउनि नाचुनि तोषवा ॥ ध्रु० ॥
मोहन-लोभन-दर्शन लाभत । म्हणुनी नित्य भजावा ॥ १ ॥

---

## २३२. पद ( चाल – धांव विभो० )

कां रे मना तूं आशा धरिसी ।
अजुनि कसा रे मुळिं न उबगसी ॥ ध्रु० ॥
अनुभव आला तुझा न कोणी । विचार करितां अंतःकरणीं ॥ १ ॥
पुत्र मित्र भार्या निजस्वार्थाचीं । तीं रे तुझ्या बा काय कामाचीं ॥ २ ॥
ममत्वानें परिवार जोडिसी । प्रेमा हृदिंचा तेथें अर्पिसी ॥ ३ ॥
कडुवट फल तूं जरि चोखिसी रे । कां न वीट तूं तरि पावसी रे ॥ ४ ॥
संग त्यागणें हाच मुख्य धर्म । वेदांताचें परम हें वर्म ॥ ५ ॥
विनायक म्हणे सेविं दत्तात्रेय । मग तूं सहजचि दत्तरूप होय ॥ ६ ॥

---

## २३३. पद ( चाल – धांव विभो० )

बाहेर पड रे मनुजा आतां । सांडुनि सारी विषय-ममता ॥ ध्रु० ॥
जन्मोजन्मीं भोगिले विषय । तृप्त न कैसें झालें हृदय ॥ १ ॥
संवेष्टोनी राहसी कैसा । गर्भामाजी प्राणी जैसा ॥ २ ॥
प्रसूतीचा काल पातला रे । यंत्रभेद तूं करिं धैर्यें रे ॥ ३ ॥
मंत्र तंत्र हें जाण अविद्येचें । मोहीं तुजला पाडित साचें ॥ ४ ॥
श्रीगुरुदत्त-चरणां भज रे । याच उपायीं मुक्त होईं रे ॥ ५ ॥
विनायक बोले तो करुणाकर । खचित करिल रे तव उद्धार ॥ ६ ॥

---

२३४. पद ( चाल — नाव चाले डुले० )

नंद मंद खुले, चित्त रूपीं भुले । अनंगभंग साधोनी ॥ ध्रु० ॥
दंग बनोनी, गुंग बनोनी । करित ढंग, नाचे रे ॥ १ ॥
आपण बोळे, आपण खेळे । धरोनि प्रेम, रंगे रे ॥ २ ॥
संग वरोनी, चंग बांधोनी । ऐक्य लभत स्वरुपीं रे ॥ ३ ॥
माज चढोनी, लाज गळोनी । असंग तेंविं वागे रे ॥ ४ ॥
अत्रिनंदन, मंतृवंदन । विनायकास थाटी रे ॥ ५ ॥

---

२३५. पद ( चाल — देवकीनंदना० )

नर्मदाक्रीडना, मधुमधुर-हसना, अमृताधाना ॥ ध्रु० ॥
अंतराल्हादना । संचरें मम मनीं, मोहना ।
अघहरा । द्रुततर मम तूं साध शोधना ॥ १ ॥
फुल्लकंजानना । येउनी झडकरीं, दर्शना ।
वितरुनी । करिं विनायेक-चित्तशोधना ॥ २ ॥

---

## २. बालदत्त

२३६. पद ( चाल — आईचा छकुला चिमुकला० )

बाल्यत्वें नटला । चिमुकला
मधु सजला, करि लीला, रमला ॥ ध्रु० ॥
क्रीडना मांडुनि बोळे, । दावी चित्र चाळे, ॥
दत्त, निजजनां रंगवि रंगे, । माधुरि ल्याला ॥ १ ॥

---

२३७. पद ( चाल – कुंजांत हरि हा, क्षणांत दिसला० )

निजांत शिरला, नितांत रमला, प्रभूत नटला,
शिशुसम तो प्रभु दत्त बनेला ॥ ध्रु० ॥
किती खेळ रची, न मितिला । कळों दे, रंग किति भरला ॥
विसरवी दुजा भावाला, । करित स्वमयीच वृत्ति भला ॥ १ ॥

---

२३८. पद ( चाल – अति गोड गोड ललकारी० )

मृदु बालभाव धरुनीयां
खेळ खेळण्या बोले प्रभुराया ॥ ध्रु० ॥
भर आणित खेळीं रमवाया ॥
भजका, धाया अनंत द्याया ।
द्वैतालागीं विसरवुनीयां ॥
दे ऐक्यास, दत्त गुरुराया ॥ १ ॥

---

२३९. पद ( चाल – नवल ही बांसरी० )

मृदुल ही सांवळी । बावळी ।
गमत चित्तवृत्ती कवळी ॥ ध्रु० ॥
शिशु-तनु, मधुर तिची नवाळी, ।
प्रगटवित इथें जी वनमाळी, ॥
वदुं कैसी शब्दांच्या मेळीं ॥ १ ॥

---

२४०. पद ( चाल – माधवा ठावा जिवा० )

बाल्यता रम्या धरी ।
भुलवी आम्हां, कला-कुसरी
दावि किति नृत्यांत, त्यागोनि थोरी ।
विहरत छंदें, प्रेमा वरी ॥ ध्रु० ॥
आमुच्यामधिं ऐक्यता । पावुनी स्वयें, लयता ।
लभवी, दत्त तो, किंकरां, न सरी ।
दंग होत भारी ॥ १ ॥

२४१. पद ( चाल – असा कसा रमला, यदुवर० )

पहा कसा सजला, । यतिपति, ।
बालकसा, रूपा खुलवाया
स्वीय कोमल दावि काया ॥ ध्रु० ॥
मिसळुनीयां आम्हांसंगें ।
करी चमत्कार नवे तो ॥
विश्वप वचे क्रीडनाला ।
वदवी दत्तोहम् ॥ १ ॥

२४२. पद ( चाल – नवरंगिं रंगलेला० )

शिशुमूर्ति, क्रीडनाला
रति, दत्त, घेउनी आला ॥ ध्रु० ॥
खेळांत दंग झाला
निर्भर रंगुनी गेला ॥

प्रेमपूर्ण, ऐक्यतेला
पवुनी, जणों बनेला
समरूप, वश्य थाटे, गमला
अमुच्यांत मोहियेला ॥ १ ॥

---

२४३. पद (चाल—चलत चलत मथुरा०)

भरत भरत भरुनी, मम मनीं, ।
खेळ खेळतो, दत्त, साधुनी ।
मीलन, हृदयासी गुंगवुनी ॥ ध्रु० ॥
बाळ बनोनी, व्यक्त होउनी, ।
नाच करि पुढें गाढ रंगुनी ॥ १ ॥

---

२४४. पद (चाल—ब्रिजलाला गडे० )

शिशुदत्त मला बिलगे, वदवि ज्ञानास, ॥ ध्रु० ॥
शास्त्र कथवीतो, । गुह्य प्रकाशितो । अर्थ—विवेक समजावयास ॥१॥

---

२४५. पद (चाल—आईचा छकुला चिमुकला० )

खेळाया सजला, । नट भला, ।
शिशु थटला, प्रियभावा वळला ॥ ध्रु० ॥
द्यावया संगमा स्वीया, । भक्तां तोषवाया, ॥
खेळ रचितसे, आपण खेळे, ।
दंग बनेला ॥ १ ॥

---

२४६. पद ( चाल – फुलवनांत चल सजणे० )

शिशुसमान, प्रभु नटुनी ।
छुम छुम स्वनूपुर नादवि, हरवि
स्मृतिला, अपुलिया नर्तनीं ।। ध्रु० ।।
नादलयता साधुनीयां ।
तन्मयता आम्हां बनवी नृत्तीं, ।
खेळे, खेळवि आम्हांसीं ।। १ ।।

---

२४७. पद ( चाल – मधुवदना सखिच्या, रम्य त्या० )

शिशु बनुनी रमतां, दाखवी क्रीडनीं,
त्र्यधिप तो, लौल्य, रंगोनी ।। ध्रु० ।।
नृत्य करी, रसें थटुनी, ।
मत्कर करीं निजीं धरुनी ।।
खेळवि मातें, सुखवी बोलुनी ।। १ ।।

---

२४८. पद ( चाल – मसिं बोलूं नको गिरिधारी० )

शिशु दत्त अला मजपाशीं, । मदना दे जो गमे, हार ।। ध्रु० ।।
खेळवि मज, रंगवुनीयां । रस हृदयीं दाटवुनीयां ।।
भर आणी अमुप रतीसी ।। १ ।।
क्रीडेमधिं निर्भरता ये । नृत्तरूपता मज होये ।
विसरुनि जग, समरस झालों ।। २ ।।
सुख अनुपम हें वर्णाया, । उपमा न दिसे जगतीं या, ।
लाभो सातत्यें मज तें ।। ३ ।।

---

२४९. पद ( चाल – कुंजांत हरि हा, क्षणांत दिसला० )

खेळांत शिशुसा, नटोनी सजला, गडीच गमला,
उधळवितो किति नाट्यरसाला ॥ ध्रु० ॥
करि नृत्त स्वयें, मिसळला । विहारीं, दत्त लघु बनला ॥
किति वदूं तरी वात्सल्या । हरित सकलाच वृत्ति भल्या ॥ १ ॥

२५०. पद ( चाल – लहरी अतां सुखाच्या० )

मज गुंगवी । स्वरूपीं । शिशु बनुनी बोळे जधीं ॥ ध्रु० ॥
धरुनी खेळे मम कर, विरवी । मम हृदया, देवोनि ऐक्या तधीं ॥१॥

२५१. पद ( चाल – अति गोड गोड ललकारी० )

कल गाय गान, धर ताला । नाच, आदरीं नृत्यीं नियमाला ॥ध्रु०॥
शिशु होउनि आला विभु, त्याला । रमवीं रंगीं, वदें गुणांला, ॥
कीर्ती वर्णीं, मधु-रचनेला । योजीं, त्यास तुष्ट करण्याला ॥ २ ॥

२५२. पद ( चाल – असा कसा रमला यदुवर० )

अला अला प्रभु हा । नटवर, ।
येथ वचे क्रीडा करण्याला, । बालरूप धरोनि ठेला ॥ ध्रु० ॥
निजजनांच्या मेळीं बोळे । रमे, महत्त्वा विसरे तो ॥
ऐक्य लभवी, मंत्र आम्हां । जपवाया सोऽहम् ॥ २ ॥

२५३. पद ( चाल — नवल ही बांसरी० )

करित ज्या क्रीडना । नर्तना, ।
धरुनि मंद, मुखीं, हसना ॥ ध्रु० ॥
अभिनयसहित वरोनि गाना ।
शिशु बनुनि, दत्त स्वीकृत-नाना-।
गति, योजूं हृत्पद्मीं ध्याना ॥ १ ॥

---

२५४. पद ( चाल — माधवा ठावा जीवा० )

दत्त हा रंगे किती, । विसरोनीयां स्वकीय स्मृती ॥
देवपण टाकी, महत्त्वा न सक्ती । शिशुसम बोळे खेळाप्रती ॥ ध्रु० ॥
नर्तना अवलंबुनी । सामरस्य आदरुनी ।
मिळुनी पूर्ण आम्हांमधीं, विहरे । ऐशि त्यास प्रीती ॥ १ ॥

---

२५५. पद ( चाल — नवरंगिं रंगलेला० )

किति प्रीति नर्तनासी । उरला न बंध वस्त्रासी ॥
गळे, परि न त्यासी । उत्सुक आंवरायासी ॥
स्थिति तेच भूषणांसी । मुकुटास कुंडलांसी
वनमाळ येत स्कंधीं तिजसी । न वळे, न भान त्यासी ॥

---

२५६. पद ( चाल — हा गुरुला प्रणाम पहिला० )

दत्त पहा थटोन रमला ॥ ध्रु० ॥
शिशुसम खेळीं रती पावला । गडी तेंविं बनला ॥ १ ॥

---

२५७. पद ( चाल—फुलवनांत चल सजणे० )

ललित नाच मधु खुलवी, । अइउण निघे ध्वनि,
सूत्र समजवि, रमतां डमरूचे वादनीं ।। ध्रु० ।।
चाल बनुनी दत्त थाटे, । सूत्र-समूहा प्रसवे नादीं ।
माहेश्वर, गमे खेळीं ।। १ ।।

---

२५८. पद ( चाल—मसि बोलुं नको गिरिधारी० )

मज घट्ट धरी निजहस्तीं, । बनवी नाचा मला खास ।। ध्रु० ।।
नाचवि मजला निजसंगीं । समरसता पाववि रंगीं ।।
तुरवी आठव मज देहीं ।। १ ।।
द्वैता हरवी, स्मृति नाशी, । दत्तरूप मी अविनाशी ।।
उपजवि मति मज दृढ ऐशी ।। २ ।।
मिसळवि मजला स्वरूपीं । न उठे दुजि वृत्ति कदापी ।।
स्वानंदीं ठेवी प्रभु तो ।। ३ ।।

---

२५९. पद ( चाल—चकोरा, मीच तव चंद्रिका० )

नटोनी दत्त, शिशु-रूपता,
सुकुमार-तनु, आला रमण्याला ।। ध्रु० ।।
खुलुनि, खेळाला मांडि मजसवें, ।
फेर धरी, फिरवी मला जवें, ।
द्वैत-हर होई, भ्रम-गळविता ।। १ ।।

---

२६०. पद ( चाल—मधुवना सखिच्या, रम्य त्या० )

रस थट्टुनी, भरुनी मन्मनीं, ऐक्यता उपजवी, हारवी सत्ता, ॥ ध्रु० ॥

लुब्ध करी, लया वरवी । दत्तमयता मला घडवी ।
बाल जधीं दत्त धरी मूर्तता ॥ १ ॥

२६१. पद ( चाल—चलत चलत मधुरा० )

मधुर हसत खुलुनी, धरि करीं ।
मत्करास तो दत्त, क्रीडनीं ।
खेळवि मजला जेंवि स्वमनीं; ॥ ध्रु० ॥
आपण रंगे, तेंवि रंगवी ।
चित्त मदीय, नृत्तीं गोंवुनी ॥ १ ॥

२६२. पद ( चाल—ब्रिजलाला गडे० )

प्रभु बोले, बने शिशुसा, शिकवि गुह्यास ॥ ध्रु० ॥
क्रीडन भासवी । त्यांतचि जाणवी । स्वीय स्वरूप विनायकास ॥१॥

२६३. पद ( चाल—लहरी अतां० )

मम सोंगडी । बनोनी । प्रभु विहरे माझ्या सवें ॥ ध्रु० ॥
शिशुसा खेळे लघु-तनु, रमवी। मज निज ठायीं, तें कसें बोलवे ॥१॥

२६४. पद ( चाल—हा गुरुला प्रणाम पहिला० )

रंग कसा खुलोन उठला ॥ ध्रु० ॥
समरसतेचा भाव पातला । जधीं दत्त वळला ॥ १ ॥

२६५. पद ( चाल – चकोरा, मीच तव चंद्रिका० )

उदेला छंद मम अंतरीं,
रति घेत मन अत्यंत विहारीं ।। ध्रु० ।।
स्वपर-भेदाला ठाव न उरला, ।
ऐक्य थटोनी, मुळींच लोपला, ।
दत्त जधिं खेळांत रमवि भरीं ।। १ ।।

---

२६६. पद ( चाल – सत्य वदे वचनाला० )

चालवितो निज कार्यालागीं ।
प्रगट बनोनी दत्त, करि सलगी ।। ध्रु० ।।
आपण बालक ऐसें गमवुनि, । संचरुनी अमुच्या अंगीं ।। १ ।।

---



**श्रीवासुदेवानंदसरस्वती ( टेंब्ये ) स्वामीमहाराज.**

जन्म श्रा. व.॥ ६ शके १७७६. ] [ समाधि आ. शु.॥ १ शके १८३६

( श्री. साठे यांजकडील देवस्थानांतील तसबीर )

## ( ९ ) श्रीवासुदेवानंदसरस्वती

### २६७. पद ( चाल – अभाग्याच्या घरीं० )

श्रीगुरुदत्ता दे मम चित्ता निजसुखशांति अतां
भवचक्रीं या फिरुनी फिरुनी श्रमलों मी ताता ।। ध्रु० ।।
विषयसुखाचेसाठीं केला संग्रह मी बहुपरी
दुःखी झालों त्या संगानें सांगुं किती मी तरी ।। १ ।।
वांचविं आतां श्रीगुरुनाथा चरणिं ठेविला माथा
तुजविण येई करुणा कोणा कोण पुरवि अर्था ।। २ ।।
टेंबेकुळिं श्रीवासुदेव मुनि आम्हां उद्धराया
माणगांविं श्रीदत्त जन्मला निजपथ दावाया ।। ३ ।।
श्रावणमासीं कृष्णषष्ठी वत्सर आनंद
बाळ जन्मलें योगिरत्न हें सकळां आनंद ।। ४ ।।
जन्म नाम तव गाउनि मागें भिक्षा दातारा
पदरीं घेउनि दीन बालका या दासा तारा ।। ५ ।।

---

### २६८. पद ( चाल – पंचतुंड नररुंड० )

वासुदेव श्रीसद्गुरुराया यावें मजला ताराया ।
अनाथ दीन मी बाळ दुर्बळ वंदन करितों तव पायां ।। ध्रु० ।।
भजनीं लावुनि अनुग्रह देउनि प्रसाद करुनी मज सखया ।
बहु आश्वासुनि दर्शन देउनि छंद लाविला मम हृदया ।। १ ।।
परि दुर्दैवें शत्रु उदेले वैर बांधिती गुरुराया ।
प्रत्यवाय ते बहुत आणिती तत्पर मजला बुडवाया ।। २ ।।

उद्दीपन ते करिति विकारां स्थिरता चित्तीं भंगाया ।
साधुसमागम दुर्लभ म्हणुनी कठिण होय त्यां जिंकाया ॥ ३ ॥
बुडतों आतां जरि न धांवसी नरकांतूनी काढाया ।
आधार मज तूं विश्वाधारा परम उदारा गुरु सदया ॥ ४ ॥
ध्यानिं आणुनी तव यश कीर्ति सिद्ध जाहलों यश गाया ।
तरी सकल हे वैरी निवटुनि निर्भय करीं अत्रितनया ॥ ५ ॥

---

२६९. पद ( चाल—पूर्णानंदस्वामी० )

सद्गुरुराया वासुदेवा दास पदरिं घ्यावा ।
दोष न मानुनि कांहीं याचे जवळी या ठेवा ॥ ध्रु० ॥
अपराधी हा थोर म्हणुनियां कृपा करा सदया ।
तुम्हांविण बा कोण कृपेला करणारा सखया ॥ १ ॥
यासाठीं मी कर जोडुनियां प्रार्थितसें देवा ।
संकटिं आतां मजलागीं या स्वामीजी पावा ॥ २ ॥
अभिमानीं हा दास तुझा कीं पडतो अज्ञानी ।
उगाच बरळे कांहीं तरी हा ज्ञाता मी मानी ॥ ३ ॥
यास्तव प्रभुजी शुद्ध कराया दंडावें मजसी ।
अहर्निश या दंड असावा आणा मार्गासी ॥ ४ ॥
जिवलग माझा कोण सखा हो तुम्हांविण सांगा ।
मजसाठीं जो नित्य कळवळे रक्षणिं मम जागा ॥ ५ ॥
प्राण-विसावा माझा सद्गुरु दत्तात्रेय राजा ।
त्याचे चरणीं भजनाचा मी सदा करिन गाजा ॥ ६ ॥

---

२७०. पद ( चाल — वैशाखमासिं० )

श्रावणांत श्रीगुरुचा जन्मदिन पातला । त्यायोगें भक्तजनां हर्ष जाहला ॥ ध्रु० ॥ क्षुब्धक्षीरोद-तुल्य गगन वर्षकाळिंचें । मेघराजि स्वरुप गमत त्या जलशायिचें । चपला हे पीतवसन दिव्य श्रीविष्णुचें । मज वाटे घननीळचि नभीं वोळला ॥ १ ॥ जीवनपूर्ण करिति वसुमती वारिवाह हे । रात्रंदिन भूसेवनपर होत कृषक हे । करुणाघन निज प्रेमरसीं बुडवि हृदय हें । ध्याननिष्ठ भजनसक्त दास रंगला ॥ २ ॥ अर्कवासर पुण्यतिथी षष्ठि साधुनी । असितपक्ष चापलग्न जीवयुत घेउनी । गणेशात्मज वासुदेवनामें जन्मुनी । आनंदीं दत्तनाथ पूर्ण प्रगटला ॥ ३ ॥

---

२७१. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

समरतों पुण्यभूमीला । तीर्थरूप ऐशा माणगांवाला ॥ ध्रु० ॥
वासुदेव अवतरला । दत्तात्रेय स्वयें जेथें जन्मला ॥ १ ॥
करुनी उपासनेला । योग-सिद्ध प्रभु तो जेथें बनला ॥ २ ॥
दावी चमत्कारांला । भक्तिमार्ग जेथें उपदेशीला ॥ ३ ॥
अद्भुत अभिनव लीला । आचरुनि साक्षात्कार प्रगटीला ॥ ४ ॥
जातां सिद्ध-स्थानाला । आनंदानुभव मज विनायकाला ॥ ५ ॥

---

२७२. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

गाऊं श्रीगुरुयतिला । वासुदेव-नामें जो अवतरला ॥ ध्रु० ॥
माणगांवीं जन्मला । नर्मदाकांठीं घेइ समाधिला ॥ १ ॥

शिकवी दत्तभक्तिला । अद्वैताचा बोध जयें केला ॥ २ ॥
अवनी पायीं फिरला । आचरुनि दावी कर्ममार्गाला ॥ ३ ॥
नाना ग्रंथां स्त्रवला । सद्धर्माच्या प्रसारार्थ झटला ॥ ४ ॥
सेवी संन्यासाला । वंदूं त्या श्रीपूर्णब्रह्माला ॥ ५ ॥

---

२७३. पद ( चाल—अंध पंगु० )

अविद्ये तूं जाई येथुनी सोडुनि या जीवा ।
कृपा उपजली पाहुनि यातें सदय वासुदेवा ॥ ध्रु० ॥
सुविवेकातें जागा करुनी सहायार्थ दिधला ।
मनःक्षोभ गे तेणें याचा दूर असे केला ॥ १ ॥
विचार-कन्यका शांति तिजसीं परिणय घडवीला ।
त्वन्नंदिनी वासना कुलटा तत्संगा विटला ॥ २ ॥
नाममंत्र हा जपतां झाला सागर धैर्याचा ।
माये तव सुत कामादिक जे परिभव करि त्यांचा ॥ ३ ॥
श्रीगुरुमूर्ती प्रगटुनि हृदयीं बोधामृत पाजी ।
चेतवोनी सद्भावनेला शुभकार्यीं योजी ॥ ४ ॥
विषयसुरेतें सुधा गणवुनी सेवन करवीलें ।
आजवरी तूं परि तें आतां कपट कळों आलें ॥ ५ ॥
यास्तव बाई निरोप घेई पुरे त्वत्सहवास ।
माणगांविंच्या यतिप्रसादें धन्य होउं खास ॥ ६ ॥

---

२७४. पद ( चाल—कष्ट देति फार० )

गरुडेश्वर धन्य धन्य कीर्ति गाजली ।
जेथें श्रीवासुदेवमूर्ति राहिली ॥ ध्रु० ॥
भूवैकुंठचि स्थान आज जगतिं जाहलें ।
पापात्मे होति शुद्ध माहात्म्य प्रगटलें ॥
भाविकांसि दर्शन इथें घडतसे भलें ।
स्वर्गंगा नर्मदेंत येथ उतरली ॥ १ ॥
मानव-तनु नर्मदेस अपुलि अर्पुनी ।
वासुदेव दत्तरूप वसत होउनी ॥
म्हणुनी हें पुण्यक्षेत्र परम त्रिभुवनीं ।
स्मरतां मज पडुनि साक्ष वृत्ति तोषली ॥ २ ॥

---

२७५. पद ( चाल—अरसिक किति हा शेला० )

वन्दन श्री-सद्गुरुला । परब्रह्म-मूर्ति वासुदेवाला ॥ ध्रु० ॥
मानव-तनु-दत्ताला । सदाचार दावाया जो आला ॥ १ ॥
आम्हां तारायाला । अजन्मा जन्मुनी येथें प्रगटला ॥ २ ॥
आचार्य शंकर दुसरा । सनातनधर्मा करी उपकारा ॥ ३ ॥
प्रकाशी वेदान्ताला । अद्वैत-गुह्य जो बोलियेला ॥ ४ ॥
अनुग्रह देणाऱ्याला । विनायकासी भव-तारकाला ॥ ५ ॥

---

२७६. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

गरुडेश्वर स्मर रे । सुमना ॥ ध्रु० ॥
वासुदेव गुरु तेथें आहे । सत्पथ-दर्शक रे ॥ १ ॥

नार्मदीय तट परम सुमंगल । पतितां पावन रे ॥ २ ॥
क्षेत्र तीर्थ आणि श्रीगुरुसेवन । सहज घडे तुज रे ॥ ३ ॥
विनायकासी पूर्णानंदें । दावियली सोय रे ॥ ४ ॥

---

२७७. पद ( चाल—सुंदर मुख तुंदिल० )

जय जय जय वासुदेव, मुनि, दिगंबरा ।
गरुडेश्वर–क्षेत्रधार, गुरु, यतीश्वरा ॥ ध्रु० ॥
धर्मकेतु, विरति-पूर्ण, ज्ञानसागरा ।
पूर्णब्रह्म, प्रगटरूप, योगविद्वरा ।
परमहंस, सिद्धयाग, श्रौतभास्करा ।
( चाल ) सगुणा । सुगुणा । अगुणा ।
तुज नमितों । पद धरितों । जय वदतों । मंगलाकरा ॥ १ ॥
अचलव्रत, तपोमूर्ति, श्रुतिदिवाकरा ।
विजितेंद्रिय, युक्त-चित्त, चरित-सुंदरा ।
पथ-दर्शक,अघ-दाहक, विजय-मा-वरा ।
( चाल ) स्तवितों । ध्यातों । वरितों ।
सद्गुरूला । सुरतरुला । सद्गतिला । तुज कृपाकरा ॥ २ ॥

---

२७८. पद ( चाल—कोण तुजसम सांग मज० )

तारिल कवण तुजविण वासुदेवा । मूर्त प्रेमभावा ।
उडि घालुनि हा दीन सोडवावा । भयमुक्त करावा ॥ ध्रु० ॥
तूं समर्थ सकल हेतु-पूर्ण-कर्ता । चिंतेला हर्ता ।
यास्तव तळमळ दूर करीं ताता । होईं सुखदाता ॥ १ ॥

आवड कीर्तनाची तव भजनाची । पुरवावी साची ।
आनुकूल्यें दावीं अनुभवाचीं । खूण प्रसादाची ॥ २ ॥

---

२७९. पद ( चाल – बघुनि त्या भयंकर० )

स्मरण आज त्या दिवसाचें सोडिलें तुवां आम्हांतें
तळमळवी या जीवाला दुःख तें न साहे मातें ॥ ध्रु० ॥
गाउली जशी वासुराला । माउली कीं तान्हुल्याला ।
ममतेला तुलना नाहीं । म्हणुं काय तव प्रेमाला ॥
कूर्मदृष्टि तूं सकलांसी । लक्षुनि रक्षित होतासी ।
त्या तुला करुण-रूपासी । वानुं कसें वद मजपाशीं ॥
पाजुनि ज्ञानामृत लोकां । पुष्टि तुष्टि दिधली साची ।
जननी तूं परमार्थिकी । संगति न अन्य उपमेची ॥
क्षेत्र करोटीश्वर रेवा । स्थान जें तव समाधीचें ।
आठवतां विनायकाला । थांबवि स्पंदन हृदयींचें ॥

---

२८०. पद ( चाल – उद्धवा शांतवन कर जा० )

कोण मार्ग दाविल याला । कळवळा येइ कवणाला ॥ ध्रु० ॥
बाप माय बंधू भगिनी । अतुल्य तूं दृष्टांतानीं ॥
धांव घे उताविळ झालों । वाट तुझी पाहत बसलों ॥
उभा माझेपुढती राहीं । बोलें मजसंगें कांहीं ॥
( चाल ) अनन्य मी तुजला शरण । तुझे नमिले दोन्ही चरण ॥
करितों त्यांचें हृदयीं स्मरण । पाव आतां या दासाला ॥ १ ॥

या स्थाना प्रगट कराया । वासुदेवा ये गुरुराया ॥
कृपा पूर्णानंदें केली । पाहिजे ती सिद्ध झाली ॥
( चाल ) स्थापना त्वदिय कीर्तीची । तैशि तुझिये पादुकांची ॥
आणिक तव उपासनेची । आणीं साक्षात्काराला ॥ २ ॥
विघ्नें फार बाधताती । दुर्जन बहु पीडा देती ॥
स्थानमहिमा वाढायासी । प्रखरता असो तेजासी ॥
( चाल ) मागतों भजनमार्गासी । नित्य तूझ्या दर्शनासी ॥
तैसें स्थान-माहात्म्यासी । देई या विनायकाला ॥ ३ ॥

---

### २८१. पद ( चाल—आज श्याम मोहलिनो० )

वासुदेव दत्तमुनी उपासना दाखवी
नाम घेत भजनीं व्हावें मग्न असें शिकवी ।
दत्तयश गात पुनीत आम्हांकडुन म्हणवीत
मार्ग असा आचरवी हित अमुचें साधवी ॥ १ ॥

---

### २८२. पद ( चाल—वसंतीं बघुनि मेनकेला० )

पाहुनी प्रबळ कलि झाला ।
वासुदेव तो दत्त मुनीश्वर आम्हांस्तव बनला ॥ ध्रु० ॥
धर्माचा संप्रसार केला,
उपासना पथ अवलंबोनी लोकीं प्रगटीला ॥ १ ॥
भजा ईश-गुरु-वेदांताला,
आजन्म बोध हा जनां करूनी निजधामीं गेला ॥ २ ॥

---



श्रीपूर्णानंदसरस्वतीस्वामीमहाराज.

( श्री. साठे यांजकडील देवस्थानांतील छायाचित्र )

२८३. पद ( चाल—शंभो शिवहर० )

योगी यतिवर वेणुदंडधर त्रिगुणेशा भक्त ताप हर ॥ ध्रु० ॥
झालों मी पदलीन तरी
गरुडेश्वरपुरवासी मुनि मज होईं हितकर ॥ १ ॥
संचार करीं मजठायीं
हे करुणाकर विधिहरिहरमय परमहंसवर ॥ २ ॥

---

२८४. पद ( चाल—लाल शालजोडी० )

करिं दंड कमंडलु घेवोनी पायिं खडावा सेवोनी
भगवी शाटी परिधानोनी फिरे एकला जो अवनी ॥ ध्रु० ॥
वेष जयाचा संन्यासी परि सादर मूर्तिपूजनीं
विभूति लावी सर्वांगासी शीतोष्णातें नच मानी ॥ १ ॥
परिग्रह अन्य कांहीं न जवळी भय न धरी वनीं स्मशानीं
उपासनापथ सकळां दावी स्वयें आपण आचरोनी ॥ २ ॥
निधि विद्येचा श्रुतिशास्त्रांचा ब्रह्मनिष्ठ जो मुनि ज्ञानी
विनायकाचा गुरु वासुदेव येथें येवो प्रगटोनी ॥ ३ ॥

---

२८५. पद ( चाल—भसित देहीं चर्चिता० )

वेणुदंड आदरी । त्रिपुंड्रा शिरीं धरी ।
छाटि भगवि पांघरी । वासुदेव सन्मुनी ॥ ध्रु० ॥
संचरे पादचार । करि धर्मसंप्रसार ।
शिकवि जनीं निगमसार । तो भज तूं गाउनी ॥ १ ॥

दे दत्तपदिं रती । तशी तद्यशामृतीं ।
उपासना सन्मती । सेव त्यास ध्याउनी ॥ २ ॥
कमंडलु करिं असे । शोकभय हरीतसे ।
दत्तनाम गातसे । आठवितों मन्मनीं ॥ ३ ॥

---

२८६. पद (चाल—मला मदन भासे०)

यतीश्वर तपोमूर्ति योगी मुनि । संतोषवूं प्रेमें सेवनीं ॥ ध्रु० ॥
करो प्रसादा गुरुवर आम्हां । प्रगटपणें करुणा येऊनी ॥ १ ॥
स्थान बनवो निजसत्तेचें । वासुदेव हें प्रकाशवुनी ॥ २ ॥

---

२८७. पद (चाल—राधाधरमधु०)

श्रीवासुदेवानंद । यतिवर । सद्गुरु मुनि परमानंद ॥ ध्रु० ॥
त्रिपुंड्र-भूषित-ललाट बुधवर । स्वीकृत दत्तभजनछंद ॥ १ ॥
दंड-कमंडलु-युत-कर ज्ञानद । लुंठित-श्रुतिसार-मकरंद ॥ २ ॥
शाटि-परिवृतनिजांग तोषद । साक्षात्कृत योगानंद ॥ ३ ॥
त्यक्त-सर्व-भोग-संग्रह प्रभुवर । भुवन-संचार-स्वच्छंद ॥ ४ ॥
धर्मसंस्थापक गुरु सुमतिद । आचार-सद्बोधकंद ॥ ५ ॥
मानव-तनु-दत्तराज मुक्तिद । स्वामि कैवल्यानंद ॥ ६ ॥
शांत-दांत-बोध-मूर्ति वत्सल । संतुष्ट वैराग्यनंद ॥ ७ ॥
विनायक राहे नित्य होउनी । यच्चरणकमलीं मिलिंद ॥ ८ ॥

---

२८८. पद ( चाल—श्रीमंत पतीची० )

वासुदेवगुरुचा चेला काय उणें त्या पुरुषाला ॥ ध्रु० ॥
व्रतोपवासयमनियमादि आचरिल्यासम ते त्याला ।
यज्ञहोमजपतपदानां न करितां लभे पुण्याला ।
योग-याग-कर्माचरणां न वरितां पवे सिद्धीला ।
तो वसे होय ती काशी
घाली गंगा स्नानासी
ये सुधा पानभोज्यासी
उपतिष्ठे सकल सेवेला । नाहींच काम्य तृषाला ॥ १ ॥

---

२८९. पद ( चाल—हरिभजनाविण० )

श्रवण—मधुर मधुर श्रव श्रवणिं श्राववीं ॥ ध्रु० ॥
स्फुरुनि हृदयपंकजांत
चित्तवृत्ति करीं विकसित
इंद्रियांत अभिलषित
रसीं चेतवीं ॥ १ ॥
प्रेमाब्धि उचंबळवीं
त्रिकरणीं तोष भरवीं
श्रुतिमयता दृढ जडवीं
भान विसरवीं ॥ २ ॥
ऐकणेंपण मात्र उरो
प्रत्ययांतर सकल सरो
औपाधिक परिहरो
ऐक्य प्रगटवीं ॥ ३ ॥

विनायका स्वरुपभाव
द्यावा निज वासुदेव
विस्तारीं यश वैभव
कीर्ति गाजवीं ॥ ४ ॥

---

२९०. पद ( चाल—भोलानाथ दिगंबर० )

जरि मानव तनुधारी । दत्तचि वासुदेव निर्धारीं ॥ ध्रु० ॥
दिनकर कैसा येइ लपवितां । सहज होई प्रगटता ।
प्रत्ययें स्फुरे तेंविं साक्षात्कारीं ॥ १ ॥
वाडीमाजी बैसे समाधींत । जोंवरि रवि घे अस्त ।
माध्यान्हीं परि भिक्षा करी ॥ २ ॥
पहिल्यासम दुजें रूप नटला । गांवीं घे भिक्षेला ।
दिसला लोकां वेशिबाहेरी ॥ ३ ॥
प्रसाद दिधला निज हातींचा । दावितातीं जन साचा ।
विस्मय गमला सकलां भारी ॥ ४ ॥
विनोदें पुसे गांडा प्रभुंना । कर लावियेला काना ।
अगम्य लीला अशी आचरी ॥ ५ ॥
म्हणे विनायक चरमयुगींही । चमत्क्रति हे पाहीं ।
रची व्यक्त तो जन हितकारी ॥ ६ ॥

---

२९१. पद ( चाल—अरसिक किति हा शेला० )

गाऊं गुरुलीलांना । या मंगलोत्सवीं कथानकांना ॥ ध्रु० ॥
प्रवर्तविती पूजना । वैजनाथ द्विज जो न घे दर्शना ॥ १ ॥

न भजे गुरुपादुकांना । पंचगंगातटिं करि नित्य भ्रमणा ॥ २ ॥
सेवी एक्या वसना । बोलावितां कोणी जाई भोजना ॥ ३ ॥
गांडा बोले वचना । संग्रहिलें त्वां अष्टरूपकांनां ॥ ४ ॥
महापूजासेवना । आचरोनी वेंचीं या तव धना ॥ ५ ॥
तो जेव्हां ऐकेना । वासुदेवगुरुसी करि निवेदना ॥ ६ ॥
ते करिति आज्ञापना । तेव्हां निरुपायें आणिलें मना ॥ ७ ॥
प्रगटीती महिमाना । चमत्कार दाविती श्रीगुरु जनां ॥ ८ ॥
त्रिसहस्र मंडळींनां । अल्पद्रव्यामधीं दिलें जेमना ॥ ९ ॥
अगाध माहात्म्यांनां । केंविं विनायक करुं शके वर्णना ॥ १० ॥

---

२९२. पद (चाल—प्रतिकुल होइल०)

भेट मजसी देसी केव्हां वासुदेवराया
स्मरत सतत हृदयीं मम मीं सौख्यधाम पायां ॥ ध्रु० ॥
साक्षात्कार व्हावा तुझा माझे अंतरांत
व्यक्त तेज विलसो तूझें मदिय इंद्रियांत ॥
अनुग्रह प्रत्यया आणीं मन्मनोबुद्धींत
अहंकार बनविं त्वदात्मक माझा गुरुराया ॥ १ ॥
ज्ञानरूप माझेठायीं येईं प्रकाशोन
विश्वात्मैक्य साधीं माझें समरस मज करोन
दिव्यदृष्टि उघडीं माझी चित्तीं संचरोन
विनायक करिं सामर्थ्यानें युक्त आपुलीया ॥ २ ॥

---

## २९३. पद ( चाल—प्रीति जी दुजावरी० )

धर्म सुविशद करायासी । आविर्भवला हृषिकेशी । अवनिसी ॥ ध्रु० ॥
चरमयुगीं अवलंबाया । शक्याचार प्रकाशाया । अवनिसी ॥
सह्यनिवासी दत्तात्रेय । माया-मनुष्य प्रगट होय । अवनिसी ॥
( चाल ) जन्मला । द्विजकुळीं भला । शिकवि भक्तिला ।
लावि भजनासी । जन बनुनी स्वयें संन्यासी ॥ अवनिसी ॥ १ ॥
वासुदेव दत्तात्रेय । सकळांचा श्रीगुरुराय । अवनिसी ॥
विनायकाचा परमेश्वर । परब्रह्म मूर्त साचार । अवनिसी ॥
( चाल ) मंगला, । प्रगटवो कला । धरुनि प्रीतिला ।
स्थानविजयासी । यशोत्कर्ष साधायासी ॥ अवनिसी ॥ २ ॥

---

## २९४. पद ( चाल—नेदी चित्ताला० )

धर्माचरणीं होय रत तूं पावसि सौख्याला
वासुदेवें सक्रिय शिकविलें या सन्मार्गाला ॥ ध्रु० ॥
विप्रवंशीं घेउनि जन्मा स्वधर्म सेवीला ।
वेदाध्ययनादिक योग ही समुचित साधीला ॥
ब्रह्मचर्याश्रमिं राहोनी पढला विद्येला
उपासनानुग्रह जोडोनी लाभे मंत्राला ॥ १ ॥
शास्त्रगतितें पावुनि बोले अद्वयतत्त्वाला ।
लाभे सद्गुरु दत्ताच्या तो साक्षात्काराला ॥
गृहस्थ-धर्मही तदनंतरें उत्तम पाळीला
वानप्रस्थाश्रमही तेणें दृढ अभ्यासीला ॥ २ ॥

संन्यास दीक्षा घेउनि पुढती करि संचाराला ।
धर्म-पुरस्कारें वर्णी हरि-रति-मार्गाला ॥
स्वधर्म पाळणें आवश्यक या बोधी साराला
स्वयें आचरुनि जनां उपदेशी विहिताचाराला ॥ ३ ॥

योगयागव्रतप्रायश्चित्तें आचरि शुद्धिला ।
तीर्थें क्षेत्रें सिद्धस्थानें पायीं चालीला ॥
पथ भजनाचा भारतवर्षीं लोकां दावीला
आचारबद्ध उपासनेचा झेंडा लावीला ॥ ४ ॥

वासुदेव-गुरु-चरितापासुनि घेई बोधाला ।
इहपर इष्टद सेवीं यास्तव त्या आचाराला ॥
प्रमाण श्रुतिला तेंच योग्य कीं अवलंबायाला
म्हणे विनायक जाग नित्य तूं निजकर्तव्याला ॥ ५ ॥

---

२९५. पद ( चाल — तूं टाक चिरुन ही मान० )

पाजुनि बोधामृतपान हरीं अज्ञान ।
देउनि सिद्धि मम उपासनेला बनविं मला बलवान ॥ ध्रु० ॥
करिं निजात्मतेचें दान
तयें उपजवीं मज ज्ञान
विश्व गमविं विभवें सान
सामर्थ्याचें सद्गुरुवर योजीं मजठायीं आधान ॥ १ ॥
घडवीं तव लीलागान
विसरवीं देहिंचें भान
लावीं सगुणाचें ध्यान
सिद्धि सर्वेही ठेविं मजपाशीं तेजें प्रकाशमान ॥ २ ॥

प्रगटवावया हें स्थान
धरिं निजांचा अभिमान
करविं तयांचा सन्मान
संपन्न कार्य तव करावया दे विनायका अवसान ॥ ३ ॥

---

## ( १० ) श्रीगुरु

### २९६. पद ( चाल—स्वार्थी जी प्रीति० )

ठेवी जो। वृत्ति प्रेमाची गुरुपदीं ॥ ध्रु० ॥
ज्ञानाला तो लाभुनि पावे। धैर्यातें विपदीं ॥ १ ॥
कृपाचि भरली अवघी जाणे। परमचि त्या वरदीं ॥ २ ॥
पावसि अर्था सकळहि म्हणुनी। मन ठेवीं सुखदीं ॥ ३ ॥

---

### २९७. पद ( चाल—स्वार्थी जी प्रीति० )

सेवीं तूं। धाम मुक्तिचें सद्गुरू ॥ ध्रु० ॥
तारक तुजला दुसरा नाहीं। नको त्यासि विसरूं ॥ १ ॥
भेटेल तुजसी शोधिसि जरि तूं। सह्याद्रिशिखरू ॥ २ ॥
अनन्य होतां भेटी देतो। सुजनां कल्पतरू ॥ ३ ॥

---

### २९८. पद ( चाल—उद्धवा शांतवन कर, जा० )

नका पाहूं श्रीगुरु अंता। भवीं शिणलों मी कष्टतां ॥ध्रु०॥
वहु दोषां आचरीतां। दुःख भोगा आलें ताता ॥
लाज कैंची या तव पतिता। स्वयें पाप निज सांगतां ॥

(चाल) कृपा उपजो तुमच्या चित्ता। मजसाठीं श्रीगुरुदत्ता ॥
मज कोणी वांचवीता। वालि नाहीं भगवंता ॥ १ ॥

नाहीं मज गृहधनदारा। कोठें या न उरला थारा ॥
अनाथ दीन मी उदारा। मज द्यावा निज आसरा ॥
(चाल) पाठिराखा मम त्राता। थोर तुझी वत्सलता ॥
माय बाप मज तूं आतां। स्वजन बंधू कृपावंता ॥ २ ॥

मन माझें विषयीं जडतें। चंचलता चित्ता येते ॥
एकांतासी हानी होते। तेणें मन बहु हळहळतें ॥
(चाल) शक्ति नाहीं आंवराया। काय करूं मी गुरुराया ॥
करुणाघना दयावंता। होई मम सहायकर्ता ॥ ३ ॥

लेश नसे वैराग्याचा। काम चित्तीं प्रबळ साचा ॥
ध्यानयोग मूर्खा कैंचा। दास सदा हा कामाचा ॥
(चाल) काम-पंचानन जागा। शांति कैंची अंतरंगा ॥
घोर गर्जना तो करितां। कोण तारी भीतिग्रस्ता ॥ ४ ॥

पीठ लोभाचें रचोनी। छत्र मोहाचें ताणोनी ॥
मदवासित चित्तासनीं। कामहरी हा बैसोनी ॥
(चाल) क्रोधमंत्री तो आदरी। मत्सर प्रतिहार करी ॥
राज्य स्थापी हृदयांतरीं। कोण मजला सोडविता ॥ ५ ॥

कायावाचामनें नाथा। दुर्बळ झालों श्रीसमर्था ॥
कोण पुरवी माझ्या अर्था। तुजविणें श्रीगुरुनाथा ॥
(चाल) आशा मावळली आतां। मज आली उदासीनता ॥
उत्साह नाहीं मम चित्ता। तारीं तारीं श्रीगुरुदत्ता ॥ ६ ॥

नाहिं भक्ति उपासना । सदाचार करुणाघना ॥
विषय गोड वाटे मना । जवळि करितों तत्साधना ॥
(चाल) नाहिं विषय परमार्थ । हरपले दोन्ही अर्थ ॥
सकळ ओढवे हा अनर्थ । वांचवीं या श्रीसमर्था ॥ ७ ॥
सर्वभावें शरण आलों । चरणिं नाथ दास झालों ॥
संसारासी उबगलों । मायापाशीं सांपडलों ॥
(चाल) दोष काय स्वीकारीतां । पापी जरी शरण येतां ॥
उद्धरीतां या त्वत्पतिता । कीर्ति होय तूझी दत्ता ॥ ८ ॥

---

## २९९. पद (धुमाळी)

श्रीगुरु कराल का उपकार ॥ ध्रु० ॥
प्रगटपणातें धरुनी येथें । द्यावा साक्षात्कार ॥ १ ॥
दर्शन दिधल्यावांचुनि कैसा । होइल मम उद्धार ॥ २ ॥
निज भजनाचा योग घडवुनी । पाजा सुधा-रस-सार ॥ ३ ॥
विनवि विनायक चरणां नमुनी । द्या मज प्रेम अपार ॥ ४ ॥

---

## ३००. पद (धुमाळी)

निज मन गुरूंस अर्पूं या ॥ ध्रु० ॥
अंतरिं रंगुनि प्रेमें दाटुनि । भजनरसातें सेवूं या ॥ १ ॥
कथामृतपानें प्रमत्त होउनि । आनंदनिर्भर नाचूं या ॥ २ ॥
विसरुनि आपुल्या देहाभिमाना । स्वरुपीं समरस होऊं या ॥ ३ ॥
समाधिसौख्या बोले विनायक । याच साधनीं पावूं या ॥ ४ ॥

---

## ३०१. पद ( धुमाळी )

गुरुपदरजांत लोळूं या ॥ ध्रु० ॥
प्रायश्चित्तें नानाविध तीर्थें । तदधिक शुद्धी साधूं या ॥ १ ॥
विषयवासना विष शमवाया । दिव्य रसायन सेवूं या ॥ २ ॥
भवरोगातें नष्ट कराया । ओषधिमज्जन सारूं या ॥ ३ ॥
कृतान्त-बाणीं विद्ध न व्हाया । धूलि-कवच हें लेवूं या ॥ ४ ॥
अमर बनाया सांगे विनायक । हाच योग कीं जोडूं या ॥ ५ ॥

---

## ३०२. पद ( धुमाळी )

गुरुगुणसुधेस सेवूं या ॥ ध्रु० ॥
चित्तवृत्तिचे कामादिक मळ । याच उपायीं शोधूं या ॥ १ ॥
जन्ममृत्युचे फेरे अवघड । त्यांसी समूळ चुकवूं या ॥ २ ॥
आधिव्याधिदौर्बल्यादि । दोषसमुच्चय शमवूं या ॥ ३ ॥
भक्तिरसानें परिप्लुत होउनि । प्रापञ्चातें विसरूं या ॥ ४ ॥
मोक्षमार्ग हा सुखकर हितकर । म्हणे विनायक जोडूं या ॥ ५ ॥

---

## ३०३. पद ( धुमाळी )

सद्गुरु तुम्हीं कधीं येणार ॥ ध्रु० ॥
मस्तकिं माझ्या कर ठेवोनी । कधिं अपुला करणार ॥ १ ॥
पुलकांकित तनु स्पर्शसुखानें । कधिं माझी होणार ॥ २ ॥
निजवाक्यामृत श्रवणीं ओतुनि । शांति कधीं देणार ॥ ३ ॥
अनुग्रह तुमचा मज साधाया । संधि कधीं मिळणार ॥ ४ ॥

---

### ३०४. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

नामसुधा देई । गुरुमाई ॥ ध्रु० ॥
प्राशन करितां तृष्णा मनिंची । हरपोनी जाई ॥ १ ॥
मिष्टान्नीं या अनुपम गोडी । तृप्ति न मन घेई ॥ २ ॥
दिव्यौषधि हे भवरोगाला । पूर्ण लया नेई ॥ ३ ॥
विनायकाच्या जनिमरणाला । हारकती होई ॥ ४ ॥

---

### ३०५. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

चरित मुखें गाऊं । श्रीगुरुचें ॥ ध्रु० ॥
रसानुबंधें लोलुप बनुनी । मधुकरसे होऊं ॥ १ ॥
विषयसेवनीं माधुरी जैशी । रुचि तैशी घेऊं ॥ २ ॥
प्रेमाश्रुधारा नयनीं निघतां । स्वारस्या ध्याऊं ॥ ३ ॥
तन्मय होतां अनुपम मोदें । भरुनीयां जाऊं ॥ ४ ॥

---

### ३०६. पद ( चाल – प्रतिकुल होइल० )

श्रीगुरुनीं मजला कैसें पूर्ण मोहियेलें ।
गुंगवोनि अपुल्याठायीं वेडें मज केलें ॥ ध्रु० ॥
विषयराग इंद्रियांचे श्रीगुरुमय झाले ।
मनन मनाचेंही आतां दत्तरूप ठेलें ।
बुद्धितत्त्व सद्वस्तुमाजी विरोनीच गेलें ।
प्रभुनीं मद्वैशिष्ट्यातें गमत हारवीलें ॥ १ ॥
वर्णन या आनंदाचें गिरा कोण बोले ।
सुखनिदान चित्तालागीं काय कळुनि आलें ।

अहंप्रत्यय जीवाचे कीं सर्वही निमाले ।
ऐक्यरूप होउनि सारे स्तब्ध राहियेले ॥ २ ॥

---

३०७. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

वेड मला लागो । श्रीगुरु तव ॥ ध्रु० ॥
भजनपूजनीं शुद्ध प्रेमानें । मम काया वागो ॥ १ ॥
कीर्तनरंगीं समरस होउनी । दास तुझा जागो ॥ २ ॥
यशामृतधारा श्रवणीं पडतां । अधिकरुचि हा मागो ॥ ३ ॥
स्वरुपीं तूझ्या पागल बनुनी । तुजलागीं बिलगो ॥ ४ ॥
विनायकाची स्मृति देहाची । त्वच्छंदें भंगो ॥ ५ ॥

---

३०८. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

गुरुमहिमा गा रे । भावें ॥ ध्रु० ॥
जन्मकर्म जनसंग्रह स्मरुनी । धरिं अनुरागा रे ॥ १ ॥
उपासनापथ दावियला तुज । जड त्या मार्गा रे ॥ २ ॥
शिकवण त्याची भजन करावें । भज त्या रंगा रे ॥ ३ ॥
कथारसपानें मत्त विनायक । करि बहु दंगा रे ॥ ४ ॥

---

३०९. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

चित्तातें रमवूं । गुरुचरणीं ॥ ध्रु० ॥
समरस करुनी ताप तयाचा । पदरतिनें शमवूं ॥ १ ॥
शुद्धस्फटिकासम निर्मळ त्या । प्रकाशमय बनवूं ॥ २ ॥
परिमळ त्याचा म्हणे विनायक । ब्रह्माण्डीं भरवूं ॥ ३ ॥

---

३१०. पद ( चाल—अरसिक किति हा शेला० )

वळवूं कैसा देवा । कवण्या योगें प्रसन्न तो व्हावा ॥ ध्रु० ॥
मजवरि धरि जो रुसवा । कोप तयाचा कैसा शमवावा ॥ १ ॥
कैसा प्रभु तो गावा । जेणें मजपाशीं धांवत यावा ॥ २ ॥
कोणत्या प्रेमभावा । अर्पण मी करितां मज विलगावा ॥ ३ ॥
केंवीं त्या आळवावा । कारुण्यें भरुनी द्रव पावावा ॥ ४ ॥
विनायकाला बरवा । गुरुजी आपणचि मार्ग दावावा ॥ ५ ॥

---

३११. पद ( चाल—मम जिवाची प्रियकरिणी० )

मी देखिली गुरुमूर्ती । आत्मसुखीं जी निर्भर होती ।
जे माझ्या आविर्भवली चित्तीं ॥ ध्रु० ॥
प्रसन्न जे मज पूर्णकृपेनें । शिकविली जिनें मज आत्मरति ॥ १ ॥
विनायकाला लावुनि गोडी । दिधलि जियेनें भजनीं प्रीति ॥ २ ॥

---

३१२. पद ( झंपा )

अतां प्रार्थना गुरुवरा चरण-कमलां । वितर तूं आमुच्या मंगलाला ॥ ध्रु० ॥ विजयी आम्हां करीं । शत्रुनां संहरीं । धैर्य दे अंतरीं ॥ आमुचीया ॥ तव विजयध्वज करीं । देउनी सत्त्वरीं । गाववीं श्रीहरी ॥ निज यशाला ॥ १ ॥ मनोरथ पूरवीं । अलक्ष्मी घालवीं । सिद्धिला साधवीं ॥ पूर्ति देईं ॥ दुश्चित्तता नसो । स्वास्थ्य जीवीं वसो । निरामयता असो ॥ त्वदीयांला ॥ २ ॥ पुत्रपौत्रादिकीं । कृपेनें विलोकीं । कल्याण होय कीं ॥ जेंवि त्यांचें ॥ लोटिं बाधा दुरी । शोक चिंता हरीं । नाशिं तूं त्यांचिया

॥ संकटांला ॥ ३ ॥ स्थान-यश वाढवीं । जय जय रव करवीं । तेज तूं प्रगटवीं ॥ अमोघ दिव्य ॥ भक्तिला क्रीडवीं । तुष्टिला तोषवीं । विनायक पाववीं ॥ दर्शनाला ॥ ४ ॥

---

३१३. पद ( चाल – या नव नवल नयनोत्सवा० )

गा श्रुतिमधुर गुरुकीर्तिला । तरसी भवार्णवा
अनु-दिन रत जरि हें अमृत सेवायाला ॥ ध्रु० ॥
प्रेमा हृदयीं येतां भरुनी । असुख जाशि विसरोनी ।
आनंदाचा भर येवोनी । लाविल डोलायाला ॥ १ ॥
डुलतां डुलतां गळे अहंता । ग्रंथि तुटोनी जातां ।
देहातितता तुजसी येतां । वश होत सर्व तुजला ॥ २ ॥

---

३१४. पद ( चाल – वरि गरिवा वीरा जी अबला० )

जरि प्रसन्न होती गुरु तुजला । मग भेणें जायचि विलयाला ॥ ध्रु० ॥
परोपरी ते रक्षिति कृपाळु । कोण विरोधी सामर्थ्याला ॥ १ ॥
चरण धरीं शरणार्थी होईं । मग पाहसिल चमत्काराला ॥ २ ॥
प्रतिबंध तुझे सारे तुटती । पावसिल सहज आनंदाला ॥ ३ ॥
जीवन्मुक्तता येईल अंगीं । थारा न मिळे मुळीं चिंतेला ॥ ४ ॥
भजन-रति घे पद गुरुचे ध्याई । बोध होय हा विनायकाला ॥ ५ ॥

---

३१५. पद ( चाल – मज गमे ऐसा जनक तो० )

गुरुपदां जो का सेवितो । धन्य नर तो ॥ ध्रु० ॥
पूर्व-पुण्य जरि उदया येई । तरीच ऐशी सुबुद्धि होई ।
पापात्मा रति विषयीं घेई । लाभ हा न सकलां होतो ॥ १ ॥

प्रारब्ध-भोग तो जरि भोगी । तेथें न ठेवी वृत्ति जागी ।
ध्यास गुरुचा त्या अंतरंगीं । लौकिककर्मा हीन मानितो ॥ २ ॥
संसारीं तो असुनि निराळा । विषयांचा त्या नाहीं चाळा ।
सेवि सदा तो गुरु दयाळा । कर्तव्य गुरु-सेवा समजतो ॥ ३ ॥
विनायक हें सौख्य अनुभवितो । जननिंदेसीं कान न देतो ।
वासुदेव गुरु हृदयीं स्मरतो । तरेन प्रसादें भवा म्हणतो ॥ ४ ॥

---

३१६. पद ( चाल—रमवाया जाऊं० )

श्रीगुरुला सेवूं । निशिदिनीं । श्रीगुरुला सेवूं ॥ ध्रु० ॥
भोग तयाला अर्पूं प्रेमें । जाऊं भरुनी सेवाकामें ।
उपचारें त्या पुजूं नेमें । मन चरणीं ठेवूं ॥ १ ॥
शृंगारांनीं मूर्ती सजवूं । पुष्पालंकारीं ती नटवूं ।
सुंदर वस्त्रें अंगीं लेववूं । गायनीं आळवूं ॥ २ ॥
मंदमंदसा वारा घालूं । महिमा त्याचा विनयें बोलूं ।
चवरि मोर्चलें सादर ढाळूं । आनंदें रमवूं ॥ ३ ॥
स्नान भोजनीं पानीं सुखवूं । दीप घृताचे पुढती लावूं ।
परिमळें मृदुल काया भरवूं । रंगिं या रंगवूं ॥ ४ ॥

---

३१७. पद ( चाल—जरि कुणा श्रीमंताची सून० )

काय अजुनि प्रतिपत्तीची वेळ आलि नाहिं का ।
आजवरी सेवा केली ती न फळा येई का ॥ ध्रु० ॥
गुरुमूर्ती संतोषावी अशी न का योग्यता ।
कां न धरी पुण्याई ती अजुनि परिपक्वता ।

कशि न होत या स्थानाची दृढ-भूमि-सिद्धता ।
प्रतिष्ठान निजसत्तेचें देव इथें स्थापि का ।।

---

### ३१८. पद ( चाल – संशय कां मनिं आला० )

श्रीगुरु कां सेवा ना । त्यजोनी अन्य लघु साधनांनां ।। ध्रु० ।।
गुरूसेवा दे तोष मनाला । शमवुनी विकारांनां ।। १ ।।
कल्पवृक्ष ती अभिष्टदाई । वितरत कल्याणांनां ।। २ ।।
सुगमाहुनिही सुगम असे ती । उल्हसवित वृत्तींनां ।। ३ ।।
ज्ञानरूप ती मोक्षचि केवळ । बोधद अविवेकांनां ।। ४ ।।
विनायका तूं दृढ करि सेवन । तोष होय गुरुजींनां ।। ५ ।।

---

### ३१९. पद ( धुमाळी )

गुरुयश बोलत नाचूं या ।। ध्रु० ।।
देहमनातें विसरुनि गातां । लीन तयांतचि होऊं या ।। १ ।।
दत्तचि बनुनी आनंदीं त्या । निर्विशेषता पावूं या ।। २ ।।
देश-कालादि निमित्त यांचा । सकळ संबंध तोडूं या ।। ३ ।।
प्रापंचातें स्वप्न बनवुनी । समाधि-निद्रा सेवूं या ।। ४ ।।
स्वरुपीं जागे होउनि तेथें । अखंड जागृति मिळवूं या ।। ५ ।।
देहोपाधिस न त्यागितांही । समरसतेला खेळवूं या ।। ६ ।।
गुरुयशवर्णन विनायकाचें । साफल्यतेला आणूं या ।। ७ ।।

---

३२०. पद ( चाल – वरि गरिबा वीरा जी अबला० )

गुरुविण नाहीं सद्गति तुजला । यास्तव सेवीं गुरुचरणांला ॥ ध्रु० ॥
इहपर सौख्यद जाणुनि गुरुला । नित्य आदरीं तद्वचनाला ॥ १ ॥
सन्निध राहुनि करिं सेवेला । ते न निरोपिति जरि कार्याला ॥ २ ॥
अकृत्यहि जरि साधायाला । तत्पर बन ना धरिं शंकेला ॥ ३ ॥
जपतप साधन विनायकाला । हेंच एक तरि गमे मुक्तिला ॥ ४ ॥

---

३२१. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

पूर्ण कृपा झाली । श्रीगुरुची ॥ ध्रु० ॥
तरसिल आतां भवार्णवीं या । सार्थकता घडली ॥ १ ॥
आनंदाला सीमा नाहीं । उत्कंठा पुरली ॥ २ ॥
भाग्यपूर्णता सकल उदेली । पुण्यें तव फळलीं ॥ ३ ॥
सर्वत्र विजयी होसी बाळा । गुरुमूर्ती वदली ॥ ४ ॥

---

३२२. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

श्रीगुरुला सेवा । नर हो ॥ ध्रु० ॥
साध्यसाधनात्मक त्या जाणुनि । मति तेथें रमवा ॥ १ ॥
सर्व लालसा पुरवुनि देईल । निजसुख-रस-मेवा ॥ २ ॥
अखंड स्मरतां प्रगटपणें तो । दाविल निजभावा ॥ ३ ॥
गुरुपरिचर्या फळली रजका । प्रबंध तो गावा ॥ ४ ॥
विनायक कथी मी अनुभवितों । गुरु-प्रसाद बरवा ॥ ५ ॥

---



श्री. विनायक वासुदेव साठे

३२३. पद ( चाल — मज गमे ऐसा जनक० )

गुरु-पदीं होईं लीन रे । हाच पथ रे ।। ध्रु० ।।
इहपर सौख्याब्धितें पावसी । विजय-श्रीतें नित्य जिंकिसी ।
मंगलात्मा होउनि राहसी । परमात्मा तूं खचित बनशि रे ।। १ ।।
अचिंत्य अगम्य अलभ्य नाहीं । अतर्क्य अलंघ्य तुजला कांहीं ।
सर्व सामर्थ्य लभतें पाहीं । देणें गुरुचें अतुल जाण रे ।। २ ।।

---

३२४. पद ( चाल — स्मरतां नित्य हरी० )

गुरुचरित्र गाईं । तेणें बोध तुला होई ।। ध्रु० ।।
कवण्या मार्गें जावें हें तुज । स्पष्ट कळुन येई ।। १ ।।
आचाराची दिशा समजेल । भ्रम मनिंचा जाई ।। २ ।।
अनेक कार्यां गुरुहि अनेक । फोड करुनि घेईं ।। ३ ।।
सद्गुरु केंवीं त्वां ओळखावा । ज्ञान तेंच देई ।। ४ ।।
संशय सारे जे त्वन्मनिंचे । सकल लया नेई ।। ५ ।।
म्हणे विनायक तुझें तुजलागीं । उमगे निज ठाईं ।। ६ ।।

---

३२५. पद ( चाल — मज गमे ऐसा जनक० )

गुरु-कृपा आहे तुजवरी । निश्चयो हा ।। ध्रु० ।।
उपासना तव सिद्ध होउनी । भक्ति-भावना दृढ उपजोनी ।
दर्शन-लाहो तुला घडोनी । तृप्त होशिल तूं अंतरीं ।। १ ।।
गुरुचरिताला वर्णायासीं । देइल अलौकिक स्फूर्तीसीं ।
पावसि भजनीं समाधीसीं । दत्त-भाव ये निर्धारीं ।। २ ।।

उत्सवरूप तूं खचित बनोनी । इच्छेसम ये सर्व घडोनी ।
साक्षात्कारें प्रभु प्रगटोनी । करितिल निर्भर साचारीं ॥ ३ ॥
सत्यत्व होय मनोरथांसीं । सिद्धत्व तेंवीं तव वाणीसीं ।
यथार्थत्व तव संकल्पांसीं । मंगल थटेल विस्तारीं ॥ ४ ॥

---

३२६. पद ( चाल—या नव नवल नयनोत्सवा० )

गा गुरु-गुरुक-गुरु-लाघवा । गुरुता गुरुची
गुरुतम तूं जाणुनि, घे गुरु-गुरु-यश मेवा ॥ ध्रु० ॥
गुरुकारें गुरु तुष्ट करोनी । गुरु-कृपा सेवोनी ।
गुरु-वृत्ति त्वां अंगिकारोनी । गुरु-बोध मेळवावा ॥ १ ॥

३२७. पद ( धुमाळी )

गुरुरति वृथा न कधिं होई ॥ ध्रु० ॥
निश्चय बाणो तव हा चित्ता । गुरुदीक्षा घेईं ॥ १ ॥
कल्याणाचा मार्ग सुखाचा । गुरुमहिमा गाईं ॥ २ ॥
निशिदिनिं गुरुसीं निजहृदयीं तूं । निर्भर तरि ध्याईं ॥ ३ ॥
इच्छित सर्वहि प्राप्त होउनी । दुःख लया नेई ॥ ४ ।
म्हणे विनायक रक्षी श्रीगुरु । शरण तया जाईं ॥ ५ ॥

---

३२८. पद ( चाल—अरसिक किति हा शेला० )

सेवावें सद्गुरुला । पावावें त्वां मग सकलार्थाला ॥ ध्रु० ॥
गमेल अवघड तुजला । प्रथमारंभिं जरी धरिं धैर्याला ॥ १ ॥
सेवा-काम जो वरिला । तोच कृपेनें नेइल सिद्धिला ॥ २ ॥

न भजें निंदास्तुतिला । शक्याशक्यतेच्या विचाराला ॥ ३ ॥
त्याच्या सामर्थ्याला । बाध न कोठें सेव निश्चयाला ॥ ४ ॥
त्यजुनी देहममतेला । रणयोद्ध्यासम झट सेवायाला ॥ ५ ॥
विसरुनि सुखदुःखाला । साध हें वदे गुरु विनायकाला ॥ ६ ॥

---

३२९. पद ( धुमाळी )

श्रीगुरुपदांस विनवूं या ॥ ध्रु० ॥
श्रद्धा पावो दृढता धर्मीं । कुमति न शिवो स्वजन मति या ॥ १ ॥
अनाचार-रति अल्पहि नुपजो । न झगटो कुविचार हृदया ॥ २ ॥
धर्मकारणीं असुची व्हावी । हुत सर्वस्वासह काया ॥ ३ ॥
घडे अधर्मँ अर्थसिद्धि जरी । तुच्छतेनें गमो वायां ॥ ४ ॥
शासनदंड स्थानिं असो या । उद्यत सदा अत्रितनया ॥ ५ ॥
विनायकाला साधुसंगती । लाभो अखंड गुरुराया ॥ ६ ॥

---

३३०. पद ( चाल – खचित उगिच भय दावी मजला० )

विमल हृदय जरि अर्पिसि गुरुला ।
येइल गुरुता सत्वर तुजला ॥ ध्रु० ॥
स्वीय लभवुनी तुज विभवाला । स्वरुपीं मिळविल तुज प्रणताला ।
कवण वर्णिल तव भाग्याला ॥ १ ॥
यास्तव याच धरीं मार्गाला । नको संशय वरिं निश्चयाला ।
आला अनुभव विनायकाला ॥ २ ॥

---

उत्सवरूप तूं खचित बनोनी । इच्छेसम ये सर्व घडोनी ।
साक्षात्कारें प्रभु प्रगटोनी । करितिल निर्भर साचारीं ॥ ३ ॥
सत्यत्व होय मनोरथांसीं । सिद्धत्व तेंवीं तव वाणीसीं ।
यथार्थत्व तव संकल्पांसीं । मंगल थटेल विस्तारीं ॥ ४ ॥

---

### ३२६. पद ( चाल—या नव नवल नयनोत्सवा० )

गा गुरु-गुरुक-गुरु-लाघवा । गुरुता गुरुची
गुरुतम तूं जाणुनि, घे गुरु-गुरु-यश मेवा ॥ ध्रु० ॥
गुरुकारें गुरु तुष्ट करोनी । गुरु-क्रमा सेवोनी ।
गुरु-वृत्ति त्वां अंगिकारोनी । गुरु-बोध मेळवावा ॥ १ ॥

---

### ३२७. पद ( धुमाळी )

गुरुरति वृथा न कधिं होई ॥ ध्रु० ॥
निश्चय बाणो तव हा चित्ता । गुरुदीक्षा घेईं ॥ १ ॥
कल्याणाचा मार्ग सुखाचा । गुरुमहिमा गाईं ॥ २ ॥
निशिदिनिं गुरुसीं निजहृदयीं तूं । निर्भर तरि ध्याईं ॥ ३ ॥
इच्छित सर्वहि प्राप्त होउनी । दुःख लया नेई ॥ ४ ।
म्हणे विनायक रक्षी श्रीगुरु । शरण तया जाईं ॥ ५ ॥

---

### ३२८. पद ( चाल—अरसिक किति हा शेला० )

सेवावें सद्गुरुला । पावावें त्वां मग सकलार्थाला ॥ ध्रु० ॥
गमेल अवघड तुजला । प्रथमारंभिं जरी धरिं धैर्याला ॥ १ ॥
सेवा-काम जो वरिला । तोच कृपेनें नेइल सिद्धिला ॥ २ ॥

न भजें निंदास्तुतिला । शक्याशक्यतेच्या विचाराला ॥ ३ ॥
त्याच्या सामर्थ्याला । बाध न कोठें सेव निश्चयाला ॥ ४ ॥
त्यजुनी देहममतेला । रणयोद्ध्यासम झट सेवायाला ॥ ५ ॥
विसरुनि सुखदुःखाला । साध हें वदे गुरु विनायकाला ॥ ६ ॥

---

३२९. पद ( धुमाळी )

श्रीगुरुपदांस विनवूं या ॥ ध्रु० ॥
श्रद्धा पावो दृढता धर्मीं । कुमति न शिवो स्वजन मति या ॥ १ ॥
अनाचार-रति अल्पहि नुपजो । न झगटो कुविचार हृदया ॥ २ ॥
धर्मकारणीं अमुची व्हावी । हुत सर्वस्वासह काया ॥ ३ ॥
घडे अधर्में अर्थसिद्धि जरी । तुच्छतेनें गमो वायां ॥ ४ ॥
शासनदंड स्थानिं असो या । उद्यत सदा अत्रितनया ॥ ५ ॥
विनायकाला साधुसंगती । लाभो अखंड गुरुराया ॥ ६ ॥

---

३३०. पद ( चाल — खचित उगिच भय दावी मजला० )

विमल हृदय जरि अर्पिसि गुरुला ।
येइल गुरुता सत्वर तुजला ॥ ध्रु० ॥
स्वीय लभवुनी तुज विभवाला । स्वरुपीं मिळविल तुज प्रणताला ।
कवण वर्णिल तव भाग्याला ॥ १ ॥
यास्तव याच धरीं मार्गाला । नको संशय वरिं निश्चयाला ।
आला अनुभव विनायकाला ॥ २ ॥

---

३३१. पद ( चाल—करिन यदुमनीं सदना० )

वरिन गुरुपदां विनयें, । रमविन मन समरस उपायें ॥ ध्रु० ॥
बनविन लोलुप रसभर तया ये, तयें तेथचि धाये ॥ १ ॥

---

३३२. पद ( चाल—मधुवदना सखिच्या० )

गुरुरतिला धरुनी, तन्मयी वृत्तिला बनवुनी, ऐक्यता साधीं ।
नित्य स्मरें स्वरूप मनीं । शांति लभसी लया पवुनी ।
प्रेम भरे, चित्त धरी तृप्तिला ॥ १ ॥

---

३३३. पद ( चाल—मुरली के धून० )

गुरुचे कीर्तीस वदूं, मधु-मधुर
ललित गाऊं गुणवृंद चित्तहर ॥ ध्रु० ॥
दंग बनोनी रस सुंदर उठवुं
डुलवुं जगा, तरल त्या बनवुनीयां
कानीं भरूं यश साधुं समरसता
रंग करूं लय पावुं तनु-विसर ॥ १ ॥

---

३३४. पद ( चाल—करिन यदुमनीं सदना० )

भजक परि-नटें गुरुचा । द्रुत लभशिल अनुभव कृपेचा ॥ ध्रु० ॥
सुखमय होशिल अधिप निखिलाचा विजेता करणांचा ॥ १ ॥

---

३३५. पद ( चाल – करिन यदुमनीं सदना० )

धरुनि गुरुरतीस मनें, । परिजन बन, वद यश रवानें ।। ध्रु० ।।
लय वर, तेथ डुलत प्रियपणानें वसें नित्य सुखानें ।। १ ।।

३३६. पद ( चाल – अजुनि खुळा हा नाद० )

अजुनि कसा प्रारब्धभोग किमपि क्षीण होइना ।। ध्रु० ।।
कष्ट भोगिले देहीं बहुपरि कां अजुनी सोडिना ।। १ ।।
सेवन केलें गुरुचरणांचें, फळा कां येइना ।। २ ।।
जन्माचें हें कोडें माझ्या उमज कुणी पाडिना ।। ३ ।।
धर्म, गुरु आणि देव यांतुनी उभा कुणी राहिना ।। ४ ।।
सत्त्व-परीक्षा माझी कसली कुणि मनीं आणिना ।। ५ ।।
उपासना कशि व्यर्थ जाहली कुणी मार्ग दाविना ।। ६ ।।
चुकतें माझें कुठें कसें ती समज कुणी घालिना ।। ७ ।।
सत्ता कैशी या स्थानाची देव मुळीं स्थापिना ।। ८ ।।
दृढासनीं मज वासुदेव कां भजनार्थ गोंविना ।। ९ ।।
विनायकाला दर्शन सद्गुरु कां अजुनी देइना ।। १० ।।

३३७. पद ( चाल – बोल होईल फोल० )

बोल बोलोनि डोल । प्रेमभरानें ।
मनिं यावा गहिंवर दाटुनियां, । बन ईशचरणीं लोल ।। १ ।।
गुरुभक्ति दृढ वर आदरानें, । तर हा भवसिंधु खोल ।। २ ।।
जरि होती गुरु वश सेवनानें, । मग विनायका न मोल ।। ३ ।।

३३८. पद ( चाल – नवरंगि रंगलेला० )

गुरु-कीर्ति गावयाला भर थोर प्रीतिला आला ॥
दाटोनि प्रेम याला उत्सुक होउनी ठेला ॥
भुलला रसीं मिळाला बुडला तयीं गमेला
अभिजात भाव, वाटे, उदेला, विरुनी तयांत गेला ॥

---

३३९. पद ( चाल – बँडची )

गुरुयशवर्णन साधूं या ।
भजनीं समरस होऊं या ॥
जयजयकारा गर्जूं या
रसभर उमोप पावूं या ॥
नृत्तीं बेहोष रंगूं या ॥ १ ॥

---

## ( ११ ) श्रीस्थान

३४०. पद ( चाल – वैशाखमासीं० )

लोकसंग्रहार्थ स्थान प्रगट हें करीं । तेज येथ प्रखर वसो दिव्य निरंतरीं ॥ ध्रु० ॥ धर्म कर्म नीति सदाचार उपासना । अग्नि पंच दीप्त-शिखा भक्तिभावना । श्रद्धा-हुति-हवन अग्नि-होत्र कल्पना । सिद्ध करुनि यज्ञ इथें नाथ आचरीं ॥ १ ॥ यज्ञपुरुष तूंच स्वयें तुष्ट होउनी । अखंड मूर्त-स्वरुपीं निज येथ राहुनी । सद्वृत्तां अर्थसिद्धि-पायस देउनी । भजकांचा विजय नित्य घडविं श्रीहरी

॥ २ ॥ श्रौत-स्मार्तविध्यनुष्ठान प्रवर्तवावया । वेदमार्ग त्यजिती नष्ट दंडण्यां तयां । श्रुति-विहिताचार-दक्ष अनुग्रहावया । उद्यतशस्त्र शीघ्र वरद सन्मुख हो तरी ॥ ३ ॥ सकलतीर्थ-क्षेत्र-पर्व-माहात्म्य प्रगटवीं । योग-तपो-व्रत-ध्यान-वीर्य विकासवीं । दैत्य-दलन-दर्प-हरण-प्रताप प्रकाशवीं । उत्कर्ष असा साधवीत स्थानिं संचरीं ॥ ४ ॥

---

३४१. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

यश-परिमल विहरो । स्थानीं या ॥ ध्रु० ॥
भरुनि आमुच्या अंतःकरणीं । विश्वीं या पसरो ॥ १ ॥
प्रसादवातें सुसमीरित तो । अप्रतिहत विचरो ॥ २ ॥
अभेद्य दुर्गम गहन स्थळींही । अकुंठित संचरो ॥ ३ ॥
विनायकाचा सुगंधित तेणें । आत्मा शुभ वितरो ॥ ४ ॥

---

३४२. पद ( चाल—या नव नवल नयनोत्सवा० )

मापति तव चरित-कौतुका । प्रगटीं अमृत
तें जनि-मरण-हरणका, मोक्षचि केवळ लोकां ॥ ध्रु० ॥
या स्थानाची विजयपताका फडको त्रिभुवनशिखरीं ।
वैरी भस्मचि होउनि तेजें पावो तो कलि धाका ॥ १ ॥

---

३४३. पद ( चाल—पंचतुंड नररुंड० )

स्थान तुझें हें विजयी व्हाया साक्षात्कारा मागतसों ।
लक्ष्मीसह घे प्रगटपणातें येथें ऐसें प्रार्थितसों ॥ ध्रु० ॥
स्थिरासन हें बनवुनी येथें स्थापी सत्ता इच्छितसों ।
भजनोत्कर्षा साधुनि स्फुरवीं आनंद-प्रत्यय वदतसों ॥ १ ॥

शत्रुनाश उपशम रोगांचा जय भक्तांचा येथ असो ।
परिभव मृत्यु हानि आम्हांला त्वत्कृपेनें कदा नसो ॥ २ ॥
जयजयकारें नित्य गर्जना त्वन्नामाची येथ वसो ।
कथाकीर्तनीं रंग खुलावा जयघोष असा याचितसों ॥ ३ ॥
उपकरणांचें दृढानुकूल्य उपासनेस्तव चिंतितसों ।
सहाय व्हावा कालहि आम्हां दुष्टनिबर्हण वांछितसों ॥ ४ ॥

---

३४४. पद ( चाल – शंभो शिवहर० )

स्थानीं अवतर योगिराजवर सद्येशा धर्मग्लानिहर ॥ ध्रु० ॥
उपासानापथ स्पष्ट करीं
निजभक्तहृदयवासी गुरुवर स्वजनपापहर ॥ १ ॥
येथें शासन निज स्थापीं
धर्मदंड तव प्रगटो प्रभुवर कुमति-ध्वंस-पर ॥ २ ॥

---

३४५. पद ( चाल – पंचतुंड नररुंड० )

सर्वांठायीं पूर्ण असोनी स्थानविशेषीं गोचरता ।
तत्त्व जाणुनी हें या स्थानीं वंदन करितों भगवंता ॥ ध्रु० ॥
अनुभव येथें नित्य अम्हांला काम्य पुरविसी अवधूता ।
धरुनी अमुच्या अभिमानासी येउं न देसी मुळिं लघुता ॥ १ ॥
जें न चिंतिलें अज्ञानानें मंगल होसी साधविता ।
अकल्पित अम्हां लाभ घडविसी तुजसम नाहीं कुणि दाता ॥ २ ॥

साक्षात्कारें प्रगट होउनी हरिसी अशुची उपहास्यता ।
नासुनि विघ्नें गुप्तपणानें करिसी कार्यां सुसिद्धता ॥ ३ ॥
सकल पूर्णता उभारवोनी दाविसी निज प्रत्यक्षता ।
यास्तव चरणीं लीन होउनी व्हावी म्हणतों प्रसन्नता ॥ ४ ॥

---

३४६. पद ( चाल — असाचि धांवत येई० )

अपार वैभव ठेविं स्थानिं या । होय विलोभन विश्ववासियां ॥ ध्रु० ॥
समुदित-विधुसें सुधेस प्रसवो जनचित्ता अतिलोल बनवो
गाढ मोहवो ध्यान-योगियां ॥ १ ॥

---

३४७. पद ( चाल — पंचतुंड नररुंड० )

साक्षात्कारें प्रगटुनि येथें निज-तनु-दर्शन घडवीलें ।
क्षण एक वासुदेवा श्रीगुरु मजला स्थानीं या वहिलें ॥ ध्रु० ॥
प्रकाशदिन तो असे पातला वार्षिक उत्सवकार्य भलें ।
प्राप्त जाहलें तें तरि प्रभुजी पाहिजे कीं सिद्ध झालें ॥ १ ॥
समाधि गरुडेश्वरीं घेतली प्रकटीकरण इथें केलें ।
दिनहि तोच कीं क्षणहि तोच कीं दृश्य आपणां बनवीलें ॥ २ ॥
जन्मकाल तो आम्ही तुमचा या ठायींचा निश्चयिलें ।
म्हणुनि कार्य हें मंगल तुमचें देवा आहे योजियलें ॥ ३ ॥
भजनपूजनीं भर येवोनी प्रेम गमावें विकासलें ।
आनंदात्मक सर्व होउनी विश्व दिसावें तयिं मुरलें ॥ ४ ॥

---

३४८. पद ( चाल—शंभो शिवहर० )

स्थानीं प्रकटुनि संचरोनि निजजन-चित्तीं, कार्य सिद्ध कर ॥ ध्रु० ॥

नृत्ता वर्तव भक्तनरीं,

वदवीं निजभजनासीं सुखवुनि दासां, प्रभुवर ॥ १ ॥

उल्हास घडो सकलांसीं,

सद्गुरुनायक, अघमलहर बन, धवलकीर्तिवर ॥ २ ॥

---

३४९. ओंवी

कार्य आहे हें श्रीदत्ताचें । त्याच्या फार आवडीचें ।
ऐसें निर्धारोनी साचें । वागावें भक्तजनीं ॥ १ ॥
प्रत्यक्ष येथें आहेत । ऐसा भाव हृदयांत ।
ठेवणें नित्य जागृत । आवश्यक सकळांसीं ॥ २ ॥
स्वार्थासी मारोनी लाथ । सेवावा प्रभु समर्थ ।
खचित सकल अर्थ । सिद्धतेला आणील ॥ ३ ॥
स्वयें भगवान दत्त । आपणां करील प्रत्त ।
प्रसन्न तुमचें चित्त । बनवील निर्धारें ॥ ४ ॥

---

३५०. पद ( चाल—पांडुरंग भेटी वैष्णव निघाले० )

लक्ष्मीसह येथें वास श्रीदत्ताचा । ऐसा निर्धाराचा भाव ठेवा ॥ १ ॥
येथें प्रेमाचेंच मुख्य असे काज । करायाचें चोज प्रभूचेंच ॥ २ ॥
किति उपकृत केलें आपणांसीं । तें निजवाचेसीं बोलायाचें ॥ ३ ॥
विनायक म्हणे सकल ममता । तया भगवंता समर्पिणें ॥ ४ ॥

---

३५१. पद ( चाल—तुम मत जाव मुरारी० )

जेथें शुद्ध भाव तेथें कृपा करी । नित्य त्याचेवरी वोळतसे ॥ १ ॥
सोडीना तयासीं चिकटोनी राहे । चिंता त्याची वाहे निजशिरीं ॥२॥
आईबाप धनी गुरु यजमान । बने दयाघन स्वकीयांसी ॥ ३ ॥
विनायक म्हणे अर्पावें आपणां । तया नारायणा सर्वस्वेंसी ॥ ४ ॥

३५२. दिंडी

वास दत्ताचा येथ असे खास ।
धरूनि चित्तीं या युक्त विचारास ।
करा भजनाला परम लीनतेनें ।
गाढ हृदयींच्या प्रेमभावनेनें ॥ १ ॥

३५३. दिंडी

सकल अर्थातें सिद्ध करिल देव ।
तुम्हां दाविल तो स्वीय प्रकटभाव ।
भजा प्रेमानें आपणांस अर्पा ।
अहंभावाच्या त्यागुनियां दर्पा ॥ १ ॥

३५४. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

देव इथें नटला । रुचिर किती ॥ ध्रु० ॥
समृद्धीतें घेउनि आला । कल्पशाल थटला ॥ १ ॥
उभारुनी कृपाछत्र तापा । ये शमवायाला ॥ २ ॥
म्हणे विनायक सेवुनि त्यासीं । पावा सौख्याला ॥ ३ ॥

### ३५५. अंजनीगीत

दैन्यदारिद्र्या हराया । अभ्युदय साधवाया ।
कामनांतें पुरवाया । प्रकट गमे दत्त ॥ १ ॥
स्थानीं तेज प्रकाशत । नेत्रां आमोदातें देत ।
देहीं शान्ति आकारीत । वाटत आमुचीया ॥ २ ॥
मना प्रसन्नता येत । क्रीडे रस हृदयांत ।
प्रेममय बनवीत । आम्हां कारुण्यसिंधु ॥ ३ ॥
समरसतेतें आणी । आम्हांमध्यें चक्रपाणी ।
द्वैत समूळत्वें खणी । वत्सल आत्माराम ॥ ४ ॥

---

### ३५६. पद ( चाल—दर्यावरि नाच करी० )—छकडा

येथें दिसे दत्तात्रेय । मूर्तिमंत कृपामय ॥
किति वाटतो सुखाचा । गाभा गमे आनंदाचा ॥
पाप ताप दैन्य दोष । करित वाटे निःशेष ॥
शुभ बनवी वासना । साधी कुतर्क-शमना ॥
चित्ता होऊं नेदी क्षोभ । येथें मुळीं पद्मनाभ ॥
ऐसा भाव आदरावा । देव येथिंचा लुटावा ॥

---

### ३५७. पद ( चाल—शैवालें युक्त जैसें० )

दत्तांचा वास येथें स्थानीं या चिंतुनी ।
भजकांनीं सेवणें त्या मनोभावा अर्पुनी ।
मनोरथ मांगल्याचे सिद्ध बनती जाणुनी ।
निश्चयानें भजणें त्या शंकांतें सांडुनी ॥ १ ॥

---

३५८. पद ( चाल— करिन यदुमनीं सदना० )

विमल निजमना करुनी । प्रभु-यश-कवन-रतिस धरोनी ॥ ध्रु० ॥
ललितगुणीं मधुकरसम बनोनी । रसा घेइं लुटोनी ॥ १ ॥

३५९. पद ( चाल—प्रीति जी दुजावरी० )

येथें दत्त नित्य असती । भावासम अनुभव देती । भजक हो ॥ ध्रु० ॥
धरुनि ऐशा निश्चयाला । भजा भजा गुरुमूर्तीला । भजक हो ॥
कार्यामाजी व्हा प्रविष्ट । चुकेल खचित सर्व अनिष्ट । भजक हो ॥
( चाल ) ऐक्यता । मनिं उभारतां । येइ शुद्धता ।
गळुनी अहंता । विकार सारे मावळती ॥ भजक हो ॥ १ ॥

३६०. पद ( चाल—अंध पंगु० )

श्रीदत्तांचा वास इथें हें रहस्य जाणोनी ।
भजा भजक हो स्थानासीं या प्रेमातें धरुनी ॥ ध्रु० ॥
देतिल तुम्हां दर्शन खचितचि शुद्धभाव बनतां ।
यास्तव त्यागा द्वैतभावना जोडुनि समरसता ॥ १ ॥
अहंता-बीज खणुनी काढा आग्रहास सोडा ।
लीन भावना वरुनी सेवा सख्यातें जोडा ॥ २ ॥
भक्तीपाशीं देव नांदतो ओळखोनी तत्त्वा ।
लीला त्याच्या गावा चित्तीं जाणुनी महत्त्वा ॥ ३ ॥
कोण्याठायीं कशापरी तो धांवुनियां आला ।
रक्षण तुमचें कैसें केलें वर्णा वृत्ताला ॥ ४ ॥

कृतज्ञतेनें स्मरतां त्यासीं होय तुम्हां विकला ।
पुरविल तुमच्या शुभहेतूंनां धरा निश्चयाला ।। ५ ।।
द्वेषमत्सरां समग्र टाका तत्कार्यीं मिसळा ।
दूर सारुनी स्वार्थालागीं दयामेघ कवळा ।। ६ ।।
क्षेत्रा तुमच्या पिकवुनि भाग्या आणिल वृद्धीतें ।
कल्याणाचा मार्ग असे हा वितरिल सद्गतितें ।। ७ ।।

---

## ( १२ ) भक्ति

### वंदन-भक्ति

३६१. पद ( चाल—बीज पेरावें० )

विश्व वंदावें । सर्व दत्तमय पाहावें ।। ध्रु० ।।
स्थूलसूक्ष्मादिक तोची नटला । प्रगट करोनी निजमायेला ।
दावितसे द्वैताभासाला । स्वरुप उमजावें ।। १ ।।
अत्ता तैसा अन्नहि बनला । सूर्यचंद्रहि आपणचि झाला ।
अयनात्मक कालात्मा सजला । गुह्य जाणावें ।। २ ।।
मूर्त अमूर्तहि जें जें कांहीं । ब्रह्मांडीं या भरलें पाहीं ।
वस्तुजात तो घडुनी राही । तत्त्व समजावें ।। ३ ।।
प्रणामभक्ति त्या अलर्काची । आणोनी तूं चित्तीं साची ।
ओळख पटवीं श्रीदत्ताची । सकलां नमावें ।। ४ ।।

---

## स्मरण-भक्ति

३६२. पद ( चाल—बीज पेरावें० )

गुरुला स्मरावें । प्रापंचीं मग वर्तावें ॥ ध्रु० ॥

कर्मसाधनीं श्रीदत्तासी । आठवोनी सावधानेंसीं ।
अवमानोनी शुभाशुभांसी । विरक्त असावें ॥ १ ॥

दास्यत्व करी बन्धकि पतिचें । परि मन जारीं वसे तियेचें ।
सेवन घडतां संसाराचें । मन न रमवावें ॥ २ ॥

भोग भोगितां स्मरण न सांडीं । मोहपाश उकलुनी तोडीं ।
प्रसाद भगवंताचा जोडीं । दत्तगुण गावे ॥ ३ ॥

कृतवीर्याचा प्रियसुत भ्याला । प्रजाशासन शिरिं घ्यायाला ।
गर्गें तेव्हां उपदेशीला । दत्तपर व्हावें ॥ ४ ॥

दत्तकृपेनें चित्त विरालें । तेव्हांपासुनी स्मरण जडलें ।
अभ्यासें त्या मूर्त लाभलें । तथ्य जाणावें ॥ ५ ॥

स्मरण करितां कार्तवीर्याचें । लाभ घडती नष्टवस्तूंचे ।
माहात्म्य हें स्मरणभक्तिचें । मनिं ठसवावें ॥ ६ ॥

---

## दास्य-भक्ति

३६३. पद ( चाल—बीज पेरावें० )

दास्य जोडावें । दत्ताचा अनुचर व्हावें ॥ ध्रु० ॥

योगक्षेमासाठीं होती । श्रीमंताचे सेवक जगतीं ।
अनुचित येथें ऐशी रीति । निरिच्छ असावें ॥ १ ॥

सेवक झाले जे देवाचे । इहपर निष्कामचि ते साचे ।
भृत्य न होती ते पोटाचे । मर्म जाणावें ।। २ ।।
चाड न धरुनी अपवादांची । सांड करोनी लौकिकाची ।
तैशी मानापमान यांची । सेवन करावें ।। ३ ।।
क्षुधातृषादि कांहीं न जाणीं । विश्रांतीही मनिं नच आणीं ।
गृहधनादिक अर्पुनि चरणीं । प्रभुपद वरावें ।। ४ ।।
दास्य आयुराजानें केलें । थोरपण निज मनीं नाणीलें ।
उपहासादि सर्व साहिलें । यश तें स्मरावें ।। ५ ।।

---

## सख्य-भक्ति

### ३६४. पद ( चाल—बीज पेरावें० )

सख्य बांधावें । सगुणीं निर्गुण लक्षावें ।। ध्रु० ।।
जीवशिवांची परम सख्यता । हृदयाकाशीं श्रुतिविख्याता ।
साक्षात्कारें ती अनुभवितां । दक्ष राहावें ।। १ ।।
कर्मफलासी एक उपभोगी । दुजा न होई तेथें संगी ।
परि तो सख्यत्वासि न भंगी । प्रियपण पहावें ।। २ ।।
कधिं न विसंबे जो जीवाला । नाना देहीं सहचर झाला ।
जोडी प्रेमें त्या श्रेष्ठाला । कृतघ्न न व्हावें ।। ३ ।।
तुज न गमावें त्यावांचोनी । जिवलगा त्या चित्त वाहोनी ।
निरपेक्ष आणि शुद्ध बनोनी । प्रेम अर्पावें ।। ४ ।।
क्षत्रियांतक जो भार्गवराम । श्रीदत्ताचा भक्तवरोत्तम ।
सख्यभक्ति हे त्याची अनुपम । महिमान गावें ।। ५ ।।

---

## सेवन-भक्ति

### ३६५. पद ( चाल—बीज पेरावें० )

चरण सेवावे । गुरुपदीं चित्त रमवावें ॥ ध्रु० ॥
ठेवुनि सदैव चरणीं माथा । तया भजावें श्रीगुरुनाथा ।
उपजेल करुणा त्या समर्था । रहस्य ठसावें ॥ १ ॥
पदरेणू जे भगवंताचे । शिरीं वन्दितां स्नेहें साचे ।
चुंबन घेतां पदचिन्हांचें । तेथ लोळावें ॥ २ ॥
सेवनिं जडतां दृढ अभिलाष । विसरे जेव्हां विषय निःशेष ।
हृदीं दाटतां परम संतोष । प्रेम लोटावें ॥ ३ ॥
वज्रांकुशध्वजपद्मांकित जीं । चरणपंकजें हृदयसरोजीं ।
आठवोनी आदरें पूजीं । आसक्त व्हावें ॥ ४ ॥
विष्णुदत्त तो धन्य जाहला । सेवन-भक्ति करुनी तरला ।
ऐकुनियां या इतिहासाला । उपासक व्हावें ॥ ५ ॥

---

## अर्चन-भक्ति

### ३६६. पद ( चाल—बीज पेरावें० )

अर्चा धरावी । दत्तकृपा संपादावी ॥ ध्रु० ॥
प्रतिमापूजन करणें सादर । समर्पोनी नाना उपचार ।
पाहुनि डोळां सकळ शृंगार । मूर्ति ती ध्यावी ॥ १ ॥
अखंड पूजन त्वां साधावें । त्रिकाळ तरि तें मुख्य घडावें ।
चित्त सदा अनुरक्त असावें । दृढता वरावी ॥ २ ॥

हृदयपद्म तव प्रफुल्ल व्हावें । प्रेमपरागीं चित्त भरावें ।
अनुरागभरें रंगुनि जावें । वृत्ति न उठावी ॥ ३ ॥
एकाग्रत्वें ध्यान धरावें । यथेष्ट पूजन मग कल्पावें ।
दिव्य देवा भोग अर्पावे । कीर्ति वर्णावी ॥ ४ ॥
आवडे वस्तु जी आपुल्याला । करी निवेदन ती देवाला ।
लांचावोनी प्रेमरसाला । लाज सांडावी ॥ ५ ॥
अर्चनभक्ति यदुरायाची । ओळख पटतां अवधूताची ।
विश्वरूपा प्रमुदित अर्ची । ख्याति वानावी ॥ ६ ॥

---

## कीर्तन-भक्ति

### ३६७. पद ( चाल—बीज पेरावें० )

विलज्ज बनावें । गुरुकीर्तन नित्य करावें ॥ ध्रु० ॥
जन्मकर्में दिव्य दत्ताचीं । मूर्त प्रतीकें प्रेमरसाचीं ।
मुक्तकंठ त्वां गाउनि साचीं । भवासि तरावें ॥ १ ॥
भगवल्लीला चित्तीं स्मरुनी । अनुरागानें बद्ध होउनी ।
भावार्थसार ग्रहण करोनी । चरित वर्णावें ॥ २ ॥
नित्यमुक्त परि भक्तांसाठी । जन्मादि दावी जगजेठी ।
धांवत येतो प्रेमापाठीं । वात्सल्य गावें ॥ ३ ॥
कंठ भरोनी यावा गातां । नेत्रीं उपजो प्रेमाश्रुसरिता ।
पुलकांकित तनु गहिंवर येतां । रसीं मिसळावें ॥ ४ ॥
निजदासांचा होउनि किंकर । कार्यें करितां श्रमे अनिवार ।
उभा पाठिसी करुणासागर । त्या आळवावें ॥ ५ ॥

वेदधर्म-मुनि किर्ती गाई । चरित्र वदतां समरस होई ।
कीर्तनभक्ति त्याची घेई । तत्तुल्य व्हावें ॥ ६ ॥

---

## श्रवण-भक्ति

३६८. पद ( चाल—बीज पेरावें० )

चित्त लावावें । दत्तमाहात्म्य परिसावें ॥ ध्रु० ॥
कथामृतपानीं त्रिकरणाची । साधी समरसता दृढतेची ।
जोड देउनी सत्प्रेमाची । एकाग्र व्हावें ॥ १ ॥
श्रवण बोलती द्वार मुक्तीचें । साधन सुलभ वस्तुज्ञानाचें ।
मूर्त समाधिरूप हें साचें । सुख अनुभवावें ॥ २ ॥
कानीं पडतां भगवत्कीर्ति । करणें अंतर्मुखता धरिती ।
सहजें चित्तीं विलीन होती । प्रेमा दुणावे ॥ ३ ॥
विषय इंद्रियां भगवंताचा । लाभे श्रवणें परम रसाचा ।
उदय सात्त्विक अष्टभावांचा । वृत्ति लय पावे ॥ ४ ॥
भक्ति जोडे परमेशाची । विरक्ति बाणे विषयसुखाची ।
होय जाणीव सत्स्वरूपाची । श्रवण साधावें ॥ ५ ॥
दीपकें श्रवणभक्ति केली । जीवन्मुक्तता त्या लाभली ।
साक्षात्कारें पूर्ण प्रगटली । यशामृत प्यावें ॥ ६ ॥

---

## आत्मनिवेदन-भक्ति

### ३६९. पद (चाल—बीज पेरावें०)

गुरुचरण ध्यावे। गुरुसीं सकल निवेदावें॥ ध्रु०॥
देह तयाचा धनहि तयाचें। पुत्र कलत्र निखिल तयाचे।
कांहीं नोहे अपुलें साचें। सर्व अर्पावें॥ १॥
साक्षी आत्माराम अवधूत। त्रिभुवन त्याच्या धाकें वर्तत।
ज्ञानदृष्टिनें मुनि विलोकित। द्वैत सांडावें॥ २॥
ममत्व त्यागुनि परिवाराचें। गोधनादि क्षेत्रसदनाचें।
मित्रबांधवादिक सकलांचें। निर्मम बनावें॥ ३॥
जें जें कांहीं अपुलें म्हणसी। जें जें घडतें तव देहासी।
सकल अर्पुनी तुवां तयासी। मुक्त विचरावें॥ ४॥
इच्छा जाणुनि प्रभु दत्ताची। निःसंगत्वें प्रापंचाची।
सेवा जडतां तुजला साची। बद्धत्व नसावें॥ ५॥
वासुदेवगुरु दत्तात्रेय। निजशुभाचारें दाविति सोय।
आम्हीं धरिले त्यांचे पाय। ज्ञान लाभावें॥ ६॥

---

### ३७०. पद (चाल—पार्थी तुज देउनि०)

आदरीं भक्तिमार्गाला। उपाय हा सुलभ मुक्तिला॥ ध्रु०॥
ईश्वराठायीं अनुरक्तता। तदनुस्मरणें चित्तीं जडतां।
शांडिल्याला परमसंमता। भक्ति घडे तुजला॥ १॥
ईश्वरीं अर्पी अखिलाचार। स्मरणीं दृढता धरिं निरंतर।
नारद बोले तर भव दुस्तर। सत्पथ हा कथिला॥ २॥

शुद्धचिदात्मक निष्ठा कथिती। मुक्तिफलातें देई म्हणती।
निश्चय बादरायण बोलती। धरिं या श्रद्धेला ॥ ३ ॥
श्रवणकीर्तनादिक जे सेवा। भक्त अर्पिती प्रेमें देवा।
भक्ति नवविधा साधन जीवा। व्यास वदे सकलां ॥ ४ ॥
ईश्वर अपुला पति मानोनी। पत्नीभावा अवलंबोनी।
जारभावना कोणी धरुनी। भजती ईशाला ॥ ५ ॥
पुत्रत्वानें दत्त लाभला। तृप्ति न परि त्या अनसूयेला।
विनवुनि मागे अर्भकत्वाला। करी लालनाला ॥ ६ ॥
ऐसे अनंत मार्ग भक्तिचे। आचरितां हे बहुत सुखाचे।
अपरिमित भक्त तरले साचे। मानीं या बोला ॥ ७ ॥

---

३७१. पद (चाल—दीन दास चरणिं तुझा०)

भावसुता जीवराव भक्ति तूं वरीं। तिजविण तुज योग्य नसे अन्य नोवरी ॥ ध्रु० ॥ माधव-यश-कीर्ति-सुधा काय जन्मली। शुद्ध-सत्त्व-निर्मित कीं शालु नेसली। अजित-गुणा-भरणी जणुं मधुर थाटली। मुररिपुची कांति गमे मूर्त सुंदरी ॥ १ ॥ सुमनहार विनयवती घेउनी करीं। संगोत्सुक तिष्ठतसे हृदयमंदिरीं। रति-चतुरा प्रणययुता स्वीकृता करीं। अनुभविसी अतुल समाधान अंतरीं ॥ २ ॥

---

३७२. पद ( चाल — हरिभजनावीण० )

जीवा तव भक्ति प्रिया अर्पि माधवा ॥ ध्रु० ॥

रम्य-हृदय-मंदिरांत
ज्ञानदीप प्रज्वळीत
सुमन सेज रचुनि तेथ
ध्याई केशवा ॥ १ ॥

श्यामसुंदरास पुजुनि
रतियोषा पदिं वाहुनि
सेव विष्णुदास बनुनि
मार्ग हा नवा ॥ २ ॥

पाहुनि त्वत्प्रेम देव
प्रगटवोनि सगुण भाव
दाविल अभिसारभाव
देख वैभवा ॥ ३ ॥

अंकीं निज घेउनि हरी
गुप्त करी भुजांतरीं
अधरसुधा प्राशुनि धरी
कामसंभवा ॥ ४ ॥

उभयतांस संग होत
सौख्य परी तुजसि घडत
नवल हेंच कीं वर्तत
घेइं अनुभवा ॥ ५ ॥

गोपवरीं निज कांता
ओपुनि त्या नंदसुता
मेळविली कृतार्थता
थोर मानवा ॥ ६ ॥

हाच योग सुलभ असे
अमृतत्व लाभतसे
भेटि तुला घडवितसे
नित्य त्या शिवा ॥ ७ ॥

---

३७३. पद (चाल—कुसुमगंध सुटला०)

रंग कसा खुलला । प्रेमाचा ॥ ध्रु० ॥
श्रद्धादेवी झगटे मजला । कर लोभें धरिला ॥ १ ॥
कोमल कंठीं घाली बाहू । मारी मीठीला ॥ २ ॥
सुमनसेजेवरि मज लकटी । कामुक संगाला ॥ ३ ॥
तनुवरि माझ्या पसरी काया । करी घर्षणाला ॥ ४ ॥
सोडीना मज भिडली आंगा । भोग तिचा घडला ॥ ५ ॥
दत्तचि झालों क्रीडारतिनें । भाव दुजा गळला ॥ ६ ॥

---

३७४. पद (झंपा)

तुझ्या भक्तिचा पूर्ण उत्कर्ष व्हावा । भृत्यकांनां अम्हां विजय द्यावा ॥ ध्रु० ॥ प्रेमरस दाटवीं । हृदब्जें विकसवीं । चरित निज वर्णवीं ॥ छंद लावीं ॥ भजनसुख वाढवीं । कीर्तनें परिसवीं । स्थानिं या जाणवीं ॥ प्रगट भावा ॥ १ ॥ नाममहिमा करीं ।

उदित अवनीवरी । स्वलीला विस्तरीं ।। स्वजन तारीं ।। कल्पवृक्षा-परी । अर्थदत्वा वरीं । यशोध्वज नरहरी ।। फडकवावा ।। २ ।। धर्म-परिपालनीं । साधुंच्या सदवनीं । प्रणत-दुःख-दलनीं ।। पाप-शमनीं ।। उद्यत-शस्त्र बनुनी । तेज प्रज्वाळुनी । अभिमान शासनीं ।। जागवावा ।। ३ ।। अहित संहारुनी । दुर्मदां नमवुनी । पाखंड नासुनी ।। शत्रु वधुनी ।। भक्तजय साधुनी । स्वीयरति देउनी । कीर्ति-डिंडिम जनीं ।। गर्जवावा ।। ४ ।।

---

## ( १३ ) भजन

### १. 'भजन'

३७५. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

वेडा मी बनलों । हरिभजनें ।। ध्रु० ।।
त्यागुनि सकळहि संसर्गाला । गोसावी झालों ।। १ ।।
संसाराची आशा पुरली । विटुनी मी गेलों ।। २ ।।
जनसंमर्दीं काधिं नच जातां । बहिष्कृतसा वसलों ।। ३ ।।
मानापमानीं चाड न मजला । लघुवृत्ति नटलों ।। ४ ।।
पुढती कांहीं सुख ना म्हणुनी । नामीं मीं रतलों ।। ५ ।।

---

३७६. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

बहर किती आला । भजनासी ।। ध्रु० ।।
वनमाळेचा अवचित येथें । सुगंध दरवळला ।। १ ।।
सुधांशु-धवला-मंदस्मित-भा । येत प्रत्ययाला ।। २ ।।

नयन देखती मधुनी मधुनी । पितांबर-छबिला ॥ ३ ॥
मृदुल पाउलें नवनीतासम । विंधिति दृष्टीला ॥ ४ ॥
स्पर्श सुखाचा अविरत घडतो । अविदित हा तनुला ॥ ५ ॥
विनायकाच्या हृदयीं प्रेमा । दत्तरूप बनला ॥ ६ ॥

---

### ३७७. पद ( चाल — बीज पेरावें० )

दत्ता भजावें । आनंदें मग डोलावें ॥ ध्रु० ॥
विषयवासना लोपुनि जाती । सकळ कर्में दत्तमय होती ।
दोष न कांहीं तुजला जडती । चरण सेवावे ॥ १ ॥
निवृत्त तृष्णा तुझि होईल । गुरुपदीं चित्त लय पावेल ।
सहज समाधियोग लाभेल । दत्त-यश गावें ॥ २ ॥
ममत्व मनिंचें हरपुनि जाय । देहाचीही विस्मृति होय ।
ब्रह्माण्ड गमेल दत्तात्रेय । ध्याय गुरु-भावें ॥ ३ ॥
अवर्णनीया गति तुजप्रति । प्राप्त होय हें जाण निश्चितीं ।
यास्तव सेवीं श्रीदत्तयति । तल्लीन व्हावें ॥ ४ ॥

---

### ३७८. पद ( चाल — बीज पेरावें० )

भजन दत्ताचें । अमृत हें इहलोकींचें ॥ ध्रु० ॥
सुखदुःखांचा विसर पडाया । चित्तविभ्रम स्तब्ध व्हावया ।
शांति यावया तुझिये हृदया । रसायण साचें ॥ १ ॥
सुगम सुसाधन वृत्तिलयाचें । लेणें अभिनव आनंदाचें ।
परम सार हें तृप्तिरसाचें । अवर्ण्य वाचे ॥ २ ॥

सदैव सेवन विनायकासी । झटे वासुदेव घडवायासी ।
आले उदया गमत तयासीं । सांठे पुण्याचे ।। ३ ।।

---

३७९. पद ( चाल—तो नर दुःखमुक्त झाला० )

ज्यानें भजनमार्ग धरिला । तोचि अधिकृत मोक्षा झाला ।। ध्रु० ।।
गाउनि ज्यानें नाम गुरूचें जपयज्ञ सिद्ध केला ।
जिंकुनि तेणें लोक स्वर्गीय साधिलें धन्यतेला ।। १ ।।
भाग्य त्याचें वर्णावें किती वस्तु न दृष्टांताला ।
तोच देव गुरु तोच होतसे नित्य करा भजनाला ।। २ ।।

---

३८०. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

प्रेम इथें विकसो । भजनाचें ।। ध्रु० ।।
समरसतेचा गंध मनोहर । हृत्कमळीं विलसो ।। १ ।।
तुष्ट देवता माधुर्याची । प्रगटपणें निवसो ।। २ ।।
विनायकाचें चित्त रसीं या । परमचि उल्हासो ।। ३ ।।

---

३८१. पद ( धुमाळी )

भजन-सुख-रसांत मिसळूं या ।। ध्रु० ।।
देव प्रगटला खेळ खेळतो । भजन-रंग तरि खेळूं या ।। १ ।।
सोन्याचा हा दिवस उगवला । भोंवति त्याच्या नाचूं या ।। २ ।।
सकळ भावना गळुनी गेल्या । ऐक्यतेला अनुभवूं या ।। ३ ।।
योग-समाधी काय बापुडी । अभिमान तिचा शमवूं या ।। ४ ।।
वैकुंठाची काय थोरवी । शून्य तयाला बनवूं या ।। ५ ।।

अमृत-पानीं देवां करवीं । लाळ येथें घोटवूं या ॥ ६ ॥
भजन-रवाची दंगल जगतीं । म्हणे विनायक मांडूं या ॥ ७ ॥

---

### ३८२. पद (चाल — राधारमण गिरि०)

आनंदभर तुज येई । दत्तभजनीं सक्त होई ॥ ध्रु० ॥
येईल तो तुज सन्निध प्रगटुनि । मनमोहन हृदयीं ध्याई ॥ १ ॥
दाविल निजकांती जशी चपला । त्या तेजीं मिसळुनि जाई ॥ २ ॥
परिमळ वन-माळेचा मधुमधु । घेतां तूं भरुनि येई ॥ ३ ॥
यशामृत घोंट विनायकाला । म्हणति अतृप्तसा घेई ॥ ४ ॥

---

### ३८३. पद (चाल — गोड गोड मुरली०)

रंग रंग भजनीं, वृत्ति ग,
रचुनी कवनें आळविं गानीं ।
बनुनि दंग तूं जाय गुंगुनी ॥ ध्रु० ॥
समरस होउनि अपणां विसर
दत्तात्मकतेला तूं धर ग
सैंधव जलांत तशि जा विरुनी ॥ १ ॥
डोलत डोलत वदत विनायक
रागरागिणी गा अनेक ग ।
प्रेमरसाचा भर येवोनी ॥ २ ॥

---

३८४. पद ( चाल – लहरीं आतां० )

भजनीं रचीं । रसाच्या ।
स्तवनपरा काव्याकृती ॥ ध्रु० ॥
वदनीं गातां सुमधुर, गुरुला ।
प्रगटविती निःसंशयीं साकृती ॥ १ ॥

३८५. पद ( चाल – जमल्या पहा वनीं० )

वितरीं इथें, तुझ्या भजनाला ।
रतिसीं हृदयीं, रमवाया स्वजनाला ॥ ध्रु० ॥
समरस होउनि, लीला तुझिया । स्मरुनि, मनिं बनूं तत्पर गाया, ।
डुलवीं प्रेमानें आम्हां सकलांला ॥ १ ॥

३८६. पद ( चाल – जो पिया जोडूं० )

भावना जोडुं अश्रद्धा तरी तोडूं
दुष्टभाव गाडूं, दत्ता, वासनांस सांडूं ॥
मन तुज अर्पुनि निर्भर भजनीं ।
यश तव गाऊं मूर्तिस ध्याऊं ॥
स्मितीं धरूं रति समरस होऊं ।
रसभर लाधुनि त्यांतचि न्हाऊं ॥

३८७. पद ( चाल – फुलवनांत चल सजणे० )

भजनरंग मधु थटवीं ।
घुम घुम घुमो ध्वनि, नाद विकसविं,
बहरा उधळवीं गायनीं ॥

भान हरपे, ऐक्य थारे, ।
होऊनि वेडा रमसी नृत्तीं ।
ऐसा दंग बने, रंगे ॥

---

३८८. पद ( चाल—गमते सदा ही मजला० )

रमते मती त्वद्भजनीं ।
होउनी रक्त गुणगायनीं सदा,
परतते न गृध्रा ॥ ध्रु० ॥

पागल ती झाली वदतां ।
कीर्ति, होई पीयुषीं अलि, ।
येतां रस न विटेच, लय पवुनी ॥ १ ॥

---

३८९. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

भजनरसा सेवीं । रसिका ॥ ध्रु० ॥

डुलविल प्रेमें आनंदें तो । हृदय उचंबळवी ॥ १ ॥
माधुर्याचा अनुपम ठेवा । इतर रसीं विटवी ॥ २ ॥
माधुरि अधिकाधिक तद्ग्रहणीं । नवी नवी खुलवी ॥ ३ ॥
धाया आणी म्हणे विनायक । अपेक्षा नुरवी ॥ ४ ॥

---

३९०. पद ( चाल—श्रीरंगा । दे मजला सत्संगा० )

गुरुराया । शरणागत तव पायां । येईं ताराया ॥
अवधूता । चरणीं नत मी ताता । येईं ताराया ॥
श्रीदत्ता । अर्पित मी तुज चित्ता । येईं ताराया ॥

योगीशा । मागत मी उपदेशा । येईं ताराया ॥
आनंदा । निजानुभव दे मंदा । येईं ताराया ॥
सर्वज्ञा । सुज्ञ करीं मज अज्ञा । येईं ताराया ॥
उन्मत्ता । हरवीं कलिची सत्ता । येईं ताराया ॥
ब्रह्मिष्ठा । याचित मी दृढनिष्ठा । येईं ताराया ॥
श्रीपादा । दर्शन देईं वरदा । येईं ताराया ॥
त्रिगुणेशा । तोडीं या भवपाशा । येईं ताराया ॥
निःसंगा । भजनीं दे अनुरागा । येईं ताराया ॥
निर्मुक्ता । मुक्त करीं पदसक्ता । येईं ताराया ॥

---

## २. 'करुणापर'

### ३९१. पद ( अंजनीगीत )

वांचवि मजला श्रीगुरुराया । शरण आलों तुझिया पायां ।
कष्ट झाले किति मम हृदया । वर्णवती ना ते ॥ १ ॥
संसारींचीं दुःखें भोगितां । हृदयीं आली व्याकूळता ।
सकळ आशा निष्फळ होतां । शरण तुज आलों ॥ २ ॥
वेदपुराणीं कीर्ति ऐकिली । प्रभुची सेवा ज्यांसी घडली ।
सहज मुक्तता त्यां लाभली । श्रीहरि-प्रसादें ॥ ३ ॥
कथा ऐकिली पांडवांची । भक्तोत्तम प्रल्हादाची ।
सुनीतिपुत्र ध्रुवबाळाची । कथा ऐकिली म्यां ॥ ४ ॥
भावड्या भोळ्या शबरीची । गोकुळींच्या गवळ्यांची ।
मथुरेच्या कुब्जादासीची । सुमनोहर कथा ॥ ५ ॥

कथा कबीरकमालाची । तुकाराम एकनाथाची ।
कथा ऐकिली दामाजीची । ऐशा अनंत कथा ॥ ६ ॥
अन्नसंतर्पण भास्कराचें । भवहरण सायंदेवाचें ।
कुष्ठशमन कुष्ठरोग्याचें । श्रीगुरुचरित्राचें ॥ ७ ॥
अनंत आख्यायिका कथा । ऐकिल्या मी श्रीगुरुनाथा ।
श्रद्धा उपजली गुरुसमर्था । माझीये मनीं ॥ ८ ॥
म्हणुनी शरण तुजला आलों । तुझेवरी दृढ विश्वासलों ।
तुझे भजनीं रत झालों । श्रीगुरुदत्तात्रेया ॥ ९ ॥
माझे मनिंचें शुद्ध प्रेम । तुजला अर्पिलें मंगलधाम ।
कृपा करूनी मजला परम । तारावें नाथा ॥ १० ॥
कोण पदरीं मज घेईल । कोण माझी चिंता वाहील ।
कोण हेतु माझे पुरवील । तुजवीण दत्ता ॥ ११॥
उपाशी कीं मी जेवीलों । सुखें निजलों कीं जागलों ।
दुर्वृत्त कीं कसा वागलों । तुजला चिंता ॥ १२ ॥
मजला सौख्य कीं दुःख आहे । चिंताभार किती मी वाहें ।
संकट काय येऊं पाहे । तुजला चिंता ॥ १३ ॥
बसलों उठलों कीं खेळलों । कोणा काय मीं बोलिलों ।
दुःखी झालों कीं संतोषलों । तुजला चिंता ॥ १४ ॥
कोण धरिती स्नेहभाव । कोण वाहती शत्रुभाव ।
कोण योजिती कपटभाव । तुजला चिंता ॥ १५ ॥
कोण माझे सखे सोयरे । कोण भरले थोर मत्सरें ।
कोण जडले परमादरें । तुजला चिंता ॥ १६ ॥

कोण पुढती गोड बोलती । अंतरिं कपटभाव योजिती ।
कोण कारस्थानें रचिती । तुजला चिंता ॥ १७ ॥
हेतु पुरले कीं राहिले । आशाभंग किती सोशिले ।
माझें मन किति दुःखी झालें । तुजला चिंता ॥ १८ ॥
निंदा स्तुति माझी घडत । शुभाशुभ जें मज प्राप्त होत ।
लाभ किंवा हानि वर्तत । तुजला चिंता ॥ १९ ॥
ग्रहपीडा ये मज दारुण । भूतपिशाच्चसंमंधग्रहण ।
महाव्याधि परम कठिण । तुजला चिंता ॥ २० ॥
सन्मान किंवा अपमान । सुकीर्ति अपकीर्ति गहन ।
जें जें घडत मजला न्यून । तुजला चिंता ॥ २१ ॥
माझे हृदयांतरीं बसोनी । मज भजनीं प्रभु लावोनी ।
कृपादृष्टि परम ठेवोनी । मम चिंता वाहासी ॥ २२ ॥
अंतर्बाह्य संरक्षिसी । क्षणहि न मजला विसंबिसी ।
काय वानूं या तव प्रेमासीं । मायबाप दत्ता ॥ २३ ॥
मायेवीण कोणापाशीं । मोकळें करूं मम हृदयासीं ।
कोण निवारी संकटासीं । हृदयजीवना ॥ २४ ॥
समाधान मजला नाहीं । जीवित शून्य झालें पाहीं ।
मृत्यु आला लवलाहीं । जिवंतपणीं मजला ॥ २५ ॥
अनन्यशरण झालों चरणीं । वांचवा आतां चक्रपाणी ।
भयभीत मी अंतःकरणीं । सोडवा याला ॥ २६ ॥
चिंता प्रखर मज पीडीते । माझें हृदय विह्वल होतें ।
निराशा मजला विकळ करिते । ये धांवोनीयां ॥ २७ ॥

जरि न मजला तुम्हीं धांवाल । तरि मज कोण सोडवील ।
कोण जगतीं असे दयाळ । तुम्हांवांचोनी ॥ २८ ॥
चरणीं अर्पिली ही प्रार्थना । कळवळा येवो दयाघना ।
तुजलागीं अत्रिनंदना । करुणा येवो माझी ॥ २९ ॥

---

३९२. पद ( चाल—कष्ट देति फार० )

दीन दास चरणिं तुझ्या शरण पातला
त्रिविध ताप दुःसह जो त्यांत पोळला ॥ ध्रु० ॥
स्वपद-सक्त भक्त, दुःख-मुक्त व्हावया
तप्त हृदय परम सदय शांतवावया
भ्रष्ट नष्ट परम दुष्ट खळ तरावया
प्रगट स्पष्ट होउनियां तारिं तूं मला ॥ १ ॥
भीति-ग्रस्त परम-त्रस्त संकटीं पडें
प्रणतार्ती हरण करीं तव पदीं जडें
वत्सल तूं असती तरी वारिं सांकडें
प्रार्थित मी सदयवरा परम कोमला ॥ २ ॥
स्वजन बंधु मजसि कुणी नाहीं राहिला
प्रियसखाहि नाहीं मला जगतीं उरला
वैरि सकळ छळिती किती सांगूं तुजला
सकळहि तूं जाणसि सखा सोडवीं मला ॥ ३ ।
सर्वाश्रय देईं मला दत्त आसरा
तुजविण तरि कोण मला सांग गुरुवरा
अनन्य असें शरण तुला पाव लेंकरा
हीन दीन नम्र असा नमित तूजला ॥ ४ ॥

---

## ३९३. पद ( अंजनीगीत )

चिटलों नाथा संसाराला । शरण आलों आतां तुजला ।
स्वीकारावा दास भला । सेवा देवोनी ॥ १ ॥
साधाया जातां परमार्थाला । अनर्थ थोर ओढवे भला ।
काय सांगूं सर्वज्ञाला । तुज गुरुराया ॥ २ ॥
अभिलाष नाहीं गेला मनिंचा । हृदयीं जागा नित्य साचा ।
आशीविष तो उग्रगरलाचा । दंशी मम हृदया ॥ ३ ॥
एकान्तासी जाउनी बसतां । श्रीहरिमूर्ती आठवीतां ।
भलतेंच उपजवी चित्ता । अभिलाष दुष्ट ॥ ४ ॥
वासना जोंवरि मेली नाहीं । एकांत विष तोंवरि पाहीं ।
कोण त्याचे वेग साही । ऐशी शक्ति कोणा ॥ ५ ॥
धरवेना एकांताला । सोडवेना संगतीला ।
ऐशा दुर्धर प्रसंगाला । सांपडलों देवा ॥ ६ ॥
नाहीं बळ मज धैर्याचें । तैसें नाहीं तपश्चर्येचें ।
नाहीं तैसें पुण्याईचें । काय करूं नाथा ॥ ७ ॥
उपासना दृढ चालविली । परि ते सकळ निष्फळ झाली ।
तुज नाहीं आवडली । हृदयविश्रामा ॥ ८ ॥
सर्वत्र माझी निंदा झाली । अपकीर्ति थोर बोभाटली ।
सर्व आशा माझी खुंटली । प्राणविसावीया ॥ ९ ॥
उरलें नाहीं कांहिं प्रेमाचें । दर्शन देईं तव पायींचें ।
सार्थक व्हावें या देहाचें । पुरवावी इच्छा ॥ १० ॥

### ३९४. पद ( चाल—प्रतिकुल होइल० )

सुख न गमे संसारीं या म्हणुनि शरण आलों ।
दृढ धरुनि विश्वासाला सेवापर झालों ॥ ध्रु० ॥
संकट पडलें थोर मला सखया धांवोनी ।
कृपाकवचा लेववूनी धैर्य मज देऊनी ।
अंतराय सकळहि माझे पूर्ण निवारोनी ।
दुःखमुक्त करणें आतां तुजसि विश्वासलों ॥ १ ॥
वासना मज बहु बाधती दीनसा करीती ।
दोष घडती मज अज्ञाना सांगूं तुज किती ।
अनुकुल मम दैव न म्हणुनी विघ्नें उद्भवती ।
मार्गदर्शक तूंचि मजला किंकर तव बनलों ॥ २ ॥
मायबाप धनी आधार सद्गुरु कृपावंत ।
निलय परम विश्रांतिचें अत्र्यात्मज दत्त ।
धाम शाश्वत मंगलाचें दिव्य सौख्ययुक्त ।
जाणुनि हें स्वरूप तुझें तव चरणीं रतलों ॥ ३ ॥
तारिं तारीं तारीं या दीनबालकाला ।
पाप सकल नासुनि याचें शुद्ध करीं याला ।
दैन्य हरुनि करिं समर्थ या तव दीनाला ।
हेतु पूर्ण करिसील म्हणुनी मम आशा वदलों ॥ ४ ॥

---

### ३९५. पद ( चाल—धांव विभो० )

कोणालागीं मारुं मी हांका । तुजविण नाथा अनाथरक्षका ॥ ध्रु० ॥
प्रसंग ओढवे मजवरी बांका । कळवळा येवो जननीजनका ॥ १ ॥

जगतीं माझा कोण जिव्हाळ्याचा । मजसाठिं येइ जो धांवत साचा॥२॥
पाठीराखा उभा निरंतर । एकचि माझा तूं करुणाकर ॥ ३ ॥
नको पाहूं अंत आतां सखया । शरण मी झालों तुझिये पायां ॥ ४ ॥
विनायक म्हणे प्रभु आत्माराम । त्वरित प्रगटणें मंगलधाम ॥ ५ ॥

---

### ३९६. पद ( चाल—शाम चुनरिया० )

धांव प्रभुवरा दत्तात्रेया । घाबरलों बहु संकट पडलें ।
मति माझी कांहीं न चाले योजीं उपाया ॥ ध्रु० ॥
वांचविं मजला दीन दयाळा । प्रसंग वारीं श्रीगोपाळा ।
लवकरिं येईं मज सोडवाया ॥ १ ॥

---

### ३९७. पद ( चाल—अजि शेवटच्या लाभचि० )

निर्वाणीचा तंतू मम आशेचा उरलासे तव कृपेचा ॥
जरि साधेना याला तव प्रसाद ना मग खचित नाश चुकेना ॥
हा काकुळती बहु आला तुम्हांप्रती रक्षी कोण या श्रीपती ॥
अन्यसाधनें याचें अवन न होणें यास्तव कराच्चि धांवणें ॥
फसलों आतां नाहीं गति या ताता हृदय फाटे अवधूता ॥
लज्जा राखा नसे कुणि पाठिराखा तुटो फजितीचा विळखा ॥
बोलणें काय मनीं होय हायहाय घालिल उडी कोण माय ॥
जिव्हाळ्याचे वदतों उद्वेगाचे शब्द पश्चात्तापाचे ॥
विनायकाचा करा स्वीकार साचा आशय हाच दृढ त्याचा ॥

---

३९८. पद ( चाल—बघुनि त्या भयंकर० )

अरि-करीं विसंबिसि कैसा पाडिसी केंविं निर्वाणीं ।
निर्दयता शिवली हृदया विस्मयें स्तब्ध मम वाणी ॥
श्रुति काय अनृता वदली साधूक्ति असत्यचि झाली ।
अनुभवहि खोटा पडला हरपुनि मति कुंठित ठेली ॥
म्हणुं काय या तव कृत्या लोटिलें मजसीं संदेहीं ।
लपविलें कां आपणासीं समजुं दे प्रभो मज पाहीं ॥
त्वरित घे धांव मम सखया सोडीव वैरी निवटोनी ।
तुजविण बा विनायकाला गति नसे येइं प्रगटोनी ॥

---

३९९. पद ( चाल—बघुनि त्या भयंकर० )

न करुणालया तुज करुणा बोलेल कोण ही वाचा ।
अनुपम तूं कोमलवृत्ति लेश नसे काठिण्याचा ॥
देखोनि कष्ट स्वजनांचे परिसतां आर्तरव त्यांचे ।
विरघळसी नवनीतासम भान नुरे कसलें साचें ॥
अहोरात्र राहुनि जागा रक्षिसी स्वीय भक्तांसी ।
अणुहि न विसांवा तुजला जाणेल कोण महिम्यासी ॥
स्थूल सूक्ष्म प्राणीयांसी आहारादि सकलहि देसी ।
अवन भयापासुनि करिसी सीमा न तुझे व्यापासीं ॥
उडि घाल वांचवायाला मी दीन शरण चरणांला ।
रिपुकरीं वध न मम व्हावा प्रार्थितों राख ब्रीदाला ॥

---

४००. पद (चाल – जरि कुणा श्रीमंताची०)

कधिं न कळत प्रगटे माझी सिद्धिसंपन्नता
फलोन्मुख गुरुसेवा बनुनी कधिं धरी मूर्तता ॥ ध्रु० ॥
ज्ञानरूप मी पावोनी लभेन कधिं मुक्तता
शोक मोह हरुनी मज ये कधिं पूर्णकामता
द्वन्द्व-विसर पडुनी कधीं ती जागेल प्रबुद्धता
स्थानोत्कर्षास्तव कधिं मजसीं घडे बलपूर्तता ॥ १ ॥

---

४०१. पद (चाल – जमल्या पहा वनीं०)

अवना करीं गुरो सुद्याळा ।
करुणा करुनी जननी गे ! तव बाळा ॥ ध्रु० ॥
विलपन ऐकुनि चित्तीं द्रवसी । विरघळुनि त्वरें धांवत येसी
हरिसी दुःखाला, देशी भय काळा ॥ १ ॥

---

४०२. पद (चाल – जमल्या पहा वनीं०)

चरणीं असें तुझ्या नत याला ।
अपुला म्हणुनी पदरीं घे तनयाला ॥ ध्रु० ॥
उचलुनि सत्वर, प्रेमें हृदयीं, । धरुनि, बन तया मोदनदायी
हरुनी कष्टांला, साधीं अवनाला ॥ १ ॥

४०३. पद ( चाल—जमल्या पहा वनीं० )

करुनी क्षमा हरा दुरितांला
स्वकरीं धरुनी मधुमूर्ते ! प्रणताला ॥ ध्रु० ॥
भयहर होउनि, कष्टां हरुनी, । अभय वितरुनी सद्गतिदानी
बनुनी, स्वीकारा पायीं सुरताला ॥ १ ॥

---

४०४. पद ( चाल—ही रात सवत बाई० )

कां चित्त द्रवत नाहीं
अजुनी, वळे न, स्थिर राही ॥
पद-सक्त हृदब्जा केलें
सेवनीं मति धरीयेली ॥
तुजवीण कोण दातारा ।
सोडविता अपायीं ।
घे धांव कुणा न येई
दत्ता दया मम पाहीं ॥

---

४०५. पद ( चाल—ही रात सवत बाई० )

नैष्ठुर्य गळुनि जावो
करुणा मतींत जनि पावो ॥
किति कष्ट सहावे जीवें
जाहलों नत पदीं भावें ॥

अपमान शोक चिंतेला ।
सोखुं किती दयाळा ।
घे शीघ्र उडी कृपाळा
नाशीं अघाशय माझा ॥

---

४०६. पद ( चाल — मसिं बोलूं नको गिरिधारी० )

मज सोडुं नको वनमाळी । मतिला झोंबे तुझा काम ॥ ध्रु० ॥
भारुनि मज गुंगविलेंसीं । रति अवघी चोरुनि घेसी ।
स्मृति नाहीं उरलि मनासीं ॥ १ ॥
मी आतुर संगमिं झालों । रूप-चिंतनांत विरालों ।
तळमळ किती मम हृदयासीं ॥ २ ॥
कधिं वपु पवते त्वत्स्पर्शी । कधिं ऐक्य तुझें मज ईशा ।
उत्कंठा ऐसी मजसीं ॥ ३ ॥

---

## ३. ‘ औत्कंठ्य ’

४०७. पद ( धुमाळी )

प्रभु निजस्वरूप मज दावा ॥ ध्रु० ॥
उत्कंठा बहु मम हृदयींची । त्वरित अतां पुरवा ॥ १ ॥
लोळेन तुमच्या चरणांवरतीं । योग असा घडवा ॥ २ ॥
प्रेमाश्रूंनीं लोचन भरतां । स्तुति आपुली करवा ॥ ३ ॥
कंठ दाटतां अपुल्याठायीं । मन माझें रमवा ॥ ४ ॥

---

### ४०८. पद (चाल – प्रतिकुल होइल०)

उत्सुक तव दर्शनाला द्वारिं तिष्ठतसें
परम लीन होउनि चरणीं हांका मारितसें ॥ ध्रु० ॥
उघडिं कवाड अपुलें आतां मजसाठीं नाथा ।
डोळेभरि पाहिन प्रेमें स्वरुप मी समर्था ।
आलिंगीन तनू तूझी अर्पिन पदीं माथां ।
काम मनिंचा पुरवावा हा म्हणुनि प्रार्थितसें ॥ १ ॥
श्रवणिं पडो तूझी दत्ता अमृतमय वाणी ।
उपजवील शान्ति थोर जी अंतःकरणीं ।
जवळि घेउनी सखया मजला शिरीं ठेवी पाणी ।
घडत योग कधिं हा ऐसा वाट पाहतसें ॥ २ ॥

---

### ४०९. पद (चाल – धांव विभो०)

सांगु किती मन झालें उतावीळ । पहावया दत्ता तव मुखकमळ ॥ ध्रु० ॥
कोठें रमेना स्थिर होईना । समाधान अल्पहि पावेना ॥ १ ॥
सुग्रास अन्नहि वाटे विष या । विटलें परमचि इंद्रियविषया ॥ २ ॥
देहाचा तें मानि कंटाळा । आली त्यासी उदासीन कळा ॥ ३ ॥
रात्रंदिन जागें नाहीं विश्रांति । पाहिन कधीं मी म्हणे श्रीपती ॥४॥
दर्शन देउनी तोषवीं तरि या । शरण मी नाथा तुझीये पायां ॥ ५ ॥

---

४१०. पद ( चाल—ठाकुर तव शरणाई० )

मानस मम तुजठायीं प्रेमें
भरुनि बने लुब्ध तुजला घ्याया ।
दृढ आलिंगन अभिरामें ॥ ध्रु० ॥
सुकुमार सुधातुल्य कायेसीं
तनु स्पर्शो रतिकामें ॥ १ ॥

---

४११. पद ( चाल—असाचि धांवत येइ० )

कराच तृप्त मदीय वासना
दर्शन देउनि तोषवा मना ॥ ध्रु० ॥
तळमळ हृदया लभेन कधिं मी
रति संगीं तव कामप्रशमीं ।
आर्त जाहलों अंग-स्पर्शना ॥ १ ॥

---

४१२. पद ( चाल—असा कसा रमला, यदुवर० )

अतां मला दिसला । असुपति ।
गुप्त कसा झाला सहसा तो,
शोधुं कोठ तया कळेना ; ॥ ध्रु० ॥
हृदयनाथा हा मन्माथा ।
पदीं तुझीया उडि घेतो ॥
दृष्टिस पडें आर्त झालों ।
प्रगटें बोलें ओम् ( ॐ )

---

४१३. पद (चाल—चतुर सुगरा०)

मुखर बनते। उत्कंठा, धृति गळे तीव्र ती होतां॥ ध्रु०॥
नकळत प्रगटे फसवि मनासीं। दत्त भजवि धूर्ता॥ १॥

४१४. पद (चाल—रमला कुठें ग कान्हा०)

मजला गमे ना कांहीं। त्याजविना कीं लवलाहीं॥ ध्रु०॥
छंद तयीं माझ्या चित्ता। सर्व तया माझी सत्ता।
वेधोनि मजला लपला। मन माझें तेणें दाहीं॥ १॥
अनसूयेचा सुत दत्त। हृदयींचें माझें वित्त।
कैसें कळे मज वृत्त। म्हणुनी मी पडलों मोहीं॥ २॥

४१५. पद (चाल—हा गुरुला प्रणाम पहिला०)

देव मला समोर दिसला॥ ध्रु०॥
समरस झालों, लया पावलों,। सुधारूप गमला॥ १॥

४१६. पद (चाल—नदी किनारीं नदी किनारीं०)

रसें थटोनी, हृदीं स्मरोनी,
मनीं धरोनी, दत्त सखा
पाहत होउनि उतावळा॥ ध्रु०॥
येत धांवूनि प्रभु तो केव्हां
आलिंगोनि मजसिं कधिं
रमवी पसरी बाहु गळां॥ १॥

## ४. 'वात्सल्यपर'

### ४१७. पद ( चाल—रुचती कां० )

दत्ताचें प्रेम आहे मजवरतीं निश्चयें
माझेपाठीं नित्य उभा मज लक्षी विस्मयें ।
करि माझ्या कौतुकाला भर त्याला त्यांत ये
पुरवीतो काम माझे वात्सल्यें तो रयें ॥ १ ॥

---

### ४१८. पद ( चाल—उपवनिं गात कोकिळा० )

मजवरि दत्त बोळला । घनसा, तो आलिंगी तनुला जणुं ॥ध्रु०॥
सुखद होय किति मजला, । अमृतमूर्ती गमला ।
शमवि ताप, शांत करी । मजसीं, अहा ॥ १ ॥

---

### ४१९. पद ( चाल—ठाकुर तव शरणाई० )

वत्सल प्रभु मजपाशीं नांदे
प्रगटपणें, शुद्ध करुनी द्याया ॥
सुख-विश्रान्तिस मज मोदें ॥ ध्रु० ॥
रमणीय करी वृत्त, मोहाया
मन माझें सुविनोदें ॥ १ ॥

---

### ४२०. पद ( चाल—आईचा छकुला० )

प्रेमासीं भुलला । बहकला ।
विरघळला भ्रमलेला गमला ॥ ध्रु० ॥
वैभवा सांडुनी सेवी । भृत्या प्राण भावी ॥
कष्ट सकलही आपण साही । पागल झाला ॥ १ ॥

---

# ( १४ ) कार्यसिद्धि

४२१. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

आम्हां दे विजयाला । त्वत्पददासांला नत जे तुजला ॥ ध्रु० ॥
तो जय दे आम्हांला । तुवां जो दिधला कार्तवीर्याला ॥ १ ॥
योगर्द्धि अलर्काला । ती त्वां द्यावी आम्हां दासांला ॥ २ ॥
देवां जो जय दिधला । मारवुनि जंभासुरदैत्याला ॥ ३ ॥
प्रसाद जो प्रभु केला । क्षात्र-कुल-हननीं परशुरामाला ॥ ४ ॥
मागत तो हरि तुजला । देईजे आम्हां संपन्नतेला ॥ ५ ॥

४२२. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

करितों मी नमनाला । श्रीकार्यास्तव सकल देवतांला ॥ध्रु०॥
धरुनी मी चरणांला । मागत सिद्धि पूजनोत्सवाला ॥ १ ॥
विश्वात्मक जो नटला । देवतामय त्या जाणुनि गुरुला ॥ २ ॥
प्रार्थित मी सकळांला । श्रीदत्तात्मक सुरवराधिपाला ॥ ३ ॥
देउनि साहाय्य मजला । पूर्ण कराया श्रीमहोत्सवाला ॥ ४ ॥

४२३. पद ( चाल — साध्य नसे मुनिकन्या० )

वंदितों सुरेशांसीं । आले जे का गुरुकार्यासीं ॥ ध्रु० ॥
सांग सशक्तिक परिवारेंसीं । वळले या स्थानासी ।
त्यां मागें मी साहाय्यासीं ॥ १ ॥
अनुकूल व्हावें मज वळ द्यावें । अपूर्व समृद्धिसीं ।
करणें प्रगटवोनी उत्सवासीं ॥ २ ॥

वासुदेवात्मक सकळ विभूति। जाणुनि मी तुम्हांसीं।
आहें तुमच्या शरण चरणांसीं ।। ३ ।।
आप्त-काम हा विनायक बनवा। न्यून नसावें यासीं।
याच्या हरवा निखिल विघ्नांसीं ।। ४ ।।

---

४२४. पद ( चाल — नमिती गजवदन० )

प्रणमित सकल-सुर-युवति-समूहा।
उदारा पुष्टि-करा शिवतम-रस-निवहा ।। ध्रु० ।।
त्रिभुवनजननी येथ प्रगटुनी। समृद्ध करा गुरु-यजन महा ।। १ ।।
भजन-समीहा विनायकाची। सुफलित करा व्हा दुरित-मल-हा ।।२।।

---

४२५. पद ( चाल — भोलानाथ दिगंबर० )

नमितों स्वकुलेशांसीं। माझा आहे अभिमान ज्यांसीं ।। ध्रु० ।।
प्रसन्न सन्मुख होउनि मजसीं। द्या आशीर्वादासीं।
व्हावें गुरुच्या पात्र कृपेसीं ।। १ ।।
प्रसाद तुमचा म्हणुनी जडलों। सद्गुरु-पद-भक्तिसीं।
न्यावा तरि हा योग सिद्धिसीं ।। २ ।।
कार्यारंभीं शिर अर्पीतों। तुमच्या चरणाब्जांसीं।
पूर्णत्वें व्हा सहाय उत्सवासीं ।। ३ ।।
विनायक तुम्हीं श्रीदत्ताच्या। लाविला उपासनेसीं।
दत्तात्मक धरा प्रगटतेसीं ।। ४ ।।

---

४२६. पद ( चाल – भोलानाथ दिगंबर० )

मागतों आशीर्वचना । करुनी गुरु-जन-चरण-वंदना ।। ध्रु० ।।
उपासना मम सिद्ध व्हावया । घडवाया दर्शना ।
प्रगटवा श्रीगुरु अत्रिनंदना ।। १ ।।
साक्षात्कारें प्रभु येथ यावे । घ्यावें स्वयें पूजना ।
करवा माझी पूर्ण कामना ।। २ ।।
पूज्य-पाद मम आप्त जे परम । प्रणति अर्पीत त्यांनां ।
वाढवा म्हणतों भजन-सेवना ।। ३ ।।
विप्र-वेद-गुरुशास्त्रांलागीं । विनायक करि वंदना ।
सिद्धि द्या कार्यीं वदे प्रार्थना ।। ४ ।।

---

४२७. पद ( चाल – मूर्तिमंत भीति० )

शांत चित्त मुळीं न होय न प्रयत्न चालती ।
प्रत्यवाय उपासनेंत अभिलाष आणिती ।।
आनुकूल्य द्या असें ऊर्मि जयें न ऊठती ।
उत्सवा सहाय व्हा सुरेश नति पदांप्रती ।।

---

४२८. पद. ( चल – लग्न होय चार दिवस० )

सिद्ध करा कार्य येथ रंग भरा उत्सवीं ।
ऋद्धि-सिद्धि-युक्त घडो अत्युच्छ्रित-वैभवीं ।।
उद्भवोत पुष्टि तुष्टि माधुरी नवी नवी ।
जाणवा जननि जनां गति न यांत मानवी ।। १ ।।

---

४२९. पद ( चाल – सौख्य पूर्ण देवो तुम्हां० )

कार्यसिद्ध होवो ऐसें मी कुलदेवां प्रार्थितों ॥ ध्रु० ॥
उपासना जी लावुनि दिधली । आजवरी करवुनी घेतली ।
अव्याहत पाहिजे चालली । म्हणुनि अनुग्रहा याचितों ॥ १ ॥

४३०. पद ( चाल – रुचती कां तीर्थ०:)

निर्विघ्न कार्य तूझें देवा येथें साधणें ।
साक्षात्कार येथें तुझा आम्हांलागीं लाभणें ॥
जयजयकार माहात्म्याचा निजस्थानीं करणें ।
कीर्तनासी रंग येथें दत्तजी आणणें ॥ १ ॥

४३१. पद ( चाल – या नव नवल नयनोत्सवा० )

या मधु-मधुर-मधुरोत्सवा । खुलुनी प्रेमरसीं ॥
भजन-रति-सुख-भरें रंग मनोहर यावा ॥ ध्रु० ॥
गायन-वादन-नृत्य-कलांची । अभिनयादि-ललितांची ॥
पूर्ति होउनी, जय-घोषाचा । सुश्राव्य गजर व्हावा ॥ १ ॥
स्वाद्वन्न महाजन-संमेलन । श्रवण कीर्तन पदार्चन ॥
वेद-घोष नाम-यज्ञ-सेवन । यांहीं सिद्ध करावा ॥ २ ॥

४३२. पद ( चाल – पंचतुंड नररुंड० )

आनंदाचें लेणें आम्हां उपासना तव गुरुराया
यास्तव तिजला सिद्ध कराया प्रगटोनी द्या निज साहाय्या ॥ ध्रु० ॥
पार्था हातीं कार्य करविलें स्वयें सारथी बनुनीयां
त्याच चरित्रा ध्याउनि आम्हीं शरण जाहलों तव पायां ॥ १ ॥

सर्व सिद्धता अपण करोनी निमित्त आम्हां बनवाया
प्रकाश व्हावा येथें अपुला सजलों तुज हें मागाया ॥ २ ॥

४३३. पद. ( चाल—मूर्तिमंत भीति० )

भव्य कार्य होय इथें प्रभु करा अशी कृपा
नासुनी प्रत्यवाय घडविजे अम्हां तपा ॥
आमुची कामतृषा शमवाया भजन-प्रपा ।
उभारोनि सिद्धि अम्हां सद्गुरो निर्वपा ॥ १ ॥

४३४. पद ( चाल—या नव नवल नयनोत्सवा० )

द्या शुभवर, गुरुवरा, वरा । भजका या मज
मंगल-सुविहित-विमलीं कार्यीं यश-दातारा ॥ ध्रु० ॥
कीर्ति वाढो या दासाची । पूर्ति हो भजनाची ॥
त्रिजय-सिद्धता विनायकाची । प्रगटवोनी त्या तारा ॥ १ ॥

४३५. पद ( चाल—बल ज्याचें त्यास तें० )

यश कार्यीं इच्छितों । भाळ ठेवुनी चरणीं तुझिये
वंदितसें, हेतु कथितसें, होय सिद्ध भावितों ॥ ध्रु० ॥
पाप ताप आणि दैन्य सर्वही,
त्वरित हरीं, मज दया करीं, ऐसें मी याचितों ॥ १ ॥
माया घेरी मजला भारी,
तमोमयी, दाटत हृदयीं, दूर करीं प्रार्थितों ॥ २ ॥

## ४३६. पद ( चाल – रुचती कां० )

स्मित मधुर शोभे ज्याच्या मुखकमलीं सुंदर
प्रसन्न जो स्मृतिमात्रें दत्त होतो सत्त्वर ।
पुरवीतो भक्तचोज स्वयें असुनी ईश्वर
सहाय हो प्राप्त कार्यीं तो आम्हां दयाकर ।। १ ।।

---

## ४३७. पद ( झंपा )

शांत व्हा शांत व्हा दत्त योगेश्वरा । आवरा कोप त्या शीघ्र वारा ।। ध्रु० ।। अज्ञ अम्हि माणसें । लोभ चित्तीं वसे । नित्य करवीतसे ।। पाप भारी ।। मोह होतो मना । घडवि च्युतिसाधना । सत्पथोल्लंघना ।। महोदारा ।। १ ।। क्षमा करा गुरुवरा । पदनतां पामरां । खिन्नता अंतरा ।। प्राप्त झाली ।। हात निज जोडुनी । शिर पदीं ठेवुनी । प्रार्थितों येउनी ।। प्रणत तारा ।। २ ।। सह्यगिरि आठवुनी । गरुडेश्वर चिंतुनी । नर्मदा ध्याउनी ।। तेंविं कृष्णा ।। चरित हृदिं आणुनी । तेथिंचें गुरुमुनी । म्हणत या प्रगटुनी ।। अत्रिकुमरा ।। ३ ।। साधण्या उत्सवा । आपणां संचरवा । आम्हांसि लाभवा ।। धन्यतेला ।। अनामय राखुनी । आम्हां धृति देउनी । विघ्ना अपसारुनी । कृत्य सारा ।। ४ ।। विनायक वंदितो । पदरिं घ्या बोलतो । सिद्धि द्या याचितो ।। स्वीय कार्यीं ।। दोष मनिं नाणुनी । अनुग्रहा देउनी । कृपा मज वितरुनी ।। मजसीं भारा ।। ५ ।।

---

४३८. पद ( चाल – रुचती कां० )

अंतर्बाह्य तेजोमूर्ती कमनीय मंगल
मूर्तिमंत परम शान्ति सौख्याब्धि जो केवल ।
*नित्य वरद नित्य तुष्ट नित्य भक्तां वत्सल*
कृपाळू तो दत्त, कार्य निज बनवो सत्फल ॥

---

४३९. पद ( चाल – असाचि धांवत येइ० )

अनंत सद्यश विस्तरावया,
सिद्ध करा निज कार्य, स्थानिं या ॥ ध्रु० ॥
स्मित-चरित-सुधारसास स्रवुनी,
वितरावें मधु प्रेम स्वजनीं,
हेतु हा बनो पूर्ण स्वामिया ॥ १ ॥

---

४४०. पद ( चाल – जमल्या पहा वनीं० )

धरितों, प्रभो, तुझ्या चरणांला, ।
वितरीं अपुल्या, करुणाब्धे, करुणेला ॥ ध्रु० ॥
करवुनि उत्सवकार्या, बनुनी
अशुभ-हर स्वयें, देउनि हानि
दुरिता विस्तारा येथें स्वयशाला ॥ १ ॥

---

४४१. पद ( चाल—ठाकुर तव शरणाई० )

राधन तव, गुरुमाई, पावो
सुयश, अशी अर्जि चरणीं माझी
बहु प्रेमास्पद तुज होवो ॥ ध्रु० ॥
वडवोनि निजार्चेस या ठायीं,
भजनीं दे रतिभावो ॥ १ ॥

---

४४२. पद ( चाल—चकोरा, मीच तव चंद्रिका० )

प्रभो द्या सिद्धि शुभ उत्सवा
भजनीं रति लभो रंग खुलावा ॥ ध्रु० ॥
रचुनि मांगल्या ऐक्य उपजवा,
मोह नसो अणु, तृप्ति जागवा,
मूर्त विजया संतत प्रगटवा ॥ १ ॥

---

## ( १५ ) उपदेश

४४३. पद ( चाल—पार्था तुज देउनि० )

शरण जा दत्त चरणाला । कथितों तुज सदुपायाला ॥ ध्रु० ॥
भ्रमसी जरि तूं संसारीं या । आशापाशीं गुंतोनीयां ।
भोगपिपासा जडली हृदया । घे तन्नामाला ॥ १ ॥
इहपर देइल सद्गति तुजला । निश्चय बाणो तव चित्ताला ।
उणें न किमपि हि मग बा तुजला । जरि भजसी त्याला ॥ २ ॥

इतर साधनें बहुतचि असती। फलश्रुती तरि थोर वर्णिती।
बहु आयासें फल तीं देती। भजन सुलभ तुजला ॥ ३ ॥
समूळ भवरोगा शमवाया। अविद्या-तिमिर-भ्रम दवडाया।
वासना-विष नष्ट व्हावया। घे भजनरसाला ॥ ४ ॥

---

४४४. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

छंद मना घेई। दत्ताचा ॥ ध्रु० ॥
माहुर-क्षेत्रीं निद्रा घेतो। त्यासी तूं ध्याई ॥ १ ॥
सह्याद्रीसी वास तयाचा। तेथें तूं जाई ॥ २ ॥
स्नानास्तव तो सेवी गंगा। नत चरणीं होई ॥ ३ ॥
गाणगाभुवनीं करितो ध्याना। गुण त्याचे गाई ॥ ४ ॥
आचमन करी कुरुक्षेत्रासी। दावी नवलाई ॥ ५ ॥
भस्मलेपन धूतपापासी। नित्य तिथें येई ॥ ६ ॥
करहाटीं तो संध्या करूनी। सकलार्था देई ॥ ७ ॥
सुगंधधारण विठ्ठल-नगरी। लीला हे गाई ॥ ८ ॥
भिक्षे योजी कोल्हापुर तो। देहि वदे माई ॥ ९ ॥
सारपुरासी भोजन सारी। तारक तो ध्याई ॥ १० ॥
सायंसंध्या पश्चिमाब्धिसीं। दिनचर्या गाई ॥ ११ ॥

---

### ४४५. पद ( चाल – तूं किती घालिसी० )

मानवा तुला जरि दत्त प्राप्त व्हावा । अहोरात्र त्वां छंद तयाचा घ्यावा ।। ध्रु० ।। अवतार स्पष्ट हा जगदुद्धाराला । प्रत्यक्ष भेटतो स्मरतां भजकाला ।। सह्यगिरीवरि वास कल्पियेला । त्रैलोक्यसंचरण नियम नित्य त्याला ।। ( चाल ) लीन भाव तूं जरि चरणीं अर्पिसी । हृदयसरोजीं नित्य तया पूजिशी । एकाग्र होउनी चित्तीं ध्याइशी । अवधूत दिगंबर सौख्यपूर्ण ठेवा । लाभोनि चाखिशी मग मुक्तिचा मेवा ।। १ ।। परमहंस जे श्रेष्ठ यतीश्वर झाले । अनुन्मत्त परी उन्मत्तसे गमले ।। दंडकमंडलुशिखासूत्रादि नाहीं । आचार-बंधनहि नुरलें ज्यां कांहीं ।। ( चाल ) परिग्रह सकलहि मुक्त जे सांडुनी । अव्यक्तलिंग जे विचरती होउनी । उपनिषदांहि वर्णिले जे सन्मुनी । नमिला त्यांहीं श्रीदत्तयोगि बरवा । अत्यद्भुत हा त्वां तन्महिमा गावा ।। २ ।। सत्कीर्तिवंत बहु विप्र वेदशर्मा । परि तत्सुत भोगी ग्रहपीडा परमा ।। वैश्वदेव-समया लक्षुनि यति आला । धूलिधूसर मलिन भिक्षुकसा सजला ।। ( चाल ) भस्म तयानें सर्वांगा चर्चुनी । मक्षिकावृत तो छद्मरूप धरुनी । दुर्गंधयुक्त तरि निजांग दाउनी । पातला दत्तमुनि धरुनि अशा भावा । निजदास विप्र तत्पुत्र सोडवावा ।। ३ ।। विप्रवरें त्या जाणुनि मुनिसिंहाला । ताडनादिक ही सोसुनि धरि चरणाला ।। निश्चय तयाचा पाहुनि मुनि बोले । कां सेवितोसि तूं सांग मज वहिलें ।। ( चाल ) सप्तग्रहांनीं मत्पुत्रा पीडिलें । उपाय माझे सकळहि गा हारले । परमहंस तुम्ही दत्त मीं जाणिले । सांगतां असें ये कृपा दत्तदेवा । देउनी सप्त मनु पुत्र करी बरवा ।। ४ ।। मधुर सुधेसम श्रीदत्तचरित

आहे । प्राशितां अनल्पहि तृप्ति कदा नोहे ॥ रेणुकापुरीं द्विज विष्णु-दत्त नामा । दत्तभक्त महामति सुविनीत महात्मा ॥ (चाल) द्वारीं तयाच्या अश्वत्थ त्यावरी, । ब्रह्मराक्षस करी वास निरंतरीं । तद्दत्त बलीनें तृप्त तो अंतरीं । प्रसन्न म्हणे मी तुजला विप्रदेवा । माग वर अभीष्ट तुजप्रति जो द्यावा ॥ ५ ॥ स्वपत्न्य-भिमतें तो दत्तदर्शनाला । करवीं म्हणे बा सत्त्वरीं या मजला ॥ अन्य देशि जरि स्वर्गही तुच्छ याला । त्याच भेटवीं श्रीदत्तदयां-बुधिला ॥ (चाल) तन्नाम आम्हां तापकर होय तें । दर्शन राक्षसा मग कैसें साधतें । तापसी जनांसही दुर्लभ जाण तें । परि त्वदन्नपुष्ट हा ऋणमुक्त व्हावा । म्हणुनि पाहतों यत्न करुनि बरवा ॥ ६ ॥ एकदां मद्यापणस्थित देवाला । जाणुनी दाखवी योगिदैवताला ॥ हीन तो गमे त्या मोहें विप्राला । दर्शन होय कसें मग दुर्भाग्याला ॥ (चाल) सावधान करुनी पुनरपि दावितां । अस्थिभूषण तो रक्ताक्ष सेवितां । अस्थिनिकरें शीर्शें बहु ताडितां । पळे तेथुनी तो धरुनि अज्ञभावा । भयभीत मनीं कीं जीव वांचवावा ॥ ७ ॥ पुनः बोधुनी दावी श्रीपतिला । चरण धरीं म्हणे सोडुनि भीतिला ॥ दर्शश्राद्धिं तूं क्षण देईं त्याला । सांडिं सांडिं रे बा सकळहि मोहाला ॥ (चाल) मांसास्थिताडित चरण न सोडितो । उपहास धिःकार कुवचही साहितो । परम धीट तत्पदां नमस्कारितो । कृपा उदेली तेधवां दत्तदेवा । सांग म्हणे जो मनोरथ पूर्ण व्हावा ॥ ८ ॥ श्राद्धीं क्षण मी देतों ऐसें म्हणतां । अधःपात पितरां बोले मी येतां ॥ पूर्णकाम तूं बद्ध कसा कर्माला । ब्रह्मनिष्ठ त्वत्सम दुर्लभ श्राद्धाला ॥ (चाल) एकनिष्ठ तद्भाव शुद्ध पाहुनी । मत्कल्प दुजा विप्र म्हणे योजुनी ।

पाकशुद्धि तरी विधियुक्त साधुनी । सिद्ध होय तूं त्वन्महिमा वाढावा । येतों खचितचि भक्त म्हणे तूं बरवा ॥ ९ ॥ सूर्य वह्नि श्रीदत्त या त्रिवर्गाला । श्राद्धसमर्पणीं मुक्तता पितरांला ॥ तदुच्छिष्टाशनीं सद्गति राक्षसाला । श्रीदत्त विभु दे उभयर्द्धि विप्राला ॥ ( चाल ) श्रीदत्तभक्तिचें अमृत सेवुनी । निजचित्तलया तच्चरणीं साधुनी । विषयवैराग्य तद्भजनें पावुनी । कृतार्थ तेणें तव जन्म धन्य व्हावा । दत्तरूप म्हणुनी सकळीं मानावा ॥ १० ॥

---

## ४४६. पद ( चाल – दीनदास० )

चित्त तुझें जडलें कसें भलत्यावरी । मनमोहन असुनि तुझ्या जवळि श्रीहरी ॥ ध्रु० ॥ तत्स्वरुपाहूनि अधिक कोण भेटला । सुगुणराशि तत्सम तरि कोण पाहिला । अतुलशक्ति कोण युवा अन्य मानला । भ्रांत केंविं जाहलासि शोध अंतरीं ॥ १ ॥ शुद्ध प्रेम तुजसि कुठें अखंड गवसलें । कृपापूर्ण हृदय सदा कोठें देखिलें । सदैव तव हितार्थ कोण झटत राहिलें । विचार हाच करुनि होय प्रबुद्ध सत्वरीं ॥ २ ॥ माय बाप बंधु भगिनी तोच जाणिजे । सकल गोत एक तोच सत्य मानिजे । त्याजविण इतर कुठें निष्ठा न ठेविजे । निश्चय हा बाणवुनी सुपथ आदरीं ॥ ३ ॥ दिशाभूल झालि तुझी चकलासी रे । टाकुनि मणि कांच तुवां घेतली करें । ओळखुनी गुह्य अतां मोह सांडिं रे । सावधान बनुनि पार ऐक्य ईश्वरीं ॥ ४ ॥

---

### ४४७. पद ( झंपा )

मना होइं रे पूर्ण वैराग्यशाली। देव आहे तुझा नित्य वाली ॥ ध्रु० ॥ सत्य सांडूं नको। धर्म त्यागूं नको। भीति मानूं नको ॥ संकटांची ॥ शील बुडवूं नको। देह मळवूं नको। भ्याडवृत्ति नको ॥ विपत्कालीं ॥ १ ॥ द्वेष मांडूं नको। ममत्व जोडूं नको। अंगिकारूं नको ॥ दुरभिमाना ॥ स्वास्थ्य दवडूं नको। सुसंग तोडूं नको। खिन्नता मुळिं नको ॥ तुजसि कसली ॥ २ ॥ भेद पाहूं नको। समत्व ढळवूं नको। अनिष्ट चिंतूं नको ॥ कुणाचेंही ॥ कर्तव्य चुकवूं नको। आसक्त होऊं नको। दुराशा धरुं नको ॥ व्यर्थ कुठली ॥ ३ ॥ वचन भंगूं नको। घात योजूं नको। दंश ठेवूं नको ॥ मानसीं तूं ॥ दंभ सेवूं नको। स्वव्रत मोडूं नको। बद्ध होऊं नको ॥ मोहजाळीं ॥ ४ ॥ कपट खेळूं नको। गुह्य फोडूं नको। बुद्धि भेदूं नको ॥ भाविकांची ॥ परस्व लोभूं नको। परस्त्रीरति नको। विषयवार्ता नको ॥ जाळ समुळीं ॥ ५ ॥ भक्ति सोडूं नको। निश्चयीं चळूं नको। अपेक्षा तुज नको ॥ सिद्धीचीही ॥ दत्तचरणाविणें। तूं न कोठें शिणें। भज तया विनु म्हणे ॥ हृदयकमळीं ॥ ६ ॥

---

### ४४८. पद ( चाल—हरिभजनावीण० )

गुरुचरणीं होय सदा युक्त तूं मना ॥ ध्रु० ॥
पुरतिल सकल भोगकाम
तृप्त होय विषयप्रेम
व्यापिल तव हृदयधाम
शुद्ध भावना ॥ १ ॥

निवृत्त दुःख व्हावयास
साधन हें तुजसि खास
म्हणुनि रहा भजत त्यास
त्यजुनि कामना ॥ २ ॥

दृढ करितां चिंतनास
अनुभव ये विनायकास
जवळि करुनि सतत वास
देत दर्शना ॥ ३ ॥

---

४४९. पद (चाल—तूं माझा यजमान०)

परमार्था भज रे। सुज्ञा ॥ ध्रु० ॥
इतर अर्थ ते नश्वर असती। लोभ त्यांचा त्यज रे ॥ १ ॥
व्यष्टयभिमाना सोडुनि पाहें। समष्टित्व निज रे ॥ २ ॥
फलाभिसक्ती जडत्वा आणी। ती नको तुज रे ॥ ३ ॥
अधर्म सांडुनि विहिताचारें। दृढपरिकर सज रे ॥ ४ ॥
सकलहि कर्में ईशा अर्पुनी। भगवंता यज रे ॥ ५ ॥
सर्वात्मक तो प्रभु ओळखोनी। विश्वाला पुज रे ॥ ६ ॥
म्हणे विनायक शुद्ध भावना। तव बनो सहज रे ॥ ७ ॥

---

४५०. पद (चाल—नका करूं अविचार०)

करा षडरिसंहार। गडे हो ॥
मोहक पाहुनि रूप तयांचें। भुलतसां करसे तुम्हीं अनिवार ॥ध्रु०॥
अंतरिं भिनुनी नित्य तुम्हांला। प्रवर्तविती ते दुष्कर्माला।
समजुं न देतां प्रेरिति इषुला। भाव वरी सुकुमार ॥ १ ॥

अनंतजन्मींचे सांगाती । लोंचट बहु ते कधिं न सोडिती ।
भव-चक्रांतुनि निसटुं न देती । दृढ त्यांचा सहकार ॥ २ ॥
इंगितज्ञ ते दुर्जय बनती । लक्ष्य आपुलें अचुक साधिती ।
तोंवरि लपुनी देहीं बसती । करिती नानाचार ॥ ३ ॥
विवेक-शस्त्रें सज्ज होउनी । ज्ञानें काढा त्यां हुडकोनी ।
सावध त्यांसीं युद्ध करोनी । जिंका ते झुंजार ॥ ४ ॥
विनायक विनवी प्रभु दत्ताला । पाठी घाला या आम्हांला ।
रिपुहत आम्हीं शरण पदाला । चुको ही येरझार ॥ ५ ॥

---

४५१. पद ( चाल—नका करूं अविचार० )

धरा मनीं सुविचार । सुजन हो ॥
जाल खचितचि तुम्हीं त्या योगें । तरुनि हा भवसागर पार ॥ध्रु०॥
स्वार्थबुद्धि जरी तुम्हां न सोडी । पुन्हां पुन्हां ती भ्रमांत पाडी ।
विवेकाचा अनुबंध तोडी । फसूं नका साचार ॥ १ ॥
श्रीगुरुभजनीं ती योजावी । तिची उपेक्षा मुळिं न करावी ।
जागृतावस्था न सांडावी । ढळूं न द्या निर्धार ॥ २ ॥
नरजन्मासी आलीयासीं । पशुसम व्हावें न निश्चयेंसीं ।
साधा त्याच्या सार्थक्यासीं । हेंच उपदेशसार ॥ ३ ॥
साधुसज्जनीं द्रोह न धरणें । ईश्वरभक्ती सादर करणें ।
देवस्थानीं नम्र राहणें । शोभन हा आचार ॥ ४ ॥
निंदा करितां द्विजदेवांची । तैशी प्रभुच्या प्रियभक्तांची ।
हानि होतसे सर्वस्वाची । न घडे मग प्रतिकार ॥ ५ ॥

देव-मार्गा उपहासिती । असत्यारोपें त्यां दूषिती ।
भगवत्प्रबंधीं विकल्प धरिती । जिवंत ते जळणार ॥ ६ ॥
यास्तव त्यांची संगति टाळा । स्वार्थालागीं पडुं दे आळा ।
प्राणापरिसही शास्त्र पाळा । तयें होय उद्धार ॥ ७ ॥
विनायक म्हणे गुरु-भजनाला । करितां लागे चिंता त्याला ।
तारिल त्वरितची स्वयें तुम्हांला । श्रीगुरु परमोदार ॥ ८ ॥

---

## ४५२. पद ( चाल — एकला नयनाला० )

वाहुनि घ्यावें सदां देवकार्याला ॥ ध्रु० ॥
सोडि न पिपिलिका शर्करेसीं । सिद्ध होय मरणाला ॥ १ ॥
आजीवित-व्रत-परिपालन जें । तेंच युक्त धीराला ॥ २ ॥
उपासनेला दृढ चालवितां । यश खचित वरिल तुजला ॥ ३ ॥
निश्चय हा धरुनि मनीं । जिंकीं सर्वही संकटांला ॥ ४ ॥

---

## ४५३. पद ( चाल — मम आत्मा गमला० )

जननिंदा न गणावी । विषसम हितकर बनत हरि-भजन-साधक ती जाणावी ॥ ध्रु० ॥ मधुर अमृतसम परम-रसदा, गुण-गायनीं स्फूर्तिदा साहितां शांतिदा विनम्र करी हरिपदीं वृत्तिलय साधवी ॥ १ ॥

---

## ४५४. पद ( चाल — वरि गरिबा वीरा जी० )

बन बहिरा तूं जननिंदेला । सेवित राहा गुरुचरणांला ॥ ध्रु० ॥
तितिक्षुत्व तुज साध्य व्हावया । ठेवीं गुरुवरि दृढ श्रद्धेला ॥ १ ॥

अनंत-वृश्चिक-दंश-कठोरा। गिरा परिसतां धरिं धैर्याला ॥ २ ॥
स्तुति-विष धीरांनांहि माजवी। यास्तव जिंकीं तन्मोहाला ॥ ३ ॥
खिजवितां कोणी शांत असावें। न आंचवावें उपासनेला ॥ ४ ॥
इह जरि नाहीं पुढती सद्गुरु। सुखवितील तुज विनायकाला ॥५॥

---

## ४५५. पद ( चाल—श्रीरंग गोपिकोत्संग० )

तुज नको काय कुणि भको मन न तव ठको इतर जनवार्ता। तूं सोडूं नको आपुल्या स्वहिताच्या मार्गा ॥ ध्रु० ॥ ऐकसी जरि अनुसरसी स्वपथ सांडिसी मुकसि दोंहीला। ठरुनि मूर्ख परिणामीं पावसि खेदाला। चाल—पुरुषार्थ त्यांत साधिसील कोणता। उलट जगीं तुझी होय उपहास्यता ॥ समजुनी बोध ठसवुनी विवेक धरुनी कुवच सोसावें। न पडुनि बळी मोहाला स्वहित गमवावें ॥ १ ॥ पाहती धीट तूं किती विनोद करिती तुवां न फसावें। तूं न जनांच्या निंदास्तुतिला वश व्हावें। चाल—उपासनाव्रत तुझें तूं न भंगवीं। आजन्म तें दृढनिश्चयें चालवीं ॥ जरि खुळें निर्धारबळें देव तुज वळे। संशय न कांहीं वासुदेव-कृपेनें मंगल घडे पाहीं ॥ २ ॥

---

## ४५६. पद ( चाल—वरि गरिबा वीरा जी० )

मन तव कैसें दुर्बल धीरा। याच्या करिं तूं पूर्ण विचारा ॥ ध्रु० ॥
देवा भजणें न अपराध हा। देई न संशयाला थारा ॥ १ ॥
डगमगसी कां प्रारब्धाला। अपरिहार्य तुज विदित उदारा ॥ २ ॥
कां वश होसी निंदास्तुतिला। कांहीं वदोत जन परभारां ॥ ३ ॥

भीसी कां तूं द्वंद्वांलागीं । घट्ट बनोनी साहीं विकारां ॥ ४ ॥
व्यवहारीं तूं चतुर शहाणा । जाणीं मायेच्या बाजारा ॥ ५ ॥
हार न खाईं संगर जिंकीं । उपासनेच्या धरिं आधारा ॥ ६ ॥
उपदेशी गुरु विनायकाला । या कथुनी बोधामृतसारा ॥ ७ ॥

---

### ४५७. पद ( चाल—या नव नवल नयनोत्सवा० )

गा गुण गुणन गुणभाजना
गुणनीं गुण गुणतां अगणित रसगुण ये
दाटुनि गुणगायना ॥ ध्रु० ॥
प्रेमगुणें त्या गुणित करोनी रमवावें गुणगानीं
गुणन गुणनिका त्या अर्पोनी करिं गुणनीय पूजना ॥ १ ॥

---

### ४५८. पद ( चाल—कवन सुख पाये० )

शरण गुरुपायीं । होउनी ध्याय गुरुरूप निजठायीं ॥ ध्रु० ॥
भवनाश साधुनी । द्वैत तोडोनी । परमामृत लभे मना या
उपायीं ॥ १ ॥ गिरि सह्य गांठुनी । सेव दत्तमुनी । गुरु त्याविण
अन्य न तो शेषशायी ॥ २ ॥

---

### ४५९. पद ( फटका )

धर्मरक्षणीं दक्ष राहुनी मोक्षमार्ग तूं सदा वरीं ।
प्रापंचाची चटक घेउनी अधर्मसेवा कधिं न करीं ॥
इहपर सौख्या लाभायासी ईश्वरभजनीं लोभ धरीं ।
वासनांचा फंद सांडुनी देवछंद तूं आदरीं ॥

आत्तनासम भोग लाधती चिंता नसावी त्वदंतरीं ।
पुण्याईचा ओघ वळविणें विषयकारणीं नको तरी ॥
धर्मध्वजित्वा त्यजोनिं दुरी ।
प्रेमवृत्ति तूं ठेव खरी ।
कोण मग पावे तुझी सरी ।
पुष्पवृष्टि सुर करिति शिरीं ।
विनायकाला बोधामृत हें पाजी श्रीगुरु कृपाभरीं ॥ १ ॥

---

## ४६०. पद ( फटका )

भजनमार्ग हा सुलभ तयाचा आदर मनुजा सुखें करीं ।
देवाच्या तूं गुणा गाउनी निर्भयतेला मनीं धरीं ॥
जें जें कांहीं तुजला प्रिय तें अर्पुनि तें तें पूजिं हरी ।
लाजलज्जा खुंटिस लावुनी ईशाच्या तूं भरीं भरी ॥
नाच रंग तसे ढंग सर्वही सेवीं त्यांतें परोपरी ।
हृदयखुलावट होय जयानें ढोंगसोंग तें नित्य वरीं ॥
भिन्नपथ भिन्न मतांतरीं ।
गुरफटुनि तूं न जाय तरी ।
भ्रान्तिभूलींनां लकटुनि दुरी ।
भीड कुणाची धरी न बरी ।
कल्याणाचा पंथ न त्यजिणें करामत तुझी हीच खरी ॥ १ ॥
अरुणोदयीं जागृत होउनी ईश्वरमूर्ति सगुण स्मरीं ।
अपराधांची क्षमा माग निज प्रधानकर्तव्य आदरीं ॥

ज्या ज्या उपचारांतें सेविसि ते ते योजीं परमेश्वरीं ।
अखंड ऐसें स्मरण ठेवुनी राहे देवीं निरंतरीं ॥
सृष्टिनिरीक्षण करितां चिंतीं भगवत्कृतीतें निजांतरीं ।
कृतज्ञतेनें भरुनि येतां लोटे प्रेमा त्या न सरी ॥
बोलेल मग तव वैखरी ।
जिव्हाळ्याचे शब्द तरी ।
हरियशगाथा तीच खरी ।
सेव सदा ती सुमाधुरी ।
म्हणे विनायक वासुदेव हे शिकवण शिकवी तिज न सरी ॥ २ ॥

---

४६१. पद (फटका)

धर्मलंड तूं भंड माजवुनि वितण्डवादें तण्डुं नको ।
कुतर्कांचें बंड उभारुनि पाखंड लोकीं पसरुं नको ॥
परंपरागतिं खंड पाडुनी वण्ड-मूर्ख तूं होऊं नको ।
अधर्माचें मण्डरुप-रण्डा-पानासक्ती धरूं नको ॥
आचारांची सांड करुनि वण्ड शण्ड तूं बनूं नको ।
विद्वत्तेचा टंक वाहुनी परधर्मदण्ड सेवूं नको ॥
शौण्ड-शरण्डसम वर्तुं नको ।
वारुण्डवृत्ति धरूं नको ।
षण्डपण्डता मिरवुं नको ।
पिण्डकपिण्डा स्पर्शुं नको ।
पिचण्डभरणीं शौण्डिर असणें इति-कर्तव्या समजुं नको ॥ १ ॥

---

४६२. पद ( चाल — माया जळली कां० )

करणें अवश्य का । कर्तव्य असें ठरतें का ॥
धर्म्य यशस्कर लोकमान्य तें हितकर आहे का ॥ ध्रु० ॥
संमत श्रुतिला का । परंपरेला साजे का ॥
परपीडक तें नाहीं मन अशि ग्वाही देतें का ॥ १ ॥
सुकृत लाभे का । पापसंबंध नसेच का ॥
हानि न किमपि जाति-कुल-देशा ऐसें पटतें का ॥ २ ॥
असे सुखसाध्य का । कष्ट न वायां जाती का ॥
धन मान आणि मित्रसाहाय्यहि अपणां मिळती का ॥ ३ ॥
वृद्धां माने का । सज्जन पसंत करती का ॥
युक्त मानुनी ज्ञातेजनही मान तुकविती का ॥ ४ ॥
देवा रुचेल का । प्रिय तयाचें साधेल का ॥
अशा विचारें कार्य-प्रवृत्ती निष्फल होई का ॥ ५ ॥

---

४६३. पद ( चाल — श्रीमंत पतीची राणी० )

परनार मृत्युची मूर्ती । धरुं नको मुळिं तिथें प्रीती ॥
ही प्रळयाग्नि-शिखा मूर्त । सोन्याचा असि निश्चीतीं ॥
हें हलाहलविष कीं स्पष्ट । हा तक्षक सुंदरकान्ती ॥
हा कठोर पवि इंद्राचा । करणार छिन्न आघातीं ॥
हा माज तीक्ष्ण मद्याचा
हा रोग घोर नेत्रांचा
हा तिजा नेत्र सांबाचा
चिंतनेंच मरशिल जीवा । अभिलाष नको तुज चित्तीं ॥ १ ॥

४६४. पद ( चाल – आम्हीं दैवाचे दैवाचे० )

वदावें वाचे देवाचें नाम सुखेंसीं
शमे काम, लभे दाम, मिळे क्षेम मतीसीं ॥ ध्रु० ॥
प्रीति जडे प्रेमा जागे ।
म्हणुनियां वेड लगे ।
वृत्ति तेणें तेथ तगे ।
देहाचें भान नुरे पवे लयासीं ॥ १ ॥
देवाची कांति थाटे ।
घनरूपें जणों वाटे ।
आम्हांठायीं विनटे ।
त्यायोगें देवपणा येत अम्हांसीं ॥ २ ॥
गाउं सर्व दत्तं दत्तं ।
चित्त करूं प्रत्तं प्रत्तं
वरूं छंदा नृत्तं नृत्तं ।
छुम छुम छुम रंगवुं येथ या ध्वनीसीं ॥ ३ ॥

४६५. पद ( चाल – जनमानसमंदिरांत० )

गुणगायन प्रेमयुक्त । करूनी मतिला प्रसक्त, ।
विकसवीं, लया लभुनी, । अंतरांत, होइं रक्त ॥ ध्रु० ॥
बन तन्मय, सामरस्य । पवुनी, मधु साध लास्य, ।
त्यजिं लज्जा, विसर द्वैत, । भक्ता पथ हाच युक्त ॥ १ ॥

# ( १६ ) वैराग्य

## ४६६. पद ( चाल – हरिभजनावीण० )

मधुर तुजसि वाटतसे संग नारीचा ॥ ध्रु० ॥
परि फससि अज्ञ नरा । विचार जरी करिसि बरा ।
म्हणसिल मग त्याज्य खरा । विषय तेथिंचा ॥ १ ॥
अधरामृत म्हणसिल विष । अंगसंगिं निरयदोष ।
कैसा उपजे अभिलाष । रतिसौख्याचा ॥ २ ॥
भोगितां न तृप्ति होय । ध्यान करी भ्रष्ट हृदय ।
बहुत घडवि तुज अपाय । भोग योनिचा ॥ ३ ॥
युवति-सहस्रें दश-शिर । तोष न धरी असुरवर ।
होइ अन्य-दार-हर । अतृप्त साचा ॥ ४ ॥
वंशक्षय पावुनियां । विभव सकळ जाय लया ।
स्त्री-विषय करित तया । भाग मृत्युचा ॥ ५ ॥
नाहुषाचा अनुभव । कधिं न होय तृप्तभाव ।
उपभोगें अधिकोद्भव । स्त्री-कामाचा ॥ ६ ॥
म्हणुनि भजें दत्तगुरू । भक्त-काम-कल्पतरू ।
तरसिल हा भव दुस्तरू । निश्चयवाचा ॥ ७ ॥

---

## ४६७. पद ( चाल – मित्रा मम जन्मकथा० )

स्त्री-स्वरुपें अग्नि नटे प्रळयकाळिंचा ॥ ध्रु० ॥
नयनिं उभा मदन सशर । कटाक्ष निशित बाण खर
प्रेरुनि करि दग्धांतर । तुजसि साचा ॥ १ ॥

४६४. पद ( चाल – आम्हीं दैवाचे दैवाचे० )

वदावें वाचे देवाचें नाम सुखेंसीं
शमे काम, लभे दाम, मिळे क्षेम मतीसीं ॥ ध्रु० ॥
प्रीति जडे प्रेमा जागे ।
म्हणुनियां वेड लगे ।
वृत्ति तेणें तेथ तगे ।
देहाचें भान नुरे पवे लयासीं ॥ १ ॥
देवाची कांति थाटे ।
घनरूपें जणों वाटे ।
आम्हांठायीं विनटे ।
त्यायोगें देवपणा येत अम्हांसीं ॥ २ ॥
गाउं सर्व दत्तं दत्तं ।
चित्त करूं प्रत्तं प्रत्तं
वरुं छंदा नृत्तं नृत्तं ।
छुम छुम छुम रंगवुं येथ या ध्वनीसीं ॥ ३ ॥

---

४६५. पद ( चाल – जनमानसमंदिरांत० )

गुणगायन प्रेमयुक्त । करुनी मतिला प्रसक्त, ।
विकसवीं, लया लभुनी, । अंतरांत, होईं रक्त ॥ ध्रु० ॥
बन तन्मय, सामरस्य । पवुनी, मधु साध लास्य, ।
त्यजिं लज्जा, विसर द्वैत, । भक्ता पथ हाच युक्त ॥ १ ॥

---

## ( १६ ) वैराग्य

### ४६६. पद ( चाल — हरिभजनावीण० )

मधुर तुजसि वाटतसे संग नारीचा ।। ध्रु० ।।
परि फससि अज्ञ नरा । विचार जरी करिसि बरा ।
म्हणसिल मग त्याज्य खरा । विषय तेथिंचा ।। १ ।।
अधरामृत म्हणसिल विष । अंगसंगिं निरयदोष ।
कैसा उपजे अभिलाष । रतिसौख्याचा ।। २ ।।
भोगितां न तृप्ति होय । ध्यान करी भ्रष्ट हृदय ।
बहुत घडवि तुज अपाय । भोग योनिचा ।। ३ ।।
युवति-सहस्त्रें दश-शिर । तोष न धरी असुरवर ।
होइ अन्य-दार-हर । अतृप्त साचा ।। ४ ।।
वंशक्षय पावुनियां । विभव सकळ जाय लया ।
स्त्री-विषय करित तया । भाग मृत्युचा ।। ५ ।।
नाहुषाचा अनुभव । कधिं न होय तृप्तभाव ।
उपभोगें अधिकोद्भव । स्त्री-कामाचा ।। ६ ।।
म्हणुनि भजें दत्तगुरू । भक्त-काम-कल्पतरू ।
तरसिल हा भव दुस्तरू । निश्चयवाचा ।। ७ ।।

---

### ४६७. पद ( चाल — मित्रा मम जन्मकथा० )

स्त्री-स्वरुपें अग्नि नटे प्रळयकाळिंचा ।। ध्रु० ।।
नयनिं उभा मदन सशर । कटाक्ष निशित बाण खर
प्रेरुनि करि दग्धांतर । तुजसि साचा ।। १ ।।

ऐकवुनी वल्गु गिरा । प्राशवित मोहमदिरा ।
हतबुद्ध होसि नरा । दास युवतिचा ।। २ ।।
नारीचे पीवर कुच । दोन शिरें स्पष्ट हींच ।
द्विशीर्ष वा मूर्त साच । प्रगट येथिंचा ।। ३ ।।
स्पर्श हेंचि दुर्धर विष । करित सकळ धैर्यशोष ।
स्मृति हरि तव निःशेष । गंध अंगिंचा ।। ४ ।।
संभोगीं श्वास मधुर । मंद-हसित चेतोहर ।
केलि-राग कुतुहलभर । सुरत-रसाचा ।। ५ ।।
वित्तवीर्यचित्तहरण । देहलता सुकवि जाण ।
संग समज स्वीय मरण । स्त्री-देहाचा ।। ६ ।।
नितंब हेच पापगिरी । भोगालय नरक-दरी ।
म्हणुनि नरा वीट धरीं । दुःसंगाचा ।। ७ ।।
त्यजुनि दुष्ट भोगकाम । करुनि शुद्ध हृदय-धाम ।
धरीं मातृभाव परम । आनंदाचा ।। ८ ।।
विधि-हरि-हरां खेळवित । तुजसि काय सुवश होत ।
कैसा अभिलाष जडत । या मायेचा ।। ९ ।।
नरजन्म देति तुला । मोक्षमार्ग करिति खुला ।
म्हणुनि धरीं भाव भला । कृतज्ञतेचा ।। १० ।।
जननी या सकळ स्त्रिया । नमन करीं नित्य तयां ।
घेई असा साधुनियां । लाभ मुक्तिचा ।। ११ ।।

४६८. पद ( चाल – प्रतिकुल होइल० )

वेड अजुनि तुजला कैसें नाहिं लागलें रे। दत्तकीर्ति गासी तरि-ही मन न गुंगलें रे ॥ध्रु०॥ राहिलासी जागा कैसा विषयसेवनांत। वृत्ति आठव धरि ते कैसी कां न झालि भ्रांत। व्यवहारक्रम न तुझा कां नष्ट होत। मत्त न अजुनि होसी कैसा नवल वाटतें रे ॥ १ ॥ कां न लोकबाह्य तूझा आचार बनला रे। अंगिकार जडत्वाचा कां न करिसी रे। काम क्रोध भलत्याठायीं कां न योजिसी रे। अनुन्मत्त उन्मत्तसा कां न वागसी रे ॥ २ ॥ जनसंग्रहाचा कां न त्याग करिसी रे। चाड लौकिकाची कैसी मुळिं न सांडसी रे। अपवाद घडतां तुजला कां न हर्षसी रे। दत्तरूप होउनि कां न नग्न फिरसी रे ॥ ३ ॥

---

४६९. पद ( चाल – प्रीति जी दुजावरी० )

कपट वेष धरुनि मजला। झटसी कां फसवायाला। मन्मथा ॥ध्रु०॥
तूं पुरुष नारी नटसी। मुख स्त्रीचें मज दाविसी। मन्मथा ॥
सुकुमार भाव बाहेरी। विष भरलें परि अंतरीं। मन्मथा ॥
( चाल ) प्रार्थिसी। मधुर हांससी। चरण वंदिसी।
धरुनि विनयाला। तत्पर तूं मोहायाला। मन्मथा ॥ १ ॥

साधुनी समय स्पर्शातें। करिसी मनःक्षोभा यातें। मन्मथा ॥
प्रेरुनी शर कटाक्षाचे। विंधिसि तूं वर्म हृदयाचें। मन्मथा ॥
( चाल ) चुंबिसी। जवळि ओढिसी। बाहु पसरसी।
आलिंगनाला। विषयीं मज लोटायाला ॥ मन्मथा ॥ २ ॥

वदनिं वदन तूं घालिसी । अधरामृत प्राशविसी । मन्मथा ॥
अंगिं अंग मेळविसी । इंद्रियें माझीं चेतवीसी । मन्मथा ॥
( चाल ) उच्छ्वास । देति सौख्यास । करिति मज खास ।
सिद्ध सुरताला । सत्त्व माझें भंगायाला ॥ मन्मथा ॥ ३ ॥
ब्रह्मचर्या हारविसी । वित्त वीर्या चाळविसी । मन्मथा ॥
नरकीं मज लोळविसी । त्यांत हर्ष मानवीसी । मन्मथा ॥
( चाल ) सुकृता । होसि भक्षिता । धरिसि अद्यता ।
बद्ध करण्याला । पाशीं निज गोवायाला ॥ मन्मथा ॥ ४ ॥
दास आपुला सजविसी । पापकर्में घडविसी । मन्मथा ॥
आयुः प्रज्ञा यश कीर्ति । तपोव्रतादिहि नासती । मन्मथा ॥
( चाल ) उबगलों । विरति पावलों । शरण जाहलों ।
दत्तचरणांला । दहन तुझें साधायाला ॥ मन्मथा ॥ ५ ॥
ऐक गोष्ट कल्याणाची । कांस धरीं गुरुभक्तिची । मन्मथा ॥
व्हाया अमर तूझी काया । सेविं नित्य अत्रितनया । मन्मथा ॥
( चाल ) पावसी । साधुवृत्तिसी । साधन बनसी ।
तूंच जगताला । भवांतूनी तारायाला ॥ मन्मथा ॥ ६ ॥

---

४७०. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

विषयराग सांडीं । प्राण्या ॥ ध्रु० ॥
हरिच्या प्रेमासाठीं हरिच्या । भजनीं धरीं गोडी ॥ १ ॥
द्वंद्वाच्या तूं पाठिं न लागें । शिथिल करीं बेडी ॥ २ ॥
गळवित करिंच्या पुरुषार्था जी । ती आशा तोडीं ॥ ३ ॥

सिद्धिमदें तूं मत्त न होतां। परमार्थी जोडीं ॥ ४ ॥
वदे विनायक प्रियरुप बनुनी, । द्वैत-भित्ति फोडीं ॥ ५ ॥

---

४७१. पद (चाल—काय पुरुष चळले बाई०)

काय करूं चित्तालागीं। नित्य असे विषयीं रागी।
उमज पडोनी बैरागी। होय ना कधीं हो ॥ ध्रु० ॥
जन्म किती झाले असती। त्याच त्याच भोगीं प्रीति।
रसोद्गमही दाटुनि येती। नवल हें पहा हो ॥ १ ॥
रति उपजे उच्छिष्टासीं। सेविलेंच सेवायासीं।
उबग न घे वृत्ति कैसी। हें तों अपूर्व हो ॥ २ ॥
दुःख आदि अंतीं भोगी। परि न होय विषयीं त्यागी।
हर्ष धरी त्यांच्या संगीं। अविवेक कसा हो ॥ ३ ॥
कळुनि न कळे ऐसें होई। पुन्हां पुन्हां विषयीं जाई।
जणुं नरकीं उडीच घेई। ओढाळ किती हो ॥ ४ ॥
वासुदेव प्रसन्न होती। कृपा विनायकासीं करिती।
तरिच तो पवे जय चित्तीं। न अन्य उपाय हो ॥ ५ ॥

---

४७२. पद (चाल—पोरांसह थोर किती०)

काम मुख्य षडरि किती। चित्ताचें छळण करिति।
बांधुनि तुज तुडविती। अप्रतिहत ते ॥ ध्रु० ॥
निजपाशीं ते गोंविति। हळु हळु मग भक्षिताती।
चैन अशी चालविती। मदोन्मत्त ते ॥ १ ॥

राहुकेतु जेंविं ग्रसिति । चन्द्रदिवाकरांप्रति ।
राक्षस कीं बळि खाती । तेंविं गमत ते ।। २ ।।

वासुदेव जरि होती । कृपापूर्ण तयांप्रती ।
तरीच त्यां मुक्तस्थिती । प्राप्त होय ते ।। ३ ।।

---

४७३. पद ( चाल – तूं टाक चिरुन ही मान० )

सांडुनि विषयांचें ध्यान, हो सावधान
तल्लीन होउनी तूं गुरुचरणीं सोडूं नको अवधान ।। ध्रु० ।।

तूं करी गुणांचें गान
जाण तयाचें महिमान
भरीं कथाश्रवणें कान
योग साध हा दृढ अनुभवें तव गळावें देहभान ।। १ ।।

तूं समाधिनिर्भर डोल
प्रापंचा वनविं फोल
मग नसे सुखासीं मोल
वासनाबलातें क्षीण कराया मनीं धरीं अवसान ।। २ ।।

वासुदेवगुरुचे पाय
आदरिं तुझी तोच माय
त्यासींच तूं शरण जाय
तारील खचित तुज विनायक त्यास तुझा असे अभिमान ।। ३ ।।

---

### ४७४. पद (चाल—मज गमे ऐसा जनक०)

तनु नसे तूझी खचित ही। भ्रांति सारी ॥ ध्रु० ॥
प्राण-त्यक्त ती होतां खाती। काकगृध्रादि प्राणी निश्चिती
अग्निसंपर्क जन घडविती। संशय येथें न मुळिं अणुही ॥ १ ॥
भवार्णवातें कैसा तरसी। तीच्या योगें करिं मननासी
यास्तव चिंतीं निजस्वरुपासी। तेणें राहिल भ्रम न लेशही ॥२॥

---

### ४७५. पद (चाल—मन सुद्ध तुझं गोष्ट हाये०)

चल चल मना हो तूं वेगिन् आतां बैरागी।
प्रापंच सोड भीति कसलि बन रे तूं जोगी
राख फांस तूं अंगीं ॥ ध्रु० ॥
जाळ देहा, करि आशेचें शून्य, ओंकारिला।
घे भोगामंदिं गुंतु नको तोड गांठीला।
तूं रे पट्कन् चल चटकन् थाटुनि त्यागी ॥ १ ॥
वासनाजाल स्वयें खोल खेळ लढाई।
जिंक शत्रु कामादिक करीं बढाई।
ब्रह्मश्री घालिल गळां माळ तुजलागीं ॥ २ ॥
मालक बनसील खचित त्रैलोक्याचा।
म्हणतिल अवतार तुजसिं रे दत्ताचा।
विनायक म्हणे जिवंतपणीं मुक्ती भोगीं ॥ ३ ॥

---

## ( १७ ) ध्यान

### ४७६. पद ( चाल—या नव नवल नयनोत्सवा० )

हा नव-मृदुल-नवनीतसा । हृदयीं ध्यायिसि तूं कमल-दल-रुचि हरी सुखविल अमृत-करसा ॥ ध्रु० ॥ मंद-मधुर-स्मित निज दावोनी । टाकिल मति मोहोनी । हास्यमयता तुज देवोनी । दाटविल प्रेमरसा ॥ १ ॥ निरतिशयसुखानुभवें निर्भर । रिघत नयनीं बाष्पपूर । पुलकांकित तनु जाधिं आर्द्रतर । रमवि तुज प्रियकांतसा ॥ २ ॥

---

### ४७७. पद ( चाल—निजरूपीं जगदाकृति० )

मन ध्यानीं रमवुनी प्रसादा लभुनि अनुभवा चित्त-प्रमोदा ॥ ध्रु० ॥
एकाग्र होतां प्रकाशुनि तें । पाहे मग निज-चरित-विनोदा ॥ १ ॥
पूर्वस्मृतिनें लज्जित अधिकचि । झगटे निर्भर भगवत्पादां ॥ २ ॥
शत्रुमित्र तसे प्रियाऽप्रियादि । स्मरुनि न पावे हर्षविषादां ॥ ३ ॥
ईश्वररूपीं समरस बनतां । विकसुनि अनुपम धरि आल्हादा ॥ ४ ॥
विनायक म्हणे योग सुखाचा । जोडुनि भोगा परमानंदा ॥ ५ ॥

---

### ४७८. पद ( चाल—तरुण कुलीन गोरा० )

सदय रुचिर प्यारा, स्मेराननं, सदय रुचिर प्यारा पाहिजे ध्यानार्थ देव वरोन्मुख चित्ता हरणारा ॥ ध्रु० ॥ चाल—ध्यानांत सगुण जो प्रगटोनी हर्षवी । पाडोनि भूल जो निजरूपीं रंगवी । तिळमात्र स्मृति जो अम्हां द्वैताची नुरवी । तेजोमय सारा, प्रकाशत तेजोमय सारा ॥ १ ॥

---

### ४७९. पद (कटाव)

नवनीतासम मृदुल पाउलें । आरक्ततेनें ठाण दीधलें ।।
पादतलीं तें अतुल शोभलें । उदयास्तांचें लक्षण गमलें ।।
साधुजनोदय दुष्टास्त भले । साधाति एक्यासमयीं वहिलें ।।
हेंच तत्त्व कीं स्पष्ट प्रगटीलें । नखें पांढरीं स्फटिकासम तीं ।।
पीतदीप्ति पदयुग्माप्रति । तेणें अधिकरुचि खुलुन दीसती ।।
जणुं सुवर्णकोंदणीं चमकती । रत्नेंच कीं अपूर्व झळकती ।।
प्रतिबिंबित पीतपट दाविति । अभिनव मुक्ताफलें विलसती ।।
सुकुमार तशीं कठिणही असती । ब्रह्माण्डातें भेदूं शकती ।।
गंगा जेथें घे संभूती । हरिपदपद्मीं तीं विराजती ।।
ऐशा ध्यावें चरणाब्जांसीं । नूपुरादिकीं सुमण्डितांसीं ।।
आकण्ठमाला स्पर्शे ज्यांसीं । अभिनव दृश्यें जीं नयनांसीं ।।
पावन करिती जीं तीर्थांसीं । भरलीं गमती सुधारसेंसीं ।।
सुरासुरमुकुटमणिवृंदांसीं । संगें देती शुभकान्तीसीं ।।
मुनिचित्ता जीं दुर्लभ बनती । भक्तमनीं जीं क्रीडा करिती ।।
साधुजनांसीं सौख्यद होती । परि दुष्टां जीं काळ भासती ।।
सुरतरुसम जीं काम्य पुरविती । दर्शनेंच जीं पापें हरिती ।।
बोधसुधेचें पान करविती । वैराग्याचा उदय साधिती ।।
बाळा आणीं अपुल्या तीं अंतःकरणीं ।।

---

### ४८०. पद (चाल—खेलत नंदकुमार०)

चित्त बने अत्रितनय । ध्यानिं धरिसि जरि मूर्ति मनमोहन ।। ध्रु०।।
आयुधें हातीं शंख चक्र त्रिशूळ । पद्म तैसि गदा कौमुदी गहन ।।१।।

पायिं खडावा पीतांबर कटीं । कंठीं माळा अंगिं गंधलेपन ॥ २ ॥
कनकाचि दीप्ति मूर्त सौदामिनी । तेजें झळकत नयनां रंजन ॥ ३ ॥
विनायकाला संतोषदायिनी । मंगलतनु जी हृदयोन्मादन ॥ ४ ॥

---

४८१. पद ( चाल—सखे मी मुरारी वनीं पाहिला० )

मनीं रेखितां त्या अत्रिनंदना । गुरु भावुनियां हृदयरंजना ॥ ध्रु० ॥
प्रमोदें भरोनी दृढालिंगनीं । वरितां मतिस योजुनी बोधनीं ।
विनायका लाभवि निजदर्शना ॥ १ ॥

---

४८२. पद ( चाल—नयनोंमें बसे मुरारी० )

शरणागति मनें करावी । समरसता तव व्हावी ॥ ध्रु० ॥
मुखपंकज जें स्मितयुक्त तयीं । वृत्ति रमवुनि, हास्यमय होईं ॥ १ ॥
इतरीं रति सांडुनि हाच धरीं । योग विनायक, म्हणे सत्वरीं ॥ २ ॥

---

४८३. पद ( चाल—नवल ही बांसरी० )

धवल ही मोहवी । लोभवी । विरल दंतपंक्ती रमवी ॥ ध्रु० ॥
हसनिं गळवित सुधा गणावी । मधु बनवि विश्वकाय वदात्री ॥
रतिदायी दत्ताची ध्यावी ॥ १ ॥

---

४८४. पद ( चाल—वाजवि वाजवि मुरलीला० )

मोहन-मोदन-स्वरुपाला । धरिं करीं मद्वशीकरणाला ॥ ध्रु० ॥
देखुनि तावक विभवाला । रति उपजो अत्यंता याला ॥
अति विस्मित व्हावें । स्तब्ध बनावें । कांहीं न सुचावें वदण्याला ॥ १ ॥

लोलुप उमोप बघण्याला । होवुनि पावो तन्मयतेला ॥
विसरो अपणांसीं । वपुभेदासीं । समरसता बाणो हृदयाला ॥ २ ॥

दावुनि निजमुखपद्माला । सुरत करावें विनायकाला ॥
सौगंध हुंगुनी । बंभर बनुनी । शोषो तो तन्मकरंदाला ॥ ३ ॥

---

४८५. पद ( चाल—असाचि धांवत येइ० )

उभार, सत्वर, स्वीय शंतमा । सुंदर-कांतिस अमृतोपमा ॥ ध्रु० ॥
प्रिय रमण जसा, प्रियेस सुखवी, बन तैसा, मज गाढ रमवीं,
लुब्ध पावलों थोर संभ्रमा ॥ १ ॥

---

४८६. पद ( चाल—उपवनिं गात कोकिला० )

स्मितमुख देव पाहिला, । रमवाया मातें ये, गमला मज ॥
हृदयनाथ मधु सजला, । मन्मथरूपी दिसला,
रमत चित्त, सांगुं किती, खुलुनी तरी ॥ १ ॥

---

४८७. पद ( चाल—मानपुजारे मेरी० )

ध्यान धरा रे चित्तीं । हसन मंद जें त्याचें ॥ ध्रु० ॥
अमृत-निर्झर पवुनि थटाल । तन्मय, सौख्यभर अनुभवाल, ।
मोहन होइल हृदयाचें, ॥ शमा लभा, ऐक्य वरा,
रसभर येवो । मोदन होय मनाचें ॥ १ ॥

---

४८८. पद ( चाल – मधुवदना सखिच्या रम्य त्या० )

स्मित मधुला लभतां, अमृतीं
थोरवी न गणुनी, माधुरी सेवीं ।
दंग बनें, रतीस धरीं, । तन्मय रमें लयास वरीं ।
ध्यानिं पहातां प्रभुच्या मूर्तिला ॥

---

४८९. पद ( चाल – कैसी बनी बांसरी० )

चित्तीं बने बावरा, पाहातां
सुंदर तनुला दत्त-विभूच्या
मधुर भावना येतां उठोनी
समरस होतो लय पवुनी ॥ १ ॥

---

## ( १८ ) वेदान्त

४९०. पद ( धुमाळी० )

प्रभु माझ्या मनिंचा हेतु पुरवा ॥ ध्रु० ॥
पतिरायाची जांचणी दुःसह । ती माझी चुकवा ॥ १ ॥
सासुबाईचा व्याप भयंकर । मज कोठें लपवा ॥ २ ॥
मामाजीची अभेद्य ग्रंथी । भेद तिचा करवा ॥ ३ ॥
कुटिल भावोजी दावा धरिती । भय त्यांचें तुरवा ॥ ४ ॥
विनायकासी स्वीकारोनी । एकांतीं रमवा ॥ ५ ॥

---

### ४९१. पद (चाल—प्रीति जी दुजावरी०)

द्वैतातें नासुनि जीवा। निजस्वरुपीं घे विसावा। बुधवरा ॥ ध्रु० ॥

दुजेपण हें लटिकें जाणीं। बोधीं या ठेवीं स्मरणीं। बुधवरा ॥
प्रज्ञानघन तूं श्रुतिवाणी। अवधारीं अंतःकरणीं। बुधवरा ॥
(चाल) ध्याउनी। तत्व हें मनीं। सत्य उमजुनी।
योग साधावा। जेणें तव भ्रम निरसावा ॥ बुधवरा ॥ १ ॥

येथ ब्रह्मादिकहि भुलले। दास अविद्येचे झाले। बुधवरा ॥
गुरुभजनें ज्ञान लाभलें। महत्त्वासि तेणें चढले। बुधवरा ॥
(चाल) सेवुनी। दत्तगुरुमुनि। लीन होउनी।
अर्पिं सर्वस्वा। पावसी तूं ऐक्यभावा ॥ बुधवरा ॥ २ ॥

---

### ४९२. पद (चाल—बीज पेरावें०)

नाटक पहावें। विश्वरहस्य ओळखावें ॥ ध्रु० ॥

कृतांत मधुराकृति सूत्रधार। नटी मोहिनी नटली सुंदर।
कामादिक हे बनले नटवर। नवल देखावें ॥ १ ॥
काम सजोनी स्त्रीवेषधारी। शृंगारचेष्टा बहु आचरी।
मत्सर योजी निज किंकरी। तुवां न फसावें ॥ २ ॥
संविधानकें प्रापंचाचीं। कार्यें प्रमुखत्वें मोहाचीं।
मद भासवी सुखामोदाचीं। भान राखावें ॥ ३ ॥
संधिविग्रह लोभक्रोधाचे। दाविति अभिनय कापट्याचे।
द्योतन सारें मनोवृत्तिचें। तुवां लक्षावें ॥ ४ ॥
नाट्यभूमि तनु भूतमात्राची। देहावस्था पाटि येथींची।
अंतीं भेटी यमसदनाची। धैर्य न गळावें ॥ ५ ॥

विनायक म्हणे जीव नासला । प्रयोगीं या ऐक्य पावला ।
वासनेनें मूर्ख बनविला । सार जाणावें ॥ ६ ॥

---

४९३. पद ( चाल—साध्य नसे मुनि० )

त्याग जो वासनेचा । म्हणती ज्ञाते मोक्षचि साचा ॥ ध्रु० ॥
हरिमय होऊन ध्याई हरिला
भाव दुजा ज्या नुरला । साधे त्यासी जय चित्ताचा ॥ १ ॥
चित्तनिरोधें योगा पावे
शांतिनें चिर सुखावे । जोडी लाभ अमृतत्वाचा ॥ २ ॥
विनायक बोले श्रीगुरुचरणीं
सिद्ध जो सर्वार्पणीं । त्या ये भाव भगवंताचा ॥ ३ ॥

---

४९४. पद ( चाल—मज गमे ऐसा जनक तो० )

पति तुझा कैसा सांग हें । कोण कुठला ॥ ध्रु० ॥
म्हणसी वरिलें जया विवाहीं
तो तरि येथें पडुनी राही
दुःख कुणास्तव करिसी पाहीं
अविवेक काय तव हा नोहे ॥ १ ॥
प्राणा जरि तूं भर्ता वदसी
पूर्वसंबंध काय जाणसी
पुढें तया गति काय बोलसी
हा तव केवळ मोहचि आहे ॥ २ ॥

---

## ( १९ ) मन

### ४९५. पद ( चाल—मज गमे ऐसा० )

मन तुझें बनवीं धीर रे । करीं वश रे ।। ध्रु० ।।

फसणुक होइल तव न कुठेंही ।
प्रापंचीं तशि परमार्थींही ।।
येतिल हातीं सर्व सिद्धिही
वीरात्मा तूं शोभशील रे ।। १ ।।

माकडचेष्टा खेळे मन हें
तुजला तैसें नाचवीत हें
दोष घडवुनी आणी पाहें
त्यास जिंकुनी जयी होइं रे ।। २ ।।

जेता त्याचा बनतां होसी
अजिंक्य तूं या त्रैलोक्यासी
ब्रह्माण्डावरि सत्ता लभसी
भाग्या तुझिया मिती नुरे रे ।। ३ ।।

सर्वावस्थीं एकरूपता
अढळ तुझी ती नित्य राहतां
येइल तुजला परमेश्वरता
पारमेष्ठ्यपद भोगशील रे ।। ४ ।।

### ४९६. पद ( चाल—बळ ज्याचें त्यास तें० )

मन कैसें खेळतें । प्रेम उठवुनि विषयीं एक्या त्यास त्यजी, उपजवी दुजी रति इतरीं सहज तें ।। ध्रु० ।। त्यासहि सोडुनि सेवि अन्य तें । क्षणोक्षणीं वदल लक्षणीं बहुरूपी होय तें ।। १ ।। विकारि बनुनी ढंग आचरी । परोपरी खुलावट करी जग उलटें दावितें ।।२।।

---

### ४९७. पद ( चाल—ये काल कसा० )

उभारीत कसा मन नाच पहा । आपण न श्रमतां तुज श्रमवि अहा ।। ध्रु० ।। तिमिर पातलें जरि नयनासी निशा जरि तुज दाटे । भोवंडित तुज नित्य सुटे तें यास्तव त्या वश करित रहा ।। १ ।।

---

### ४९८. पद ( चाल—जठरानल शमवाया० )

शरणागति कशि करिसी जीवा । मना शत्रुतें काय न ठावें ।। ध्रु० ।।
बांधुनि तुजला विषयीं घाली । घडवी तुजला थोर अघाली ।
कळुं न देत तुज कुदशा आली । अंध करी तुज मत्सरभावें ।। १ ।।

---

### ४९९. पद ( चाल—श्वानाहुनि अति नीच० )

वैरी मन अति दुष्ट असें हें लोटीं अपायीं न कळतां ।
यास्तव त्यासी वश होवोनी कां घात ओढवुनि घेतां ।। ध्रु० ।।
दाखवि भलतें दृश्य तुम्हांसी मानुनि सत्य कसे फसतां ।
विकृत आपण होउनि बनवी तसे तुम्हांस न ओळखितां ।। १ ।।
चाळे याचे दुर्गम दुःखद कौतुकार्ह ते कसे करितां ।
विश्वासघातकी अनिवार याची कांस कशी धरितां ।। २ ।।

चांचल्याचा चवचालपणा सुखें कसा तुम्हीं अनुभवितां ।
कापट्याचा खेळ खेळतां कसें तुम्हीं अंगिकारितां ॥ ३ ॥
तें उभारी संशयाला
साच मानितां कसें त्याला
उठवी द्रोहमत्सराला
तुम्हीं बळी पडतां हालां
पाडुनि इरेस कुमार्गाला
लावितां रुचे तुम्हांला
निरयसाधन दुष्ट संग हा
सिद्ध न कां वारायाला
उपेक्षा याची करितां केंविं हें तत्पर तुमच्या घाता ॥ ४ ॥

---

५००. पद ( चाल—नागिणी चपल० )

जारिणी रतिस धरि जारीं । मनःस्थितिही तशि पाहीं उन्मार्गगामिनी भारी ॥ ध्रु० ॥ चांचल्याची सीमा परमा । कोठें न पवे क्षणहि विरामा । नवी नवी मारि भरारी ॥ १ ॥

---

५०१. पद ( चाल—जरि करिन सकल खलकार्य० )

मन करिशिल वश तरि जन्म सफल ।
कधिं न होसि तूं संकटीं विकल ॥ ध्रु० ॥
अवश तोंवरी मूर्खत्वाला
मिती न राहिल बुडविल तुजला
असुख-निरयांत खचितचि जाणीं
म्हणुनि करीं शीघ्र तें अचल ॥ १ ॥

---

## ( २० ) एकादशी

### ५०२. पद ( चाल—प्रीति जी दुजावरी० )

व्रत आचरितां श्रीहरिचें । दुर्लभ ही लभतें साचें । मानवा ।। ध्रु० ।।
अटळ दैव परि तें भंगे । अनुकूल होय व्रत-योगें । मानवा ।।
याच जन्मीं काम्य साधे । सिद्धि-सामर्थ्यानुबंधें । मानवा ।।
( चाल ) तीव्रता । तेंवि सिद्धता । होय तत्वतां ।
म्हणुनि दृढतेला । धरुनि तूं पाव सिद्धीला ।। मानवा ।। १ ।।
आप्तकाम होतां बनसी । शुद्धचित्त अविलंबेंसीं । मानवा ।।
ज्ञान हृदयीं प्रकाशेल । सच्चित्सुखमय बनवील । मानवा ।।
( चाल ) मुक्तिला । वेद बोलिला । मार्ग हा भला ।
व्रताचरणाचा । अंगिकार करिं तूं याचा ।। मानवा ।। २ ।।

---

### ५०३. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

हरिजागर करिं रे । हरिदिनीं ।। ध्रु० ।।
अगाध महिमा अगाध गरिमा । पर्व हें साध रे ।। १ ।।
इहपर मंगल प्राप्त होउनी । सुखमय बनसी रे ।। २ ।।
परमात्म्याला प्रियतम होशी । ज्ञान उपजेल रे ।। ३ ।।
वैकुंठीं तुज ठाव लाभुनी । हरिपण येईल रे ।। ४ ।।
म्हणे विनायक या सदुपायीं । तर हा भवांबुधि रे ।। ५ ।।

---

### ५०४. पद ( चाल—धांव त्रिभो० )

एकादशीव्रत अनुपम जगतीं । नाहीं त्याच्या पुण्या गणती ।। ध्रु० ।।
वैकुंठीं दे वास चिरंतन । येत विष्णुता साकारोन ।। १ ।।

सरळ सुखाचा निधि बनवीत । दुर्दैवाचा घडवी घात ।। २ ।।
दहा इंद्रियें मन एकादश । आहार त्यां न देणें लेश ।। ३ ।।
योग साध हा उपोषणाचा । जागर करिं तूं रात्रीं साचा ।। ४ ।।
दुर्लभ सिद्धी लभसी सहजीं । म्हणुनि व्रतीं या अपणां योजीं ।।५।।
म्हणे विनायक अगाध महिमा । येथ रमाही पावत लघिमा ।। ६ ।।

---

**५०५. पद** ( चाल—कष्ट देति फार० )

एकादशी आचर तूं नित्य मानवा ।
होशिल मग खास श्रेष्ठ श्रीरमाधवा ।। ध्रु० ।।
सर्व सिद्धि प्राप्त होत स्वर्ग लाभतो ।
अश्वमेधयज्ञपुण्य मोक्ष जोडतो ।
अटळ भाललेख तोहि भंग पावतो ।
हरिवासरव्रत सेवुनि तूं भज केशवा ।। १ ।।
जागर उपवास भला विधि तया दिनीं ।
प्रमोद मधुसूदनास गीतनर्तनीं ।
प्रीति तेंवि भजनार्चनीं हर्ष कीर्तनीं ।
यास्तव व्रताचार असा साध वैष्णवा ।। २ ।।

---

**५०६. पद** ( चाल—प्रतिकुल होइल० )

प्रेम कां न धरिसी मूढा हरिसेवनाचें । कां न कळत महत्त्व तुजला या नरदेहाचें ।। ध्रु० ।। विषयभोग जन्मांतरीं काय न भोगिलेस । कां न तृप्त होसी अजुनी कैसा न विटलास । जाणसी न कैसा

सुज्ञा आपुल्या हितास । आतां तरि जागा होईं घे व्रत माधवाचें ।। १ ।। आवडे परम एकादशी तया मधुसूदनासीं । इंद्रियांसहित चित्त लावीं व्रतपालनासीं । अहोरात्र जागा राहें करिं उपवासासी । कीर्तनांत सादर होइं गुण गाय नाचें ।। २ ।। साधुसंत मिळवुनी साधीं अर्चन श्रीपतिचें । काम-क्रोध-अभिमानांसीं शून्य कर साचे । हरिजन-द्रोह तूज नको धरीं पाय त्यांचे । अंबरीष-चरितीं पहा वर्म आचाराचें ।। ३ ।।

---

## ५०७. पद (झंपा)

कथा मंगला बोलुं या पुत्रदेची । पाववी फलसिद्धि जे व्रताची ।। ध्रु० ।। कामना धरुनियां । होय व्रतिं युक्त या । अर्थ साधोनियां ।। मुक्तता ये ।। इहपरहि सद्गति । लाधते निश्चितीं । हीच या फलश्रुति ।। साधनाची ।। १ ।। सेवितां श्रीहरी । होतसे अघ दुरी । शुद्धि ये अंतरीं ।। व्रताचारें ।। प्रारब्धदोषही । नासती सर्वही । महत्त्वी थोर ही ।। विधानाची ।। २ ।। महिजिदाख्य भूपति । लाभला संतती । एकादशीप्रती ।। लोक करुनी ।। लोमश महामति । जेंविं उपदेशिती । जोड जैं योजिती ।। सुकृताची ।। ३ ।। माहात्म्य हें असें । कोण बोले कसें । दृष्टांत त्या नसे ।। द्यावयासी ।। नरा दे विष्णुता । ज्या अशि विशिष्टता । विनायक मौनता ।। धरित वाचे ।। ४ ।।

---

# ( २१ ) संमिश्र

**५०८. पद** ( चाल—कष्ट देति फार० )

मा[१]धव हा मास असे मूर्त मा[२]धव ।
मा[३] धवा[४]सहित भाव प्रकटी माधव[५] ।। ध्रु० ।।
मा[६] धव[७] तो काम त्यास सुवश होइजे ।
मा[६] धव[८] मी दर्प असा हृदयिं योजिजे ।
मा[६] धव[९] तुज मेश-सेवनांत स्पर्शिजे ।
मां[१०]-धव[११]सा ऋतु अनुग्रहो तुजसिं माधव[१२] ।। १ ।।
चित्त-माधवीं[१३]त माधवीय[१४] माधवी[१५] ।
फुलुनि थट्टुनि लीन बनो ललित[१६] माधवीं[२] ।
मन मा[२]पीं लगट करो जशी मा[३] धवीं[४] ।
माधव[१]व्रत सेवुनि तूं होईं मा[२]धव[४] ।। २ ।।
माधवीय रूपशील-चरित्र-फलासवा ।
प्राशुनि तूं कोकिलसा गाय माधवा ।
मा-वर-गुण-पुष्प-मधुप होउनी रवा ।
करित सेव उल्हसुनी प्रकाम माधव ।। ३ ।।
स्नानदानव्रतोपवास-श्रवण-कीर्तनीं ।
आराधीं माधव तूं तन्मय होउनी ।
जन्ममृत्यु हरति तुझे तत्त्व जाणुनि ।
भज भज भज माधवांत श्रीरमाधव ।। ४ ।।

---

१ वैशाख. २ विष्णु. ३ लक्ष्मी. ४ पतिसह. ५ गोड. ६ नकारार्थी. ७ धूर्त, कपटी. ८ धनी. ९ कांपणें. १० विष्णुसा. ११ ( मा = आई; धव = पति; माधव = बाप ) १२ वसंत. १३ पृथ्वी ( संदर्भ—तथा मे माधवी देवी विवरं दातुमर्हति वा. रा. ९।९७।१५ ) १४ माधवाची. १५ वसंतश्री. १६ प्रेमार्द्र.

### ५०९. पद ( चाल – देवकी नंदना० )

भक्तलज्जावना । नत-दुरित-दलना व्यापनादाना ।। ध्रु० ।।
चित्तसंशोधना । संहरीं अघ, करीं बोधना ।
तमहरा, शुभगति मज दे, पुण्यकीर्तना ।। १ ।।

---

### ५१०. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

देव गमे रुसला । मजवरतीं ।। ध्रु० ।।
दावी ना मज निज मुख-कमला । दडुनीयां बसला ।। १ ।।
वनमाळेच्या आमोदाला । देई ना मजला ।। २ ।।
आलिंगनसुख सुंदरवपुचें । घडवी ना याला ।। ३ ।।
पीतपटाच्या पदरापाशीं । दे ना क्रीडेला ।। ४ ।।
लुचण्या लालस मीं तत्तनुला । म्हणुनि झणीं लपला ।। ५ ।।
लोळाया हा उत्सुक आंगीं । गुप्त तरी झाला ।। ६ ।।
विनायकासीं करुणाघन प्रभु । निष्ठुर कीं बनला ।। ७ ।।

---

### ५११. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

अमृतघन वळला । मजवरतीं ।। ध्रु० ।।
झांकी माझी काया सारी । वेष्टुनियां मजला ।। १ ।।
देहीं भरुनी मम हृदयींच्या । शमवी तापाला ।। २ ।।
अनुपम अनुभव विनायकाला । अननुभूत आला ।। ३ ।।

---

५१२. पद ( चाल – कगवा बोले मोरे० )

भजसीं प्रेमा येत आळवितां,
आळवितां, गृणन् मधुरवें
भरोनि हृदयीं समरसता ये ॥ ध्रु० ॥
पुलक उठे तनु कंप लभुनियां
स्वेद-भरें पावत भाव नवा ।
विनायक अनुभवित अभिनंदा ॥ १ ॥

---

५१३. पद ( चाल – सखे झणिं जिंकिला० )

प्रभो तुज वाहिलें । मन हें ।
मूढ बनत, तव हसना मधुरा ।
बघुनि, सांगुं किति, तेथ गुंगलें ॥ ध्रु० ॥
भृंग-सम वचे स्मित-माधुरिला ।
अन्य गमे प्रिय अणुहि न, भुललें ॥ १ ॥

---

५१४. पद ( चाल – चकोरा, मीच तव चंद्रिका० )

हृदीशा, लोभ तव लागला,
न सुटेच मज तो खोल जडेला ॥ ध्रु० ॥
जवळि घे याला, मार्ग न दुसरा ।
कोण मला वदें देइ आसरा ।
नाथ जगतीं तूंच तरि मजला ॥ १ ॥

---

### ५१५. पद ( चाल—प्रतिकुल होइल० )

माझेवरी असो तूझा नित्य कृपाभाव ।
तुजविण नाहीं माझा अन्य कोणी देव ॥ ध्रु० ॥
माझ्यासाठीं कोण सदा प्रेमें कळवळे ।
चातकासि मेघ जैसा नभीं कोण वळे ।
अमृतबिंदु माझ्या वदनीं कोण घालि बळें ।
कां न म्यां तुज प्रार्थावें मजलागीं पाव ॥ १ ॥
माझ्या पाठिमागें उभा असमि दत्तात्रेय ।
रात्रंदिन रक्षिसी मजला बाळा जेंवि माय ।
जें जें इच्छी मन माझें तूं तें देता होय ।
देउं काय उपमेला उरला नाहीं वाव ॥ २ ॥

### ५१६. पद ( चाल—प्रतिकुल होइल० )

कोण जाणे महिमा तूझा सूज्ञ कोण आहे ।
ओझें नित्य प्रापंचाचें शिरिं हा जीव वाहे ॥ ध्रु० ॥
राग-द्वेष-हरिख-दुःख-द्वन्द्वांमाजी पडे ।
शब्द-स्पर्श-रूप-गंध-विषयिं मति जडे ।
लौकिकाचा मोह याला किती सांगुं नडे ।
तेणें व्याकुळ होउनि चित्तीं भ्रांतपणें पाहे ॥ १ ॥
असुनि हृदयीं कोणालाही अनुभवा न येसी ।
सकळ सूत्र हालवोनी कुणा न साक्ष देसी ।
अहंकारबळें प्राणी मिरवि महत्त्वासी ।
असुनि नेत्र झाला अंध कोण तुजसि पाहे ॥ २ ॥

माझ्यासाठीं नाथ आतां प्रगट येथ व्हावें ।
माझ्या चर्मचक्षूलागीं स्वरुप दाखवावें ।
पहातां पहातां तुझेठायीं मिसळोनि जावें ।
तरि आतां येईं सखया देवा लवलाहें ॥ ३ ॥

५१७. पद ( चाल – हांसोनि नाचोनियां आनंदें० )

निर्लज्ज होवोनियां प्रेमानें । नाचूं, गुणांसीं गातां, भरानें ॥ ध्रु० ॥
रसीं ऐक्यता पवुनि, लुटाया । सौख्य तेथिंचें, पूर्ण लोभुं या ॥
रंगुं भुलूं क्रीडानंदीं या । नाचूं, गुणांसीं गातां, भरानें ॥ १ ॥

५१८. पद ( चाल – राधिका चतुर बोले० )

कीर्तिला मधुर गाईं – मना माझ्या दंग होईं – भृंगा ॥
गुणवृंद, प्रेम धरुनी, स्मरुनी, मंद्रस्वरें – गा गा ॥
हृदयहर मन्मथाला – मोहन दत्ताला – गा गा ॥
मधुहास्य मंद विलसे, अमृतमय भासे, आननपद्मिं वसे –
रत तेथ शीघ्र लगटें – अलिसें मूर्त नटें – गा गा ॥
आनंदाची मूर्ती, धर धर तत्प्रीती, गाय रसें गीती,
लया साध, समरसमयी करीं वृत्ती लीन तयीं – भृंगा ॥

५१९. पद ( चाल – मोहन शाम शोभना० )

मन्मथ मूर्त थाटला । मोही मन मधुरस्मित ।
संगिं उत्सुक कराया ॥ ध्रु० ॥
नेत्र मोडि हरवाया । धृति, लज्जा गळवाया, ॥
आपणीं मिळवाया । भाव दावि रतिचा या ॥ १ ॥

५२०. पद ( चाल—कुंजांत हरि हा, क्षणांत दिसला० )

मनांत भरला, मतींत शिरला, वपूंत विरला, ।
उपजविलें मधु कामरसाला ।। ध्रु० ।।
मज भोग तरी घडविला । शरीरीं, वानुं किति विभुला ।।
विसरुनी, प्रभो, संसारा, । वरित तुजलाच देववरा ।। १ ।।

---

५२१. पद ( चाल—विनवुं किति किती कान्हा तुला० )

रमवुं हळुहळू रूपीं मना । सौख्य लभवूं, धरवुं ध्याना, । त्या विसरवूं स्वीय भाना ।। ध्रु० ।। ऐक्य साधे, गुरुमय बने, । हानि अज्ञानास ज्ञानें ।। घडुनि येतां, तें, रसानें । पूर्ण भरुनी सेवि भजना ।। १ ।।

---

५२२. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

जन्म वृथा झाला । श्रीगुरु मम ।। ध्रु० ।।
पात्र न झालों तव प्रीतिला । पापी मी कसला ।। १ ।।
साध्य न केला परमार्थाला । विषयीं हा भुलला ।। २ ।।
स्वार्थ न परमार्था हा साधी । दोहींसी फसला ।। ३ ।।
सौख्याचा तो लेश न उरला । किति सांगूं तुजला ।। ४ ।।

---

५२३. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

कष्ट किती साहूं । गुरुराया ।। ध्रु० ।।
प्रतिकुल झालें दैवचि मजला । कोणा मी बाहूं ।। १ ।।
जिवलग झाले वैरी सखया । अंत नको पाहूं ।। २ ।।

चिंता ग्रासी या पाप्याला । भार किती वाहूं ॥ ३ ॥
अन्न हि मजला दुर्मिळ झालें । कृपा कधिं लाहूं ॥ ४ ॥

---

### ५२४. पद ( चाल—अरसिक किति हा शेला० )

निश्चय स्वामी ठरला । न ढळे तो आतां कल्पांताला ॥ ध्रु० ॥
सांडुनि संसाराला । तव किंकर सजलों पदसेवेला ॥ १ ॥
हेतु न कांहीं उरला । घेईं तूं पदरीं अनुरक्ताला ॥ २ ॥
तृप्तिच आम्हां सकलां । हरिसी जरि तूं सर्वस्वाला ॥ ३ ॥
प्राणही तव कार्याला । अर्पण हे केले दे सिद्धीला ॥ ४ ॥
निश्चय आम्हीं कथिला । तारक तूं होईं तव दासाला ॥ ५ ॥

---

### ५२५. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

दास तुझा भुलला । संसारीं ॥ ध्रु० ॥
सुंदर-ललना-प्रेमकटाक्षीं । बद्धचि जो झाला ॥ १ ॥
सुरतरसाचा सुरसिक बनुनी । मोहीं जो पडला ॥ २ ॥
विश्वासाची जिवलग प्यारी । मानी जो स्त्रीला ॥ ३ ॥
कामोत्कण्ठापीडित हृदयें । श्वान जसा नटला ॥ ४ ॥
अव्यक्ताक्षर-बाल-भाषितें । रंगुनि जो गेला ॥ ५ ॥
गृह-धन-पशु-सुत-लोभा धरुनी । स्वहिता जो ठकला ॥ ६ ॥
रक्षीं आतां दत्ता सखया । या तव दीनाला ॥ ७ ॥

---

### ५२६. पद ( झंपा )

नको नाथजी संगति पापियांची । मूर्त कीं जोड जी यातनांची ॥ ध्रु० ॥ कुणा मृत्यु वनवास । घडवि देहदंडास । कारागृहीं

वास ॥ पात नरकीं ॥ मनस्ताप अवमान । चेतवी दुरभिमान । करित मति वेभान ॥ मानवांची ॥ १ ॥ परघातचिंतनीं । वृत्तितें रमवुनी । धरवि द्वेष सुजनिं ॥ मत्सरानें ॥ जळवि अभ्यंतरीं । दिसवि शांति वरी । बनवि मूर्ति तरी ॥ अधर्माची ॥ २ ॥ माझी करुणा तुला । दीन-जन-वत्सला । येइ जरि कोमला ॥ अर्जि ऐकें । पाखंड-सहवास । कधिं नसो मज खास । पुरविं हे मम आस ॥ अंतरींची ॥ ३ ॥

---

५२७. पद (झंपा)

प्रभो दुर्गति देइं त्या दुर्मदाला । मानिना किमपि जो दुष्ट तुजला ॥ ध्रु० ॥ निरयगति त्यास दे । शोक-भय-मृत्यु दे । नित्य जो का मदें ॥ व्यापियेला ॥ देह त्याचा गदें । पीडुनि राहुं दे । ताप त्या होउं दे ॥ उद्धताला ॥ १ ॥ थोर अपकीर्ति दे । स्वजनद्रोहास दे । इष्ट-जन-हानि दे ॥ दुर्विनीता ॥ मित्र-द्वेषास दे । अहित-संगास दे । कार्यनाशास दे ॥ अहंकृतिला ॥ २ ॥ द्रव्य-क्षय-दुःख दे । परिभवा सतत दे । मनुज-बळ-संहार दे ॥ दुर्यशाला ॥ मानभंगास दे । लोकशत्रुत्व दे । सिद्धि-शून्यत्व दे ॥ दुरात्म्याला ॥ ३ ॥ घोर शिक्षा करीं । शरण ये तोंवरी । नम्रभावा धरी ॥ भजनरति घे ॥ साधुजन आदरी । धर्मपथ आचरी । शुद्ध-प्रेमें वरी ॥ चरण-कमलां ॥ ४ ॥

---

५२८. पद (चाल—अरसिक किति हा शेला०)

उदुंबर-तरु-रुचि मजला । ज्या प्रभुनें अंगिकारीला ॥ ध्रु० ॥
प्रेमा नच इतरांला । सुरद्रुसम जरि प्रिय न दत्ताला ॥ १ ॥

अभिमत मम जीवाला । आदर विभुनें ज्याचा बहु केला ॥ २ ॥
म्हणुनी नमितों त्याला । भेटवील मज जो अत्रितनयाला ॥३॥
याहुनि अन्य न मजला । प्रियतम कांहीं मज दत्तरतिला ॥ ४ ॥

---

५२९. पद ( चाल—मम आत्मा गमला० )

मज वाटे नियमचि हा । न लभत सुखलव अणुहि हरिभजक । सोशी निंदा-दाहा ॥ ध्रु० ॥ निरपराध जरी जन दूषिती । पापात्मा त्या गणिती । दूर तया करिती । वैरी जसा गमे त्यांला दुर्दैव अहा ॥ १ ॥

---

५३०. पद ( चाल—अनृतचि गोपाला० )

तलवार चिंतेची शिरीं असतां
कशि ये मनीं स्थिरता ॥ ध्रु० ॥
सकल लय तिकडे लागे
लक्ष भजनावरुनि चळे
गुरुविण न त्राता ॥ १ ॥

---

५३१. पद ( चाल—किति सांगुं तुला० )

फसणूक कशी मम होत असे ॥ ध्रु० ॥
ना स्वार्थ परमार्थ लाभतसे ॥
दैवभोग पाठी लागतसे ॥
कृपा देवाची न जोडतसे ॥
अनुभव येत कसा, विपरीत असा, अनन्यसा ॥ १ ॥

न कळुनि जरि गुरुभजनास जडे ।।
अनन्तजन्मींचें पाप झडे ।।
मग मलाच कैसें कोण नडे ।।
साधूक्त केंविं वितथ, अनर्थक सुपथ, सांग नाथ ।। २ ।।

---

५३२. पद (चाल—तनु इच्छि सुंदरा०)

क्षमा करा प्रभुवरा । अपराधी खरा । ठावा न नियम मज मुनिवरा । कृपा असावी या पामरा ।। प्रथमागत मीं असें । हें कळवीतसें । चरणिं निज मस्तक ठेवीतसें । लीनता अपुली प्रगटीतसें ।। १ ।।

---

५३३. पद (चाल—तूं बोलल्याविना मी०)

इच्छा तुझीच सारी ऐसेंच मानणार ।
संकल्प अन्य दत्ता नाहींच योजणार ।।
तव हेतु जाणण्यासीं जागाच राहणार ।
पाहून भाव तूझा तैसेंच चिंतिणार ।।
धरुनी मनास तूझ्या आचार म्यां वरावे ।
प्रिय जे तुला गमावे हव्यास ते धरावे ।।
होशील तुष्ट जेणें मजसीं तसा बनेन ।
कांहीं करोनि तूझे चित्तास रीझवीन ।।

---

५३४. पद ( चाल — कुसुमगंध सुटला० )

यश अनुपम बोलूं । साधवीय ॥ ध्रु० ॥
रागभरें रस त्यांतिल घोळूं । सौख्यानें डोलूं ॥ १ ॥
प्रेमाश्रूंतें गातां गाळूं । घोटवुनी लाळू ॥ २ ॥
सर्वात्मत्वें रंगीं मिसळूं । तन्मयता कवळूं ॥ ३ ॥
म्हणे विनायक तनु-मन-मेळू । साधवुनी बोळूं ॥ ४ ॥

---

५३५. पद ( चाल — कुसुमगंध सुटला० )

उभारुनी आला । प्रेमा मज ॥ ध्रु० ॥
नूतनवर्षारंभ आजचा । दत्तकृपें लभला ॥ १ ॥
वात्सल्याचा भाव प्रभूचा । उच्छ्रायें थटला ॥ २ ॥
कृतज्ञतेचा भर हृदयाला । शक्ति न वदण्याला ॥ ३ ॥
अगाध लीला वर्णायाला । ये ना वाचेला ॥ ४ ॥
म्हणे विनायक अगाध श्रीगुरु । येथ असे नटला ॥ ५ ॥

## ( २२ ) निरूपणाचीं मूळपदें

### ५३६. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

दत्त कथा गाई । मनुजा ॥ ध्रु० ॥
वांछा मनिंची दुर्लभ जरि ती । पूर्ण तुझी होई ॥ १ ॥
अनुपम भक्तिप्रेमा उपजे । शांति सुखा देई ॥ २ ॥
शमविल तुझिया हृदयवेदना । दुःख लया नेई ॥ ३ ॥
इहपर मंगल साधेल म्हणुनी । या मार्गें जाई ॥ ४ ॥
म्हणे विनायक रसामृतीं या । नित्य उडी घेई ॥ ५ ॥

---

### ५३७. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

स्वधर्में भज रे । प्रभुला ॥ ध्रु० ॥
निजवर्णाश्रमविहिताचारें । सिद्धि घडे तुज रे ॥ १ ॥
शुद्धभावनेविण न अन्य तो । अपेक्षी तव रे ॥ २ ॥
महानंदा गणिका लाभे । शिवसायुज्या रे ॥ ३ ॥
विनायक बोले दृढतेनें प्रिय । होसी हरिला रे ॥ ४ ॥

---

### ५३८. पद ( चाल — स्मरतां नित्य हरी० )

सद्गुरु-पाय धरीं । तेणें चिंता होय दुरी ॥ ध्रु० ॥
सेविसि जरि गुरु विश्वासानें । रक्षिल खचित तरी ॥ १ ॥
उपाय तारक हाच खरा तुज । निश्चयें आदरीं ॥ २ ॥
अभ्युदयासह परमार्थद हा । धोपट मार्ग वरीं ॥ ३ ॥
गाई प्रेमें चरित तयाचें । कीर्तन-रंग करीं ॥ ४ ॥

## ( २२ ) निरूपणाचीं मूळपदें

### ५३६. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

दत्त कथा गाईं । मनुजा ॥ ध्रु० ॥
वांछा मनिंची दुर्लभ जरि ती । पूर्ण तुझी होई ॥ १ ॥
अनुपम भक्तिप्रेमा उपजे । शांति सुखा देई ॥ २ ॥
शमविल तुझिया हृदयवेदना । दुःख लया नेई ॥ ३ ॥
इहपर मंगल साधेल म्हणुनी । या मार्गें जाईं ॥ ४ ॥
म्हणे विनायक रसामृतीं या । नित्य उडी घेईं ॥ ५ ॥

---

### ५३७. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

स्वधर्मे भज रे । प्रभुला ॥ ध्रु० ॥
निजवर्णाश्रमविहिताचारें । सिद्धि घडे तुज रे ॥ १ ॥
शुद्धभावनेविण न अन्य तो । अपेक्षी तव रे ॥ २ ॥
महानंदा गणिका लाभे । शिवसायुज्या रे ॥ ३ ॥
विनायक बोले दृढतेनें प्रिय । होसी हरिला रे ॥ ४ ॥

---

### ५३८. पद ( चाल — स्मरतां नित्य हरी० )

सद्गुरु-पाय धरीं । तेणें चिंता होय दुरी ॥ ध्रु० ॥
सेविसि जरि गुरु विश्वासानें । रक्षिल खचित तरी ॥ १ ॥
उपाय तारक हाच खरा तुज । निश्चयें आदरीं ॥ २ ॥
अभ्युदयासह परमार्थद हा । धोपट मार्ग वरीं ॥ ३ ॥
गाईं प्रेमें चरित तयाचें । कीर्तन-रंग करीं ॥ ४ ॥

जन्मकर्मादि लीला त्याच्या । वर्णी प्रेमभरीं ॥ ५ ॥
स्वात्मा केला दत्त अत्रिला । तो भज निरंतरीं ॥ ६ ॥
विनायकाला प्रसन्न प्रभु तो । ठेवी हस्त शिरीं ॥ ७ ॥

---

५३९. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

दत्तपदां सेवा । प्रेमें ॥ ध्रु० ॥
अर्थ सर्वही लभती तुम्हां । धरणें या भावा ॥ १ ॥
अंतीं सद्गति होइल खचितचि । निश्चय हा ठेवा ॥ २ ॥
अनुपम अनुभव आयुनृपतिचा । तें चरित्र गावा ॥ ३ ॥
वदे विनायक साधन सुलभ हें । मन तेथें जडवा ॥ ४ ॥

---

५४०. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

विफल कृपा नोहे । गुरुची ॥ ध्रु० ॥
अद्भुत सामर्थ्याची तिजला । हानि न कधीं पाहे ॥ १ ॥
महद्भयेंही होति बापुडीं । अशुभ नाशिताहे ॥ २ ॥
इंदुमतीचा हुंड पिडी जरि । गर्भ अढळ राहे ॥ ३ ॥
म्हणे विनायक आयुनृपकथा । हेंच सांगताहे ॥ ४ ॥

---

५४१. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

समर्थ श्रीभगवान । सद्गुरु ॥ ध्रु० ॥
निश्चयें अशा भजतां त्यासीं । धरी तुझा अभिमान ॥ १ ॥
रात्रंदिन तुज संरक्षी तो । यांत नसे अनुमान ॥ २ ॥
त्रैलोक्यामधिं अतुलशक्तिचा । तोच एक बळवान ॥ ३ ॥

दानव मायेपासुनि तारी । आयूचें संतान ॥ ४ ॥
म्हणे विनायक उपासना-व्रतीं । बनावें धैर्यवान ॥ ५ ॥

---

### ५४२. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

कोण तुला तारी । गुरुविण ॥ ध्रु० ॥
विश्वासाच्या दृढ अनुबंधें । भज तूं त्यास तरी ॥ १ ॥
कनवाळू तो परम कृपाळू । भयें तुझीं वारी ॥ २ ॥
प्रारब्धाचा भोग भोगितां । विषमता निवारी ॥ ३ ॥
आयुसुताच्या वृत्तांताचा । पूर्ण विचार करीं ॥ ४ ॥
म्हणे विनायक श्रीगुरुसेवन । इहपर सुखकारी ॥ ५ ॥

---

### ५४३. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

देवाची करणी । अघटित ॥ ध्रु० ॥
अप्रतर्क्य जें मनोबुद्धीसीं । घडवुनि तें आणी ॥ १ ॥
सर्ग-स्थिति-लय-कारक-प्रभुही । न जाणती शिराणी ॥ २ ॥
अरक्षितांचें रक्षण साधी । अद्भुत बलखाणी ॥ ३ ॥
म्हणे विनायक अगाधता तिची । कोण जगीं जाणी ॥ ४ ॥

---

### ५४४. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

धैर्य तुझें पाही । प्रभु तो ॥ ध्रु० ॥
सकामभक्ती फलवती करुनी । पाडि प्रथम मोहीं ॥ १ ॥
विपत्ति आणी तदनंतर तो । दुःख तदा साहीं ॥ २ ॥
अखंडैक-रसता न भंगतां । पावे लवलाहीं ॥ ३ ॥

निष्कामभक्ति-योगा शिकवी । योगक्षेम वाही ।। ४ ।।
म्हणे विनायक विरत करुनि तुज । तुज सन्निध राही ।।५।।

---

### ५४५. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

भक्तांचा अभिमान । दत्ता ।। ध्रु० ।।
सकाम किंवा असो निष्काम । शुभ वितरे भगवान ।। १ ।।
मनोरथ सर्व पुरवुनि देतो । शुद्ध आत्मज्ञान ।। २ ।।
बाणवि निश्चय विरक्त करि त्यां । स्वयें तो दयावान ।। ३ ।।
भक्तिसुखीं त्या अखंड ठेवी । मोक्ष गमवी सान ।। ४ ।।
म्हणे विनायक भक्त-वैभवा । नसे जगीं उपमान ।। ५ ।।

---

### ५४६. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

चरित-सुधा सेवूं । मधुरा ।। ध्रु० ।।
रसपानें या चिंतारोगा । सहजचि कीं शमवूं ।। १ ।।
तमोमयी जी वृत्ति अंतरीं । प्रकाशमय बनवूं ।। २ ।।
ईशेच्छेसम घडुनी येतें । बोध मनीं ठसवूं ।। ३ ।।
ऋतुध्वज वरी मदालसेला । मर्म हृदया पटवूं ।। ४ ।।
म्हणे विनायक कथाकीर्तनीं । चित्त सदा रमवूं ।। ५ ।।

---

### ५४७. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

भक्तिपथा भज रे । मनुजा ।। ध्रु० ।।
श्रद्धा भक्ती ध्यानयोग हे । श्रुति-कथितोपाय रे ।। १ ।।
भगवत्कथारति करि निर्विण्ण । इतरीं तुज जाण रे ।। २ ।।

श्रद्धालुत्वें मद्भजनपरा । त्याग प्राप्त होत रे ।। ३ ।।
अखंड भक्तीयोग असा ज्या । त्या देव प्रगटत रे ।। ४ ।।
सर्व संशय-निवृत्त होउनी । देवचि तो बनत रे ।। ५ ।।
म्हणे विनायक ज्ञानसुलभता । भक्तियोगें समज रे ।। ६ ।।

---

### ५४८. पद ( चाल—स्मरतां नित्य हरी० )

व्रतचर्या घेई । तेणें शुद्धि मना येई ।। ध्रु० ।।
नियमपालनीं कायादण्डन । इंद्रियदमन होई ।। १ ।।
दृढ आचारें श्रद्धा विकसुनि । प्रेमरसा देई ।। २ ।।
अभ्यासानें भक्तिभावना । परिणतिला जाई ।। ३ ।।
एकादशीव्रत अंबरीषासीं । वैकुण्ठा नेई ।। ४ ।।
म्हणे विनायक गुरुपदसेवन । तुज सद्गतिदाई ।। ५ ।।

---

### ५४९. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

प्रिय सदाचार रे । देवा ।। ध्रु० ।।
वर्णाश्रम जे पाळिति सज्जन । रुचती त्या फार रे ।। १ ।।
जें जें कांहीं स्वधर्माचरण । भजन तें घडत रे ।। २ ।।
आचारवंत भक्त तयाला । अत्यंत प्यार रे ।। ३ ।।
वन्ध्या महिषी दुभवी श्रीगुरु । ती कथा परिस रे ।। ४ ।।
म्हणे विनायक सार शोधुनी । निजहित आचर रे ।। ५ ।।

---

५५०. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

विभव समर्पीं रे । गुरुला ॥ ध्रु० ॥
जे जे कांहीं तुज अनुकुलता । तया निवेदीं रे ॥ १ ॥
सेविसि तूं ज्या प्रिय उपचारां । त्यांहीं त्या पूज रे ॥ २ ॥
जेथें तुजला ममत्व तेथें । धनी तया कर रे ॥ ३ ॥
गाणगाधिपें नरहरिसेवन । यापरि केलें रे ॥ ४ ॥
म्हणे विनायक सर्वस्वाचा । स्वामी श्रीगुरु रे ॥ ५ ॥

---

५५१. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

त्यज अहंकार रे । प्राज्ञा ॥ ध्रु० ॥
आचरितांही राशि पुण्याच्या । अभिमान दाटत रे ॥ १ ॥
ज्ञात्यालाही बाधा करितो । उठत न कळतचि रे ॥ २ ॥
दुर्ज्ञेय ऊर्मी सदा तयाच्या । शोधुनि शमवीं रे ॥ ३ ॥
निःशेष गळवीं मद चित्ताचा । तेणें तरसी रे ॥ ४ ॥
विमद त्रिविक्रम होतां पाहे । विश्वरूप गुरु रे ॥ ५ ॥
विनायकाला गुरु वासुदेव । सार हें पढवित रे ॥ ६ ॥

---

५५२. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

दैत्य नको होऊं । जीवा ॥ ध्रु० ॥
थारा चित्तीं अविवेकाला । अणुहि नको देऊं ॥ १ ॥
औद्धत्याचा अंतःकरणीं । लेश नको ठेवूं ॥ २ ॥
ईशभक्तिची सद्धर्माची । जोड नको गळवूं ॥ ३ ॥

श्रीगुरु-शासित-मत्त-द्विजांचें । वृत्त नको सेवूं ॥ ४ ॥
म्हणे विनायक गुरुचरणींची । प्रीति नको गमवूं ॥ ५ ॥

---

५५३. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

निश्चय दृढ धर रे । गुरुपदीं ॥ ध्रु० ॥
सिद्ध होय तव कार्य कठिणही । दुर्घट तें जरि रे ॥ १ ॥
सेवन करितां हानि ये जरी । धैर्य न गळवीं रे ॥ २ ॥
शेवट विजयी खचितचि होशी । यांत न संशय रे ॥ ३ ॥
पतिव्रतेचा मृत पति उठला । ती कथा परिस रे ॥ ४ ॥
अनुभव येतो म्हणे विनायक । श्रद्धेनें खास रे ॥ ५ ॥

---

५५४. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

स्वाचारवान प्रिय रे । श्रीशा ॥ ध्रु० ॥
दोष न लागत विहिताचारें । शुद्धि मना ये रे ॥ १ ॥
फलाभिकांक्षा-विरहित-सेवन । बनवि जितेंद्रिय रे ॥ २ ॥
दृढता आणि स्थैर्य-लब्धि दे । मोक्षाधिकार रे ॥ ३ ॥
परान्नानुभव-खिन्न-द्विज-स्त्री । तदाख्यान गा रे ॥ ४ ॥
म्हणे विनायक श्रीगुरु-बोधित । आचारा धर रे ॥ ५ ॥

---

५५५. पद ( चाल—स्मरतां नित्य हरी० )

गुरुवच आदरितां । लाभे सिद्धि तुझे हाता ॥ ध्रु० ॥
कृतचि करविती गुरु, परि येई । पूर्ण तया फलता ॥ १ ॥
अगाध आहे प्रभाव वचनीं । अपूर्व त्या गुरुता ॥ २ ॥
सोमनाथस्त्री वन्ध्या वृद्धा । पाहीं तच्चरिता ॥ ३ ॥

गुर्वाज्ञेनें पिप्पल सेवी । हरली अप्रजता ॥ ४ ॥
म्हणे विनायक नियोग गुरुचा । तारक या जगता ॥ ५ ॥

---

५५६. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

गुरुवच-महिम्यातें । गा रे ॥ ध्रु० ॥
अघटित-घटना-सामर्थ्याचा । अनुभव ये तूतें ॥ १ ॥
होउनि तेणें श्रद्धा दृढ, दे । अनुपम धैर्यातें ॥ २ ॥
सातत्यानें निरलस सेवन । पाववि सिद्धीतें ॥ ३ ॥
पल्लव आले शुष्ककाष्ठासीं । आरोग्य नरहरितें ॥ ४ ॥
म्हणे विनायक अद्भुत ऐसें । गुरुयश गा त्यातें ॥ ५ ॥

---

५५७. पद ( चाल — स्मरतां नित्य हरी० )

गुरुचे पदकमळीं । वसती तीर्थें सर्व भलीं ॥ ध्रु० ॥
चरणसेवनें अनंत पुण्यें । नाशिती अघाली ॥ १ ॥
नित्यादिक जीं कर्में, बनती । सिद्ध, जणों घडलीं ॥ २ ॥
योग-याग-तप-स्नानें होती । जैशीं आचरिलीं ॥ ३ ॥
तंतुक पाहे लिंग-स्थानीं । गुरुमूर्ती बसली ॥ ४ ॥
म्हणे विनायक अनुभव कथितों । साक्ष मला पटली ॥ ५ ॥

---

५५८. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

कांस निश्चयाची । धर तूं ॥ ध्रु० ॥
रक्षिल तुजला करुणाघन तो । त्यज भ्रान्ती मनिंची ॥ १ ॥
असे प्रतिज्ञा भक्तपालनीं । उडि घालिल साची ॥ २ ॥
प्रल्हादाच्या हनना झटतां । फजिती दैत्याची ॥ ३ ॥

विधिवचनास्तव धरुनी प्रगटे । आकृति नरहरिची ॥ ४ ॥
भजनपथ वरीं बाणविं हृदयीं । वृत्ती धैर्याची ॥ ५ ॥
म्हणे विनायक अद्भुत करणी । त्या परमेशाची ॥ ६ ॥

---

५५९. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

संत-चरित गा रे । विबुधा ॥ ध्रु० ॥
पथदर्शक तें होइल तुजला । दृढता आणिल रे ॥ १ ॥
भक्त-वात्सल्य देवाचें जें । प्रेम उभारिल रे ॥ २ ॥
कृतज्ञतेनें जाशिल भरुनी । स्वानुभव स्मरशिल रे ॥ ३ ॥
चित्त शुद्ध तव बनुनी ज्ञाना । खचित पावशिल रे ॥ ४ ॥
म्हणे विनायक रुचिर मार्ग हा । मुक्त तुज करिल रे ॥ ५ ॥

---

५६०. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

दत्तपदां नम रे । अनुदिन ॥ ध्रु० ॥
ऋद्धिसिद्धि तुज प्राप्त होउनी । दत्तचि बनशिल रे ॥ १ ॥
योगेश्वर तूं तेणें होशी । साक्षात्कारें रे ॥ २ ॥
म्हणे विनायक काय न देइल । नमनें तुज गुरु रे ॥ ३ ॥

---

५६१. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

ज्ञानचि कारण रे । सुगतिला ॥ ध्रु० ॥
उपासनेला कर्मालाही । विचार अवश्यचि रे ॥ १ ॥
क्रममुक्ति किंवा मोक्षालागीं । विवेक पाववि रे ॥ २ ॥
म्हणे विनायक मृत्यु प्रमादें । यास्तव तो त्यज रे ॥ ३ ॥

---

५६२. पद ( चाल—बीज पेरावें० )

भाव ठेवावा । गुरुसेवा-छंद धरावा ॥ ध्रु० ॥
समर्थ दुर्बळ आपण याचा । विचार न मुळीं करणें साचा ।
वारा न घ्यावा संशयाचा । निश्चय करावा ॥ १ ॥
जनापवादां तुवां न भ्यावें । अपमानेंही त्वां न चिचकावें ।
दुरुत्तरांतें सोशित जावें । विवेक करावा ॥ २ ॥
अनुग्रह झाला भास्करासीं । ज्यायोगें, त्या आचारासीं ।
म्हणे विनायक जोडीं रतिसीं । बोध हा घ्यावा ॥ ३ ॥

---

५६३. पद ( चाल—बीज पेरावें० )

पर्व साधावें । तेणें सिद्धार्थ बनावें ॥ ध्रु० ॥
तत्पर राहे निजव्यवसायीं । जो न बुझतो बहु अंतरायीं ।
दृढता ज्याची अनुपम हृदयीं । तोच फल पावे ॥ १ ॥
विशिष्ट काळीं विशिष्ट करणें । महती त्याची मनिं ठसवीणें ।
विशेष श्रद्धा अवलंबीणें । मर्म जाणावें ॥ २ ॥
अखंड योगाचरणालागीं । अशक्त किंवा लालस भोगीं ।
त्याच्या युक्ती हे उपयोगी । सार सेवावें ॥ ३ ॥
अल्प श्रमानें अनल्प लभणें । शास्त्रमनोगत ध्यानीं घेणें ।
म्हणे विनायक अपूर्व लेणें । त्वां ओळखावें ॥ ४ ॥

---

५६४. पद ( चाल—तूं माझा यजमान० )

अहंकार त्यज रे । मनुजा ॥ ध्रु० ॥
नास्तिक्य तेणें उपजे तुजला । तत्सम न पातक रे ॥ १ ॥

कार्य अकार्य मान्य अमान्य । विवेक जाइल रे ।। २ ।।
निन्दित-कर्मीं प्रवृत्ति घडुनी । जाशिल विलया रे ।। ३ ।।
निन्दा करिशिल श्रेष्ठ जनांची । सर्वस्व हरशिल रे ।। ४ ।।
दृष्टी असुनी अंध बनुनि तूं । पावशिल पतन रे ।। ५ ।।
मद्यपसदृश प्रमत्तता तुज । हरविल भाना रे ।। ६ ।।
देव करि जरी अनुग्रह मूर्खा । तुज न तो कळेल रे ।। ७ ।।
म्हणे विनायक भजन-सुखा हा । अजगर ग्रासिल रे ।। ८ ।।

---

### ५६५. पद ( चाल — स्मरतां नित्य हरी० )

दत्तजन्म गासी । तेणें शुद्ध-चित्त होसी ।। ध्रु० ।।
गळुनि असूया तुझिया मनिंची । अनसूयक बनसी ।। १ ।।
अत्री देहीं जो का तुझिया । त्यातें ओळखिसी ।। २ ।।
त्र्यधिप जाहले बाळ, वर्णितां । नर्मदत्व घेसी ।। ३ ।।
ऊर्मी उठतां वृत्तीमाजी । सह्यता पावसी ।। ४ ।।
म्हणे विनायक, दत्त होय तो, । प्रभु, जाणें तुजसीं ।। ५ ।।

---

### ५६६. पद ( चाल — तूं माझा यजमान० )

दत्ताला सेवा । जन हो ।। ध्रु० ।।
समृद्ध करुनी ज्ञानाचा तो । देत तुम्हां ठेवा ।। १ ।।
देउनि तृप्ति साधी तुमचा । विरक्ति योग बरवा ।। २ ।।
कथाप्रसंगीं प्रेमारंगें । अपूर्व घ्या सेवा ।। ३ ।।
विश्वकुटुंबी उदार बनवी । घडवि ऐक्यभावा ।। ४ ।।
विनायक विनवी चरणां नमुनी । लोभ तिथें जडवा ।। ५ ।।

---

५६७. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

इच्छा ईशाची । बलवती ।। ध्रु० ।।

सकलहि सत्ता प्रभुची जगतीं । जाणावी साची ।। १ ।।

मानवशक्ती पडत थोकडी । खूण अनुभवाची ।। २ ।।

ईश्वर-घटना दुष्प्रधर्षा । घडुनि यावयाची ।। ३ ।।

हुण्ड-हातिंची मान सोडवी । अवचित नहुषाची ।। ४ ।।

म्हणे विनायक गुरुसीं भजतां । शंका न असिद्धीची ।। ५ ।।

---

५६८. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

गुरुचें यश गावा । अनुदिन ।। ध्रु० ।।

लोभ तेणें उपजुनि चित्तीं । घडविल तत्सेवा ।। १ ।।

प्रसाद नोहे विफल तयाचा । धराल या भावा ।। २ ।।

भजतां सकामतेनेंही त्या । अधिकार ये बरवा ।। ३ ।।

आयु लाधला पुत्र तत्कृपें । महिमा वानावा ।। ४ ।।

विनायकाला वाटे प्रेमा । परमचि जाणावा ।। ५ ।।

# ( २३ ) कथाभाग–आख्यानें

## ५६९. पद ( चाल – प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान – मदालसा )

हाय हाय माझ्यावरतीं । कां एवढा कोप चित्तीं । प्रभुवरा ।।ध्रु०।।
तुज नाहीं कधिं विसरलों । अनुचित नाहीं आचरलों । प्रभुवरा ।।
न मागतां प्रसाद केला । साधियेलें मंगलाला । प्रभुवरा ।।
(चाल) गालवा । देउनि बरवा । अश्व तूं नवा ।
अलौकिक जगतीं । धाडिला मम पुत्राप्रती ।। प्रभुवरा ।। १ ।।
थोर पराक्रम करवीला । दुष्ट दानव मारवीला । प्रभुवरा ।।
स्त्रीरत्न त्या लाभवीलें । उणें सौख्या न ठेवीलें । प्रभुवरा ।।
(चाल) घात हा । केंविं तूं महा । घडविला अहा ।
स्वप्न जे रीति । मावळलें सर्व निश्चितीं ।। प्रभुवरा ।। २ ।।

---

## ५७०. पद ( चाल – कष्ट देति फार० )

( आख्यान – मदालसा )

निष्ठुर तुज केंविं म्हणूं सदय तूं हरी ।
दैव उणें म्हणुनि घडे घात हा तरी ।। ध्रु० ।।
पुत्र नव्हे दिव्य रत्न मजसी लाभलें ।
शौर्य धैर्य स्थैर्य गुणीं जगीं प्रकाशलें ।
धर्मपालनतत्परतेंत पूर्ण झळकलें ।
ब्राह्मण-मख-रक्षणांत सद्गतितें वरी ।। १ ।।

जनिमरणीं मंगलचि साधिलें तयें ।
चरित शुद्ध निर्मल यश शोभविलें तयें ।
आठव किती आठवती वर्णितां न ये ।
शिव शिव शिव दुःख कसें साहुं अंतरीं ॥ २ ॥

---

५७१. पद ( चाल – उद्धवा शांतवन कर जा० )

( आख्यान – मदालसा )

पुत्र धन्य तूं या जगतीं । धन्य केलें स्वकुलाप्रती ॥ ध्रु० ॥
धन्य विद्या धन्य विनय । वश तुजला सर्वदा विजय ॥
धन्य धैर्य शौर्य स्थैर्य । त्रिभुवनिं तूं धन्य आर्य ॥
( चाल ) नम्र आज्ञाधारक असती । सदा सिद्ध पितृसेवेसीं ॥
धर्मवीर म्हणवुनि घेसी । शुद्धाचरणीं धरिसी प्रीति ॥ १ ॥
गालव–मखरक्षण केलें । दुष्ट दैत्य संहारिले ॥
मदालसेतें सोडविलें । कन्यारत्न तें त्वां वरिलें ॥
( चाल ) ब्राह्मणरक्षणार्थ प्राण । वेंचुनी तूं कृतार्थ जाण ॥
झेंडा लाविलास पूर्ण । हाय आमुची काय गती ॥ २ ॥

---

५७२. पद ( चाल – कष्ट देति फार० )

( आख्यान – मदालसा )

भाग्य थोर म्हणुनि मुनिरक्षणीं मरे ।
मदीय पुत्र हेंच तत्त्व वाटतें खरें ॥ ध्रु० ॥
मम जननी नाहीं असा तनय प्रसवली ।
वैभव हें मम भगिनीही नाहीं पावली ।

खचित थोर ईशकृपा मजवरी भली ।
स्वर्गति मम नंदन द्विजकार्यीं अनुसरे ॥ १ ॥
मानव तरि तोच जगीं जन्म पावला ।
संग्रामीं झुंजण्यांत मृत्यु लाभला ।
मातेच्या मुक्त होत ऋणांतुनी भला ।
त्याच्यास्तव वीरप्रसू भवाब्धि हा तरे ॥ २ ॥

---

५७३. पद ( चाल—प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान—मदालसा )

हें काय स्वप्न कीं भास । किंवा हें सत्यचि खास । समजुं मी ॥ध्रु०॥
कृपा केली शंकरांनीं । किंवा दिसत जें कां मनीं । समजुं मी ॥
किंवा कोणी तोतया हा । पुत्ररूपें कपटी महा । समजुं मी ॥
( चाल ) मुनिवरें । येउनि त्वरें । कळविलें खरें ।
पुत्रनिधनास । दावुनी कंठभुषणास ॥ समजुं मी ॥ १ ॥
ही काय-तरि भूतचेष्टा । पावलों कीं नव्या अरिष्टा । समजुं मी ॥
नष्ट पुत्र आला कैसा । कोठें ठेवूं भरंवसा । समजुं मी ॥
( चाल ) जागृती । खचित निश्चितीं । भ्रम न मजप्रति ।
व्याधि न नयनास । पहातों मीं निज पुत्रास ॥ समजुं मी ॥ २ ॥

---

५७४. पद ( चाल—बघुनि त्या भयंकर० )

( आख्यान-मदालसा )

मृगयार्थ वनीं मी जातां दिव्याश्रम बघुनी ताता ।
भुलुनी मीं गेलों तेथें पुढिल काय वदुं मी आतां ॥ ध्रु० ॥
पाहुनियां मुनि संभावित । मति झाली माझी भ्रांत ।
बोलिलों मी नम्रवाचा । ओढवीला स्वयें हा घात ॥

किती केला तेणें मान । वदुनीयां मधुरोक्तिला ।
फसलों मी अनर्थ घडला । लावूं कुणा दूषणाला ॥
मागितलें धन दक्षणेस । सहाय हो म्हणे यज्ञास ।
याचिलें कंठभूषणास । जाणिलें न मी कपटास ॥
हार त्यास अर्पुनीयां । बसलों जंव मठ रक्षाया ।
साधियेला तेणें दावा । हार मला देवोनियां ॥
हाय हाय मूढ मी केंवीं । बनलों त्या समयीं ताता ।
म्हणुनि हा प्रसंग आला । यापरी जाणिं वृत्तान्ता ॥
घातकी मीच अज्ञानी । सांडिला विवेकचि सारा ।
त्या गुणें तया कपट्यानें । साधुनी घेतलें वैरा ॥
ओळखिला तो तालकेतु । सूड बंधुचा उगवाया ।
रचिली ही तेणें माया । शोकार्णविं मज बुडवाया ॥

---

५७५. पद ( चाल – कष्ट देति फार० )

( आख्यान – मदालसा )

विषयराग सांग बनुनि खुलत तेधवां
आविष्करण मदन-रति-केलिवैभवा ॥ ध्रु० ॥
मदालसासंग मधुर माधुरी लुटी ।
कुवलयाश्व वनोपवनीं गिरिनदीतटीं ।
शोधुनियां रुचिर रम्य पुलिनें गोमटीं ।
वाटे कीं अनंगरंग प्रगटला नवा ॥ १ ॥
कामशास्त्रनिपुण भूप रहस्य जाणता ।
मदालसा गमत जणों मूर्त रसिकता ।

रतिविनोद अपूर्व घडत होय सुचविता ।
युवति तेच धन्य तसा धन्य तो युवा ॥ २ ॥

---

### ५७६. पद ( चाल — प्रीति जी दुजाचरी० )

( आख्यान — मदालसा )

कां मुला तूं व्यर्थ रडसी । देहातीतता न जाणसी । तान्हुल्या ॥ध्रु०॥
शुद्ध बुद्ध परमानंद । तूं असती सदा अभेद । तान्हुल्या ॥
पंचभूतात्मक शरीर । तुजपासुनि आहे दूर । तान्हुल्या ॥
( चाल ) संबंध । तेंवि अनुबंध । करिती न बंध ।
नित्यमुक्तासीं । धरुं नको तूं ममत्वासी ॥ तान्हुल्या ॥ १ ॥
तूं नामरूपगुणविरहित । लटिकें अम्हि नांव ठेवीत । तान्हुल्या ॥
देह आणि इंद्रियांसी । गुणचि कारण उत्पत्तीसीं । तान्हुल्या ॥
( चाल ) गुणसृष्ट । सकल हें स्पष्ट । होतसे नष्ट ।
स्वप्नगति जैसी । भुलुं नको वृद्धिक्षयांसीं ॥ तान्हुल्या ॥ २ ॥

---

### ५७७. पद ( चाल — प्रतिकुल होइल० )

( आख्यान — मदालसा )

भोग दुःखद परिणामीं तो दुःखरूप जाणीं । सौख्यलेश कांहीं तेथें तूं न मनीं आणीं ॥ ध्रु० ॥ जन भौतिक सुखदुःखांनीं हृष्ट व्यथित होती । जैसें कर्म तैसा भोग प्राणि अनुभविती । पराधीन सुख विषयांचें उमजोनि चित्तीं । ज्ञानि न लोभ धरिती कांहीं निज अंतःकरणीं ॥ १ ॥ यास्तव तूं न देहादिकीं होईं साभिलाष । शुभाशुभकर्मसंबंधें नित्य तीं सदोष । मोहित हा लक्षी तेथें जीव सुखविशेष । या परि न करीं बाळा तुज काय सुखा वाणी ॥ २ ॥

---

## ५७८. पद ( झंपा )

( आख्यान–मदालसा )

मुला सांगतें गोष्ट अभ्युदयाची । अनुष्ठितां अर्थदा होय साची ।। ध्रु० ।। ऋद्धि सिद्धि जरी । प्राप्त व्हाव्या तरी । कर्ममार्गावरी ।। नित्य तनया ।। जनकचित्ता धरीं । मित्रहित आचरीं । कुलें तूं संहरीं वैरियांचीं ।। १ ।। धन्य तूं होउनी । शत्रु निर्दाळुनी । निष्कंटक करुनी ।। राज्य भोगीं ।। इंद्रसाधर्म्यता । पालनीं जोडितां । येवो सरूपता ।। निर्जरांची ।। २ ।। धर्मफल भोगितां । शोभवीं सुरेशता। साध द्विज-तृप्तता ।। पर्वकाळीं ।। बांधवां तोषवीं । परहितीं जागवीं । मति रति न धरावी ।। परस्त्रीची ।। ३ ।। मुररिपू ध्याउनी । षड्रिपू जिंकुनी । प्रबुद्धता धरुनी ।। वारिं माया ।। अनित्य भव जाणुनी । तत्व घे समजुनी । कांस दे सोडुनी ।। दुराशेची ।। ४ ।। पराभवीं भूपती । लूटिं द्रव्याप्रती । मेळवीं यशोन्नति ।। अर्थत्यागें ।। अपवादभय धरीं । विपत्तिसागरीं । झटे जनोद्धारीं ।। प्राण वेंचीं ।। ५ ।। यज्ञ तूं आहरीं । तृप्त देवां करीं । आश्रितांची हरीं ।। सर्व तृष्णा ।। द्विजां अन्नदानें । स्त्रियां कामदानें । सुखविं संगरानें ।। मनें अरिंचीं ।। ६ ।। बांधवां बालपणीं । श्रीगुरु कुमारपणीं । यौवनीं कुलमणि ।। कामिनिसीं ।। जाउनी वनांतरा । वृद्धपणीं वनचरां । हर्षवीं उदारा ।। अत्यंतचि ।। ७ ।। मदालसा यापरी । बोध अलर्का करी । प्रवृत्तिपथ आदरीं ।। पितृकाजें ।। निवृत्त हो शेवटीं । जा भवाब्धि-पर-तटीं । प्रणालिका गोमटी ।। क्रम-मुक्तिची ।। ८ ।।

---

## ५७९. पद ( चाल — कष्ट देति फार० )

( आख्यान — मदालसा )

हाय हाय काय मला प्राप्त हे गति ।
जाहली कां न कळे खुंटली मती ॥ ध्रु० ॥
जननीचा उपदेश जसा तेंविं वागलों ।
यज्ञ याग करुनि बहु पुण्य आचरलों ।
प्रजारंजनार्थ अहर्निश झटलों ।
दैवदुर्विपाक कसा हाय मज गती ॥ १ ॥
स्वप्नींही अन्याय मला नाहिं घडला ।
अपवादें डाग कधीं नाहिं लागला ।
त्रिवर्ग धर्म-अर्थ-काम-युक्त साधिला ।
मावळुनी सर्व हाय होय दुर्गती ॥ २ ॥
माय आज असती जरी उपाय योजिती ।
दाखविती दोष मला मजसीं तारिती ।
शरण कुणा जाउं कोण वालि या क्षिती ।
समजेना पालटेल केंविं हे स्थिती ॥ ३ ॥
निर्वाणरूप बनुनि असा सचिंत बैसला ।
दुःखाग्निमाजि असे तीव्र पोळला ।
गलितदर्प शुद्धचित्त होउनी भला ।
मातेला आठवितां येत त्या स्मृती ॥ ४ ॥
अंगुलीयक रक्षणार्थ दीधलें मला ।
त्यांत तिणें लिहुनि असे मंत्र ठेविला ।
विपत्तींत येशि जधीं सेव त्याजला ।
सांगुनि मज गेली वनीं स्मरलें निश्चितीं ॥ ५ ॥

### ५८०. पद ( चाल — कुसुमगंध सुटला० )

( आख्यान — भास्करब्राह्मण )

भाव मूर्त आला । माधुरिला ॥ ध्रु० ॥
रसनायोगें दाटत करणीं । मधु बनवी त्यांला ॥ १ ॥
स्वादुरसानें मनही भरुनी । पावे रसतेला ॥ २ ॥
प्रियरुप सारें होउनि येथें । गंध दरवळला ॥ ३ ॥

---

### ५८१. पद ( चाल — वैशाखमासिं० )

( आख्यान — भास्करब्राह्मण )

गुरुचरणां लक्षितांच भान विसरला
स्थायीभाव प्रेमरसा प्राप्त जाहला ॥ ध्रु० ॥
दाटुनि ये कण्ठ शब्द सर्व खुंटला
बाष्पपूर नयनिं येत घर्म पातला
पुलकांकित होत तनू कंप सूटला
विवर्णता येउनि तो स्थाणु शोभला ॥ १ ॥

---

### ५८२. पद ( चाल — कुसुमगंध सुटला० )

( आख्यान — सायंदेव )

मत्त मला केलें । यश-मधुनें ॥ ध्रु० ॥
देह विसरलों स्मृतिहि हरलों । मन मुरुनी ठेलें ॥ १ ॥
पानीं तृप्ति मुळीं न मजला । भान लया गेलें ॥ २ ॥
मधुर इंद्रियां जग हें सारें । सुधापूर्ण झालें ॥ ३ ॥

सिद्धमुनीश्वर चरितश्रवणीं । अधीरत्व आलें ॥ ४ ॥
म्हणे विनायक नामधारकें । हृद्य निवेदीलें ॥ ५ ॥

---

५८३. पद ( चाल – रुचती कां० )

( आख्यान – सायंदेव )

धन्य माझें जनन देवा मज ऐसें वाटतें ।
कृतार्थ आज पितर माझे मन मजला सांगतें ।
दग्ध झालें पाप नाथा सर्व खचित भासतें ।
काय वर्णूं भाग्य माझें अनुपमेय शोभतें ॥ १ ॥

---

५८४. पद ( चाल – प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान – सायंदेव )

नेति त्यासी संगमासीं । गुरुराज स्वयें प्रीतीसीं । बालका ॥ध्रु०॥
तत्परीक्षा पाहूं साची । मनीषा हे गुरुमूर्तीची । बालका ॥
अस्तमान होय तंव ते । करिताती तेथ वस्तीतें । बालका ॥
( चाल ) उठविती । मेघ अवचिती । वर्ष घडविती ।
नभोवलयासीं । तम लागे दाटायासीं ॥ बालका ॥ १ ॥
ओणवा गुरुवरि वेंघोनी । अंगिं पर्जन्य साहोनी । बालका ॥
सेवि गुरुसीं शिष्यराणा । किती प्रेमा अंतःकरणा । बालका ॥
( चाल ) संचरे । मारुतनिकरें । शीत तें भरे ।
कांपवी तनुसीं । विप्र झटे वारायासी ॥ बालका ॥ २ ॥
मेघ थांबे दों प्रहरेसीं । विद्युद्गर्जनाही तैसी । बालका ॥
अग्नि आणीं गुरु सांगती । बघुं नको पार्श्वभागांतीं । बालका ॥

( चाल ) अग्नितें । घेउनि परते । पाहि बाजुतें ।
देखे अहींसीं । पळत गांठी गुरुपदांसीं ॥ बालका ॥ ३ ॥
गुरु म्हणती कां भ्यालासीं । सर्प दिधले रक्षणासीं । बालका ॥
गुरुसेवा ऐशी आहे । विचारोनी मनीं पाहें । बालका ॥
( चाल ) निर्धार । पाहिजे थोर । जाण हें सार ।
तरिच सिद्धीसीं । पावसि तूं निश्चयेंसीं ॥ बालका ॥ ४ ॥

---

### ५८५. पद ( चाल — प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान — वन्ध्या-स्त्री )

आजवरि व्रतादिक केलीं । ती सारीं व्यर्थचि झालीं । गुरुवरा ॥ध्रु०॥
योगयाग तैशीं तीर्थें । सर्वहि तीं झालीं व्यर्थें । गुरुवरा ॥
उपवासहि बहु आचरिले । परी नाहीं कामा आले । गुरुवरा ॥
( चाल ) अन्यथा । वाक्य सर्वथा । कधिं न हे प्रथा ।
आहे ऐकिली । मानितें मदिच्छा फळली ॥ गुरुवरा ॥ १ ॥

---

### ५८६. पद ( चाल — अरसिक किति हा शेला० )

( आख्यान — रजकाचें )

काय वदावें तुजला । पुरविसि सकलहि भक्तकामनेला ॥ ध्रु० ॥
दुर्लभ जे मर्त्यांला । त्याही भोगां देसी दासाला ॥ १ ॥
शक्यचि सर्वहि तुजला । त्रिभुवनपति तूं तुज लोकेशाला ॥ २ ॥
तुझिया वदान्यतेला । लक्षुनि सुरद्रुहि धरि लज्जेला ॥ ३ ॥
द्याया दृष्टांताला । ब्रह्मांडीं या ठाव न मुळीं उरला ॥ ४ ॥
खद्योतें सूर्याला । तुळितां हानि येत योजकाला ॥ ५ ॥

तुजसीं उपमायाला । सुरतरु किमपिहि योग्य न जरि गमला ॥ ६ ॥
त्वद्यश वानायाला । कल्पुनि तुजसम स्थविर पादपाला ॥ ७ ॥
वर्णिन वैशिष्ट्याला । चरतरु केवळ श्रीश हा नटला ॥ ८ ॥
सांगे सद्गुरु मजला । कवणें परि मी गाऊं तरि तुजला ॥ ९ ॥

---

५८७. पद ( चाल – अंध पंगु० )

( आख्यान – महालय )

भाद्रकृष्णिंच्या प्रथम तिथीला महालया सारी ।
वह्निलोक त्या प्राप्त होतसे जाणा निर्धारीं ॥ ध्रु० ॥
द्वितीयेसीं कैलासप्राप्ति तिजि दे अष्टनिधी ।
चतुर्थतिथिसीं तुष्ट गणपति नाशी तदुपाधी ॥ १ ॥
पंचमीसीं महदैश्वर्य ये षष्ठि सुतसंपदा ।
सप्तमीला बाधों न शकती रोगादि आपदा ॥ २ ॥
अष्टमीसीं कैवल्य लाभे नवमीसीं संतति ।
दशमीतिथिला धनधान्यादि हरिदिनीं रिपु मरती ॥ ३ ॥
द्वादशीला अपस्मारादिक यातुधान शमती ।
त्रयोदशीला सुंदर ललना अखिल भोग मिळती ॥ ४ ॥
चतुर्दशीला महापातकें सकळ दग्ध होती ।
सायुज्यमुक्ति अमा देत हे श्राद्धीं फलश्रुति ॥ ५ ॥

---

५८८. पद ( झंपा )

( आख्यान – श्राद्धमाहात्म्य – सप्तकौशिकांचें )

किती बोलसी धूर्त तूं वितथ मजसीं । लाज वाटे तुला मुळिं न कैसी ॥ ध्रु० ॥ प्रेम माझेवरी । अल्प ना तुज तरी । भाषणीं

माधुरी ।। दाविसी तूं ।। मोदकचूर्ण कसें। त्यागुनी मज तसें। दुसरीस अनुरसें, ।। अर्पिलेंसीं ।। १ ।।

---

५८९. पद ( चाल—शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान—मूषकाचें )

पाहातों हा, काय येथें, सुधाकर दुसरा ।
अवतार कमलजेचा किंवा चपला भास्वरा ।।
इंद्राणी घेत काय तपालागीं आसरा ।
केलि-कुपिता, उमा येत, शोधाया श्रीहरा ।। १ ।।

---

५९०. पद ( चाल—शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान—मूषकाचें )

कोमलता सुंदरता माधूर्यता रम्यता ।
एकवटलीं गमति येथ काय मनोहारिता ।।
लावण्याची मूस ब्रह्मदेवें न निर्मिता ।
मन हरलें भान गेलें हारपली धीरता ।। १ ।।

---

५९१. पद ( चाल—शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान—संकष्टीमाहात्म्य—इंद्रयानपतन—आरोहण )

रम्यतेची पूर्ण सीमा अमृताचें सत्व ती ।
चंद्राची कान्ति मूर्त शृंगारींची ते रती ।।
मोहनाची मोहिनी ती विद्युल्लता भास्वती ।
ऊपमेची ऊपमा ती माधवाची श्रीमती ।। १ ।।

---

### ५९२. पद ( चाल – प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान – गणपतीचें – कृतवीर्याला स्वप्नांत पुस्तकप्राप्ति )

जागृत होउनि जों पाहे। आठवलें स्वप्न लवलाहें। नृपवरा ॥ध्रु०॥
तात अदृश्य होवोनी। गेले पुस्तक ठेवोनी। नृपवरा ॥
ऐसें आठळोनी येतां। दुःख गमलें थोर चित्ता। नृपवरा ॥
( चाल ) ढळढळां। रडत कोंवळा। कंठ मोकळा।
करुनि तो मोहें। पितृ-वियोग-शोक न साहे ॥ नृपवरा ॥ १ ॥

---

### ५९३. पद ( चाल – उद्धवा शांतवन कर जा० )

( आख्यान – गणपतीचें – कृतवीर्याला स्वप्नांत पुस्तकप्राप्ति )

पुस्तक पाहतां निजकरीं। नवल झालें बहु अंतरीं ॥ ध्रु० ॥
स्वप्नवस्तु बोले कैसी। येत येथें प्रत्ययासीं ॥
कौतुक देखोनि हर्षला। तात-विरहें दुःखित बनला ॥
(चाल) हर्ष शोक दोन्ही त्याला। दाउनी एक समयाला ॥
करविती विचित्र लीला। शूरसेना सांगे हरी ॥ १ ॥

---

### ५९४. पद ( चाल – अंध पंगु० )

( आख्यान – चण्डभिल्ल – शिवरात्रविषयक )

मासाचे जे त्रिंशद्दिन ते पुण्यकाल साचे।
शिवा अष्टमी चतुर्थि गेशा प्रिय दिन पर्वाचे ॥ ध्रु० ॥
अमा पितरां पंचमी नागां षष्ठि कुमारासीं।
तेंवि सप्तमी प्रिय त्या रविला नवमी चण्डीसीं ॥ १ ॥

विधिला दशमी प्रिय रुद्राला एकादशी तशी ।
हरिसि द्वादशी तशी यमाला प्रिय ती त्रयोदशी ॥ २ ॥
चतुर्दशी ती शंभूलागीं प्रियतम जाणावी ।
व्रतास अशुक्लपक्षींची जी निशीथयुत घ्यावी ॥ ३ ॥
उपोषणा ती श्रेष्ठ गणावी शिवसायुज्य देई ।
अघविनाशिनी परमपावना विशिष्टत्व गाई ॥ ४ ॥

---

५९५. पद ( चाल—कष्ट देति फार० )

( आख्यान—माघस्नानमाहात्म्य )

स्नान-पुण्य मूर्त गमत काय प्रगटलें ।
रूप असें तिजसि नृपा हृद्य लाभलें ॥ ध्रु० ॥
कनकरचित मूर्ति जशी तेंविं शोभली ।
विद्युत कीं स्वरुपिं इच्या पूर्ण सांचली ।
चंद्रकान्ति इच्या मिसें जणों उभारली ।
सौंदर्यपद्म भासतसे रम्य विकासलें ॥ १ ॥
नेत्र मृगें काय इला स्वीय दीधले ।
विधुनें निजवदन काय ईस अर्पिलें ।
मधुनें निजसत्त्व इला काय वाहिलें ।
पीयूषें काय इचें अंग बनविलें ॥ २ ॥
अरुणें निजवसन इच्या अधरीं ठेविलें ।
भ्रूभंगीं कुसुमशरें विहार योजिले ।
ज्योत्स्नेनें मंद मधुर हसन रमविलें ।
कौटिल्या अलकिं इच्या अभय गवसलें ॥ ३ ॥

ऐरावत-हस्त इच्या भुजांत वोळला ।
कदलीचा गर्भ ऊरुमाजि रंगला ।
नवकिसलय-सौष्ठव-भर करतलीं अला ।
सौकुमार्य तनुलतेंत खुलुनि राहिलें ॥ ४ ॥
पयोधरीं पीनत्वोन्नति सुष्टु साजली ।
पुष्टता नितंबजघनद्वयिं समावली ।
कृशता जणुं उदरदेशिं स्थैर्य पावली ।
सुकृत-फल तद्रूपीं परिणत जाहलें ॥ ५ ॥

---

५९६. पद ( चाल – अरसिक किति हा शेला० )

( आख्यान – माघस्नानमाहात्म्य – कांचनमालिनी व राक्षस यांची कथा )

विचार कैंविं न शिवला । आजवरी मज या पापीणीला ॥ ध्रु० ॥
भोगचि केवळ वरिला । देह हा शुष्क तेणें बनवीला ॥ १ ॥
अधर्मचि संग्रहीला । तनुविक्रयानें निरय जोडिला ॥ २ ॥
सांडुनि शुभकर्माला । दान-धर्म-व्रत शुभ आचाराला ॥ ३ ॥
अनर्थचि प्राप्त केला । जारसंगें भ्रष्टविलें कायेला ॥ ४ ॥
दुर्गति आतां मजला । चुकवूं कशि ती महाघात झाला ॥ ५ ॥

---

५९७. पद ( झंपा )

( आख्यान – उमामहेश्वरव्रतकथा )

तुला गर्व हा श्रीश श्रीच्याच योगें । शापितों ती तरी शीघ्र भंगे ॥ ध्रु० ॥ जाउं दे सागरीं । उदधिजा सत्वरीं । वैकुंठ झडकरी ॥ नाश पावो ॥ अधिकार मावळो । दुर्गंध दरवळो । कीर्ती तूझी

मळो ॥ वायुवेगें ॥ १ ॥ गरुड हत होउं दे । तेज तव लोपुं दे । सुस्थिति न राहुं दे ॥ तुजसि कसली ॥ भ्रमण रानीं वनीं । निरवधि लाभुनी । प्रेतता घेउनी ॥ जगीं वागें ॥ २ ॥

---

५९८. पद ( चाल – प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान – उमामहेश्वरव्रतकथा )

जातां वैभव माधवाचें । म्लान होई वदन त्याचें । राजया ॥ध्रु०॥
काय करूं कोठें जाऊं । कवणा तरी शरण होऊं । राजया ॥
शिवाराधन कैसें होय । दशा केंविं पवे म्हणे लय । राजया ॥
( चाल ) धडपडे । संभ्रमीं पडे । कोण सांकडें ।
निवारिल साचें । धरुं पाय वदे कवणाचे ॥ राजया ॥ १ ॥

---

५९९. पद ( चाल – नच सुंदरि करुं कोपा० )

( आख्यान – शंकरभिल्लिणीचें )

मज सोडुनि कशि जासी । पदसरसिजविनतासीं ।
कामाचा भर किति गे विह्वल करि यासीं ॥ ध्रु० ॥
आलिंगीं मत्तनुसीं । दे चुंबन अधरांसीं ।
मिठि मारीं कण्ठासीं । तनु भिडवीं अंगासीं ॥
( चाल ) संगीं लालस तव मी पुरवीं इच्छेसीं ॥ १ ॥

---

६००. पद ( चाल – शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान – रुक्मांगदाचें )

पाहोनी रूप तीचें विश्व झालें मोहित ।
ब्रह्मदेव नेत्र झांकी मनीं होई लज्जित ॥

कोण ऐसा धैर्यवंत जो न क्षोभा पावत ।
उन्मादचि मूर्त वाटे स्त्रीछद्में उभारत ॥ १ ॥

---

६०१. पद ( चाल – बल ज्याचें त्यास तें० )

( आख्यान – गजेंद्रमोक्ष )

करि कैसा शोभतो । अलि-कुल-दान-रसिक शिरावरि, गीत-रवीं गमत रीझवी । त्या नादें डोलतो ॥ ध्रु० ॥ हृष्ट पुष्ट घन-नीळ असा तो । वनांतरीं संचार करी । भूमेघचि भासतो ॥ १ ॥ अजात-रिपु तो विशाल-तनुधर । विगतभयी अचल-गुणमयी । वनराजा साजतो ॥ २ ॥ भव्यपरिवारानु-गत गजपति । निज विभवीं पृथ्वि कांपवी । बलाध्यक्ष गर्जतो ॥ ३ ॥

---

६०२. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

( आख्यान – गजेंद्रमोक्ष )

सरोवरीं नेलें । जल-गंधें ॥ ध्रु० ॥
कमल-सुवासें वासित अनिलें । मन त्याचें धालें ॥ १ ॥
दृष्टिस पडतां तेथिल शोभा । भरुनि हृदय आलें ॥ २ ॥
अमृत दुसरें गमलें त्यासीं । चित्त उल्हासलें ॥ ३ ॥
जीवन वाटे नूतन स्फुरलें । श्रम सारे हरले ॥ ४ ॥

---

६०३. पद ( चाल – शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान – गजेन्द्रमोक्ष )

विद्युन्मय पीतांबरें मध्यभाग झांकिला ।
कौस्तुभमणी रत्नहार कंठासीं शोभला ॥

वनमाळी चतुर्हस्त उद्यतचक्र पातला ।
गरुड-स्कंधीं बैसुनीयां किरीटी धांवला ॥ १ ॥

---

६०४. पद ( चाल—कुसुमगंध सुटला० )

( आख्यान—अनिरुद्ध—उषा—विवाह )

कांत कधीं भेटे । अभिनव तो ॥ ध्रु० ॥
चुंबुनि अधरीं मम अंगासी । स्वप्नीं जो लगटे ॥ १ ॥
रमवाया मज रतिशयनीं जो । रागानें विनटे ॥ २ ॥
देव किन्नर विद्याधर कीं । नररूपें प्रगटे ॥ ३ ॥
तळमळ मजला सांगु किती मी । धैर्य सखे आटे ॥ ४ ॥

---

६०५. पद ( चाल—कष्ट देति फार० )

( आख्यान—अनिरुद्ध—उषा—विवाह )

रंग खुलत मूर्त तदा विषयसेवनीं ।
एकवटुनि ब्रह्मसौख्य ये जणुं लगटुनी ॥ ध्रु० ॥
रमण तो रमणी ती मदन रति जशीं ।
चंद्र रोहिणीच मूर्त गमत तीं तशीं ।
इंद्रशची निर्भर हीं काय रतिरसीं ।
ती श्री हा माधव कीं सक्त क्रीडनीं ॥ १ ॥
रूपशीलसुगुणांहीं अन्योन्यतुल्य तीं ।
परस्परीं अनुरक्त तशीं एकचित्त तीं ।
प्रेमभरें गुप्तत्वें रमति दंपती ।
आनंदीं काल जात न ये समजुनी ॥ २ ॥

---

६०६. पद ( चाल — शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान — कोजागरीव्रत )

हेमांगा हेमवस्त्रा हेमभूषा-भूषिता ।
व्योमतारा गमति आल्या घेवोनि मूर्तता ॥
विभागोनी तीनरूपीं धरि चपला व्यक्तता ।
यौवनोद्गम-मुग्धबाला सौंदर्य-देवता ॥ १ ॥

---

६०७. पद ( चाल — शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान — गंगेचें )

दिव्यरूपें प्रगट झाली तीर्थांची देवता ।
पुण्य वाटे धरित तीच्या रूपानें मूर्तता ॥
विष्णुची कीं कान्ति, कान्ता, तशि तीची गौरता ।
पीयूष कीं सतनु साधी नेत्रांची धन्यता ॥ १ ॥

---

६०८. पद ( चाल — शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान — गुरुभार्याहरण )

या तरुणीनें मजलागीं पूर्णत्वें जिंकिलें ।
स्तब्धत्व येई मातें तन्मयत्व जाहलें ॥
उन्माद होउनि प्राप्त तम नेत्रीं दाटलें ।
सौख्य सर्व हेंच आतां न एष्टव्य राहिलें ॥ १ ॥

---

## ६०९. पद ( चाल – शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान – एकादशीमाहात्म्य – कोचरशराजा व सुप्रज्ञाराणी )

त्या तरुणा पाहुनीयां मन माझें वेधलें ।
न कळतां सहज मी त्या वश सुंदरा जाहलें ॥
चातुर्यें भोग देतां चित्त त्याचें लोभलें ।
अननुभूत सुखें त्याला वेड माझें लाविलें ॥ १ ॥

---

## ६१०. पद ( चाल – शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान – जयशर्म्याचें – पुरुषोत्तममास-एकादशी )

पाहोनी रूप झाला मनामाजि विस्मित ।
चालेना तर्क कांहीं स्तब्ध बघत राहत ॥
काय बोले तेज येथ माधुरी वर्तत ।
अननुभूत सौख्य कां हें आज मज लाभत ॥ १ ।

---

## ६११. पद ( चाल – शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान – जयशर्म्याचें – पुरुषोत्तममास-एकादशी )

इंद्राची इंद्राणी तूं शंभुची पार्वती ।
अप्सरा स्वर्गिंची तूं काय मानूं निश्चितीं ॥
गंधर्वी किन्नरी तूं शशिपत्नी महाद्युति ।
रोहिणी काय संज्ञा सूर्याची प्रिया सती ॥ १ ॥

---

६१२. पद ( झंपा )

( आख्यान – विष्णुदासद्विज )

वृथा वाहसि गर्व तूं विष्णुदासा । भाससी मजसि तूं दैवहतसा ॥ ध्रु० ॥ रत्नमुक्तादिकीं । खचित पूजा निकीं । प्रियाप्रिय-विवेकीं ॥ बांधिली म्यां ॥ तुलसिपत्रीं कसी । सांग आच्छादिसी । रम्यता नाशिसी ॥ अज्ञजनसा ॥ १ ॥ भक्तिचा लेश ना । आकळे त्वन्मना । व्यर्थ तव वल्गना ॥ जाणिवेची ॥ रसिकत्व तुज नसे । स्पष्ट हें होतसे । लागलें जणुं पिसें ॥ दिससि ऐसा ॥ २ ॥

---

६१३. पद ( झंपा )

( आख्यान – पुंडरीकद्विजाचें )

तुला भेटण्या पातलों पुण्डरीका । जाण भगवद्भक्तजननायका ॥ ध्रु० ॥ हरिदासदर्शनीं । लोलुप मी मन्मनीं । दुर्लभ तो बहु जनीं, ॥ धन्य नर कीं ॥ चाण्डाल तो जरी । जातिनें होय तरी । त्याची न ये सरी ॥ विप्रभविका ॥ १ ॥ प्रेम परमेश्वरीं । तव असे निरंतरीं । भजसि तो श्रीहरी ॥ अनन्यत्वें ॥ विधिसुत मी प्रगटलों । परम हृदिं तोषलों । पहाया विनटलों ॥ विष्णुभजका ॥ २ ॥

---

६१४. पद ( चाल – शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान – पुंडरीकद्विजाचें )

प्रसन्न झालीं जलें सारीं ऋतुही तेंविं ते ।
वाहे वारा आनुकूल्यें सुसफल वृक्ष ते ॥

मोद सर्व पदार्थांत स्फुरण तैसें होय तें ।
चराचर विश्व तेव्हां धरि अत्यन्त तोष तें ॥ १ ॥

---

६१५. पद ( चाल – कष्ट देति फार० )

( आख्यान – पुण्डरीकद्विजाचें )

त्यास येत द्यावयास दर्शना हरी
वनमाळी पीतवसन तुष्ट सत्त्वरीं ॥ ध्रु० ॥
श्रीवत्सांक कौस्तुभयुक्त दीनवत्सल ।
केयूरीं शोभत प्रभा धरित श्यामल ।
पुण्डरीक विशालाक्ष इन्दुच केवल ।
देवांसह प्रगटत तो जेंविं तदंतरीं ॥ १ ॥

---

६१६. पद ( चाल – शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान – वैकुंठचतुर्दशीचें )

सौंदर्यें अनंतकोटी मदनांसीं लाजवी ।
अंगीच्या सुवासानें गंध दर्प लोपवी ॥
स्मित मधुनें मधुरतेला लघुता जो लेखवी ।
ऊर्जीं तो घेत दीक्षा रमाकांत शांभवी ॥ १ ॥

---

६१७. पद ( झंपा )

( आख्यान – उपमन्यूचें )

अरे राक्षसा जाळितों तूज आतां । नसे शिव-निन्दका कवण त्राता ॥ ध्रु० ॥ कपटवेषें अहा । फसविसी मज पहा । घोर अपराध

हा ॥ क्षम्य नोहे ॥ चळविसी मज कसा । वरळुनी भलतसा । तूं पत्र महाघसा ॥ त्वरित घाता ॥ १ ॥ क्षीरार्थ ईश्वरा । सेविलें शंकरा । त्या तपें अघवरा ॥ दग्ध होई ॥ अथर्वास्त्रमंत्रिता । भस्ममुष्टिप्रेरिता । ऐकवो त्रिजगता ॥ निधनवार्ता ॥ २ ॥

---

६१८. पद ( चाल – अंध पंगु० )

( आख्यान – सुभद्राहरण )

धर्मलोप न व्हावा म्हणुनी अर्जुन वनवासा ।
निघे घेउनी धर्माज्ञेतें तद्वृत्ता परिसा ॥ ध्रु० ॥
संगें जाती श्रोत्रिय तैसे सूत पौराणिकही ।
यती तापसी ब्रह्मचारिही वैष्णव हरिजनही ॥ १ ॥
तीर्थें फिरतां फिरतां येती ते गंगाद्वारीं ।
अद्भुत झालें नवल तेथ तें ऐका साचारीं ॥ २ ॥
गंगेमाजी नागकन्यका मोहुनि रूपाला ।
उलुपी नामें ओढुनि नेई जलांत पार्थाला ॥ ३ ॥
एकरात्र तो राहुनि तीच्या पुरवी कामाला ।
देउनि मग ती मुनिपाशीं त्या जाई निलयाला ॥ ४
प्रवास पुढती करितां गांठी मणिपुर धनंजय ।
चित्रवाहननृप-नंदिनीसीं होत बद्ध-हृदय ॥ ५ ॥
चित्रांगदेसीं वरुनी तेथ वसे अब्द तीन ।
परते तेथुनि होतां तिजला पुत्रमुखदर्शन ॥ ६ ॥
मकरीभूता पंच अप्सरा स्पर्शें उद्धरून ।
प्रभासक्षेत्रीं तदनंतर ये पाण्डवेय अर्जुन ॥ ७ ॥

कृष्णाज्ञेनें हरुनि सुभद्रा खाण्डवप्रस्थासीं ।
जात संपवुनि वनवासातें जोडुनि कीर्तीसीं ॥ ८ ॥

---

## ६१९. पद (कटाव)

(आख्यान – सुभद्राहरण)

पायिं खडावा वाजति चटचट । तरुण यतीश्वर चालत पटपट ॥
रुद्राक्षमाळा करिति रटरट । दण्ड हातिंचा नादत खटखट ॥
कानिं कुंडलें हालति लटलट । कमंडलूदक सांडत सटसट ॥
फर्दा शालिचा शिरीं बांधिला । जरतारि कौपीन तो नेसला ॥
शाटी भगवी वेष्टिलि कटिला । भस्म चर्चिलें सर्वांगाला ॥
त्रिपुंड्र रेखिला ललाटाला । स्वरूपीं पालट रंगें केला ॥
वैराग्याच्या आविर्भावा । ज्ञानदृष्टिच्या पूर्ण वैभवा ॥
साधुवृत्तिच्या मूर्तानुभावा । योगारूढत्व स्वस्वभावा ॥
प्रगटी रचुनी अनेक भावा । दावी निज नारायणभावा ॥
राम मोहला । अर्जुन संन्यासी बनला ॥

---

## ६२०. पद (चाल – कुसुमगंध सुटला०)

(आख्यान – सुभद्राहरण)

नलिनी हे गमली । नयनांसीं ॥ ध्रु० ॥
सौंदर्याची कोमल कलिका । इजवरतीं फुलली ॥ १ ॥
कांति-न्हदीं जणुं जन्मा लभुनी । समुन्नती पवली ॥ २ ॥
उल्लसत माज माधुर्याचा । उच्छ्रायें थटली ॥ ३ ॥
रम्यताच कीं ईच्या रूपें । पूर्ण विस्फारली ॥ ४ ॥

---

हा ॥ क्षम्य नोहे ॥ चळविसी मज कसा । वरलुनी भलतसा । तूं पव महाघसा ॥ त्वरित घाता ॥ १ ॥ क्षीरार्थ ईश्वरा । सेविलें शंकरा । त्या तपें अघवरा ॥ दग्ध होई ॥ अथर्वास्त्रमंत्रिता । भस्ममुष्टिप्रेरिता । ऐकवो त्रिजगता ॥ निधनवार्ता ॥ २ ॥

---

### ६१८. पद ( चाल – अंध पंगु० )

( आख्यान – सुभद्राहरण )

धर्मलोप न व्हावा म्हणुनी अर्जुन वनवासा ।
निघे घेउनी धर्माज्ञेतें तद्वृत्ता परिसा ॥ ध्रु० ॥
संगें जाती श्रोत्रिय तैसे सूत पौराणिकही ।
यती तापसी ब्रह्मचारिही वैष्णव हरिजनही ॥ १ ॥
तीर्थें फिरतां फिरतां येती ते गंगाद्वारीं ।
अद्भुत झालें नवल तेथ तें ऐका साचारीं ॥ २ ॥
गंगेमाजी नागकन्यका मोहुनि रूपाला ।
उलुपी नामें ओढुनि नेई जलांत पार्थाला ॥ ३ ॥
एकरात्र तो राहुनि तीच्या पुरवी कामाला ।
देउनि मग तीं मुनिपाशीं त्या जाई निलयाला ॥ ४ ॥
प्रवास पुढती करितां गांठी मणिपुर धनंजय ।
चित्रवाहननृप-नंदिनीसीं होत बद्ध-हृदय ॥ ५ ॥
चित्रांगदेसीं वरुनी तेथ वसे अब्द तीन ।
परते तेथुनि होतां तिजला पुत्रमुखदर्शन ॥ ६ ॥
मकरीभूता पंच अप्सरा स्पर्शें उद्धरून ।
प्रभासक्षेत्रीं तदनंतर ये पाण्डवेय अर्जुन ॥ ७ ॥

कृष्णाज्ञेनें हरुनि सुभद्रा खाण्डवप्रस्थासीं ।
जात संपवुनि वनवासातें जोडुनि कीर्तीसीं ॥ ८ ॥

---

६१९. पद ( कटाव )

( आख्यान – सुभद्राहरण )

पायिं खडावा वाजति चटचट । तरुण यतीश्वर चालत पटपट ॥
रुद्राक्षमाळा करिति रटरट । दण्ड हातिंचा नादत खटखट ॥
कानिं कुंडलें हालति लटलट । कमंडलूदक सांडत सटसट ॥
फर्दा शालिचा शिरीं बांधिला । जरतारि कौपीन तो नेसला ॥
शाटी भगवी वेष्टिलि कटिला । भस्म चर्चिलें सर्वांगाला ॥
त्रिपुंड्र रेखिला ललाटाला । स्वरुपीं पालट रंगें केला ॥
वैराग्याच्या आविर्भावा । ज्ञानदृष्टिच्या पूर्ण वैभवा ॥
साधुवृत्तिच्या मूर्तानुभावा । योगारूढत्व स्वस्वभावा ॥
प्रगटी रचुनी अनेक भावा । दावी निज नारायणभावा ॥
राम मोहला । अर्जुन संन्यासी बनला ॥

६२०. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

( आख्यान – सुभद्राहरण )

नलिनी हे गमली । नयनांसीं ॥ ध्रु० ॥
सौंदर्याची कोमल कलिका । इजवरतीं फुलली ॥ १ ॥
कांति-ऱ्हदीं जणुं जन्मा लभुनी । समुन्नती पवली ॥ २ ॥
उल्लसत माज माधुर्याचा । उच्छ्रायें थटली ॥ ३ ॥
रम्यताच कीं ईच्या रूपें । पूर्ण विस्फारली ॥ ४ ॥

---

## ६२१. पद ( चाल – अरसिक किति हा शेला० )

( आख्यान – शल्यवध )

शमवूं कैसें त्यांनां । अशक्य तें वाटे माझिये मना ॥ ध्रु० ॥
भगदत करुनी ज्यांनां । फसवुनि कपटें घातलें राना ॥ १ ॥
द्रौपदीवस्त्रहरणा । योजोनी मी केली विटंबना ॥ २ ॥
भोगिले भोग नाना । सार्वभौमत्वें केलें वर्तना ॥ ३ ॥
गोंवुनि आप्तेष्टांनां । या युद्धीं जणुं ओपियलें हनना ॥ ४ ॥
रक्षाया निज असुंनां । करणें अनुचित गमे अरिवंदना ॥ ५ ॥

---

## ६२२. पद ( चाल – अंध पंगु० )

( आख्यान – शल्यवध )

शल्यपाण्डवां युद्ध लागतां लाघव तें ऐका ।
होय जयानें मनःशुद्धता घेइल कलि धाका ॥ ध्रु० ॥
भीम धांवला अश्वसारथी शल्याचे मारी ।
गदायुद्ध करी शल्य त्याजसीं मूर्च्छा ये भारी ॥ १ ॥
चेकितान वधि दुर्योधन नृप शल्य पुन्हां लोटे ।
युधिष्ठिरासीं झुंज घेत तो त्यापाशीं लगटे ॥ २ ॥
भीम पातला धर्मरक्षणा भीषण तो समर ।
पाण्डवांचा पराभव होई संतोषे कुरुवर ॥ ३ ॥
अश्वत्थामा विजयापाशीं युद्ध करी थोर ।
श्वेतवाहनें कुरुसैन्याचा केला संहार ॥ ४ ॥
पांचाल्य सुरथ मारी द्रौणी भिडे अर्जुनासीं ।
धृष्टद्युम्नें युद्ध मांडिलें कौरवराजासीं ॥ ५ ॥

शल्य सात्यकी युद्ध मांडिती परस्परां भिडती ।
अर्जुन बाणीं विद्ध सैन्य करि दावी चमत्कृती ॥ ६ ॥
युधिष्ठिर करी तदा प्रतिज्ञा मारिन शल्यासीं ।
चक्ररक्षा सुत माद्रीचे करोत सायासी ॥ ७ ॥
गोविंद-वाक्यें शक्ति प्रेरी धर्म शल्याप्रती ।
मारुनि त्यासी वधी बंधुला मिळवी विजयासी ॥ ८ ॥

---

६२३. पद ( चाल—अंध पंगु० )

( आख्यान—द्रौपदीस्वयंवर )

धृष्टद्युम्न तो भगिनीलागीं दावी ते राजे ।
शौर्यादिक गुण वर्णी त्यांचे कुलयश जें साजे ॥ ध्रु० ।
दुर्योधनादिक शतबन्धू हे व्यासवरें झाले ।
महोग्रबल ते प्रसिद्ध लोकीं सकर्ण बघ वहिले ॥ १ ॥
गांधारनृपात्मज सौबलादि स्वयंवरा आले ।
अश्वत्थामा भोज शस्त्रधर श्रेष्ठपणें सजले ॥ २ ॥
सपुत्र येथें विराटराजा पौंड्रक भगदत्त ।
मद्रराज हा शल्य महारथ होय इथें दत्त ॥ ३ ॥
सोमदत्त हा भूरिश्रवा हा शिबि औशीनर हा ।
चोरां घातक कारुषाधिपती हा येथें पाहा ॥ ४ ॥
संकर्षण हा वासुदेव हा सांब रौक्मिणेय ।
अक्रुर सात्यकि उद्धव सुमति येथ प्राप्त होय ॥ ५ ॥
भगीरथ बृहत्क्षत्र जयद्रथ चित्रांगद भूप ।
जरासंध हा शिशूपाल हा पराक्रमी अमुप ॥ ६ ॥

ऐसे येथें अनेक राजे लोभ तुझा धरुनी ।
कृष्णे आले तरि तूं त्यांतें घेई निरखोनी ॥ ७ ॥

---

६२४. पद ( चाल—रुचती कां० )

( आख्यान—पांडवसत्त्वपरीक्षा )

नको आतां उशिर लावूं द्वारिं मृत्यु लोटला ।
अपाण्डवा होय मही ऐसा समय पातला ॥
किती आतां वाट पाहूं ठाव हृदयें सांडिला ।
पंकमग्ना उद्धरिं धेनू हांका मारि तूजला ॥ १ ॥

---

६२५. पद ( चाल—शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान—पूतनावध )

अंगींच्या सुवासानें विश्व भासे वासित ।
मंदहास्यें करित सर्व ज्योत्स्नामय वाटत ॥
पायींच्या नुपुरशब्दें कलहंसा बोधित ।
निजगतिनें शिकवि वाटे मत्तेभां तद्वत ॥ १ ॥

---

६२६. पद ( चाल—प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान—कंसजन्म )

देह भान विसरुनि गेला । तद्रूपीं तन्मय झाला । नृपति तो ॥ ध्रु० ॥
अशन-पान-शयन-विहारीं । तीस भजे लंपट भारी । नृपति तो ॥
क्षण एक तिज विसंबेना । प्राणचि मानी ती अंगना । नृपति तो ॥

( चाल ) लोभला । दास जाहला । पागल बनला ।
भुलुनि रूपाला । अर्पी तिज सर्वस्वाला ।। नृपति तो ।। १ ।।

---

### ६२७. पद ( चाल – श्रीमंत पतीची० )

( आख्यान – कंसजन्म )

तातगेहीं वास जीचा । कोण गणी तद्भाग्याला ।। ध्रु० ।।
देवताच स्वातंत्र्याची । बंध कोण घालिल तिजला ।
बाप माय सर्वहि सिद्ध । हौस तिची पुरवायाला ।
पुतळी ती जणुं सौख्याची । सीमा नसेच डौलाला ।
स्वच्छंदें वागायाला
मुभा असे सर्वची तिला
सकळ मानिती धाकाला
शब्द तिचा झेलायाला । जन दाविती तत्परतेला ।। १ ।।

---

### ६२८. पद ( लावणी )

( आख्यान – कंसजन्म )

तुजविण मन मुळींच रमेना । कोठेंहि घेईना रुचि अल्प ।
उताविळ झालों तुझे संगतिला । धरवेना मला धीर मुळीं ।
शोधीत तुजला येथ मी पातलों । कामानें दाटलों प्राणेश्वरी ।
तुजविण राज्य शून्यचि जाहलें । विषचि बनले सर्व भोग ।
कामानळें तप्त माझें हें हृदय । आलिंगनें होय शांत देवी ।
मधु अधरीचें कधीं मी सेवीन । बहर लुटीन सुरताचा ।

नाजुक हे गाल कधीं मी चुंबीन । अंगीं भिडवीन अंग माझें ।
भोगप्रसंगींचे मधुर उच्छ्वास । मंद मधु हास अनुभवीन ।
ऐसी तळमळ बहुत लागुनी । तुज अनुलक्षुनी येथ आलों ।
पुरवीं माझा हेतु आतां वरानने । कायावाचामनें तुझाच मी ।
बोलतां बोलतां धरी तिचा हात । तिस कवटाळीत ओढोनी तो ।
विनायक म्हणे साहस दुष्टाचें । थरारवी साचें देहा मना ॥

---

६२९. पद ( चाल – कष्ट देति फार० )

( आख्यान – कालियामर्दन )

हाय हाय घात गमत पूर्ण पातला ।
मूर्त अम्हां प्राण कृष्ण अहिनें ग्रासिला ॥ ध्रु० ॥
प्रेतरूप सकल दिसत जडत्व पावलें ।
कण्ठ नेत्र अवयवही शुष्क जाहले ।
देहींचें रुधिर जणों सर्व गोठलें ।
हिमिकावृत देह स्तोम माजवी भला ॥ १ ॥

---

६३०. पद ( चाल – प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान – कालियामर्दन )

नागिणी कासाविस होती । चुडेदान देई म्हणती । प्रभुवरा ॥ ध्रु० ॥
मालक तूं ब्रह्माण्डाचा । कळला हा आशय साचा । प्रभुवरा ॥
मदहारक या सर्पाचा । दुजा कोण सामर्थ्याचा । प्रभुवरा ॥
(चाल) दंशितां । धरुनि क्रुद्धता । गरल ओकितां ।
तुज निरामयता । न देखिली अशि अपूर्वता ॥ प्रभुवरा ॥ १ ॥

थोर भाग्य याचें गमतें । पुण्यें येती उदयातें । प्रभुवरा ॥
स्पर्श घडला त्वत्पदांचा । योगही आलिंगनाचा । प्रभुवरा ॥
(चाल) नर्तना । भुजगशयना । विश्ववंदना ।
करिसि प्रेमानें । वदों काय तुज वाचेनें ॥ प्रभुवरा ॥ २ ॥
दुष्ट जात कीं सर्पाची । मूर्ति जाण महादोषांची । प्रभुवरा ॥
आणुनी मनीं या भावा । क्षमा करणें श्रीमाधवा । प्रभुवरा ॥
(चाल) नंदिनी । स्वीय समजुनी । वत्सल बनुनी ।
मंगल करावें । सौभाग्य आमुचें राखावें ॥ प्रभुवरा ॥ ३ ॥

---

## ६३१. पद ( चाल – कष्ट देति फार० )

( आख्यान – कुब्जादासी-श्रीकृष्णानुग्रह )

बनतां ती रूपगुणें संपन्न कामिनी ।
मदनशरें व्याकुल कीं होत निजमनीं ॥ ध्रु० ॥
मन्द मधुर हसन करुनि विनय सांडुनी ।
श्रीहरिचा पदर धरी धीट भामिनी ।
चाल गृहा त्वरित म्हणत लाज त्यागुनी ।
रमवीं मज शमविं काम प्रसन्न होउनी ॥ १ ॥

---

## ६३२. पद ( चाल – मसिं बोलुं नको गिरधारी० )

( आख्यान–कुब्जादासी-श्रीकृष्णानुग्रह )

कशिं सोडुं तुला स्मररूपा । हृदया भेदी स्पृहाबाण ॥ ध्रु० ॥
स्पर्शुनि मज भारविलेंसी । धृति सगळी हारविलीसी ।
स्थिरता ठेविलि न मनासीं ॥ १ ॥

उन्मादित चित्त करोनी । घेतलेंस सर्व हिरोनी ।
अदय बनसी मज अवलेसीं ॥ २ ॥
काशि त्यजिसि तुझी अंगना । तुजवांचुनि कोठ रमेना ।
सर्वस्वें वोळे तुजसीं ॥ ३ ॥

---

६३३. पद ( चाल — कष्ट देति फार० )

( आख्यान — कुब्जादासी — श्रीकृष्णानुग्रह )

समरस ती होय तदा सुरत लाभतां ।
अंगसंग गळवि स्मृतिस घडवि ऐक्यता ॥ ध्रु० ॥
मी स्त्री हा पुरुष कृष्ण भेद विसरली ।
स्थलदेशकालनिमित्त भान हारली ।
क्रीडामय भाव सर्व गाढ पावली ।
औत्कंठ्या आणित वहर सौख्यलुब्धता ॥ १ ॥

---

६३४. पद ( चाल — रुचती कां० )

( आख्यान — सत्यभामाव्रतकथा )

माधुर्याची मधुरता मूर्त जे थाटली
ऐशा या तनुचि मज कां संगती लाभली ।
कुतुहलिनी बुद्धि माझी देवा कीं जाहली
रहस्यता यांतील कीं पाहिजे शंसिली ॥ १ ॥

---

### ६३५. पद ( चाल – रुचती कां० )

( स्यमंतकोपाख्यान )

सौंदर्या होत सीमा ऐसी ते भामिनी
सुगुणतेची खास मूर्ती जनचित्त-मादिनी ।
विनयशीला स्वभावें जी परि नित्य मानिनी
निजठायीं रक्त ऐशी कृष्ण वरी कामिनी ॥ १ ॥

---

### ६३६. पद ( चाल – कुसुमगंध सुटला० )

( आख्यान – अघासुरवध )

समरसता खुलली । बहारिची ॥ ध्रु० ॥
देहभिन्नता गळुनी गेली । वृत्ति मनीं विरली ॥ १ ॥
आनंदासीं सीमा नुरली । तन्मयता घडली ॥ २ ॥
श्रीहरिमूर्ती हृदयीं स्फुरली । हृदैक्यता बनली ॥ ३ ॥
बाह्याभ्यंतरिं कृष्णसंगती । अत्रुटित जडली ॥ ४ ॥

---

### ६३७. पद ( चाल – भक्तांसि भगवद्भजनें० )

( आख्यान – सीतास्वयंवर )

उठतां तो दशमुख रंगीं । सीता भ्यालि अंतरंगीं ।
धांव बोले कुलदेवते । आतां त्वरें या प्रसंगीं ।
उलटो हें धनुष्य माये । होउनि जड त्याचे अंगीं ।
पडो धूळ त्याच्या वदनीं । ऐसें करिं माये वेगीं ॥ १ ॥
प्रार्थितें मी शिवशंकरा । नाश पावो हा दुर्मति ।
द्यावें अपयश दुष्टासीं । कृपा करा मृडानीपति ।

उताणा पडो हा रावण । उलथोनी भूमिवरतीं ।
हा मेला कोठोनि आला । आल्यें तुम्हां काकुळती ॥ २ ॥

---

६३८. पद ( चाल – रुचती कां० )

( आख्यान – सीतास्वयंवर )

शृंगारोनी करिणीसीं मणिहेमभूषणीं
सीतेसीं आरूढविती आणाया रंगणीं ।
शोभे निजसखियांत नक्षत्रीं चांदणी
रूपें ती देत वाटे रतिलागीं कांचणी ॥ १ ॥

---

६३९. पद ( चाल – रुचती कां० )

( आख्यान – रामाची दिनचर्या )

रत्नांचे माणिक्यांचे हिऱ्यांचे पाचुचे
वैडूर्यांचे मौक्तिकांचे अमूल्य वस्तुंचे ।
पुष्परागनीलमणीयुक्त अपूर्व शिल्पिचे
येत सीता अलंकार झळकवीत अंगिंचे ॥ १ ॥

---

६४०. पद ( चाल – कष्ट देति फार० )

( आख्यान – रामाची दिनचर्या )

विद्युत कीं स्त्रीस्वरुपें मूर्त थाटली ।
तेंवि तेथ सीतेची दीप्ति फांकली ॥ ध्रु० ॥
छुम छुम छुम मंजुल कीं नादति नूपुरें ।
कंठींचे हार तसे रणति मधुस्वरें ।
किंकिणिध्वनि मृदुल भरिती कर्णविवरें ।
वाढाया येतां ती जानकी भली ॥ १ ॥

अंगिंचा सुवास तदा पूर्ण दरवळे ।
इंद्रधनू तत्स्वरुपीं गमत सांकळे ।
आकृष्टि मूर्तिमती तिच्यांत थारळे ।
प्रतिमा ती माधुरिची प्रत्यक्ष शोभली ॥ २ ॥

---

### ६४१. पद ( कटाव )

( आख्यान – रामचंद्राचा दिवाळसण )

थोर निनादें दुंदुभि गर्जे । ताशा कडकड कर्कश गाजे ॥
तेंवि चौघडा सुंदर वाजे । सूरसनायासहित विराजे ॥
टाळमृदुंगीं अवसर झांजे । शंख नादभर तयांत माजे ॥
शिंगें फुंकिति तास टणाणति । नभोमंडळा ध्वनि व्यापिती ॥
घण घण घण घण घंटा वाजति । अंतराळीं आवाज भरिती ॥
अंबारीयुत करी झूलती । मन्दगतीनें डुलत चालती ॥
टप टप टप टप टापा टाकिति । हेमभूषणें अश्व मिरविति ॥
कलदार पगडि शिरीं झळकते । वीरवृत्ति उठाव धरिते ॥
पदातिसेना सज्ज चालते । अभयतेची खुलावट सजते ॥
सिंहनादें मही दुमदुमते । शस्त्रांच्या खणखणाटिं घुमते ॥
अभिनव मन्जुल वाद्यरवांचा । एकवटे मधु मेळ स्वरांचा ॥
त्यांत मिळे स्वन कलगीतांचा । झुमझुम छुमछुम ध्वनि नाचाचा ॥
झणत्कार तेंवि कंकणांचा । रथसंघ राजपरिवाराचा ॥
लोटत मागुति महारवाचा । जयध्वनी भाटमागधांचा ॥
तांडा पाठीं घोडदळांचा । ऐशा थाटें निघताति दशरथ राजे ॥

---

## ६४२. पद (कटाव)

(आख्यान – रामचंद्राचें अवभृथस्नान)

यशःपटह घन वाजति पुढती । दुम दुम दुम दुम दुंदुभि गर्जति ॥
वादित्र तूर्यादिक रणरणति । झम झम झम झम झर्झरि नर्दति ॥
घण्टा झल्लरि अंबर भरिती । तौर्यत्रिक जनमनें विंधिती ॥
ध्वजा तोरणें मार्गावरतीं । चोंहोंबाजुंनीं शोभा देति ॥
मुक्ताप्रवालपुष्पहारांनीं । कदली-इक्षुदण्ड-स्तंभांनीं ॥
उष्ट्रगजपत्त्यश्वांनीं । मृत्पात्रस्थित कुसुमतरूंनीं ॥
शोभिवंत लतामंडपानीं । सुगंध चंदनवारिसिंचनीं ॥
आच्छादित सित पायघड्यांनीं । रामतीर्थपथ दिसत खुलोनी ॥
रामराणा निघे त्या वरुनी । मदोन्मत्त गज अग्रीं धांवति ॥
सुपताकांसह अश्व मागुती । तूर्य घोषक सदश्वांवरतीं ॥
आरूढ होउनि वीथि क्रमिती । पगडीवाले राजदूत किति ॥
दण्डधर असे तेथ चमकती । वन्दीजनसह वारस्त्रीगण ॥
नाटनाटकींही कलाप्रवीण । देवगंधर्व संगीत निपुण ॥
त्यामागें लोटे चंडकिरण । घडघडत महा स्यंदन दारुण ॥
सीतेसह राम ज्यांत आपण । वह्नि घेउन ज्वाला भीषण ॥
ऋत्विग्जनयुत करि आरोहण । नाना वाहनिं आरूढोनि ॥
स्त्रीपुरुषें किति येति मागुनी । राजसेवक अशेष मिळोनी ॥
चतुरंग सैन्यें शृंगारोनी । गजतुरगउष्ट्र सर्वे घेउनी ॥
रामाज्ञापर लगट करोनी । धांवत येती आनंदोनी ॥
अवभृथस्नाना राम थाटानें निघती ॥

## ६४३. पद ( झंपा )

( आख्यान – रामचंद्राचें नवरात्र–व्रतपालन )

तुला सांगतों पूर्ववृत्तान्त रामा । जानकीचा तुझ्या पूर्णकामा ।। ध्रु० ।। मुनिसुता पूर्वभवीं । सौंदर्यसुवैभवीं । सुख न मानी भवीं ।। चित्त तीचें ।। होय ती तपस्विनी । मधुर हास्य आननीं । देवता जणुं वनीं ।। तपत रामा ।। १ ।। रावणें पाहिली । भार्यार्थ प्रार्थिली । अत्यंत कोपली ।। तिरस्कारें ।। कबर तीचा धरी । बोलिली उत्तरीं । त्यजिन तनु सत्त्वरीं ।। असत्कामा ।। २ ।। पुनरपि भवांतरीं । अयोनिजा मी तरी । जन्मेन महिवरी ।। तुझे नाशा ।। तीच ही मैथिली । अंगना तव भली । रावणवधा अली ।। जाण रामा ।। ३ ।।

---

## ६४४. पद ( चाल – प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान – अहिरावण-महिरावणवध )

करिं कृपा स्वीय दासांसी । शरणागत तव पायांसीं । जननि गे ।।ध्रु०।।
बळि तुजला अर्पायासीं । आणितसों रघुवीरांसीं । जननि गे ।।
बहुत दिवशीं मानवांचा । तुज होय नैवेद्य साचा । जननि गे ।।
( चाल ) प्रार्थिती । हात जोडिती । शिरें नमविती ।
प्रसादप्राप्तिसीं । दैत्य करिती प्रयासासीं ।। जननि गे ।। १ ।।
भेटि घडे श्रीरामासीं । हेतु आणुनी हा मनासीं । जननि गे ।।
वामांगींच्या मालेसी । सोडि देवि त्या समयासीं । जननि गे ।।
( चाल ) हर्षले । तुष्ट जाहले । कार्य साधलें ।
म्हणति आम्हांसीं । करिति तेथुनि प्रयाणासीं ।। जननि गे ।। २ ।।

### ६४५. पद ( चाल — कुसुमगंध सुटला० )

( आख्यान — अहिरावण-महिरावणवध )

पुरुष मनीं भरला । बाई हा ॥ ध्रु० ॥
सोडीना मज भारी हृद्या । जीवन मम सजला ॥ १ ॥
तन्मय झाल्यें विसरुनि गेल्यें । भेद-भावनेला ॥ २ ॥
सर्वत्रचि तो दिसतो मजला । विश्वात्मक गमला ॥ ३ ॥
सकल इंद्रियें लोलुप माझीं । त्या सेवायाला ॥ ४ ॥
सर्वस्वाचा स्वामी केला । पूर्णत्वें त्याला ॥ ५ ॥
बाई बाई बनल्यें वेडी । रमक धनी वरिला ॥ ६ ॥

---

### ६४६. पद ( चाल — शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान — उपांगललिताव्रतकथा )

चारुगात्र-नेत्र-वक्त्र-बिंबोष्ठीं भूपिता ।
सुकुमारा सरलांगा गौरवर्णीं शोभिता ॥
कुल-शील-रूप आणी सुगुणीं जी मंडिता ।
गुणवती नाम जीचें धरि वाटे सार्थता ॥ १ ॥

---

### ६४७. पद ( चाल — प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान — आयुराजाचें )

दैव उफराटें फिरलें । यत्न माझे व्यर्थ झाले । करुं कसें ॥ ध्रु० ॥
गर्भहनना साधवेना । वैरि मजला जिंकवेना । करुं कसें ॥
तेज अनुदिन वाढताहे । गर्भ बलिष्ठ दिसताहे । करुं कसें ॥
( चाल ) काळ हा । मूर्त कीं पहा । दर्शनें अहा ।
वीर्य मम गळलें । षंढत्वचि मजला आलें ॥ करुं कसें ॥ १ ॥

हाहाःकारें दैत्येश्वर । बोले अनर्थ हा दुस्तर । करुं कसें ।।
अन्न पाणी त्यजोनीयां । झटतसें रिपु माराया । करुं कसें ।।
( चाल ) निरुपाय । होउनीं हाय । बनत मी गाय ।
केंविं हें घडलें । बळ माझें कोठें गेलें ।। करुं कसें ।। २ ।।

---

## ६४८. पद ( अंजनीगीत )

अभिमान झाला कौंडिण्याला । सुमंतूच्या जामाताला, ।
मुकला सर्व संपदेला, । तेच कथा वदवी ।। १ ।।
सुमंतुनामें विप्रवर, । त्याची भार्या दीक्षाचतुर ।
कन्या सुशीला सुकुमार । चतुर सद्गुणी ।। २ ।।
सुमंतु होय भार्याहीन । परिणिलि तेणें वधू नूतन ।
कर्कशानामें अवदसा जाण, । पाप ओढवे त्याचें ।। ३ ।।
कन्येसी धरी सापत्नभाव । झाला सौख्याचा अभाव ।
विवाह योजी विप्रदेव । निजकन्येचा ।। ४ ।।
कन्या दिधली कौंडिण्याला । दोघें निघती अनुष्ठानाला ।
पाथेय विप्र देई भला । कोंडा गोधूमाचा ।। ५ ।।
नदीतीरीं येतां दंपती । सुशिला देखे ब्राह्मणयुवती ।
अनंताची पूजा करिती । मनोभावेंसी ।। ६ ।।
पति बसतां अनुष्ठाना । सती नमी विप्रपत्न्यांनां ।
अनंतदोरक देउनि पूजना । करविती नारी ।। ७ ।।
व्रतमाहात्म्य प्रगटलें । कौंडिण्यासी राज्य आलें ।
मुनि दाटला अभिमानें । निंदी अनंताला ।। ८ ।।

मम तपश्चर्येचें हें फळ । कधीं नोहे गा तें विफळ ।
म्हणुनि आलें हें वैभव सकळ । अनंत कैंचा ॥ ९ ॥

दोरक टाकी तो अग्नींत । सुशिला सत्वरें विझवित ।
अनंतकोपें राज्य जात । त्या कौंडिण्याचें ॥ १० ॥

योजी विप्र तेव्हां निर्वाण । अनंत भेटे जरि न जाण ।
देइन आपुला निश्चयें प्राण । अनंतासाठीं ॥ ११ ॥

निश्चयें निघत अरण्यांत । तेथें देखे वृक्ष चूत ।
फळीं पुष्पीं पूर्ण समस्त । पक्षी नातळती ॥ १२ ॥

पुढें देखे धेनु वत्ससहित । कांहीं न मुखीं भक्षण घडत ।
पुढतीं वृषभ थोर देखत । मार्गीं तो जातां ॥ १३ ॥

गर्दभ कुंजर वृद्ध ब्राह्मण । भेटति त्यासी मार्गीं जाण ।
विचारी अनंताची खूण । मार्गीं तो जातां ॥ १४ ॥

कोणि न त्यासी सांगे कांहीं । निर्वाण झाला ब्राह्मण पाहीं ।
प्राण त्यजावया लवलाहीं । सिद्ध होत असे ॥ १५ ॥

पाहुनि त्याचा दृढभाव । अनंत धरी प्रगटभाव ।
सकळ त्यासी देत वैभव । श्रीमदनंत प्रभु ॥ १६ ॥

ब्राह्मण प्रार्थी अनंतासी । म्यां जें देखिलें या मार्गासी ।
सविस्तर त्याच्या आशयासी । सांगावें आम्हां ॥ १७ ।

तुवां जो देखिला वृक्ष चूत । पूर्वींचा ब्राह्मण विद्यावंत ।
कोणा न कांहीं तो सांगत । म्हणुनी हे दशा ॥ १८ ॥

सवत्स धेनू जे देखिली । पूर्वीं निष्फळ भूमि दिधली ।
महाधनिका वृषभता आली । दान न दे म्हणुनी ॥ १९ ॥

दोघी बहिणी आपआपणांत । दान अपुलालें देत घेत ।
म्हणुनी ऐशी दशा पावत । परस्पर मेळणी ॥ २० ॥
गर्दभ जाणें तूझा क्रोध । कुंजररूपी तूझा मद ।
अंतःकरण होतां शुद्ध । मी ब्राह्मण भेटलों ॥ २१ ॥
सकळांसी मुक्त केलें । ऐश्वर्य दिधलें तुज भलें ।
स्वर्गपदा भोगीं वहिलें । अंतीं सद्गती ॥ २२ ॥
पुनर्वसुनक्षत्रामाजी । वास त्याचा प्रभु योजी ।
अनंताचिया व्रताकाजीं । ऐसें हें फळ ॥ २३ ॥
याच व्रतें राज्य पांडवां । देणें आलें श्रीमाधवा ।
म्हणुनि अनंत हा भजावा । व्रत आचरोनी ॥ २४ ॥
अभिमान सर्व सांडोनियां । शरण जावें श्रीहरिपायां ।
याच करुनी सदुपाया । भव तरावा हा ॥ २५ ॥
अनंतासी माझी प्रार्थना । माझ्या दवडुनी अभिमाना ।
कृपा करावी दयाघना । मज दीनासी ॥ २६ ॥

---

### ६४९. पद ( चाल—प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान—शाकंभरीप्रादुर्भाव—दुर्गमासुरवध )

विसरले वेद द्विज सारे। सहसा जणुं बनले कोरे। नृपवरा ॥ध्रु०॥
स्नानसंध्यादिक राहिलीं । यज्ञकर्मे स्थगित झालीं । नृपवरा ॥
विद्या मावळोनि गेली । स्मृति कांहीं नाहीं उरली । नृपवरा ।
( चाल ) भासला । प्रळय तो भला । प्राप्त जाहला ।
स्पष्ट कीं निकरें । भरे विश्व अंधःकारें ॥ नृपवरा ॥ १ ॥

---

### ६५०. पद ( चाल—कोण तुजसम सांग० )

( आख्यान—शाकंभरीप्रादुर्भाव—दुर्गमासुरवध )

सांग तुजविण कोण आम्हां तारी । संकटां निवारी ॥
समर्थ स्वकीय तूंच जनोद्धारीं । आपत्ती वारीं ॥ ध्रु० ॥
जीवनावीण मत्स्य जगे कैसा । भाव येत तैसा ॥
माये आम्हां खचित आज खासा । तरि दे आश्वासा ॥ १ ॥
अन्नजलाभावीं स्थिति कशि व्हावी । आमुची वदावी ॥
यास्तव सत्वर धांव तुवां घ्यावी । समृद्धि करावी ॥ २ ॥

---

### ६५१. पद ( चाल—शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान—शाकंभरीप्रादुर्भाव—दुर्गमासुरवध )

कोटिसूर्यासम कान्ती देवीची फांकली ।
लावण्याचें सार ज्यांत रूपें या थाटली ॥
फलें मूलें घेवोनीयां माउली पातली ।
वत्सदुःखहरणासीं जणुं गाउली धांवली ॥ १ ॥

---

### ६५२. पद ( चाल—शैवालें युक्त जैसें० )

( आख्यान—शाकंभरीप्रादुर्भाव—दुर्गमासुरवध )

अनंत नेत्रांतूनि धारा जलाच्या वर्षली ।
नवरात्रवृष्टि तीणें ऐशी थोर साधिली ॥
नदीनदप्रवाहातें पूर्ण भरती पातली ।
अवर्षण हरुनि जातां मही तेव्हां तोषली ॥ १ ॥

---

## ६५३. पद ( चाल—करिन यदुमनीं सदना० )

( आख्यान—एकादशीमाहात्म्य—रुक्मांगदराजाची कथा )

रमत गिरिसुता विरुनी । अनुपमरतिसुखभर वरोनी ।। ध्रु० ।।
कधिं तशि मी धवतनुवरि रुळोनी । बनें ऐक्य लभोनी ।। १ ।।

---

## ६५४. पद ( चाल—गमते सदा ही० )

( आख्यान—एकादशीमाहात्म्य—रुक्मांगदराजाची कथा )

वरितें तुला भूपवरा ।
होउनी लुब्ध तव संगमीं मनें ।
वश बनोनि मारा ।। ध्रु० ।।
मोहित मी रूपीं तुझिया ।
पादपद्मीं किंकरा दृढ ।
झालें तरि करिं स्वीकृत धरीं करा ।। १ ।।

---

## ६५५. पद ( झंपा )

( आख्यान—एकादशीमाहात्म्य—रुक्मांगदराजाची कथा )

तुझ्या दर्शनें सुंदरि लोभलों मी । नुरलों जाण अतां स्वीय स्वामी ।। ध्रु० ।। विश्व मज वंदितें । प्रिय मला मानितें । ममाज्ञा पाळितें ।। कठिण जरि ती ।। धरिति रिपु भीतितें । दर गमे सुरांतें । तोच मी पदांतें ।। बनत प्रणामी ।। १ ।। सर्वस्व वाहिलें । तुजसिं जाणें भलें । मम न मुळिं राहिलें ।। अल्प कांहीं ।। स्वार्पणें तर्पितों । दीनसा प्रार्थितों । हो माझी म्हणतों ।। संगकामी ।। २ ।। त्रैलोक्य-स्वामिनी । करिन तुज भामिनी । संशय नसो मनीं ।। अणुहि तुझिया ।। दाससा विनवितों । होइं वश बोलतों । तुजसींच पूजितों ।। हृदयधामीं ।। ३ ।।

---

६५६. पद ( चाल – कष्ट देति फार० )

( आख्यान – एकादशीमाहात्म्य – रुक्मांगदराजाची कथा )

आश्रम मम धन्य आज जाहला गमे ।
विष्णुभक्त त्वत्सम इथें येउनी रमे ॥ ध्रु० ॥
जेणें यममार्ग भग्न करुनि ठेविला ।
सकलांसीं वैकुण्ठपथ पूर्ण उघडिला ।
द्वादशीव्रतीं जनौघ निखिल दृढ खिळविला ।
सुखद तव दर्शन अम्हां अमृतोपमें ॥ १ ॥

---

६५७. पद ( चाल – ही रात सवत बाई० )

( आख्यान – जयद्रथवध )

दुर्बुद्धि थट्टुनि आली । डसली गमे कुपित व्याली ॥
किती मूढ बनोनी ठेलों । मद्यपासम कसा झालों ॥ ध्रु० ॥
अविवेक घोर चित्ताला । केंविं तदा उदेला ॥
दर्पें सुविचार गेला । तेणें दशा अशि झाली ॥ १ ॥

---

६५८. पद ( चाल – रुचती कां० )

( आख्यान – मारुतिजन्म )

आलींगी तीजलागीं काममत्त मारुत
तेज निज ठेवि गर्भीं तीच्या तो उद्भूत ।
सर्वांगीं भरुनि राहे आंत तेंविं बाहिर
विहरे तो तीजपाशीं प्राणांचा ईश्वर ॥ १ ॥

---

६५९. पद ( चाल – करिन यदुमनीं सदना० )

( आख्यान – श्रीरामाचें-रावणवधार्थ विजयादशमीदिनीं प्रयाण )

विजय वितरुनी प्रणतीं ।
हर, निजजनपरिभव–विपत्ती ॥ ध्रु० ॥
अरिवध साधुनि पसरवि जगतीं
त्वदीया यशकीर्ती ॥ १ ॥

---

## ( २ ) संत

६६०. पद ( चाल – तूं माझा यजमान० )

( आख्यान – कबीराचें )

रामायण गाई । अनुदिन ॥ ध्रु० ॥
शतकोटी जो ग्रंथ तयाचा । बोध जनां देई ॥ १ ॥
सार मंथुनी ग्रंथोदधिचें । कुशलत्वें घेई ॥ २ ॥
ममत्व सारें अर्पुनि रामा । लोभ लया नेई ॥ ३ ॥
म्हणे विनायक कबिरचरित्रीं । मति कुंठित होई ॥ ४ ॥

---

६६१. पद ( चाल – तनु ईची सुंदरा० )

( आख्यान – कबीराचें )

सुंदरि स्थिर हो जरा । वाहवीं झरा । हृदयिं दाटुनि घे पाझरा । प्रेमामृतसरोवरिंचा खरा ॥ स्वकरीं तुज ओढुनी । जवळ घेउनी । वक्षःस्थळीं दृढ लगटवुनी । प्राशुं दे मधु अधर चुंफुनी ॥ कुचयुग मर्दुनी । गाल चुंबुनी । दृष्टि भिडवित नीवि खोलुनी । क्रीडुं दे निर्भर रतिशयनीं ॥

---

### ६६२. पद (कटाव)

(आख्यान – कबीराचें)

चंदनमंचक सिद्ध करोनी । सुमनांची सेज वरी रचोनी ॥
गाद्या परांच्या अंथरोनी । गिरद्या वरतीं मृदु ठेवोनी ॥
मच्छरदाणी विस्तारोनी । माळा फुलांच्या गुंतवोनी ॥
अत्तराचे दीप लावुनी । शाली शेले सितवस्त्रांनीं ॥
शयन आपुलें पैं सजवोनी । विडे अत्तरें पानसुपारी ॥
लवंगा वेलची जायपत्री । सुवर्णतबकीं भरलीं सारीं ॥
पक्कान्नांचीं ताटें कुसरीं । मांडुनि ठेविलीं अनुक्रमवारी ॥
घमघमाट त्यांचा भारी । नासिकापुटिं भरे अवसरीं ॥
सोन्यारुप्याचे पेले चमकती । आसवें मद्यें दरवळुनी येती ॥
मांसरसें जणुं पाट वाहती । मधुर सुगंधी पेयें अमिती ॥
मसाल्याचीं दुग्धें तापती । षड्रसांची अभिनव पूर्ति ॥
पेयपात्रें हिरेमाणकांचीं । शोभा देती अपूर्व साचीं ॥
रांग लागली असे दिव्यांची । पूर्णता तरि लखलखाटाची ॥
छतें झालरी बहु मोलाचीं । आरसे झुंबरें तसबिरीचीं ॥
गणती कोणा न करवे साची । असंख्यता भव्य गालिचांची ॥
तैशी महार्हवस्त्राभरणांची । प्रदर्शनें अमूल्य वस्तूंचीं ॥
शयनागारा । वाणी ऐशा करि शृंगारा ॥

---

### ६६३. पद (कटाव)

(आख्यान – रामदास-सोंवळा वैष्णव)

आचार्य सरंजाम घेउनी । संगें लोक यानिं बैसवुनी ॥
स्वयें पालखीपदस्थ होउनि । निशाणें पताका उभारोनी ॥

वस्त्रादिकीं मेणे सजवुनी । दिवट्या मशाली संग्रहोनी ॥
शंख कर्णे सनया तासे । थाट वाजंत्र्यांचा विलसे ॥
देवस्थानहि बरोबर असे । भृत्य-गणाची त्वरा दिसतसे ॥
पथक हयांचें मागुनि येतसे । थाट ऐसा शोभा देतसे ॥
अशा डौलानीं । निघताती स्वारी काढोनी ॥

---

## ६६४. पद ( चाल – प्रीति जी दुजावरी० )

( आख्यान – एकनाथांचें )

गुर्वनुग्रह नाथा झाला । ऐका त्या इतिहासाला । सुजन हो ॥ध्रु०॥
अडक्याचा तोटा आला । ताळा मुळीं न पडे भला । सुजनहो ॥
